शिवकालीन महाराष्ट्र

डॉ. अ. रा. कुलकर्णी



शिवकालीन महाराष्ट्र

सामाजिक - आर्थिक जीवनाचा अभ्यास

अ. रा. कुलकर्णी

प्राध्यापक, इमेरिटस् - इतिहास - पुणे विद्यापीठ

राजहंस प्रकाशन प्रा. लि.

शिवकालीन महाराष्ट्र
अ. रा. कुलकर्णी

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन प्रा. लि.
१०२५, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
फॅक्स : २४४३३७१९
E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Shivkaleen Maharashtra
A. R. Kulkarni

अक्षरजुळणी
रेखा ढोले
प्रिंट लिंक
७६९/५, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४

मुखपृष्ठ : आशुतोष बर्वे

आवृत्ती पहिली : १५ ऑगस्ट १९९३
आवृत्ती चौथी : सप्टेंबर २००९

ISBN 81-7434-089-0

किंमत : १५० रुपये

गुरुचरणांच्या स्पर्शाने काय चमत्कार होतो
याचे निरूपण करताना गुरुचरित्रात म्हटले आहे -

काक होय राजहंस ।।अ. २९:१६।।

माझ्या सामान्य विचारांना
राजहंसाचे गोजिरे रूप देणारे
माझे गुरू
प्राचार्य श्रीराम शर्मा
आणि
डॉ. पुरुषोत्तम महादेव जोशी
यांच्या पुण्य स्मृतीस अर्पण

ऋणनिर्देश

शिवकालीन महाराष्ट्र हा ग्रंथ सुधारित आणि वाढीव स्वरूपात अभ्यासक आणि जिज्ञासू वाचक यांच्यासमोर ठेवताना अनेक व्यक्तींचे साहाय्य झाले आहे. एकदा एका विषयावर लिहून झाल्यावर परत त्याच विषयावर लिहिण्याचा लेखकाला उत्साह नसतो; पण माझे विद्यार्थिमित्र, शिक्षक आणि काही इतिहासप्रेमी वाचकांनी वारंवार केलेल्या आग्रहामुळे मी हे पुनर्लेखनाचे काम काहीशा दिरंगाईनेच पुरे करीत आहे. या कामासाठी मला प्रवृत्त करणाऱ्यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

इतिहाससंशोधक डॉ. वि. त्र्यं. गुणे यांनी हस्तलिखित चिकित्सकपणे वाचून काही उपयुक्त सूचना केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

माझे मित्र प्रा. मनोहर आ. कुलकर्णी, पत्नी सौ. विजया कुलकर्णी यांनी प्रेसकॉपी तयार करण्याच्या कामी मोलाची मदत केली. त्याबद्दल मी त्याचा आभारी आहे.

'राजहंस' प्रकाशनाचे उत्साही संचालक श्री. दिलीप माजगावकर यांनी मित्रप्रेमामुळे या ग्रंथाच्या प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली त्याबद्दल मी त्यांचा आणि त्यांचे सहकारी यांचा सदैव ऋणी राहीन. मुद्रण, मुखपृष्ठ, सजावट, नकाशा आणि सूची यांसाठी अमोल साहाय्य करून या पुस्तकाची शोभा व उपयुक्तता वाढीस लावली त्या सर्वांचा मी आभारी आहे.

पुणे
शिवजयंती (सरकारी)
२४ एप्रिल, १९९३

अ. रा. कुलकर्णी

आशीर्वाद

देशाच्या इतर भागांच्या तुलनेत महाराष्ट्र हा ऐतिहासिक साधनसामग्रीच्या बाबतीत कमालीचा समृद्ध वारसा लाभलेला प्रदेश आहे. ही अर्थातच अभिमानास्पद गोष्ट आहे. ध्येयनिष्ठ आणि तळमळीच्या अशा गेल्या दोनेक पिढ्यांतील अभ्यासकांनी ह्या ऐतिहासिक सामग्रीचे मोठ्या परिश्रमाने संशोधन, संपादन आणि प्रकाशन केलेले आहे. ही प्रचंड साधनसामग्री नव्या अभ्यासकांना आवाहन करीत आहे. या नव्या अभ्यासकांनी या सामग्रीचे विश्लेषण करावे आणि त्याद्वारे आपल्या इतिहासाचे मान्य होईल, असे सुसंगत चित्र रेखाटावे, अशी अपेक्षा आहे. असे एक चित्र आपल्यासमोर ठेवण्याचा स्तुत्य प्रयत्न डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी प्रस्तुत ग्रंथात केलेला आहे. मोठ्या चाणाक्षपणाने त्यांनी 'शिवकालीन महाराष्ट्र' हाच निश्चित कालखंड व निश्चित भूप्रदेश आपल्या अभ्यासाकरिता निवडलेला आहे. त्यातही पुन्हा त्यांनी अत्यंत हुशारीने इ. स. १६३० ते १६८० असा आपला अभ्यासाचा कालखंड मर्यादित करून घेतलेला आहे. हे खरे आहे की या कालखंडाचा राजकीय इतिहास पुन:पुन्हा आणि चांगल्या रीतीनेही लिहिला जातो. तरीसुद्धा डॉ. कुलकर्णी यांनी प्रस्तुत ग्रंथात या कालखंडातील आर्थिक इतिहासांचे पुनर्रचित चित्र मांडताना नवी कारणमीमांसा संशोधिली आहे. ह्या त्यांच्या कार्यक्षेत्राकडे पूर्वकालीन अभ्यासकांचे लक्ष गेलेले नव्हते, असे मुळीच नाही; पण त्यांना उपलब्ध असलेली साधने अपुरी होती. पूर्वसूरींहून डॉ. कुलकर्णी यांचे वेगळेपण असे की त्यांनी नव्याने उपलब्ध झालेल्या समग्र साधनसामग्रीच्या आधारे आपल्या विषयाची मांडणी केली आहे. परिणामी ते आपल्या संकल्पनेचे परिपूर्ण चित्र तर रेखाटू शकलेच, पण ते सलग आणि स्वीकारार्ह होईल याचीही त्यांनी दक्षता घेतली आहे.

या विषयाच्या पूर्वीच्या अभ्यासकांवर अशा इतिहासाची मांडणी करताना अन्य भागातील पूर्वसिद्ध इतिहासलेखनाचा आणि अन्यत्र उपलब्ध असणाऱ्या परिस्थितीविषयक

ज्ञानाचा प्रभाव असणे अत्यंत स्वाभाविक आहे. तसेच आपण निर्देशित करीत असलेल्या सामाजिक संस्थांचे ज्यांना मुळात परिपूर्ण आकलनच झालेले नाही, अशाही पूर्वकालीन लेखकांचा त्यांच्यावर प्रभाव असणे स्वाभाविक आहे. याउलट प्रस्तुत ग्रंथाच्या पानापानातून आपणास असे दिसेल की, डॉ. कुलकर्णी यांनी समकालीन पुराव्यांनाच आपली कहाणी निवेदित करण्याची मुभा दिलेली आहे. अशा प्रकारचा प्रयोग हे अत्यंत अवघड आणि कठीण काम असते. उपलब्ध पुराव्यांवरच सामाजिक संस्थांचा परिचय करून देण्याचे काम सोपविणे, हे काही सोपे काम नव्हे. वरवरची निरीक्षणे आणि उथळ अनुमाने बाजूला ठेवली तरच अशा संस्थांचे यथातथ्य स्वरूप चितारता येते, असे डॉ. कुलकर्णी अत्यंत विश्वासाने व आग्रहाने प्रतिपादन करताना दिसतात. सर्व घटितांचे परामर्ष घेणारे स्पष्टीकरण देण्याचा ते प्रयत्न करतात - मात्र ती घटिते नि:संशय सिद्ध झालेली असतात.

आजपावेतो चालत आलेल्या महाराष्ट्र प्रदेशातील अस्सल मराठी संस्था फार्सी नावानिशी ओळखल्या जातात, ही एक विलक्षण गोष्ट आहे. ह्यावरून असे दिसते की ह्या संज्ञा फार्सी भाषेचा येथील राज्यकारभारात वापर सुरू झाल्यावर तरी अस्तित्वात आलेल्या आहेत किंवा अशा सामाजिक संस्थांच्या प्रत्यक्ष वर्णनाची गरज परकीय राजसत्तेला असण्याच्या प्रकारातून तरी त्या जन्म पावल्या आहेत. मराठी शब्दांच्या जोडीला नव्या फार्सी संज्ञा देण्यामध्ये प्रचलित वापर शक्यतो अडचणीत येऊ नये, अशी सद्भावना असावी. मौजा (खेडे), खुर्द (लहान), कसबा (छोटे शहर), मजरा (वस्ती) ह्या फार्सी संज्ञांचा सहज वापर मराठीतील वाडी, पाडी आणि खाडी या संज्ञांप्रमाणे केला जात होता. पाटील, कुलकर्णी, देशमुख आणि देशपांडे या सर्वांना 'वतनदार' फार्सी ह्या संज्ञेने ओळखले जात होते. यात एक दुहेरी धोका संभवतो. एक म्हणजे इतरत्र प्रचलित असणाऱ्या सामाजिक संस्था महाराष्ट्रातही प्रचलित करण्यासाठी आयात केल्या गेल्या आणि दुसरे म्हणजे ह्या संज्ञा केवळ महाराष्ट्रातीलच काही विशिष्ट जनरीतींचा निर्देश करण्यासाठीही वापरल्या गेल्या असाव्यात. डॉ. कुलकर्णी यांनी हे दोन्ही टोकाचे धोके अत्यंत हुशारीने टाळले आहेत. त्यांनी ह्या सामाजिक संस्था मराठमोळ्या वातावरणात अभ्यासण्याचा व त्यांचे महाराष्ट्रातले 'मराठीपण' विशद करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सतराव्या शतकातील सार्वजनिक अर्थकारणाचे वर्णन करताना प्रस्तुत लेखकाने आधुनिक परिभाषेचा वापर केलेला आहे. तरीही कारभार व अन्य अधिभार व्यवस्था समजावून देताना लेखकाने त्यांचे तत्कालीन देशी स्वरूप आहे तसेच ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. अशा खटपटीत वाचक कल्पकतेच्या हवेत तरंगण्याची खूप शक्यता असते. तथापि डॉ. कुलकर्णी वाचकांना परिचित असणारी आधुनिक परिभाषा वापरतात आणि आपले विवेचन एकाच वेळी वाचनीय व स्वीकारार्ह करण्याची दक्षता घेतात. हा त्यांचा प्रयत्न चांगलाच यशस्वी झालेला आहे.

भक्कम पुराव्याच्या अभावी निश्चित अनुमान काढण्याची शक्यता ज्या ठिकाणी नाही

(उदा. लोकसंख्येसंबंधाने काढावयाचे अनुमान), तेथे लेखकाने तशी प्रांजळ कबुली देण्याचे धैर्य दाखवले आहे. अशा प्रसंगी आपल्याला कल्पनेच्या साम्राज्यात भरकटत ठेवण्यापेक्षा लेखक स्वत:जवळील उपलब्ध पुरावे व त्यामधून अनुमाने काढण्याची आधुनिक पद्धती यांचा वापर करून एक संभाव्य चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करतो.

लेखकाने आपल्या तारतम्याचे विलोभनीय दर्शन अनेक ठिकाणी वाचकास दाखविलेले आहे. त्यांनी कोणताही पुरावा दुर्लक्षिलेला नाही. कोणत्याही पुराव्याची त्यांनी अफाट स्तुती केली नाही वा कोणत्याही पुराव्याला तुच्छ लेखले नाही. या बाबतीत आपल्या भावनेला त्यांनी जो आवर घातला आहे, तो स्पृहणीय आहे. आपल्या अभ्यासासाठी निवडलेल्या कालखंडाचे परिशीलन त्यांनी समग्र साधनांचा समर्पक उपयोग करून केलेले आहे.

नवे पुरावे उजेडात आणले नाहीत, म्हणून काही जण डॉ. कुलकर्णी यांना बोल लावण्याची शक्यता आहे. खरे तर एक प्रकारे हा डॉ. कुलकर्णी यांच्या पूर्वसूरींच्या कार्याचा गौरवच होय. या पूर्वसूरींनी नवे शोधण्यासारखे काही बाकी ठेवलेच नाही. छत्रपती शिवाजी महाराज व त्यांचा कालखंड या विषयाच्या अभ्यासकांच्या अथक परिश्रमांमुळे नवे संशोधन करण्याची डॉ. कुलकर्णी यांना मुळातच गरज पडली नाही. त्यांना फक्त विश्लेषण व यथायोग्य समन्वय साधण्याचे नाजूक काम करावे लागले. त्यांनी हे काम मोठ्या सौजन्याने पण विश्वासाने पार पाडून आपल्या अभ्यास-विषयाचे विश्वसनीय असे चित्र उभारलेले आहे. त्यांचा हा उपक्रम गौरवास्पद तर आहेच, पण त्यांच्या परिश्रमाचे सुयोग्य असे फलही त्यांना देणारा असाही आहे.

श्रीराम शर्मा

शिवकालीन महाराष्ट्राची जन्मकथा

'शिवकालीन महाराष्ट्र' हे माझ्या गेल्या ३५/४० वर्षांच्या संशोधनाचे फलित आहे. आज मागे वळून पाहताना या विषयावर संशोधन करण्याचा विचार मनात आला तेव्हापासूनचे दिवस आठवतात. सोलापूरच्या दयानंद कॉलेजचे नामांकित मध्ययुगीन इतिहासतज्ज्ञ तसेच राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक प्राचार्य श्रीराम शर्मा यांनी सुचविलेला '१९१९ च्या कायद्याने निर्माण झालेल्या द्विदल राज्यपद्धतीचे मुंबई इलाख्यातील कार्य' हा विषय अथवा प्रा. ह. धी. संकालियांनी सुचविलेला 'अग्निपुराण - सामाजिक जीवन' हा विषय धडपड करूनही मनात रुजू शकले नाहीत. शेवटी 'शिवकालीन महाराष्ट्र : सामाजिक, आर्थिक अभ्यास' असा विषय मी पक्का केला आणि १९५४ पासून त्या विषयाच्या प्राथमिक तयारीला लागलो. याच सुमारास अहमदनगर कॉलेजमधील माझी नोकरी सुटली, आणि पुण्यात, एम. ई. एस. कॉलेज (आताचे गरवारे कॉलेज) आणि गोखले इन्स्टिट्यूट मध्ये नोकऱ्या मिळाल्या; पण त्यांचा स्वीकार करणे आर्थिक नुकसानीचे होते. प्रा. शर्मा यांनी मला २०० रु. पगाराची साहायक प्राध्यापकाची नोकरी दिली आणि सोलापूरच्या दयानंद कॉलेजात मी दाखल झालो. १९५४ ते १९६३ हे सोलापुरातील नऊ वर्षांचे वास्तव्य माझ्या व्यक्तिमत्त्वविकासाच्या दृष्टीने अत्यंत फलदायी ठरले.

सोलापुरात स्थिर झाल्यावर संशोधनाच्या कार्याला मोठ्या उत्साहाने प्रारंभ केला. शिवाजी आणि मराठ्यांचा इतिहास हा संशोधनाचा विषय असल्याने पुण्यात येणे, तेथील इतिहासतज्ज्ञांची भेट घेणे क्रमप्राप्त होते. अर्थशास्त्र हा माझ्या अभ्यासाचा प्रमुख विषय होता. त्यामुळे साहजिकच शिवकालीन महाराष्ट्राचा आर्थिक अभ्यास हा माझ्या संशोधनाचा केंद्रबिंदू बनला होता. प्रा. शेजवलकर हे त्या वेळचे डेक्कन कॉलेजमधील मराठ्यांच्या इतिहासाचे एक अग्रगण्य इतिहासकार. त्यांचा माझा पूर्वपरिचय नव्हता,

मी त्यांना पाहिलेलेही नव्हते. मी त्यांच्या भेटीस डेक्कन कॉलेजमध्ये गेलो आणि माझा प्रस्ताव मांडून मार्गदर्शनाची अपेक्षा केली. त्यावर ते ताडकन म्हणाले, ''कसला आर्थिक अभ्यास? काही कागदपत्र वाचून तुम्ही काहीतरी निष्कर्ष काढाल, लिहाल, आणि ते आम्हांला वाचावे लागेल, तेव्हा या भानगडीत तुम्ही पडू नका.'' असे बोलून त्यांनी चर्चेचे सारे दरवाजे बंद केले आणि मला एक प्रकारे कायमचा निरोप दिला. या वागण्याचा अर्थ मला कळला नाही. कदाचित श्रीराम शर्मांचा विद्यार्थी म्हणून त्यांनी असा पवित्रा घेतला असावा, असा एक पुसटसा विचार मनात येऊन गेला.

त्यानंतर रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांना मी कामशेतला एक पत्र टाकले, आणि भेटीची इच्छा व्यक्त केली. आश्चर्य म्हणजे, उलटटपाली त्यांचे भेटीस येण्याची तारीख आणि वेळ ठरवलेले पत्र आले. प्रा. शेजवलकरांनी निर्माण केलेले मनातील नैराश्य दूर झाले; आणि मी दुसऱ्याच दिवशी कामशेतला सकाळीच त्यांच्या इंद्रायणीकाठच्या टुमदार बंगलीत दाखल झालो. दारातच सरदेसाई लाकूड फोडीत होते. प्रथमदर्शनीच का कोणास ठाऊक ते मला एकदम दादोजी कोंडदेवांसारखे वाटले.

"हा माझ्या नित्याचा व्यायाम आहे, तुम्ही आत बसा.'' असे कपाळावरचा घाम पुसत त्यांनी मला सांगितले. थोड्याच वेळात स्नान आटोपून ते बैठकीच्या दालनात आले आणि माझे म्हणणे शांतपणे पूर्ण लक्ष देऊन ऐकले आणि म्हणाले, ''अरे वा! तुमचा विषय नवा आहे, आम्ही केले त्याच्यापेक्षा तुम्ही काहीतरी नवीन करता आहात, चांगले आहे.'' असे म्हणून ते उठले आणि भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाचा एक अंक घेऊन आले आणि म्हणाले, ''आत्ताच हा अंक आला आहे आणि यात शिवाजीच्या अर्थकारणाविषयी बराच मजकूर आहे. माझ्याकडे दोन प्रती आहेत, तुम्ही हा अंक घ्या.'' तो 'शिवचरित्र साहित्या'चा ९ वा खंड होता. हा एक प्रकारे गुरुप्रसादच होता. आवळसकरांनी संपादित केलेल्या या ९ व्या खंडाचा मी माझ्या प्रबंधात पुढे विपुल प्रमाणात वापर केला आहे.

रियासतकारांनी त्या दिवशी मला आग्रहपूर्वक थांबवून घेतले, आपल्या पंक्तीचा लाभ दिला, आणि 'संध्याकाळपर्यंत येथे थांबून माझे ग्रंथालय पहा' असे सांगून ग्रंथालयात मला सोडून ते विश्रांतीसाठी आत गेले. मराठ्यांच्या इतिहासावरील, चौफेर व्यवस्थित लावलेले ग्रंथ पाहून मला अल्लाउद्दिनाच्या गुहेत शिरल्याचा आनंद झाला. एकेक ग्रंथ काढून त्याचा तपशील मी उतरवू लागलो. विश्रांतीसाठी म्हणून गेलेले रियासतकार मधून मधून ग्रंथालयाच्या कक्षात येत, मला काही पुस्तकांची नावे सांगत, आणि ती कोठे सापडतील ते सांगून जात. माझ्या प्रबंधाची ग्रंथसूची अशा रीतीने सरदेसाई यांच्या घरी तयार झाली.

दिवस मावळू लागला. मला पुण्याची गाडी गाठावयाची होती, म्हणून मी रियासतकारांचा निरोप घेण्यासाठी गेलो, तेव्हा ते म्हणाले, ''तुम्ही कामशेतला काही दिवस येऊन राहू शकता, माझ्या ग्रंथालयाचा उपयोग करू शकता. येथे राहण्याची व्यवस्था होईल, जेवणाची व्यवस्था तुम्हांला करावी लागेल. कामशेत गावांत ती होईल.'' इत्यादी.

माझ्या कामाविषयी त्यांनी दाखविलेल्या आस्थेची ही शिदोरी मला शेवटपर्यंत पुरली. माझा प्रबंध यदुनाथ सरकार आणि रियासतकार सरदेसाई यांनी पहावा अशी माझे गुरू श्रीराम शर्मा यांची फार इच्छा होती, पण माझा प्रबंध पूर्ण होण्यापूर्वीच ही पक्व झालेली पाने गळून पडली. ते जर माझा प्रबंध वाचायला हयात असते, तर पुढे त्या प्रबंधाची जी परवड झाली ती थांबली असती, माझ्या जीवनातली चार वर्षे वाचली असती, आणि मी चार वर्षे पुढे गेलो असतो. शिवाजी महाराजांच्या मार्गाप्रमाणे त्यांच्या जीवनावर बेतलेल्या प्रबंधाचा मार्गही खडतर झाला होता.

सोलापूर हे अध्यापनाचे आणि पुणे हे अध्ययनाचे माझे केंद्र बनले. ग. ह. खरे यांनी मला माझ्या कार्यात खूप मदत केली, आणि खऱ्या अर्थाने ते माझे 'संशोधकाचे मित्र' बनले. शंकरराव जोशी हे शिवकालीन सामाजिक व्यवस्थेचे चांगले जाणकार होते. शां. वि. आवळसकर हे कोकणच्या इतिहासाची उकल अतिशय समर्पकपणे करून दाखवीत. या सर्व संशोधकांशी वारंवार केलेल्या चर्चेमुळे आर्थिक व्यवस्थेचे कितीतरी पदर मला सुलभपणे उलगडता आले. संस्था, चालीरीती, कारभार पद्धती, शब्दांचे विशिष्ट काळातील आणि प्रदेशातील अर्थ समजावून घेण्यास या विद्वानांची फार मदत झाली. त्यांच्या सहवासात गेलेला काळ अविस्मरणीय आहे.

कॉलेजची शिकविण्याची आणि इतर व्यावसायिक कामे, सोलापूरच्या सार्वजनिक जीवनातील स्वखुषीने स्वीकारलेली कामे, जोपासलेले छंद आणि वेळात वेळ काढून प्रकाशकाच्या मागणीवरून लिहिलेले पहिलेवहिले पाठ्यपुस्तक 'भारतीय संस्कृती दर्शन' (१९५९) या सर्वांतून मार्ग काढून सतत परिश्रमाने सिद्ध केलेला प्रबंध १९६० साली पुणे विद्यापीठात सादर केला. प्रा. श्रीराम शर्मा यांची इच्छा आपल्या विद्यार्थ्यांचा प्रबंध, विशेषत: शिवाजीवरचा प्रबंध ज्येष्ठ इतिहासकाराकडून तपासला जावा अशी होती. सरकार-सरदेसाई या त्यांच्या आवडत्या इतिहासकारांना काळानेच पटावरून दूर केल्याने, त्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार आणि प्रा. र. पु. पटवर्धन या ज्येष्ठ तज्ज्ञांची नावे सुचविली; पण काही कारणांमुळे त्या दोघांनीही हे काम स्वीकारले नाही. त्यामुळे म.म.द.वा. पोतदार आणि डॉ. पु.म. जोशी या तितक्याच तोलामोलाच्या तज्ज्ञांकडे हा प्रबंध १९६० साली गेला. याच सुमारास प्राचार्य श्रीराम शर्मा निवृत्त होऊन पंजाबमध्ये उना या आपल्या गावी जाऊन स्थायिक झाले. मला कोणी वाली राहिला नाही. डॉ. जोशी यांनी आपला अहवाल योग्य वेळी सादर केला. त्यांनी काही सुधारणा सुचविल्या होत्या. हा अहवाल पाहावयास मिळाल्याने मला त्यांच्या सूचना योग्य वाटल्या. त्यांची गाठ घेणे आणि त्यातूनही त्यांच्याशी संवाद साधणे हे फार कठीण काम होते; पण हिंमत धरून मी त्यांना भेटलो आणि ''तुमच्या सूचना मला योग्य वाटतात आणि प्रबंध सुधारताना त्यांचा मी उपयोग करीन'' असे सांगितले. त्यांना बरे वाटले आणि ते म्हणाले, ''चुका मान्य करून भेटणारा तुझ्यासारखा तरुण संशोधक दुर्मीळ, तेव्हा तुला प्रबंध ठीकठाक करण्यासाठी काही मदत हवी असेल तर मी करीन.'' आपला शब्द त्यांनी पाळला. मला उपलब्ध नसलेली माहिती टंकलिखित करून पाठविली.

प्रबंध प्रविष्ट करून वर्ष दीड वर्ष झाले. निकालाची काही गंधवार्ता नाही. याच सुमारास पोतदार पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झाले. पोतदारांना पत्रे लिहिली, मित्राकरवी निरोप धाडले, पण पोतदार तारासुद्धा उघडीत नसत, तेथे पत्रे म्हणजे झाडपाला. माझ्या एका नातेवाइकांनी आचार्य अत्रे यांच्या कानावर ही गोष्ट घातली, आणि अत्र्यांनी त्यांना ताबडतोब पत्र टाकले. त्या पत्राला मात्र पोतदारांनी दोन ओळींचे उत्तर लिहून हे काम आपण लवकरच पुरे करीत असल्याचे कळविले. अत्र्यांनी ते पत्र माझ्या नातेवाइकांना पाठविले; आणि दोघांनाही आता हे काम मार्गी लागले याचे समाधान वाटले. पण प्रत्यक्षात काहीच घडत नव्हते. शेवटी पोतदार रशियास दोन-तीन महिन्यांसाठी गेल्याचे आणि जळगावच्या प्रा. या. शि. महाजनांची हंगामी कुलगुरू म्हणून नेमणूक झाल्याचे वाचले. प्रा. महाजनांना सर्व हकिगत मी पूर्वीच सांगितली होती, आणि त्यांनी पोतदारांना माझ्यासाठी विनंतीही केली होती. शेवटी वैतागून प्रा. महाजनांना मी एक पत्र लिहिले आणि प्रबंध विद्यापीठाकडून माघार घेण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली.

१९६३ साली मी सोलापूर सोडून औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागात रुजू झालो होतो. एस. आर. डोंगरकेरी हे कुलगुरू होते. त्या वेळी विद्यापीठ हे बाल्यावस्थेतले होते. त्यामुळे वातावरण अगदी मोकळे होते. डोंगरकेरींच्या सल्ल्यानुसारच मी प्रबंधाची मागणी केली होती. मराठवाडा विद्यापीठात शिक्षकांच्या बाबतीत डॉक्टरेटच्या नियमात काही सवलती दिल्या होत्या. त्यांना दोन वर्षांऐवजी एका वर्षात प्रबंध सादर करता येत असे. कुलगुरूंच्या सल्ल्यानुसार मी डॉक्टरेटसाठी नाव नोंदविले. विषय तोच पण थोडेसे नामांतर केले.

पुणे विद्यापीठातील हंगामी कुलगुरूंनी माझ्या पत्रावर निर्णय घेतला, आणि पोतदार रशियात श्रोत्यांना 'मित्रहो' असे संबोधून व्याख्याने देत असताना, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव वसंतराव गोळे यांनी पोतदारांच्या निवासस्थानातून प्रबंधाची प्रत - ज्याचे रॅपरदेखील सुखरूप होते - आणि विद्यापीठाकडे असलेल्या प्रती मला औरंगाबादेस पाठविल्या. चार वर्षांच्या बंदिवासातून काहीही न्याय न मिळता त्या प्रती बाहेर आल्या होत्या. 'आग्र्याहून सुटके'चा आनंद मला झाला.

वर्षाचा कालावधी संपताच मराठवाडा विद्यापीठात 'महाराष्ट्र इन द एज ऑफ शिवाजी' हा प्रबंध १९६४ मध्ये सादर केला. डॉ. पु.म. जोशी यांची माझे 'अंतर्गत मार्गदर्शक' म्हणून विद्यापीठाने नेमणूक केली. विद्यापीठाच्या कामासाठी डॉ. जोशी बऱ्याच वेळा औरंगाबादेस येत. त्यांच्याशी चर्चा करून, त्यांनी संमत केल्यानंतर तो प्रबंध मी विद्यापीठात सादर केला. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. चिटणीस यांनी सेतुमाधवराव पगडी यांचे नाव परीक्षक म्हणून सुचविले; पण त्यांनी हे काम स्वीकारले नाही. प्रबंध जेव्हा पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाला, तेव्हा मात्र त्यांनी शिवकालीन अर्थव्यवस्था जाणून घेण्यासाठी आपल्या इंग्रजी शिवचरित्रात माझे पुस्तक वाचावे अशी उदारपणे शिफारस केली.

अद्याप दुर्दैवाचे दशावतार संपले नव्हते. पगडी यांच्याऐवजी दुसऱ्या कोणाची नियुक्ती करावी असा विचार चालू असता, प्रबंधाचे दुसरे परीक्षक नागपूरचे डॉ. एच. एन. सिन्हा हे निधन पावल्याचे वृत्त आले, आणि त्यांच्याकडे पाठविलेला प्रबंध त्यांच्या पत्नीने विद्यापीठाकडे सखेद परत पाठविला. पगडींच्या ऐवजी ग.ह. खरे यांचे नाव पुढे आले, पण त्यास कुलगुरूंनी ते पदवीधारक अथवा कोणत्याही विद्यापीठात प्राध्यापक नाहीत या सबबीवर विरोध केला. एवढ्यात डोंगरकेरींची कुलगुरुपदाची मुदत संपली, आणि डॉ. एन.आर. तावडे यांची त्या जागी नेमणूक झाली. डॉ. तावडे हे पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक तेव्हा इतिहासविभागप्रमुखांनी सुचविलेली दोन नावे ग.ह. खरे आणि धारवाडचे डॉ. जी.एस. दीक्षित ते स्वीकारतील असे वाटले होते; पण डॉ. तावडे हे धारवाडहूनच औरंगाबादला आल्याने, त्यांनी डॉ. दीक्षितांच्या ऐवजी डॉ. पी.बी. देसाई या ज्येष्ठ इतिहासकाराचे नाव सुचविले. दोन्ही परीक्षकांनी अविलंब प्रबंध तपासला आणि आपले अहवाल सादर केले. सर्वांच्या सोयीचे पुणे हे मौखिक परीक्षेचे केंद्र ठरले आणि शेवटी १९६४ अखेर मी एकदाचा 'डॉक्टर' बनलो. अशी तयारीची ६-७ वर्षे, आणि पदवी मिळविण्यात गेलेली ५ वर्षे असे माझे एक तप या पदवीसाठी खर्ची पडले.

१९६० साली प्रबंध सादर केल्यानंतर मी डेक्कन कॉलेजात मराठ्यांच्या इतिहासाच्या प्रपाठकाच्या जागेसाठी मुलाखतीस गेलो होतो. आप्पासाहेब पवार, न.र. फाटक, पोतदार हे निवडसमितीचे सदस्य होते; पण डॉक्टरेट नाही म्हणून मला ती जागा मिळाली नाही. इतर दोघांनाही मिळाली नाही. प्रपाठक (रीडर) नाही, पण व्याख्याता म्हणून तरी माझी निवड केली जाईल अशी अपेक्षा होती. मुलाखती संपल्यावर आम्ही तिघे शेजवलकरांच्या खोलीत गेलो. निवृत्त झाल्यावरदेखील ते नित्यनियमाने कॉलेजात येत असत. समितीचा काय निर्णय होणार याची आम्हांला कल्पना नव्हती, पण माझा अनुभव वगैरे बाबी लक्षात घेऊन शेजवलकर म्हणाले की, "ही जागा तुला मिळायला हवी." संशोधनाच्या भानगडीत पडू नको असे म्हणणारे शेजवलकर मला आपले उत्तरदायित्व करण्याची संधी देणार हे ऐकून मी धन्य झालो.

१९६०-६५ या कालखंडात डेक्कन कॉलेजातली ती जागा तशीच रिकामी राहिली होती. या जागेची वृत्तपत्रातली जाहिरात वाचून मराठवाडा विद्यापीठातर्फे मी अर्ज केला, आणि कसलीही अडचण न येता म.म. पोतदार असलेल्या निवडसमितीने माझी निवड केली. कारण मला मराठ्यांच्या इतिहासात डॉक्टरेट होती. राज्याभिषेकामुळे शिवछत्रपतींना जसा आनंद झाला असेल तसे मला झाले. पण ज्यांच्या आशीर्वादाने मी माझ्या नव्या पदाची सूत्रे घेणार होतो ते प्रा. शेजवलकर मात्र हयात नव्हते आणि सरदेसाई यांना जाऊन एक दशक होऊन गेले होते. मात्र मनाला सुखावणारी एक गोष्ट म्हणजे डॉ. पु.म. जोशी हे पुराभिलेख खात्याचे संचालक पदावरून निवृत्त होऊन डेक्कन कॉलेजात 'मध्ययुगीन भारता'चे प्राध्यापक म्हणून रुजू झाले होते, त्यांच्याबरोबरीने काम करण्याची आता मला संधी मिळणार होती. त्यांचा सहवास एक सहकारी आणि मित्र म्हणून नंतर दोन दशकांहून अधिक काळ मला लाभला; आणि त्यांच्याबरोबर काम करण्याचा आनंद

तर मिळालाच, पण अनेक गोष्टी शिकता आल्या. माझ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यास या साऱ्याचे साहाय्य झाले. हे सारे योगायोगाने घडत गेले. शिवकालीन महाराष्ट्रावर मी जी व्याख्याने दिली, आणि ती पुस्तकरूपाने शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केली तेव्हा 'एक उमदे, सतत प्रेरणा देणारे, आनंदी व्यक्तिमत्त्व म्हणून' डॉ. जोशी यांना ते पुस्तक मी समर्पण केले.

प्रबंध मान्य झाल्यावर तो प्रसिद्ध व्हावा आणि लोकांच्या समोर यावा असे मला वाटणे स्वाभाविक होते. मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. तावडे यांनी प्रकाशनासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून भरघोस अनुदान मिळवून दिले. ग्रंथ प्रकाशित झाला, परंतु देशी-विदेशी विद्वानांपर्यंत तो जाऊन पोहोचला नाही. या ग्रंथापासून मला आर्थिक फायदा तर झाला नाहीच पण खूप मनस्ताप झाला. या ग्रंथावर आधारित दिलेल्या व्याख्यानाच्या पुस्तकांच्या शिवाजी विद्यापीठाने फक्त ३५० प्रती काढल्या, पण त्या काही थोड्या काळातच संपल्या. विद्यापीठाकडे मागणी करूनही लोकांना पुस्तक मिळेना आणि १९७८ साली निघालेले 'शिवकालीन महाराष्ट्र' हे पुस्तक लवकरच दृष्टीआड झाले. माझ्या अनेक मित्रांच्या मागणीवरून जुन्या आवृत्तीत बरीच सुधारणा करून व भर घालून मी हे पुस्तक नव्याने अभ्यासकांपुढे ठेवीत आहे. इंग्रजी पुस्तकाच्या पुनरावृत्तीचा योग येईल तेव्हा येवो, पण मराठीत लिहिल्याने मूळ मराठी पत्रांचा आशय आणि त्यांची ताकद, जी इंग्रजी भाषेत पकडणे कठीण जाते, ती मला जाणकारांच्या पुढे मांडता आली, आणि मला हे 'मराठी लेणे' खोदता आले.

अशी आहे या 'शिवकालीन महाराष्ट्रा'च्या जन्माची कहाणी.

पुणे
२६ जानेवारी १९९३

अ. रा. कुलकर्णी

प्रास्ताविक

छत्रपती शिवाजी महाराज हा महाराष्ट्राचा एक मानदंड आहे. सतराव्या शतकात त्यांनी मराठी राज्याची स्थापना केली, पण त्यांच्या अकाली निधनामुळे संपूर्ण मराठी मुलूख त्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणता आला नाही. सभासद बखरीत म्हटल्याप्रमाणे, 'साल्हेरी किल्ल्यापासून गोदावरी नदीअलीकडे कुलदेश वरघाट, तळघाटपावेतो एक प्रांत व तुंगभद्रेपलीकडे देखील कोल्हार, बाळापूर, चंदी, येलूर, सदर कावेरीपावेतो हा एक प्रांत असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे.' या वर्णनानुसार मराठी राज्याचे दोन प्रमुख विभाग कल्पिले होते; स्वराज्य आणि चंदीचे राज्य हे ते दोन विभाग. मराठी मुलूख 'स्वराज्यात' तर कर्नाटकातील त्यांनी संपादिलेला मुलूख 'चंदी' अथवा कर्नाटकात मोडतो. नाशिक, कोल्हापूर, सातारा, पुणे, कुलाबा, ठाणे, रत्नागिरी या आजच्या महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतील काही भाग या मराठी मुलखात अथवा स्वराज्यात मोडत होता. तुंगभद्रा ते कावेरी नद्यांमधील कोल्हार, बाळापूर, जिंजी, येलूर या भागाला चंदीचे राज्य म्हणत असत.

शिवाजीराजांचे राज्य हे महाराष्ट्रातील काही भागांपुरतेच मर्यादित असले तरी मराठी भाषिकांचा, मराठी संस्कृतीचा प्रदेश याहून बराच मोठा होता. या प्रदेशावर जरी परकीयांची सत्ता होती तरी तेथील मराठी संस्कृती नष्ट झाली नव्हती. त्यामुळे प्रस्तुत ग्रंथात केवळ शिवाजीराजाच्या वर्चस्वाखाली असलेल्या महाराष्ट्राचाच विचार केला नसून ज्या मराठी भागाची साधने उपलब्ध आहेत त्यांचाही विचार केला आहे. शिवाजी महाराज ही एक असामान्य विभूती सतराव्या शतकात मराठी मुलखात होऊन गेली. म्हणून या कालखंडाचे 'शिवकालीन महाराष्ट्र' असे नामाभिधान केले तर ते अप्रस्तुत न ठरावे.

मराठी सत्तेचा उदय

सतराव्या शतकात मराठी सत्तेचा उदय कसा झाला या बाबतीत इतिहासकारांत मतभेद आहेत. मराठ्यांच्या समग्र इतिहासाचा पहिला आंग्ल इतिहासकार जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ याने १८२६ साली प्रसिद्ध झालेल्या आपल्या ग्रंथात मराठ्यांचा उदय हा इतिहासातील एक अपघात आहे, सह्याद्रीच्या जंगलात पालापाचोळा पेटून एखादा वणवा (conflagration) निर्माण व्हावा तशातला हा प्रकार आहे, असे विधान अपुऱ्या साधनांच्या अभावी तर्करूपाने मांडले आहे. त्याचे मत हा सिद्धांत म्हणून मानणे योग्य होणार नाही. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी मराठी सत्तेची नैतिक भूमिका मांडण्याच्या हेतूने 'मराठी सत्तेचा उदय' (Rise of the Maratha Power) या नावाचा जो अभिजात ग्रंथ लिहिला त्यात ग्रँट डफच्या विधानाला अप्रत्यक्षरीत्या उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते मराठी सत्तेच्या उदयाला अखिल मराठी जनतेने केलेले प्रयत्न प्रामुख्याने कारणीभूत आहेत. शिवाजी महाराजांच्या जन्माच्या सुमारास मराठी मुलखात सामाजिक, धार्मिक, राजकीय परिवर्तन घडून येत होते, आणि या जागृतीमुळे सारा समाज त्यांच्या महान कार्यात सामील होण्यास फारसा विलंब लागला नाही. थोडक्यात, जागृत मराठी माणूस हे स्वराज्याच्या चळवळीचे प्रेरणास्थान होते. त्याचे सारे श्रेय एकट्यादुकट्या व्यक्तीला न देता ते साऱ्या मराठी जनतेला दिले पाहिजे. अर्थात समाज जागृत असला तरी संघटित असतोच असे नाही. त्याला नेतृत्वाची आवश्यकता असते, आणि ती गरज शिवाजी राजांसारख्या कुशल संघटकाने पुरविली आणि स्वराज्याचे स्वप्न साकार झाले.

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी जयराम पिंड्ये रचित 'राधा माधव विलास चंपू' या शिवकालीन ग्रंथाचे संपादन करून त्याला जी प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली आहे, त्यात दख्खनच्या राजकारणात मराठ्यांचा प्रवेश कसा झाला याचे मोठे मार्मिक आणि बुद्धीला पटण्यासारखे विवेचन केले आहे. त्यांच्या मते अहमदनगरच्या निजामशाहीत 'दख्खनी' आणि 'परदेशी' अथवा 'अफाकी' अथवा 'घारीब' असे मुसलमान सरदारांचे दोन गट होते आणि ते परस्परात वर्चस्वासाठी भांडत असत. मुसलमानांच्या या दरबारातील भांडणाला कंटाळून निजामशहाने आपली सत्ता बळकट करण्यासाठी दरबारातील मराठी माणसांना आपल्या हाताशी धरले. अशा रीतीने 'मराठ्यांचा पक्ष' या नावाने एक नवा पक्ष दख्खनच्या राजकारणात उदयास आला आणि त्यातूनच पुढे मालोजी, शहाजी यांसारखी कर्तृत्ववान मराठी माणसे उदयाला आली.

सतराव्या शतकात महाराष्ट्र देश बहमनी राजवटीच्या अवशेषात विभागलेला होता. या मुसलमानी सत्तांना मराठ्यांच्या साहाय्यानेच मुलकी आणि लष्करी कारभार चालविणे क्रमप्राप्त होते. दख्खनच्या राजकारणात मराठ्यांचा प्रवेश झाल्याने त्यांना राजकारणाचे प्रत्यक्ष धडे मिळू लागले; त्यांचा आत्मविश्वास वाढला, आणि स्वतंत्रपणे राज्य करण्याची त्यांची आकांक्षा बळावली. या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांच्या कार्याचा आपण विचार केला म्हणजे सतराव्या शतकात स्वराज्य स्थापण्यास राजकीय परिस्थिती

कशी अनुकूल बनत चालली होती याची कल्पना येते.

शहाजी

प्रस्तुत संदर्भात शिवाजी राजांच्या कार्यात त्यांचे पिताजी शहाजी महाराज यांनी कितपत हातभार लावला, या बाबतीत विद्वानांत मतभिन्नता असल्याचे आढळून येते. 'राधा माधव विलास चंपू' या शहाजी राजाच्या जीवनावर रचलेल्या काव्याच्या आधारे, आणि एकंदरीत त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन राजवाडे असा निष्कर्ष काढतात की, 'शिवाजीचा पूर्वावतार जो शहाजी त्याच्या कर्तबगारीवर शहाजीचा पश्चादवतार जो शिवाजी त्याने आपल्या कर्तबगारीची इमारत उठवून दिली.' जयराम पिंड्येने शहाजी महाराजांचे वर्णन दक्षिणेचा रक्षक असे केले आहे. या काव्यात अशी एक कल्पना मांडली आहे की परमेश्वर जेव्हा ब्रह्मदेवाला पृथ्वीचे रक्षण कोण करणार असे विचारतो तेव्हा तो म्हणतो,

अरू उत्तर दछन रछन को इत ।
साहजु है उत साहिजहाँ ॥२॥

याचा अर्थ असा की उत्तरेकडील प्रदेशाचे रक्षण करण्यास शहाजहाँ आणि दक्षिणेचे रक्षण करण्यास शहाजी आहे.

राजवाडे यांनी केलेली शहाजीच्या कार्याची मीमांसा प्रा.न.र. फाटक यांना मान्य नाही. त्यांच्या मते परकीयांच्या चाकरीत ज्याचा जन्म गेला त्या आपल्या पित्यापासून शिवाजी राजांना कसलीही प्रेरणा मिळाली नाही. 'महाराज स्वयंभू होते.'

शहाजी महाराजांनी मराठी सत्तेच्या उत्कर्षास काहीच हातभार लावला नाही, हे विधान एकांगीपणाचे आहे, शिवाजी महाराजांना 'अवतार' बनविणाऱ्या बखरकारांच्या विधानाला उचलून धरणारे आहे. शिवाजी राजांच्या कारकीर्दीची मुहूर्तमेढ रोवण्यास शहाजी राजे कसे कारणीभूत झाले यासंबंधी शिवकालीन कवी कवींद्र परमानंद यांनी एक सूचक श्लोक रचला आहे. अहमदनगरची निजामशाही जेव्हा मुघल आणि आदिलशाही यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे १६३६ साली नष्ट झाली. तेव्हा निजामशाहीच्या मुलखाचा बटवारा शहाजी राजाने या दोन विजयी सत्तांमध्ये केला. त्यासंबंधी परमानंद म्हणतो,

ततो निजाम विषयं शाहः स्वविषयं विना ।
दिल्लीन्द्राय ददौ कंचित येदिलायच कंचन ॥९.२०॥

याचा अर्थ असा की निजामशाहीचा बटवारा करताना शहाजीराजाने 'स्वविषयं विना' म्हणजे जहागिरीदाखल मिळालेला स्वतःचा प्रदेश वगळून त्यांनी निजामशाहीचा काही भाग दिल्लीपतीला व काही आदिलशहाला दिला. यावरून स्पष्ट होते की निजामशाही आणि आदिलशाही मुलखात चाकरी करीत असताना पुणे, सुपे, इंदापूरची जी जहागीर

भोसल्यांना मिळाली होती, तो सारा भूप्रदेश १६३६ च्या बटवाऱ्याने ठेवला होता. म्हणजेच शिवाजी राजांच्या कार्याचा प्रारंभच एका स्वतंत्र भूप्रदेशाचा अधिपती म्हणून झाला. शहाजी राजांच्या या मुत्सद्देगिरीकडे, चाणाक्षपणाकडे, मराठी सत्तेच्या उदयाची कारणमीमांसा करताना दुर्लक्ष करून चालणार नाही. या मूळच्या जहागिरीचा विस्तार पुढे आपल्या कर्तबगारीने शिवाजी राजांनी केला आणि 'मराठी राज्य' उदयाला आले. शिवाजी राजांचा समकालीन चरित्रकार कृष्णाजी अनंत सभासद म्हणतो, 'राज्य म्यां शिवाजीने चाळीस हजार होनांचा जो पुणे महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचे राज्य पैदा केले'. (सभासद पृ. १०७) बखरकाराने येथे 'राज्य' हा शब्दप्रयोग पुणे महालाच्या संदर्भात केला आहे, 'पुण्याची जहागीर' असे म्हटले आहे. यावरून शहाजी राजांनी आपल्या पुत्राला स्वराज्याचा प्रारंभच करून दिला होता हे सिद्ध होते; आणि म्हणूनच वयाच्या अवघ्या १५/१६ व्या वर्षी शिवाजीराजे आपली 'विश्ववंदिता' आणि 'भद्राय राजते' असे विचार व्यक्त करणारी राजमुद्रा प्रचलित करू शकले.

शिवकाल

न्यायमूर्ती रानडे यांनी मराठी सत्तेच्या उत्कर्षाची मीमांसा करताना असे म्हटले आहे की, मराठी राज्याची स्थापना ही शिवाजी महाराजांकडून झालेली या देशाची थोर सेवा होय. पण या विधानाला थोडीशी पुष्टी जोडली पाहिजे. केवळ राज्य स्थापून ते स्वस्थ राहिले नाहीत, तर हे नूतन मराठी राज्य 'सुजलाम् सुफलाम्' कसे होईल, त्याचा आर्थिक पाया कसा बळकट होईल, हे राज्य कसे टिकून राहील, याचाही त्यांनी विचार केला. आणि हीच त्यांची थोर देशसेवा होय. अमात्यांच्या शब्दांत सांगावयाचे झाले तर, त्यांनी 'नूतन सृष्टीच निर्माण केली' असे म्हणावे लागेल.

शिवाजी महाराजांच्या राजकीय कर्तृत्वाचा काळ तसा छोटा आहे. १६५६ साली त्यांनी जावळी मारली तेव्हापासूनच त्यांच्या स्वराज्यविस्ताराच्या कार्याला प्रारंभ झाला असे म्हणता येईल. १६५६ ते १६८० या २४ वर्षांच्या कालखंडात त्यांच्यावर अफझल प्रसंग, शाईस्तेखान प्रसंग, आग्रा भेट यांसारखी जीवावर बेतणारी महान अरिष्टे येऊन गेली. त्यातून ते निभावून गेले, आणि राज्याभिषेक करून घेऊन छत्रपतिपद भूषविले. सभासद म्हणतो, 'गागाभट्ट संतुष्ट जाले. भट गोसावी यांचे मते मुसलमान बादशहा तक्ती बसून छत्र धरून पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यांनीही चार पादशाही दबाविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गडकोट असे (मेळविले) असतां त्यांस तक्त नाही. या करितां मराठा राजा छत्रपती व्हावा असे चित्तांत आणिले.' पुढे कर्नाटक दिग्विजय करून त्यांनी मराठी राज्याची पताका दक्षिणेत फडकाविली. हे अवघे २४ वर्षांच्या कालावधीत साध्य केले. वास्तविक पाहता व्यक्तीच्या जीवनात २४ वर्षांचा काळ हा फार मोलाचा असतो; पण राष्ट्राच्या जीवनात तसे असत नाही. मात्र महाराष्ट्राची गोष्ट थोडीशी निराळी आहे. महाराष्ट्राच्या जीवनात ही २४ वर्षेच अत्यंत मोलाची ठरली आहेत; आणि त्यामुळेच मराठी माणूस ३०० वर्षांनंतरही शिवाजी

राजाला विसरू शकत नाही.

शिवाजी राजांच्या राजकीय कामगिरीचा आराखडा आता सर्वश्रुत आहे. ते केवळ वीरशिरोमणीच नव्हते, तर कुशल संघटक आणि संयोजकही होते. त्यांच्या काळात समाज कसा होता, आणि त्याच्या हितासाठी त्यांनी काय कार्य केले हे समजावून घेणे आवश्यक आहे. एखादी व्यक्ती राज्यशकट बदलू शकेल, पण परंपरागत, रूढीग्रस्त अशा समाजाला चुटकीसरशी बदलणे शक्य नव्हते. मात्र सामाजिक जीवनात सुधारणा करण्याची कामगिरी एखादीच व्यक्ती करू शकते. त्या दृष्टीने देखील महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन झाले पाहिजे. प्रस्तुत ग्रंथात शिवकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाच्या काही अंगांची चर्चा केली असून त्या संदर्भात महाराजांनी केलेल्या कार्याचा विचार केला आहे. सामाजिक-आर्थिक इतिहास हा प्रामुख्याने लोकांचा इतिहास असतो, आणि त्यात राजकीय इतिहासाला गौण स्थान असते. प्रस्तुत ग्रंथात प्रामुख्याने शिवकालीन महाराष्ट्रातील लोकजीवनाचा विषय आला आहे.

साधनसामग्री - स्वदेशी साधने

शिवकालीन महाराष्ट्राचा सामाजिक-आर्थिक इतिहास लिहिण्यास पुरेशी आणि सुसंगत साधने उपलब्ध नसल्याने येथे जे काही चित्र रेखाटले आहे ते पूर्ण चित्र अथवा संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र असा दावा लेखकाचा नाही. तसेच शिवकालीन महाराष्ट्र म्हणजे शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र संभाजी, राजाराम यांचा कालखंड असे येथे गृहीत धरले आहे. त्यामुळे १६८० नंतरच्या पत्रांचाही काही ठिकाणी वापर करणे अपरिहार्य ठरते. पुढील कागदपत्रांत अनेक वेळा मागील घटनांचा उल्लेख येत असल्याने सामाजिक-आर्थिक इतिहासाच्या निवेदनात काही वेळा काळाचे बंधन शिथिल करावे लागते. इतिहासाचार्य राजवाडे, भारत इतिहास संशोधक मंडळ आणि अन्य व्यक्ती व संस्था यांच्या कार्यामुळे बरीच साधने उपलब्ध झाली आहेत आणि त्यांतील बरीचशी प्रसिद्धही झाली आहेत. या साधनांत घराण्यांच्या कागदांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागेल. राजवाडे यांनी अपार कष्ट उपसून अशी घराण्यांची कागदपत्रे उजेडात आणली. कागदपत्रे देण्यास राजे-रजवाडे, जहागीरदार, सरदार फार खळखळ करीत. त्यावर ते संतापून म्हणत, 'पूर्वजांनी संपादिलेल्या जहागिरी व राज्ये भोगण्यास राजी, आणि त्यांचे पराक्रम आणि इतिहास जाणण्यास गैरराजी.' लोकांचा विरोध सहन करून त्यांनी शिवकालीन घराण्यांची काही कागदपत्रे उजेडात आणली. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या त्यांच्या मालेच्या २२ खंडांपैकी ८, १५, १६, १७, १८, २०, २१ हे खंड शिवकालाच्या अभ्यासकाला फार मोलाचे आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रसिद्ध केलेल्या 'शिवचरित्र साहित्य' या मालेतील १४ खंड हे सामाजिक आणि आर्थिक इतिहासाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांना अत्यंत उपयुक्त आहेत. याखेरीज मंडळाच्या नियतकालिकांतून आणि अन्य ग्रंथांतून तसेच इतर संस्थांच्या नियतकालिकांतून आणि ग्रंथांतून बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. जेधे शकावली,

जेधे करीना, रामचंद्र पंत अमात्यांचे आज्ञापत्र या साधनांचाही या प्रकारच्या इतिहासासाठी उपयोग करणे आवश्यक आहे.

इतिहासकार बखरींना दुय्यम दर्जाचे साधन मानतात. राजवाडे म्हणत की, 'एक अस्सल चिटोरे सर्व बखरींच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे.' हे जरी खरे असले तरी बखरीत आपल्या लोकांनी आपल्या लोकांचा इतिहास लिहिला असल्यामुळे तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. स्वजनांचा स्वत:च्या इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आपल्याला बखरींच्या द्वाराच कळून येतो. कथानायकाचे चरित्रगायन हा जरी बखरींचा मुख्य हेतू असला तरी समकालीन बखरी सामाजिक आणि आर्थिक जीवनाविषयीही आपल्याला काही सांगून जातात. त्या दृष्टीने कृष्णाजी अनंत सभासदाचे शिवचरित्र, वाकनीस-मलकारे यांची ९१ कलमी बखर आणि काही अंशी मल्हार रामराव चिटणीसांची 'सप्तप्रकरणात्मक बखर' यांना अगदीच त्याज्य मानून चालणार नाही.

शिवकालात मराठी वाङ्मय देखील बरेच बहराला आले होते. रामदास, तुकाराम हे संतशिरोमणी याच कालात होऊन गेले. त्यांचे लिखाण जरी पारमार्थिक अथवा पारलौकिक विषयासंबंधीचे असले तरी ज्या समाजात ते वावरत होते त्या समाजाचे प्रतिबिंब त्यांच्या लिखाणात पडणे अनिवार्य होते. मात्र सामाजिक-आर्थिक इतिहासासाठी कणाकणाने या साहित्यांतून माहिती गोळा करावी लागते. त्यांतील अतिशयोक्तीचा आणि अलंकाराचा भाग झाडून टाकावा लागतो; आणि निर्भेळ सत्य तेवढे टिपावे लागते.

थोडक्यात, घराण्याची कागदपत्रे, बखरी आणि साहित्यिक कलाकृती या मराठी साधनांना, मराठी मन आणि मराठी समाज समजावून घेण्यास इतर सर्व साधनांत अग्रपद दिले पाहिजे.

समकालीन संस्कृत साधनांत परमानंदाचे 'अनुपुराण' अथवा 'शिवभारत', जयराम पिंड्ये याचे 'राधा माधव विलास चंपू' आणि 'पर्णालपर्वत ग्रहणाख्यान' इत्यादी काव्यांचा काही अंशी उपयोग सामाजिक-आर्थिक इतिहासासाठी होतो. मात्र ही साधने फार काळजीपूर्वक वापरली पाहिजेत.

परदेशी साधने

परदेशी साधनांत काही बाबतीत अग्रक्रम प्रवाशांच्या वृत्तांतांना दिला पाहिजे. सतराव्या शतकात तीसाहून अधिक प्रवासी भारतात येऊन गेले. हे प्रवासी इंग्लंड, इटली आणि फ्रान्स या देशांतून प्रामुख्याने आले होते. यांपैकी कोणी व्यापारी, कोणी वैद्य, कोणी वकील, कोणी धर्मगुरू, कोणी सैनिक, कोणी खलाशी, कोणी साहसी प्रवासी अशा भिन्न भिन्न पेशांतील होते. सामाजिक-आर्थिक इतिहासाच्या अभ्यासकाला स्वदेशी साधनांत न आढळणारी माहिती हे प्रवासी पुरवितात. अर्थात त्यांचे इतिहासाचे, भूगोलाचे, स्थानिक भाषांचे, लोकांच्या चालीरीतींचे, रूढींचे संभाव्य अज्ञान लक्षात घेऊनच त्यांनी पुरविलेल्या माहितीची पारख आपल्याला करावी लागेल; परंतु लोकांचे

पोशाख, त्यांच्या सवयी, त्यांचे दैनंदिन जीवन, बाजारभाव, सामाजिक सुखसोयी, प्रवासातील अडचणी, अधिकाऱ्यांची वर्तणूक, दळणवळणाची साधने इत्यादी गोष्टींविषयी जेव्हा ते लिहितात तेव्हा इतिहासाच्या अभ्यासकाला त्याचा फार उपयोग होतो. कारण, स्वजनांना या गोष्टी नित्याच्या आणि सामान्य वाटत असल्याने त्यांची नोंद ते घेत नाहीत, पण आपल्याला तर त्यांची माहिती हवी असते.

सतराव्या शतकात भारतात जरी तीसाहून अधिक प्रवासी आले असले तरी त्यांपैकी अगदी मोजकेच प्रवासी महाराष्ट्राच्या या भूमीवरून गेले होते. कदाचित महाराष्ट्राची डोंगराळ भूमी आणि या प्रदेशातील लोकांचे दारिद्र्य परदेशी प्रवाशांना आपल्याकडे आकर्षून घेत नसावे. त्यामुळे परदेशी प्रवाशांच्या वृत्तांतातून महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक जीवनाची फारच त्रोटक अशी माहिती आपणास मिळते. हे प्रवासी मोगल अथवा पोर्तुगीजांच्या समृद्ध भूमीतून प्रवास करणे अधिक पसंत करीत असावेत. तरीसुद्धा डॉ. जॉन फ्रायर, कॅरेरी, थिवॅनो, ॲबे कॅरे, ट्रॅव्हर्नियर, डेलाँ या महाराष्ट्रात आलेल्या प्रवाशांच्या वृत्तांतांतून आपल्याला लोकांच्या सामाजिक-आर्थिक जीवनासंबंधी काही तुरळक संदर्भ मिळतात.

डॉ. जॉन फ्रायर हा महाराष्ट्रात आलेला एक महत्त्वाचा प्रवासी होय. त्याच्या प्रवास-वृत्तांतामुळे मराठी राज्याचे संस्थापक शिवाजी महाराज यांच्याकडे आपले लक्ष वेधले गेले असे ईस्ट इंडिया कंपनीचा इतिहासकार ऑर्म म्हणतो. १६७२ ते १६८१ या कालखंडात तो भारत आणि इराण या विभागात होता. मुंबई, वसई, ठाणे, कल्याण, जुन्नर, वेंगुर्ला, कारवार या ठिकाणांना त्याने भेटी दिल्या होत्या. कॅरेरी या इटालियन वैद्यक शास्त्रज्ञाने वसई, घोडबंदर, कान्हेरी, चौल, दाभोळ, फोंडा, गलगले, चिक्कोडी, मुधोळ, बेळगाव या गावांचा उल्लेख आपल्या वृत्तांतात केला आहे.

ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी १६७२ ते १६७४ मध्ये भारतात होता. कोकण प्रांतात त्याने भेट दिली होती. एक चिकित्सक आणि घटनांच्या कालपटाची अचूक माहिती असलेला प्रवासी अशी त्याची ख्याती होती. थिवॅनो याला भूगोलाचे चांगले ज्ञान होते. १६६५ ते ६७ या काळात तो दक्षिणेत होता. डेलाँ हा फ्रेंच प्रवासी कोकणात आणि गोव्याच्या भागात हिंडला होता. या सर्व प्रवाशांच्या वर्णनातून महाराष्ट्राचे काहीसे दर्शन आपणास घडते.

इंग्रजांनी पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वखारी थाटल्या होत्या. त्यांच्या दैनंदिन पत्रव्यवहारातून अनेक राजकीय आणि आर्थिक घडामोडींची माहिती येत असे. यातील बराचसा भाग 'दि इंग्लिश फॅक्टरीज् इन इंडिया' या मालेत प्रसिद्ध झाला आहे. तसेच भारत इतिहास संशोधक मंडळाने प्रसिद्ध केलेला 'इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी' हा साधनग्रंथ शिवकालाच्या राजकीय आणि आर्थिक इतिहासाच्या अभ्यासकाला फार महत्त्वाचा आहे. प्रवाशांचे वृत्तांत अथवा फॅक्टरी रेकॉर्डस् हीच केवळ शिवकालीन इतिहासाची परदेशी साधने आहेत असा कृपया ग्रह करून घेऊ नये. सतराव्या शतकासंबंधी पोर्तुगीज, डच आणि काही अंशी फ्रेंच भाषेत किती विपुल साधने उपलब्ध

आहेत याची लेखकाला कल्पना आहे. तीच गोष्ट फार्सी साधनांची. परंतु संशोधकावर भाषांच्या ज्ञानाच्या मर्यादा पडत असल्याने, जी साधने आपल्याला स्वतंत्रपणे हाताळता येतील; आणि ज्या परदेशी साधनांची इंग्रजीत भाषांतरे उपलब्ध असतील त्यांचाच येथे वापर केला आहे.

असे असले तरी सामाजिक आणि बऱ्याच अंशी आर्थिक व्यवहार, एक परदेशी व्यापार सोडला तर, जाणून घेण्यास स्थानिक भाषेतील साधने फार मोलाची असतात असे साधनचिकित्सेवरून दिसून येते.

थोडक्यात, मराठी, संस्कृत आणि परदेशी साधनांच्या साहाय्याने शिवकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक जीवनाचा स्थूल आराखडा तयार करणे शक्य आहे. इतिहासात घटना कालानुक्रमाने मांडावयाच्या असतात; परंतु सामाजिक इतिहासात तसे करणे योग्य त्या साधनांच्या अभावी कठीण जाते. प्रस्तुत ग्रंथात त्यामुळे शिवकालीन महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनाच्या वर्णनाला प्राधान्य दिले आहे.

अ. रा. कुलकर्णी

दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

पहिल्या आवृत्तीला इतिहासाचे महाराष्ट्रातील प्राध्यापक, अभ्यासक आणि अन्य सामान्य वाचक यांचा प्रतिसाद मिळाल्याने ही दुसरी आवृत्ती काढण्याचा योग येत आहे. या आवृत्तीत फक्त सूचीची भर घातली असून अनवधनाने ज्या काही लहान-सहान त्रुटी राहून गेल्या होत्या त्या दुरुस्त केल्या आहेत. सूची राहिली होती ती घातली आहे.

सूचीचे काम पत्नी सौ. विजया कुलकर्णी यांनी केले आणि राजहंसचे धडाडीचे प्रकाशक दिलीप माजगावकर यांनी ही पुनर्मुद्रित आवृत्ती त्वरेने काढली त्याबद्दल त्या दोघांचे मन:पूर्वक आभार मानतो.

अ. रा. कुलकर्णी

अनुक्रम

शिवकालीन गावगाडा

सतरावे शतक हे दख्खन देशाच्या इतिहासात विशेष क्रांतिकारक ठरले. या शतकात दक्षिणेत राजकीय बदल मोठ्या प्रमाणात झाले. दख्खनच्या राजकारणावर मराठ्यांचा प्रभाव मालोजी-शहाजीच्या कालापासून पडत होता. त्याचीच परिणती पुढे शिवछत्रपतींच्या काळात मराठी सत्तेच्या स्थापनेत झाली. राजकीय बदलाबरोबरच त्याचे परिणाम स्थानिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनावर पडणे स्वाभाविक होते. या दृष्टीने शिवपूर्वकालीन ग्रामीण जीवन अथवा गावगाडा कशा स्वरूपाचा होता आणि मराठी स्वराज्याच्या कालात त्यात काही बदल घडले होते का याचा विचार करणे आवश्यक आहे.

साधने

गावगाड्याचा अभ्यास करण्यासाठी विविध प्रकारच्या साधनांचा विचार करता येईल. या साधनसामग्रीत काही समकालीन अथवा प्राय:-समकालीन, साधनांचा समावेश होतो. घराण्यांची कागदपत्रे, खाजगी आणि बिनसरकारी स्वरूपाचा पत्रव्यवहार, बखरी, साहित्य इत्यादी साधनांच्या साहाय्याने गावगाड्याचे धागेदोरे जुळविता येतात.

या सर्व साधनसामग्रीत घराण्याच्या कागदपत्रांना अग्रस्थान दिले पाहिजे. इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी घराण्यांचे कागदपत्र जमविण्याचा अविश्रांत उपक्रम केला आणि आपल्या हयातीत 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या मालेत २२ खंड प्रसिद्ध केले आणि त्यांच्या पश्चात त्यांनी जमविलेल्या साधनांतून आणखी चार खंड प्रसिद्ध करण्यात आले. या २६ खंडांतून सुमारे ७६०० पृष्ठांचा मजकूर अभ्यासकांना उपलब्ध झाला आहे. यात अनेक घराण्यांच्या पत्रांचा आणि त्यावरील विवेचक प्रस्तावनांचा समावेश आहे.

कागदपत्रांच्या युगाला खरी सुरुवात राजवाडे यांच्यापासूनच झाली असे म्हणावे लागेल. इतिहासाला त्यांनी पूर्वीच्या काव्याच्या आणि बखरींच्या कालातून आजच्या शास्त्राच्या कालात आणून सोडले. प्रारंभी त्यांच्या या कार्याची हेटाळणी झाली. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रांना प्रसिद्ध समकालीन कादंबरीकार हरिभाऊ आपटे 'तेला-तुपाची पत्रे' म्हणून हिणवीत. पण नंतरच्या काळात लोकांना या पत्रांचे महत्त्व कळू लागले आणि राजवाडे यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात निरनिराळ्या संस्थांनी आणि संशोधकांनी असंख्य कागद जमा केले, आणि त्यांपैकी काही प्रसिद्धही केले. महाराष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहिण्यासाठी ही प्रसिद्ध आणि अप्रसिद्ध साधने अत्यंत मोलाची आहेत.

या कागदपत्रांतून कज्जे खटले, वाटणीपत्रे, हकिगती, कैफियती, निवाडपत्रे, याद्या, सनदा, शेतीच्या व्यवहारासंबंधीचे कागद, याद्या, ग्रामपंचायत, गोतसभा यांचे व्यवहार इत्यादी विविध प्रकारची पत्रे आढळतात आणि त्यापासून समाजजीवनाचे विविध पैलू अभ्यासकाच्या निदर्शनास येतात. गावगाड्याचे स्वरूप, त्याचे कामकाज आणि सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनातील त्याचे स्थान आपल्याला अशा प्रकारच्या साधनांतून प्रामुख्याने कळून येते.

खेडे

सतराव्या शतकात आणि त्यापूर्वीच्याही काळात सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू म्हणजे खेडे होते. शेती व्यवसाय हाच जीवनाचा प्रमुख मार्ग असल्याने बहुतांशी लोक प्रामुख्याने त्यावरच अवलंबून असत. त्यामुळे खेड्याला अग्रस्थान तर होतेच, पण तेथील लोकसंख्येचे प्रमाणही आजच्या खेड्याच्या मानाने अधिक होते असे दिसते. कसबे अथवा व्यापारी ठाणी त्यामानाने कमी होती.

खेड्यांची वसाहत कशी झाली हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. काही साहसी लोकांनी स्वयंभूपणे अथवा राजाज्ञेवरून जंगले तोडून, साफसफाई करून तेथील जमीन लागवडीस आणली असावी; आणि त्यातूनच खेड्यांची वसाहत झाली असावी असे स्थूलमानाने म्हणता येईल. सतराव्या शतकात सरकारी प्रलोभनामुळे, उजाड पडलेल्या खेड्यांची पुनर्वसाहत झाल्याची उदाहरणे आढळून येतात. अशी ही खेडी क्रमशः विस्तार पावत गेली असावीत.

खेड्याच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या भूपृष्ठाचे प्रामुख्याने दोन विभाग केले जात. पहिला, वसाहतीची जागा अथवा पांढरी किंवा पांढरी आई आणि दुसरा, लागवडीची जागा अथवा काळी किंवा काळी आई. ग्राम, देहे, मौजा इत्यादी विविध नावांनी खेड्याचा उल्लेख केला जात असे. खेड्याच्या अंतर्गत काही उपविभाग असत. त्यांना मजरा, वाडी, पाडी, खारी इत्यादी नावे होती. एखाद्या उपनगराचा काही वेळा विस्तार होऊन त्याचे एका खेड्यातच रूपांतर होई; पण असे झाले तरी त्या खेड्याचे मूळ नाव बदलत नसे. ही दोन खेडी स्वतंत्र आहेत हे दर्शविण्याकरिता 'बुद्रुक' अथवा 'बृहत्' आणि 'खुर्द' अथवा 'लघु' या संज्ञांचा उपयोग केला जाई. हा मूळ गाव 'बुद्रुक' आणि

नवा गाव 'खुर्द' म्हणून ओळखला जाई. उदाहरणार्थ मोसे बुद्रुक आणि मोसे खुर्द अथवा नेवासे बुद्रुक आणि नेवासे खुर्द इत्यादी.

गावाच्या उपनगरला मजरा अथवा वाडी म्हणत. काही वेळा गावातील काही कुटुंबे स्वत:च्या शेतात अथवा मळ्यात जाऊन राहत. त्या अनुषंगाने आणखी काही लोक चाकरीच्या निमित्ताने जात व तेथे एक छोटीशी वसाहतच तयार होत असे. त्यालाच मजरा अथवा वाडी म्हणत. उदाहरणार्थ, मौजे मोसे बुद्रुक याचे साडवघर आणि पाखरशेत असे दोन मजरे होते. (रा. खं. १५.२७०). कोकणात अशा उपनगराला 'पाडी' म्हणत, आणि समुद्र किनाऱ्यानजीकच्या गावांच्या उपनगरांना 'खारी' म्हणत. मजरा, वाडी, पाडी, खारी हे सारे समानार्थी शब्द आहेत.

कसबा म्हणजे कसबी, हुन्नरी लोकांचे गाव. या ठिकाणी आठवड्याचा बाजार भरत असे, आणि पंचक्रोशीतील गावकरी बाजारहाटासाठी कसब्यात येत. कारागीर आपल्या वस्तू विक्रीसाठी बाजारात आणीत आणि कसब्याच्या पेठेत हे खरेदी-विक्रीचे व्यवहार होत. पेठ वसविण्याची जबाबदारी एखाद्या व्यक्तीवर सोपविली जाई आणि या कामासाठी त्याला जमीन इनाम मिळत असे. बंदराच्या ठिकाणी असलेल्या व्यापारी शहराला 'मिरे' म्हणत.

गावचे रहिवासी

गाव हा एक व्यवस्थित जुंपलेला असा घटक होता. जमीन हेच निर्वाहाचे एकमेव साधन असल्याने ज्यांना गावात जमीन असे तेच गावचे प्रमुख रहिवासी असत. यात गावचे वंशपरंपरा अधिकारी, जमिनीचे मालक आणि ग्रामसेवक यांचाच प्रामुख्याने समावेश होत असे. काही कामानिमित्त अथवा मोलमजुरी करून निर्वाहासाठी येणाऱ्या लोकांची तुरळक वस्तीही गावात असे; परंतु त्यांच्या मालकीची जमीन नसे अथवा गावकीच्या व्यवहारात त्यांना काही अधिकार नसत.

सामान्यत: गावात चार प्रकारच्या सत्ता रूढ होत्या. पहिली दिवाणसत्ता. यात हवालदार, कारकून इत्यादी राज्याधिकारी मंडळी असत आणि त्यांच्या मार्फत राजा आपली सत्ता बजावीत असे. दुसरी आणि गावाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची सत्ता म्हणजे गोत सत्ता अथवा ग्रामाधिकाऱ्यांची सत्ता, यालाच देशसत्ता असेही म्हणत. यात गावचे वतनदार अधिकारी, रयत, बलुतेदार यांचा समावेश होई. ही राजसत्तेहून भिन्न आणि स्वतंत्र व समर्थ असे आणि प्रसंगी राजसत्तेलाही हिचा हेवा वाटत असे. सामाजिकदृष्ट्या ही सत्ता महत्त्वाची होती.

तिसरी सत्ता म्हणजे ज्ञातिसत्ता अथवा धर्मसत्ता असून ही देखील स्वतंत्र व श्रेष्ठ असे. या संदर्भात अलिबागकडील भंडारी कोळी ज्ञातीने शिवाजी महाराजांना एका ज्ञातीच्या भांडणाच्या निमित्ताने दिलेले उत्तर महत्त्वाचे आहे. ते म्हणतात, 'आमच्या ज्ञातिधर्माचे आम्ही धनी, आमची न्यायमनसुबी सरकारांत न्यावयासी प्रयोजन नाही.' (मराठेकालीन समाजदर्शन पृ.३)

चौथी सत्ता म्हणजे व्यापारी सत्ता, आणि वरील सत्तांप्रमाणे ही देखील स्वतंत्र व श्रेष्ठ असे. या दृष्टीने अथणीच्या शेट्टींनी छत्रपतींशी केलेला ठराव उद्‌बोधक आहे. त्यात म्हटले आहे :

> "गुन्हेगार नफरासी सीर मारावे असे सिके जाहले असेल (म्हणजे सरकारी निर्णय झाला असेल) तरी दैव सांगून पाठविलीया (पेठकरी मंडळींनी सांगितले तर) त्या नफरास सोडून दिले पाहिजे."(मराठेकालीन समाजदर्शन पृ. ३)

ज्यांना गावकीचे वंशपरंपरागत अधिकार असत आणि ज्यांना या कामासाठी सरकारातून जमीन मिळत असे, आणि ज्यांना गावात मानाचे स्थान असे, गावापासून ज्यांना काही हक्क प्राप्त होत असत अशा लोकांना 'देशक' म्हणत. हे गावचे कायमचे रहिवासी होत. जमिनीच्या मोबदल्यात ते गावकीची विविध प्रकारची कामे करीत. गावकामगार आणि राज्याचे अधिकारी यांचे खेड्यातील स्थान भिन्न स्वरूपाचे असे. हवालदार, मुजुमदार, कमाविसदार, कारकून इत्यादी राज्याधिकारी हे तात्पुरते नेमलेले असत. देशक या सदरात देशमुख अथवा देसाई, देशपांडे अथवा देशकुलकर्णी, पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन, महार इत्यादींचा उल्लेख केलेला आहे. थोडक्यात, ग्रामाधिकारी हे शाश्वत, तर राज्याधिकारी हे अशाश्वत अधिकारी होते.

ज्या देशकांच्याकडे गावची सनदी अथवा इतर कामे असत, आणि ज्यांना कामासाठी शेतसारा माफ असे अशा लोकांना 'वतनदार' म्हणत. वतन हा अरेबिक शब्द असून महाराष्ट्रात तो वंशपरंपरेने आणि शाश्वतपणे उपभोगावयाची सारामुक्त जमीन अशा अर्थी वापरला जातो. या वतनात चाकरी अभिप्रेत असल्याने या प्रकाराला 'चाकरी वतन'ही म्हणत असत. वतनदाराला सामान्यत: आपल्या गावची चाकरी करावी लागे आणि आवश्यकतेनुसार राजाज्ञेनुसार वतनाच्या बाहेर जाऊनही काम करावे लागे. गावचे परंपरागत अधिकारी म्हणजे पाटील आणि कुलकर्णी हे होत. गावचा ठरलेला सारा वसूल करणे ही उभयतांची जबाबदारी असे. जमीनधारकांकडून वसूल झालेल्या साऱ्याचा हिशेब ठेवणे हे कुलकर्ण्याचे काम असे. वसूल झालेला सारा पाटील सरकारी कचेरीत भरणा करीत असे. सामान्य रयत आणि सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध नसे. पाटील हा या दोघांना जोडणारा दुवा होता.

वतनदारानंतरचा गावचा प्रमुख वर्ग म्हणजे मिरासदारांचा. यांना जमिनीवर आकारलेला सारा नियमाप्रमाणे द्यावा लागे. मिरासदार हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ वंशपरंपरेने जमिनीची मालकी उपभोगणारे जमीनदार असा होतो. यांनाच 'थळकरी' असेही म्हणत. 'थळ' हा 'स्थळ' या शब्दाचा अपभ्रंश.

पण ज्यांना गावात जमीन नसे, जे गावाला परके असत, ज्यांना कसल्याही प्रकारचे सामाजिक अथवा नागरिकत्वाचे हक्क नसत त्यांना 'उपरी' म्हणत. शेतावर अथवा गावात मोलमजुरी करून अथवा काही ठराविक मुदतीने जमीन कसण्याच्या करारानुसार

ते गावात राहत असत.

गावचा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे बलुतेदारांचा होय. गावची विविध प्रकारची सेवा हे बलुतेदार अथवा ग्रामसेवक करीत आणि या श्रमाचा मोबदला म्हणून गावच्या जमीनधारकांकडून त्यांना सुगीच्या काळात धान्योत्पादनाचा काही भाग दिला जात असे. याला 'बलुता' म्हणत. बलुतेदारांची संख्या बारा होती असे सामान्यपणे मानले जाते. पण प्रत्येक गावात १२ बलुतेदार असतील असे ठामपणे म्हणता येणार नाही. गावच्या गरजेप्रमाणे ही संख्या कमी-जास्त होत असे.

बलुतेदार हे गावचे प्रतिष्ठित नागरिक होते आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजात त्यांना हक्काने भाग घेता येत असे. गोतसत्तेच्या निवाडपत्रात त्यांची नावे त्यांच्या व्यावसायिक चिन्हासह अथवा निशाणीसह नोंदविली जात. ग्रामपंचायतीत ते वतनदार, मिरासदार यांच्याबरोबरीने बसत. परीट, न्हावी, कुंभार, सोनार, सुतार, तेली, लोहार, चांभार इत्यादी व्यावसायिकांचा 'बलुतेदार' या सदराखाली उल्लेख केलेला आढळतो. त्यांच्या चाकरीचा मेहनताना कोठेही निश्चितपणे सांगितलेला नाही. तो परंपरेने आणि रीतीरिवाजाप्रमाणे ठरविला होता. जोशी, गुरव, मुलाणा या व्यावसायिकांची वर्णी या वर्गातच लावलेली दिसते. समाजाच्या धार्मिक गरजा पुरविण्याचे काम ही मंडळी करीत, आणि त्याबद्दल त्यांना रोख पैसा, धान्य आणि क्वचित प्रसंगी सारामुक्त जमीनही दिली जात असे.

थोडक्यात, वतनदार, मिरासदार, बलुतेदार आणि उपरी ही गावगाड्याची चार प्रमुख चक्रे होत असे म्हणता येईल.

वतनदार

वतन या अरबी शब्दाचा वापर महाराष्ट्रात मुसलमानी अमलाच्या काळात रूढ झाला. सरकारकडून एखाद्या ग्रामाधिकाऱ्याला मिळालेली जमिनीची देणगी म्हणजे वतन होय. तत्त्वत: जोपर्यंत तो ग्रामाधिकारी गावचे काम पाही तोपर्यंत ती जमीन त्याच्याकडे राही; पण वस्तुत: ती जमीन व्यक्तीच्या मालकीची राहत नसून, कुटुंबाच्या मालकीची बनत असे, आणि जोपर्यंत कुटुंबातील एखादी व्यक्ती प्रामाणिकपणे आणि प्रभावीपणे गावची नोकरी करीत राही तोपर्यंत ती जमीन वंशपरंपरेने त्या कुटुंबातच राही.

वतनदारांचे पालनपोषण सारा गाव करीत असे. गावकऱ्याकडून त्याला रोख, ज्याला 'नख्त' म्हणत अथवा वस्तूच्या रूपाने ज्याला 'गला' म्हणत त्याच्या चाकरीचा मोबदला मिळत असे. हे त्याचे हक्क त्याच्या सनदेत नमूद केले असल्यामुळे गावकऱ्यांकडून त्यांची वसुली तो कायदेशीरपणे करून घेत असे. वतनदाराच्या या मोबदल्यास 'हकलाजिमा' असे म्हणत.

गावचा कारभार कार्यक्षम होण्यास या शाश्वत ग्रामाधिकाऱ्यांची अत्यंत गरज त्या काळात भासत असे. त्यामुळे राजवटीत जरी बदल झाला तरी वतनदार बदलत नसत.

कारण नव्या राजवटीला देखील या ग्रामाधिकाऱ्यांच्या सेवेची तितकीच निकड असे. निजामशाही अथवा आदिलशाही राजवटीत सत्ता उपभोगणारी वतनदार मंडळी शिवाजी राजांच्या काळात देखील सुरक्षित राहिली होती. शिवाजी राजांनी त्यांना काढून अन्य नेमणुका सहसा केल्या नाहीत.

सारावसुली आणि शेतीचा विकास ही वतनदारांची प्रमुख कर्तव्ये असली तरी गावाशी निगडित अशी इतर बरीच कामे त्यांना करावी लागत. उदाहरणार्थ, गावचे छोटे छोटे तंटेबखेडे हे गावकऱ्यांच्या सभेतच निकालात काढणे, गावच्या जत्रा अथवा स्थानिक उत्सव पार पाडणे, गावची वसाहत करणे, लावणी-संचणीच्या कामाकडे लक्ष पुरविणे, गावात शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे, संकटकाळी लोकांचे संरक्षण करणे ही या ग्रामाधिकाऱ्यांची जबाबदारी असे.

मराठी माणसाने आपल्या जीवनात वतनाला फार महत्त्वाचे स्थान दिले होते. राजकीय सत्ता प्राप्त करून घेण्याचे वतन हे एक साधन होते. वतनदारांचा योगक्षेम केवळ वतनावरच चालत असे. व्यक्तीचा सामाजिक दर्जा आणि प्रतिष्ठा यांचे वतन हे एक गमक होते. त्यामुळे दिवाणसत्तेतील अथवा सरकारातील उच्च पदापेक्षा लोक वतनच अधिक पसंत करीत. वतनाला इतके महत्त्व प्राप्त झाल्याने समाजातील भांडणतंट्याचे मूळ आपल्याला या वतन संस्थेतच आढळते. वतनावरील अधिकार-प्रत्याधिकार यातून कज्जा-खटल्यांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली. वतनामुळे गावात दंगेधोपे, कारस्थाने, हिंसक कृत्ये, खून, फसवेगिरी इत्यादी गुन्ह्यांना ऊत येत असे.

वतनसंस्थेमार्फत सत्तेचे विकेंद्रीकरण साधण्यात आले होते. स्थानिक बाबींचा निर्णय जिथल्या तेथे घेऊन केंद्रीय सत्तेकडे निर्णयासाठी जाण्यात होणारा विलंब टाळता यावा हाच या विकेंद्रीकरणाचा हेतू होता. थोडक्यात असे म्हणता येईल की गावच्या स्थैर्यासाठी आणि विकासासाठी सुनियंत्रित अशी वतनसंस्था ही मध्ययुगातील एक अनिवार्य संस्था होती. गावच्या प्रमुख वतनदारांत पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे-महाजन आणि देशमुख, देशपांडे या परगण्याच्या वतनदारांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

पाटील

पाटील हा गावचा राजा होय. यालाच 'ग्रामणी' अथवा 'ग्रामप' अशी संज्ञा होती. राजव्यवहार कोशात याला 'ग्रामगोपक' असे म्हटले आहे. गावचा हा वंशपरंपरागत अधिकारी असतो. कागदपत्रातून त्याचा उल्लेख गाव पाटील, मोकदम अथवा मोकदम पाटील असा आला आहे. मोकदम या शब्दाचा अर्थ पुढारी असाही आहे. कागदपत्रातून निव्वळ मोकदम असा जेव्हा उल्लेख येतो तेव्हा त्याचा अर्थ पाटील असा होतो; पण मोकदम पाटील असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा त्याचा अर्थ असा की गावात इतर पाटील असतील तर त्यांचा तो पुढारी आणि म्हणूनच गावचा सर्वाधिकारी होय.

पाटिलकीचा संबंध गावच्या वसाहतीशी असे. काळ्या जमिनीवर जेव्हा वसाहतीला

सुरुवात झाली तेव्हापासून पाटीलकीचा उदय झाला असे स्थूलमानाने म्हणता येईल. कागदपत्रातून 'काळीवर पांढर रचली' असा शब्दप्रयोग केलेला आढळतो तो पाटलाच्या वसाहतीच्या कार्याचा निर्देशक होय.

लावणी, संचणी, उगवणी ही पाटलाची प्रमुख कामे होत. गावातील पडीक अथवा वाजट जमीन लागवडीखाली आणून तिच्यातून धान्योत्पादन साधण्याचे काम पाटलाला करावे लागे. अशा रीतीने वसाहतीच्या कार्याला तो फार मोठ्या प्रमाणावर हातभार लावीत असे. राजव्यवहार कोशात म्हटले आहे :

'अकृष्ट भूमिर्नाकर्दिः कर्दिस्तु फलभूमिका'. म्हणजेच वर सांगितल्याप्रमाणे नाकीर्दी जमीन कीर्दीस आणून तिच्यापासून फलनिष्पत्ती घडवून आणणे ही पाटलाची जबाबदारी मानली जात असे. राजवाडे खंड १७ लेखांक २१ मध्ये पाटलाची कामे साररूपाने थोडक्यात सांगितली आहेत :

> "मौजे मलवलीची मोकदमी कदीम खेडकर याची पुढे राजक्रांत जाली. खेडकर परागंदा जाले. ठिकाण कोठे नाही. राजक्रांत निवारल्या उपरी तर्फ मजकूरची लावणी करावी असे जाले. याजकरिता महादुणेकर यास गावीची वसाहत जाली पाहिजे, लावणीही जाली पाहिजे, याजकरिता कीर्दीची पाटिलकी करून दिली."

कारीच्या जेध्यांच्याकडून ८०० होन नजराणा घेऊन त्याला पाटिलकी दिली आहे आणि 'गावची संचणी करणे... गावची वसाहत करून दिवाणात रुजू राहाणे आणि पाटिलकी खाणे' असे सांगितले आहे (शि. च. सा. ३ : ५७६) यावरून वसाहत आणि लावणी आणि त्या अनुषंगाने निर्माण होणारी कर्तव्ये पाटलाला करावी लागत हे स्पष्ट होते. त्याला या कर्तव्याची सतत जाणीव राहावी म्हणून त्याची निशाणी देखील 'नांगर' हीच आहे. गावच्या शेतीच्या कर्तव्याशी असा त्याला ठामपणे निगडित केला आहे. नांगर या निशाणीचा उपयोग सर्व सरकारी दरबारी कागदपत्रांतून केला जात असे.

पाटील हा गोतसत्तेचा प्रमुख असे. या गोतसत्तेत वतनदार, बलुतेदार आणि मिरासदार यांचा समावेश असे. गावचा महसूल निश्चित करण्याची कामगिरी राजसत्तेची असली, तरी हवालदार, कमाविसदार, कारकून अथवा मोकासेदार या राजपत्रित अधिकाऱ्यांना पाटलाची संमती घेतल्याशिवाय अथवा त्याच्याशी विचारविनिमय केल्याखेरीज शेतसाऱ्याबाबत अंतिम निर्णय घेता येत नसे. कुलकर्ण्याच्या साहाय्याने प्रतिवर्षी तो आपल्या गावच्या संभाव्य उत्पन्नाचे अंदाजपत्रक तयार करीत असे, आणि सारा निश्चित करण्याच्या दृष्टीने सरकारी कारकुनाशी चर्चा करीत असे. अवर्षणामुळे अथवा गनिमाच्या हालचालीमुळे गावचे शिवार पिकले नाही अथवा पिकाची हानी झाली आणि रयतेला सारा देण्याचे बळ राहिले नाही तर पाटील रयतेचे प्रतिनिधित्व सरकार दरबारी करी, आणि रयतेला सारासूट मिळवून देई. आपल्या गावात थळकरी अथवा मिरासदार किती आहेत, कोणत्या पिकांचे उत्पादन होते, सारा वसूल किती झाला, बाकी किती राहिली

ही माहिती सरकारला पुरविण्याचे काम पाटलाचे असे.

गावचा सारा वसूल करण्याची सर्वस्वी जबाबदारी पाटलाची असे. गावावर जो सरकारी सारा बसला असेल तो भरून देण्याची हमी तो घेत असे. एखाद्या वर्षी सारा पूर्ण वसूल झाला नाही, आणि त्याला सबळ कारणे देता आली नाहीत, तर कमी पडणारी रक्कम पाटलाला स्वत: भरावी लागे. मौजे घोलीच्या पाटलाला आपली पाटिलकी गहाण ठेवून ३५० रुपयांचे कर्ज काढून साराभरपाई करावी लागली असा उल्लेख कागदपत्रात आहे. (रा. खं. १८ ले. २७). पाटलाला सारामुक्त जमीन दिली जाते ती प्रामुख्याने या सारावसुलीच्या कामासाठीच होय. सरकारी कामाची ही फार मोठी जबाबदारी पाटील आपल्या शिरावर घेत असे. आपल्या गावकऱ्यांच्या वतीने एक प्रकारे तो सरकारला जामीनच राहत असे; आणि म्हणूनच गावकरी देखील स्वखुशीने त्याला काही बक्षिसी देत. त्यालाच मानपान अथवा हकलाजिमा म्हणत.

गोतसत्तेचा तो प्रमुख असल्याने या सत्तेच्या सर्व सभांचे संचालन तो करीत असे. त्याच्या अस्तित्वाशिवाय गावची सभा भरत नसे व कोणताही न्यायनिवाडा पूर्ण होत नसे. गावात शांतता व सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी त्याचीच असे.

गावचा पाटील हा सामान्यत: मराठा समाजातील असे; परंतु काही ठिकाणी ब्राह्मण, जैन, लिंगायत अथवा अन्य जातीचे पाटील असल्याचीही तुरळक उदाहरणे आढळतात. याचे मुख्य कारण म्हणजे एखाद्याने पाटिलकी वतन विकत घेतले असेल, अथवा राजाने स्वखुशीने एखाद्या व्यक्तीला पाटिलकी बहाल केली असेल, अथवा गोतसत्तेने एखादा माणूस पाटील म्हणून निवडला असेल तर हा अधिकार अन्य जातीकडे जाण्याची शक्यता असे आणि असे क्वचित प्रसंगी घडतही असे.

थोरल्या दुष्काळात पुणे परगण्यातील मौजे मायेवाडीचे पाटील परागंदा होऊन परमुलकात गेले असता गावच्या पाटिलकीचे काम दमाजी ब्राह्मण करीत होता. दादोजी कोंडदेवाने जेव्हा वसाहतीच्या कामास प्रारंभ केला तेव्हा मूळचे पाटील परत आले व त्यांनी 'सजगुरे खंडी दोन (२) देऊन पाटिलकी सोडविली. दर मणी होन १ येक होता' असे एका १६३३ सालच्या महजरनाम्यात म्हटले आहे. (शि.च.सा.खं. २ : ९५) कोकणातील पेड या गावची पाटिलकी तुकोजी बिन हमराजी या धनगराकडे होती. ती पाटिलकी केदारजी बिन खलोजी झाबिरा आपली म्हणू लागला तेव्हा त्याचा न्यायनिवाडा होऊन पेडची पाटिलकी धनगराची असे ठरले. (शि.च.सा. ३ : ६३८)

महारजातीकडे पाटिलकी असल्याचेही तुरळक उल्लेख आढळतात. वाई परगण्यातील नागेवाडी गावची पाटिलकी ही मूळची माहजूर सेटी बिन नागनाक महार याची होती. पण पुढे ती गावात देवपूजा करावयास आणलेल्या एका गुरवाने बळकावली. नागनाकाने प्रतिनिधीकडे तक्रार करून पाटिलकी वतन महाराचे आहे, गुरवाचे नाही असे शाबीत करून घेतले. यावर गुरवाने छत्रपती राजाराम महाराजांकडे दाद मागितली. तो काळ अत्यंत धामधुमीचा होता. स्वराज्यावर मोठे अरिष्ट कोसळले होते, एकामागोमाग एक असे मराठ्यांचे किल्ले मुघल बळकावीत होते. तेव्हा राजाराम महाराजांनी नागनाकास

'धारदिव्य' करण्यास सांगून मुघलांनी बळकाविलेला वैराटगड जिंकून तो स्वराज्यास जोडून द्यावा म्हणजे आपण वतनाचा निवाडा करू असे सांगितले. नागनाकाने हे दिव्य पत्करले आणि तो किल्ला घेऊन दाखविला; आणि वतन नागनाकास मिळाले. या महजरात म्हटले आहे,

> "माहार खरा जाला व गुरव खोटा जाला. त्यास देशमुख व देशपांडे याणी गोताचे साक्षीनसी महजर माहारास करून दिल्याप्रमाणे महार पाटिलकी आनभवीत आहे. गुरवास पाटिलकीच्या वतनास आर्थाआर्थी समंध नाही." (मराठेकालीन समाजदर्शन पृ. १२४)

काही वेळा पाटलाला सरकारच्या मदतीसाठी जावे लागे आणि लष्करी चाकरीही करावी लागे. बीरवाडीच्या पाटलास शिवाजी महाराजांनी १६५१ साली कौलनामा दिला आहे. जावळीच्या चंद्रराव मोऱ्याचा या पाटलास उपद्रव होत असे. पाटलाने न्यायासाठी शिवाजी महाराजांकडे धाव घेतली. तो म्हणतो, 'आपण मिरासदार नफर आहो. साहेबी आपणास हाती धरुनु आपला अदिकारपण आपणास देउनु मिरासीवरी बैसविले पाहिजे.' यावर शिवाजी महाराज लिहितात,

> "बराये मालुमाती खातिरेस आणौनु साहेब तुम्हावरी मेहरबान होऊनु सदरहू गांवचे अदिकारपण तुमची मिरासी तुम्हांस दिधली असे. तुम्ही अदिकारपणे खाउनु अदिकारपणाची चाकरी करणे... हकलाजिमा व गांवखंडी व किरकोली हक नि।।बलुते व बाजे हक खाउनु लेकराचे लेकरी खाणे व जे वख्ती मसलतीचे काम पडेल ते वख्ती तुम्ही दाहा लोक बराबरी घेऊन साहेबापासी येत जाणे. जोवरी मसलतीचे काम असेल तोंवरी दाहां लोकांनसी चाकरी करून दरोज रोजमुरा दर नफरें रुके ४६ प्रमाणे साहेबांपासुनु घेत जाणे. मसलती जालियावरी साहेबाची रजा घेऊन गांवांस जात जाणे." (शि.प.सं. १ : ६१५)

या पत्रावरून पाटलाच्या कामाची तर कल्पना येतेच पण त्याचबरोबर चंद्रराव मोऱ्याशी सामना देण्यासाठी शिवाजी महाराजांनी कशा हालचाली सुरू केल्या होत्या याचीही माहिती होते.

पाटलाशिवाय गावचे सारे काम अडून राहत असे. काही कारणामुळे एखाद्या गावी पाटील नसेल तर तेथे पाटलाची नेमणूक होईपर्यंत परगण्याचा अधिकारी देशमुख यास पाटिलकीचे काम पहावे लागत असे. एका पत्रात म्हटले आहे,

> "ज्या गावास पाटील नाही तेथे देशमुख पाटील व कुलकर्णी नाही तेथे देशपांडे कुलकर्णी हा दस्तुर बुनियाद आहे, नवा नाही" (शि.च.सा.खं. ३ : ६११)

ज्ञात राहून पाटलाची गैरमर्जी ओढवून घेणे हिताचे नसे. तुकारामाने म्हटले आहे,

आतां काय खावे कोणीकडे जावे। गावांत रहावे कोण्या बळे।
कोपला पाटील ये गांवीच्या लोका। आतां मज भीक कोण घाली।
(तुकारामाची गाथा - अभंग : ३८८१)

पाटलाची आर्थिक स्थिती कितीही हलाखीची झाली तरी त्यामुळे त्याच्या सामाजिक प्रतिष्ठेला बाधा येत नसे. मराठीत एक म्हण आहे-

"उतरंडीला नसेना दाणा,
पण दादला असावा पाटील राणा."

हकलाजिमा

पाटिलकीच्या सनदेतच त्याने उपभोगावयाच्या हकलाजिमांची नोंद केलेली असे. हक्क म्हणजे ज्या वस्तू अथवा सेवा पाटलाला हक्काने अथवा कायद्याने स्वीकारता येत असत त्या होत. 'लाजिमा' या सदराखाली मिळणारी भेट अथवा सेवा ऐच्छिक स्वरूपाची असे. रयतेने स्वखुशीने दिलेल्या देणग्यांचा यात अंतर्भाव असे; पण सामान्यत: हक्क कोणते आणि लाजिमा कोणत्या यांचा स्वतंत्रपणे निर्देश केल्याचे कागदपत्रांत आढळून येत नाही. 'हकलाजिमा' असा संयुक्त शब्दप्रयोगच सर्वत्र आढळतो. पण समाजाला हक्क कोणते आणि लाजिमा कोणत्या यांचे ज्ञान रूढीमुळे अथवा परंपरेने होत असावे.

या हकलाजिमांना पाटलाचे कायदे असेही म्हणत. पाटलाच्या हकलाजिमांत काही कारणामुळे वाढ झाली असेल तर त्याप्रमाणे मूळ सनदेत बदल करून दिला जात असे. पाटलाचे व्यवहार प्रामुख्याने शेतीशी निगडित असल्याने त्याच्या या हक्कांना 'नांगराचे हक्क' असेही म्हटले आहे. या हकलाजिमांचे स्वरूप स्थलकालपरत्वे वेगवेगळे असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ, कोकणातील पाटलाचे हकलाजिमे हे देशावरील पाटलाच्या हकलाजिम्यापासून भिन्न होते. तसेच मुसलमानी राजवटीत वतनदारांना मिळणाऱ्या हकलाजिम्यात शिवकालात बदल होणे स्वाभाविक होते. या हकलाजिम्यांचे स्वरूप कसे होते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल.

मानपान

मानपान म्हणजे खेड्यातील सणासुदीच्या अथवा इतर प्रसंगी पाटलाला मिळणारा अग्रहक्क होय. गावच्या जत्रेचा अथवा उत्सवाचा तो प्रमुख नायक असे. सणासुदीच्या दिवशी त्याला गावकऱ्यांकडून अनेक गोष्टी मिळत. उदाहरणार्थ, होळीची पोळी, भाद्रपदात गणेशाची मूर्ती, मकर संक्रांतीस तिळगूळ; तसेच दसरा, दिवाळी, गुढीपाडवा, नागपंचमी, पोळा या सणांच्या दिवशी त्याला अनेक भेटवस्तू मिळत.

खुर्दा अथवा रोकड

गावापासून जे निव्वळ उत्पन्न सरकारला मिळत असे त्याचा काही हिस्सा पाटलाला मिळत असे. हा हिस्सा किती असावा हे सरकार ठरवीत असे. 'पाटीलकीचा हक्क बावीस टक्के दिवाणचे नेमून घेतले' असे एका कागदात म्हटले आहे. (शि.च.सा. २ : १०४)

गला अथवा ऐनजिनसी

प्रत्येक जमीनधारकाकडून त्याला काही धान्य अथवा इतर वस्तू मिळत असत. उदाहरणार्थ, 'घुगरी' म्हणजे शेतात पिकणाऱ्या धान्याचा काही भाग, 'फसकी' कोणतेही पसाभर धान्य, 'पळकी' म्हणजे पळीभर तूप अथवा तेल, 'हुर्डा' या वस्तू पाटलाला प्रत्येक संबंधित व्यक्तीकडून मिळत. गावच्या कारागिराकडून आणि वाणी व्यापाऱ्याकडूनही त्याला काही भेटवस्तू दरसाल मिळत. उदाहरणार्थ, चांभाराकडून 'पायपोसी', 'कोष्ट्याकडून 'पासोडी', विणकराकडून 'चोळखण', पेठेतील व्यापाऱ्याकडून नारळ, सुपारी, तूप, मांस इत्यादी वस्तू काहीही दाम न देता त्याला मिळत.

वेठबिगार

महार, वाजंत्री आणि कारागीर यांच्याकडून तो विनामूल्य काम करून घेत असे. एक राबता महार पाटलाच्या तैनातीला असे.

कर

सरकारी करांचाही काही हिस्सा त्याला मिळत होता. उदाहरणार्थ, गावातील लग्नावर आकारलेला 'वऱ्हाड टका' अथवा 'पाटदाम' आणि गावात येणाऱ्या व गावातून जाणाऱ्या मालावर आकारलेली जकात यांचा काही भाग त्याला मिळत असे.

पाटलाच्या हकलाजिमांचा उल्लेख सनदेत जरी असला तरी काही वेळा त्यांचा स्पष्ट नामनिर्देश न करता, 'पाटलाचे हकलाजिमे' असा स्थूलमानाने उल्लेख केलेला असे. अशा वेळी पाटलाला पूर्ण स्वातंत्र्य असे. अर्थात पाटलाचे हकलाजिमे हे परंपरेने आणि रूढीने ठरविले असल्यामुळे ते काय असतात याची कल्पना गावकऱ्यांना असे म्हणून कदाचित त्यांचा स्पष्ट निर्देश काही सनदांतून केला नसावा.

कुलकर्णी

कुलकर्णी हा गावचा दुय्यम दर्जाचा अधिकारी आणि पाटलाचा साहाय्यक. कागदपत्रांतून त्याचा उल्लेख 'गावकुलकर्णी' अथवा 'ग्रामलेखी' असा केला आहे. काही सनदांतून कुलकर्णी वतनाला 'लेखनवृत्ती' असे म्हटले आहे. यावरून त्याच्या कार्यक्षेत्राची कल्पना येते. प्रत्येक मिरासदाराकडे गावची जमीन किती आहे आणि त्याच्यावर सरकारी सारा किती आकारला आहे याचा तपशील कुलकर्ण्याच्या दप्तरात असे.

प्रत्येकाकडून पैसा जसा जमा होई तसा तो त्यांच्या नावे खातेवहीत नोंद करी व वर्षाच्या अखेरी सारा हिशेब पूर्ण करून कोणाकडून किती बाकी येणे आहे याचा तक्ता तो तयार करीत असे. आपल्या कामात कुचराई केल्यास गावकरी त्यास शिक्षा करीत.

पाटलाप्रमाणे कुलकर्ण्यानेही गावच्या लावणी-संचणीच्या कार्याकडे लक्ष द्यावे, शेतकरी गावाकडे कसे आकर्षिले जातील आणि गावाची पिकाऊ जमीन कशी वाढेल यासाठी प्रयत्न करावेत असे काही कागदपत्रांत म्हटले आहे. उदाहरणार्थ, मलकापूरचे कुलकर्ण बहाल करताना शहाजी राजे एका कौलनाम्यात म्हणतात,

"साहेब मेहरबान होऊन पेठ मजकूरचे कुलकर्ण तुजला मऱ्हामत केले असे. तुवा प्रजा आणून पेठ मजकूरची कीर्दी मामुरी करणे. तुझे सिरी सेरणी होन २० रास ठेविली असेती."

(पे.द. ३१ ले. २०) परंतु लावणी-संचणी हे काही त्यांचे प्रमुख कार्य दिसत नाही. सदरहू पत्रात केवळ एक सदिच्छा व्यक्त केली असावी आणि कुलकर्ण्यावर तसे काही कायदेशीर बंधन नसावे.

पाटलाशिवाय गाव नसे, पण प्रत्येक गावात कुलकर्णी असलाच पाहिजे असा काही दंडक नव्हता. याचे कारण कदाचित कारकुनी काम करण्यास आवश्यक तेवढ्या शिक्षित लोकांचा त्या काळात तुटवडा असावा. काही ब्राह्मण मंडळी वेदाभ्यास करीत असल्याने हिशेबी काम करण्याची त्यांना इच्छा नसावी, म्हणूनही पुरेशी कारकून मंडळी मिळत नसावीत. आणखी एक कारण म्हणजे एका पूर्ण वेळ कुलकर्ण्याची प्रत्येक गावाला आवश्यकताही भासत नसावी. त्यामुळे एकच कुलकर्णी अनेक खेड्यांच्या हिशोबाचे काम पाहत असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी गावकुलकर्ण्याला गावज्योतिषाचेही काम करावे लागे.

एखाद्या कुलकर्ण्याकडे अनेक गावे वंशपरंपरेने आली असली, आणि त्या सर्व गावांचे काम त्याला एकट्याला झेपण्यासारखे नसेल तर तो आपले हस्तक अथवा मुतालिक एखाद्या गावावर नेमत असे व त्यांच्याकडून काम करवून घेत असे. हिशोबाचे काम त्याच्याकडे असल्यामुळे क्वचित प्रसंगी त्याच्या हातून प्रमादही घडत. एखादा अप्रामाणिक कुलकर्णी एखाद्या कुळाकडून जादा रक्कम वसूल करी व ती स्वत: ग्रहण करी. दुसरा अप्रामाणिकपणाचा प्रकार म्हणजे कुळाने सारा दिला असला तरी त्याची दप्तरात नोंद न करता तो पैसा स्वत: खाणे आणि त्या कुळाच्या नावे बाकी दाखविणे.

संगमनेरच्या कुलकर्ण्याविरुद्ध रयतेने ठाणेदाराकडे कडक शब्दांत तक्रार केली आहे. ते म्हणतात,

> "कृष्णाजी नरसिंह कुलकर्ण सिरजोरीने करितो प्रजाबरी लाइनी काहाडून फाजील नख्त घेऊन जातो येणेकरून प्रजा रंजीस होताती कुले गयाल होताती ना (नफर) मजकूर काही मिरासीदार नव्हे गैरमिरासी होऊन कुलकर्ण करितो व मसाहती सेती बेरीज आहे ते एक आणि गावात येऊन बेरीज आणीक करितो प्रजेस तेच वख्ती रोखा लिहून देत नाही.

> कारकुनासी सांगितले तरी सरजामी करीत नाहीत रयतेची फाजील तहसील कृष्णाजीने नेली आहे ते देविली पाहिजे व कृष्णाजीचे रयेत खुशनद नाही."

तरी याची चौकशी करावी अशी विनंती रयतेने केली आहे. (शि.च.सा.खं. ३ : ४७०) दुसऱ्या एका पत्रावरून असे दिसून येते हा कृष्णाजी नरसिंह खरा कुलकर्णी आहे किंवा नाही याचा तडा लावला. १६१८ च्या मे मध्ये लोकांनी तक्रार केली आणि त्याच वर्षाच्या ऑगस्ट महिन्यात कृष्णाजी नरसिंहाला कामावरून दूर केले आहे. त्या गावचा मूळ कुलकर्णी पंताजी रखमांगद कोकीळ हा होता, आणि कृष्णाजी नरसिंह हा यार्दी अथवा मुतालिक म्हणून काम पाहत होता. कृष्णाजी विरुद्ध मूळ कुलकर्ण्याने तर तक्रार केलीच, पण मिरासदार कुलकर्ण्याच्या बाजूने सारी रयत उभी राहिली हे विशेष होय. सर्व बाजूंची चौकशी करून सरकारने पंताजी रखमानंद कोकिळास मिरासदार कुलकर्णी ठरविले. (शि.च.सा.खं. ३ : ४७१)

पाटील हा गावचा सर्वाधिकारी खरा पण प्रत्यक्षात त्याला कुलकर्ण्याच्या सल्ल्याप्रमाणे वागावे लागे. प्रसंगी एखादा हुशार कुलकर्णी पाटलाला बाजूला सारून गोतसत्तेचे नेतृत्व करीत असे आणि पाटील हा फक्त नामधारी अधिकारी राहत असे. राहते परगणा संगमनेर या गावचा पाटील म्हणतो, 'आपण नावचे पाटील गावात कारभार कुलकर्ण्याचा आहे.' (शि.प.सं.खं. ३ : २३८२) वर उल्लेखिलेल्या संगमनेरच्या कुलकर्ण्याच्या बाबतीत देखील रयतेने अशीच तक्रार केली आहे. 'मोकदमास मागे घालून सिरजोरीचे अमल करितो.' (शि.च.सा.खं. ३:४७१)

प्रारंभी कुलकर्णी वतन हे वंशपरंपरा आणि शाश्वत स्वरूपाचे नसावे, पण काळाच्या ओघात ते तसे बनले असावे. याचे कारण प्रत्येक गावात नेहमीच हिशोब लिहिण्यास योग्य माणूस उपलब्ध होत नसावा हे असू शकेल. एकदा एखाद्या घराण्यात शिक्षणाचे बीज रोवले गेले म्हणजे साधारणपणे त्या घराण्यात ते रुजते आणि शिक्षणाची परंपरा टिकविण्याकडे त्या घराण्याचा कल असतो, आणि अशा घराण्याला वतनाचे आमिष दाखवून कुलकर्णीपण दिले, म्हणजे गावाला एक कुलकर्णी पुरविण्याची नैतिक जबाबदारी त्या घराण्यावर येत असावी. वतनाचा असा हा व्यावहारिक फायदा लक्षात घेऊनच कुलकर्णवतन हे वंशपरंपरागत केले असावे.

एखाद्या गावचे कुलकर्णी घराणे निर्वंश झाले तर गावकरी तात्पुरता मुतालिक नेमून गावकीचे काम त्याच्याकडून करवून घेत असत. त्यानंतर कायमचा कुलकर्णी शोधण्याच्या मार्गाला गावकरी लागत. कुलकर्णवतन निर्वंशपणामुळे गावाच्या मालकीचे होई व गावकरी त्याची विक्री करीत. त्या गावचे कुलकर्ण जर किफायतशीर असेल तर एखादा ब्राह्मण काही दाम देऊन ते विकत घेण्यास तयार होई. या दामाला 'शेरणी' म्हणत. या शेरणीचा उपयोग गावकरी गावचे कर्ज भागविण्यासाठी अथवा गावकीच्या अन्य कामांसाठी करीत असत. या नव्या कुलकर्ण्याला पूर्वीच्या कुलकर्ण्याचे वतन, त्याचा

राहता वाडा आणि सारे हक्क मिळत. त्याच्या वतनाच्या व हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी गाव घेत असे.

जुन्नर परगण्यातील तांदळी गावचे कुलकर्णी जोतिसीपण १६७७ साली विकण्यात आले. त्याचा महजर केला असून त्यास पाटील समस्त बाप, भाऊ, बारा बलुते व मिरासी कुणबी हजर आहेत. पूर्वीच्या कुलकर्ण्याचे वारस कोणी नव्हते. मुतालिक ठेवून गावकुलकर्ण व जोसपण चालवीत; पण नंतर गावकऱ्यांनी विचार केला आणि रायेरीहून एका ब्राह्मणाला बोलावून आणून सांगितले,

> "आम्ही कुलकर्ण व जोसपण विकावे टकाभरी घ्यावा आणि मिरास भाऊ करावा ऐसा तह करून रायेरीहून तुम्हांस आणून मौजे मजकूरचा घरवाडा, मला बिघे १० देऊन तुम्हापासून १५० होन घेऊन तुम्हांस जोस व कुलकर्णपण दिल्हे. लेकराचे लेकरी खाणे....देशमुखाचे सिके व देसपांडियांचे दस्कत करून देऊनु जरी कोण्ही मिरासीदार कुलकरणासी अगर जोतिसास उभा राहिला तरी आम्ही मोकदम व बाराही बलुते व समस्त बापभाऊ व मिरासीदार कुणबी ऐसे-त्यास निवारू" (शि.प.सं.खं. ३ : २७२५)

विकत घेतलेल्या वतनाबद्दल काही वेळा भांडणे निर्माण होत. अशा वेळी निवाड्यासाठी गोतसत्तेकडे धाव घ्यावी लागे. थोरल्या दुष्काळात एका कुलकर्ण्याने आपले वतन २० होनास विकले; पण दुष्काळ संपल्यानंतर त्या कुलकर्ण्याचा मुलगा नव्या कुलकर्ण्याला उपद्रव करू लागला. तो म्हणतो,

> "पाई बेडी घालून मार करूनु बलात्कारे व्रीती लेहोनु घेतली व अपले पदरी बलेच होनु (२०) वीस घातले आणि आपणास निरोप दिल्हा व कागदहि हिरोनु घेतले आणि गाव त्याचे हवाले केले."

शहाजी राजांनी या बाबतीत असा निर्णय दिला आहे की,

> "मौजे कोल्हाले, परगण सुपे येथील कुलकर्ण व जोतीस अमानत करूनु हर दो जणास गोतास पाठवून देणे गोतामधे निवाड होईल तेणेप्रमाणे दुमाले करणे." (शि.च.सा.खं. २ : १४०. सन १६५५)

मोसे खोऱ्यातील ७ गावचे कुलकर्ण एकाकडे होते. पण त्याने शिंदकळी केली आणि भीतीने तो चंद्रराव मोऱ्यांच्या मुलखात पळून गेला व पुढे तेथेच मयत झाला. तेव्हा गावचे मोकदम देशमुख व देशकुलकर्णी यांनी ५० होन शेरणी घेऊन ते वतन दुसऱ्या एका व्यक्तीला दिले. त्यास दिवाण मान्यता देण्यात यावी व तसा महजर करून द्यावा असा आदेश शिवाजी महाराजांनी मोसे खोऱ्याच्या तमाम अधिकाऱ्यांना दिला आहे. (रा.खं. १५ : २७०)

शेरणी घेऊन वतन देण्याची जरी प्रथम असली तरी अशी शेरणी घेण्याचा प्रसंग गावकऱ्यांवर क्वचितच येत असावा. याचे कारण कुलकर्ण करणाऱ्या माणसांचा मुळातच तुटवडा हे होय. त्यामुळे हे काम स्वीकारण्यास स्वखुशीने जर एखाद्या शिक्षित ब्राह्मण पुढे आला तर गावकरी त्याला आनंदाने विनामूल्य कुलकर्ण बहाल करीत असावेत. मात्र ते कायम करण्यास सरकारची संमती घ्यावी लागे. त्याचप्रमाणे सरकारला देखील एखादा अधिकारी गावकऱ्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांच्यावर लादता येत नसे. एका व्यक्तीला एका गावची पाटिलकी शिवाजी महाराजांनी बहाल केली; पण त्या व्यक्तीस स्वीकारण्यास गावकरी तयार नव्हते. त्यामुळे शिवाजी महाराजांना आपला निर्णय बदलावा लागला. (९१ कलमी बखर, पृ. ७४) इतकी गोतसत्ता प्रभावी होती.

कोकणातील काही भागात कुलकर्णी वतन वंशपरंपरा नव्हते. १६५६ साली जेव्हा कोकणचा काही भाग महाराजांच्या आधिपत्याखाली आला तेव्हा त्यांनी तेथे वतनदार कुलकर्ण्यांची नेमणूक केली. उदाहरणार्थ, चेऊल सुभ्यात आदिलशाहीच्या काळात कुलकर्णी नव्हते. मुसलमान राजांनी तेथे हुजुरदार अथवा कारकुनांची नेमणूक करून त्यांच्याकडे गावच्या हिशोबाचे काम सोपविले होते. एका हुजुरदाराकडे दोन ते चार गावे असत. या हुजुरदारांना नख्त पगार दिला जात असे. कुलकर्ण्यांची नेमणूक झाल्यावर या पगारी जागा कमी करण्यात आल्या. (आंग्रेकालीन पत्रव्यवहार, भाइसंमं. त्रैमासिक शक १८६९-७० नं. ३, पृ. ८) चेऊलच्या कुलकर्ण्याने आपले काम चोख न केल्याबद्दल शिवाजीने त्याला जरब दिल्याचे एक उदाहरण आढळते. (पे.द.३१ : २४)

हकलाजिमा

कुलकर्ण्याच्या सनदेत त्याच्या हकलाजिमांची नोंद केलेली असे. त्याचे हक्क बव्हंशी पाटलासारखे असले तरी त्या हक्कापासून त्याला मिळणाऱ्या वस्तूंचे अथवा रकमेचे प्रमाण पाटलापेक्षा कमी असे. गावातील मानपानाच्या दृष्टीने त्याचे स्थान दुय्यम दर्जाचे असे. गावच्या साऱ्याचा काही हिस्सा त्याला मिळे. दप्तर खर्चासाठी 'सादिलवार' म्हणून काही रोख रक्कम त्याला सरकारातून अथवा गावाकडून मिळे. गावकऱ्यांकडून त्याला अनेक वस्तू भेट स्वरूपात मिळत. उदाहरणार्थ, चांभाराकडून पायपोस. शेतकऱ्याकडून घुगरी, हुर्डा, गवत; लोणीविक्याकडून तूप वानवळा म्हणजे व्यापाऱ्याकडून वानगीदाखल घेतलेली फळे अथवा धान्य, पाडेवारी म्हणजे राबता महार, खाजगी कामासाठी वेठबिगार इत्यादी हक्क कुलकर्ण्याचे असत. मात्र हे हक्क सर्वत्र सारखेच अथवा निश्चित स्वरूपाचे नसत. ज्या त्या गावच्या रूढीप्रमाणे ते ठरविले जात.

चौगुला

गावकीतला आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे चौगुला. तो वतनदार आहे, बलुतेदार नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. राजव्यवहार कोशात त्याला 'ग्रामणी' असे म्हटले आहे. मूळ शब्द 'चौकुला' म्हणजे चार कुळे बाळगणारा असा असावा. चौगुला

हा पाटलाच्या गावकीच्या कामातील साहाय्यक. पाटलाचा अधिकृत प्रवक्ता म्हणूनही तो ओळखला जात असे. सारावसुलीच्या कामात पाटलाला त्याचे भरपूर साहाय्य होत असे. परागंदा झालेल्या रयतेला गावात परत आणण्याची कामगिरीही तो बजावीत असे. पाटलाप्रमाणे त्याची निशाणीदेखील नांगर हीच होती.

गोतसभेत त्याला पाटलानंतरचे स्थान असे. कागदपत्रात काही वेळा देश चौगुला असा शब्द येतो. देशमुख, देशपांडे जसे परगण्याचे वतनदार अधिकारी तसा देश चौगुला हा परगण्याचा अधिकारी. देश चौगुल्याचा गावात मोठा मान असे. नांगराप्रमाणे 'काठी' अशी देखील चौगुल्याची निशाणी काही कागदपत्रांतून दाखविली आहे. यावरून जमिनीच्या क्षेत्रमापनाशीही त्याचा संबंध असावा व पाटलाला या कामी तो मदत करीत असावा असे म्हणता येईल.

गावचा वसूल परगण्याच्या मुख्य कचेरीच्या पोत्यात अथवा खजिन्यात नेऊन भरण्याची कामगिरी चौगुला करीत असे. गावची कोठारे अथवा खाजगी गुदामे, धान्याचे पेव यांची व्यवस्था ठेवण्याचे कामही याला करावे लागे.

चौगुल्याच्या कामाचा उल्लेख महिपती या कवीने भक्तिविजयात अत्यंत समर्पकपणे केला आहे.

जोहार मायबाप, ऐका वचन।
माणकोजी पाटलाने पाठविले होन।
मग चौगुल्यापाशी देऊन।
जगज्जीवन परतले।।४।।
चौगुले काय बोलती वचन
तुम्ही महाराहाते पाठविले होन।
ते आम्ही सत्वरी घेऊन।
पोतें पाठविले राजद्वारी।।७।।

प्रत्येक गावात चौगुला असेच असे नाही. हे काम पाटील स्वतःच करीत असावा. कुलकर्ण्याला जसे जोसीपणाचे कामही प्रसंगी करावे लागत असे, तसेच पाटलालाही चौगुल्याचे काम करावे लागत होते. त्या काळात आपल्या मूळ वतनाला माणसे इतकी चिकटलेली होती की, एका चौगुल्याकडे पाटिलकीचेही वतन होते, पण चौगुले वतन टिकविण्यासाठी तो पाटिलकीवर पाणी सोडावयास तयार होता. वतनासाठी कितीही संकटे आली, जिवावर बेतले तरी माणसे त्यास तयार असत. (रा.खं. १५ : ३८१) चौगुल्याचा गावात बराच दबाव असे. त्याला हिणविण्याकरिता एका लोकगीतात म्हटले आहे,

"चौगुल्याचा लेकी नको बोलूस चढईरू
कागदाचा भारा तुझ्या बापाच्या डोईवरू."

चौगुला सामान्यतः मराठा ज्ञातीतील असे; परंतु काही ठिकाणी ब्राह्मण चौगुले (दाभोळ, हर्णे या भागात), शिंपी चौगुले, लिंगायत चौगुले, जैन चौगुले, माळी चौगुले आणि मुसलमान चौगुले (कोकणात) ही आढळतात.

शेटे-महाजन

गावकीच्या कामात गुंतलेला आणखी एक वतनदारांचा वर्ग म्हणजे शेटे-महाजनांचा होय. गावच्या पेठेचे ते वंशपरंपरागत अधिकारी होत. प्रत्येक गावात पेठ असेच असे नाही. मात्र गावात पेठ वसवावयाची असेल तर ते काम शेटे-महाजनाकडे असे. या कामासाठी त्यांना सरकारातून जमीन आणि गावकऱ्यांकडून काही हक्क मिळत. त्यांचे स्वरूप सामान्यतः इतर वंशपरंपरागत अधिकाराप्रमाणेच असे. गावची वसाहत जशी पाटलाची जबाबदारी तशी पेठेची जबाबदारी शेटेची असे. कुलकर्णी जसा गावचा हिशोब ठेवी तसा महाजन पेठेचा ठेवी. पेठेकडून या दोघांना रोकड व वस्तूंच्या रूपाने हक्क मिळत. गोतसत्तेच्या कामकाजात ते अधिकृतपणे भाग घेत असत. गावात सावकारीचे व्यवहार शेटे-महाजन करीत असत. 'तराजू' ही त्यांची व्यावसायिक निशाणी होती आणि सरकारी कागदपत्रांवर विशेषतः महजरावर त्यांच्या नावासमोर तराजू काढला जाई.

देशमुख आणि देशपांडे

देशमुख आणि देशपांडे हे परगण्याचे वतनदार अधिकारी होत. अनेक खेड्यांचा मिळून परगणा होत असे. परगण्यांतील बहुतेक गावांतून देशमुख-देशपांड्यांची जमीन असल्याने गावाशी त्यांचा निकटचा संबंध असे. देशमुख हा परगण्यांतील सर्व पाटलांचा नायक आणि देशपांडे हा सर्व कुलकर्ण्यांचा नायक होता. देशमुखी वतन हे सामान्यतः मराठा समाजाकडे असे; पण मराठवाड्यात हे वतन ब्राह्मणांच्याकडेही आहे. धर्मांतरामुळे काही ठिकाणी हे वतन मुसलमानांच्याकडेही गेले आहे. आपल्या परगण्यांतील पाटलांच्या कामावर देशमुख देखरेख ठेवीत असे. गावची वाजटजमीन गरजूंना लागवडीसाठी देण्याचे काम देशमुख करी. नव्या रयतेला उत्तेजन देण्यासाठी जमिनीचा सारा क्रमशः वाढविला जाई. यालाच 'इस्तावा' पद्धती म्हणत. पहिली काही वर्षे सारा बहुतेक आकारला जात नसे. नंतर त्यात क्रमाक्रमाने वाजवी सारा येईपर्यंत प्रत्येक वर्षी थोडी थोडी वाढ केली जात असे.

परगण्यातील रयतेची स्थिती पूर्णपणे अवगत करून घेण्याकरिता तो आपल्या परगण्यात वार्षिक दौरा काढीत असे. नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमिनीचा सारा जरूर पडल्यास तो निश्चित करीत असे. जमिनीच्या मालकीत बदल झाला असेल तर कुलकर्ण्याच्या दप्तरात त्याची योग्य ती नोंद होते किंवा नाही इकडे तो लक्ष पुरवीत असे.

आपल्या या कामात त्याने कुचराई केली तर लोक त्याच्याविरुद्ध सरकारकडे तक्रार करीत असत. भोर परगण्याच्या देशमुखाबद्दल अशीच तक्रार केली होती. त्यात म्हटले

आहे,

"गावगना हिंडोन संचणी करा म्हटिले ते न होती व ठाणा कुणबी गेला तरी त्यास उगेच मोकल द्यावे. सेरीकर गावगना गस्ती करून लावणी करितो म्हणौनु बयाजवार लिहिले तरी तू चावडीला बैसोन कैफतीच लिहितोस. तरी विलायती गस्ती करून कीर्दी करवीत नाहीस येणे अमले तुझी पैरवी नाही आता तमाम विलायती गस्ती करून कीर्दी करविजे उगवणी कीजे." (शि.च.सा.२ : १९९)

दुसऱ्या एका पत्रात -

"देशमुख ठाणियास येत नाहीत व दिवानकाम चालवीत नाही"

अशी तक्रार सरकारकडे केली आहे.

देशमुख ही संस्था प्राचीन असली तरी 'देशमुख' या शब्दाचा वापर मुसलमान कालपासूनच केलेला आढळतो. हीच कामे करणाऱ्या लोकांना मुसलमानपूर्वकालात 'विषयपती' असे म्हणत. कागदपत्रात, बखरीत 'जमीनदार' हा शब्द देशमुख या अर्थी वापरला आहे. कर्नाटकात देशमुखांना 'नाडगौडा' आणि कोकणात 'देसाई' अशी संज्ञा आहे. देशव्यवस्थेत देशमुखाचे स्थान फार मोठे होते. आज्ञापत्रात म्हटले आहे,

"राज्यातील देशमुख....ते स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायकच आहेत. त्यास साधारण गणावे असे नाही. हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत."

शिवपूर्वकालात सारी रयत या जमीनदारांच्या जप्तीखाली असे. सभासद हा समकालीन शिवचरित्रकार म्हणतो,

"इदलशाही, निजामशाही, मोगलाई देश कबज केला, त्या देशात मुलकाचे पाटील, कुलकर्णी व देशमुख यांचे हाती कुल रयत."

यावरून सरकारचा आणि रयतेचा प्रत्यक्ष संबंध येत नसे हे स्पष्ट होते.

सरकार आणि रयत यांना जोडणारा देशमुख हा महत्त्वाचा दुवा होता. सरकारचे आणि रयतचे प्रतिनिधित्व तो करीत असे. संकटकाळी गावकऱ्यांना सरकारी मदतीची विशेषत: सारासुटीची गरज भासत असे. अशा वेळी पाटलामार्फत गावकऱ्यांना प्रथम देशमुखाची आपल्या अडचणीसंबंधी खात्री पटवून द्यावी लागत असे. गावकऱ्यांची सारा भरण्याची शक्ती नाही अशी त्याची खात्री झाली म्हणजे गावकऱ्यांसमवेत तो सरकारी दरबारी सारामाफीसाठी प्रयत्न करीत असे. गनिमाचा हल्ला होण्याची शक्यता असेल तर परगण्यातील जनतेचे संरक्षण करण्याची, त्यांना सुरक्षित स्थळी नेऊन पोहोचविण्याची जबाबदारी देशमुखाची आहे असे सरकार मानीत असे. रोहिडखोऱ्याच्या

देशमुखास ताकीद देताना शिवाजी महाराज म्हणतात,

"मोगल जे बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल ऐसे समजून गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे." (रा.खं. १५ : २७६)

गावच्या इतर वतनदारांच्या म्हणजे पाटील, कुलकर्णी, चौगुला इत्यादींच्या सहकार्याने त्याने गावचे काम विशेषत: लावणी-संचणीचे काम करावे अशी सरकारची अपेक्षा असे. मरळच्या देशमुख-देशपांड्यांना सुभेदाराने ताकीद दिली आहे,

"तुम्ही जमीदार असता मुलुकाची संचणी करीत नाही हे गोष्टी कर्याची नाही. तुम्हास दस्त भरून द्यावे लागेल. मुलुकाचे संचणी करावयास अंतर केलिया कार्यास येणार नाही. तरी तुम्ही रयत तजावजा होऊ न देणे माहालिची संचणी करणे....रयतीस मशागतीस लावणे या गोष्टीस हैगे वर न घालणे." (रा.खं. १६ : २१)

दुसऱ्या एका पत्रात म्हटले आहे,

"देशमुखाचे काईदा आहे की विलायेती फिरोन येक तसू पड पडू नेदीता जे पडी जमीन पडले आसेल त्यास नांगरेचे व इस्तावेचे कौलबोल देवाऊनु तमाम जिमीन कीर्दी करावे साल बसाल दस्त चढत आसावे हे तुमचे रवेश आहे यैसे ना होता तुम्ही बाहेर बैसोनु माहाल पडूनु बसेले आहा तुम्ही बेसक कैसे होऊ पाहता आपला हाक कैसे खाता साहेब काम करून विलायेती मामुरी करून आपले हाक खावे बिलायेती पडू (न) हाक कैसे खाता हे तरी खूब नव्हे. आता तुम्ही विलायतीचे रयेतीसी बहुत वजा सू दिलासा करून नागर धरवीजे येक तसू ना पडीत यैसै कीर्दी करवीजे...." (शि.च.सा. १ ले ४५)

एखाद्या मोहिमेत सरकारला त्याची आवश्यकता भासत असेल तर आपल्या परगण्याच्या कक्षेबाहेर जाऊनही त्याला सरकारला मदत करावी लागे. यावरून मुलकी चाकरीबरोबर त्याला प्रसंगी लष्करी चाकरीही करावी लागे हे स्पष्ट होते.

आपल्या देशमुखांकडून महाराज जसे चोख काम करून घेत असत तसेच त्यांच्या प्रकृतीची चौकशी करावयासही ते विसरत नसत. आपल्या देशमुखांची ते किती काळजी घेत असत हे रोहिडखोऱ्याच्या कान्होजी जेधे देशमुखाला लिहिलेल्या पत्रावरून कळून येते. ते म्हणतात,

"दिसाचे व रात्रीचेहि तैसेच १५/२० वेग होतात लिहिले तरी औसध घेऊन शरिरासी आरोग्य होई ते करणे. उपचाराचे विशी आलस न करणे. ईश्वराचे कृपेवरून बरेच होईल. तुम्ही लिहिले की आपले मूल

६ जन व देशमुखी साहेबाच्या पायापासी आहे; साभाल केला पाहिजे. तरी आता नवे लिहिणे काय लागले? पहिले पासूनच तुम्हा आम्हांत घरोबा आहे. जैसा साभाल करून ये तैसा साभाल करून मूल व स्वार साहेबाच्या पायापासी पोत (पाठविणे) तरी वेथे करता पात (परत) न येती म्हणौन लिहिले तरी वेथा बरी जालियावरी पोत (पाठविणे) वेथा बरी होय तोवरी आपल्याजवळ असो देणे. वेथा बरी होये ते करणे.''
(शि.च.सा. खं.५ :७६९)

परगण्यातील एखाद्या गावात पाटील नसेल, आणि पाटलाच्या नेमणुकीला काही अवधी असेल तर मध्यंतरीच्या काळात देशमुखाला गाव पाटलाचे काम पाहावे लागे. ही रूढी होती. स्वत:चा शिक्का वापरण्याचा अधिकार देशमुखाला होता. त्याच्या शिक्यात नांगराचे चित्र आणि त्याचे व त्याच्या परगण्याचे नाव असे.

हकलाजिमे

देशमुखाचा दर्जा पाटलापेक्षा श्रेष्ठ असल्याने आणि त्याचे कार्यक्षेत्रही मोठे असल्याने त्याचे हकलाजिमे विस्तृत होते. गावकऱ्यांकडून अनेक वस्तू त्याला भेटरूपाने मिळत. काही गावकऱ्यांना त्याची चाकरी विनादाम करावी लागे. व्यापारी, कारागीर यांच्याकडून त्याला दैनंदिन उपभोगाच्या वस्तू विनामूल्य मिळत. पिकवलेल्या धान्याचा काही हिस्सा, गवतफाटा, जळण इत्यादी वस्तू तो गावकऱ्यांकडून गोळा करी. एखाद्या गावकऱ्याची आमराई असेल तर लोणच्यासाठी कैऱ्या तो मागून घेई. पावसासाठी इरले, कांबळे, लोकर, पायपोशी, कोंबडी, बकरे, तेल-तूप, मातीची भांडी, नवरात्रात गुरवाकडून प्रसाद इत्यादी वस्तू त्याला गावकऱ्यांकडून विनामूल्य मिळत असत.

तसेच गावकऱ्यांकडून त्याला काही रोख रक्कमही मिळत असे. सामान्यत: प्रत्येक गावाकडून किमान एक होन तरी त्याला मिळत असे. परगण्याच्या दौऱ्यावर असताना ज्या गावात त्याचा मुक्काम पडे तेथील गावकऱ्यांकडून त्याला शिधा मिळत असे.

व्यापारी आणि आठवड्याच्या बाजारात येणारे फेरीवाले यांच्याकडूनही त्याला अनेक वस्तू मिळत. मोमीनाकडून सुताच्या गुंड्या, पटवेगाराकडून रेशमाच्या लड्या, भाजीविक्याकडून भाजी, तांबोळ्याकडून पान-सुपारी, दिवाळीच्या सणात आतषबाजीचे सामान करणाऱ्यांकडून काही दारूकाम, हलवायाकडून मिठाई इत्यादी वस्तू तो घेत असे. भुसारी, कलाल (दारू विक्रेते), कापडविके, लोणीविके, अत्तार, कसाई इत्यादी व्यावसायिक आपल्या दुकानातील काही माल त्याला विनामूल्य पुरवीत असत. काही वेळा सबंध बाजाराकडून त्याला काही रोख रक्कम मिळे.

न्हावी, परीट, लोहार, सुतार, शिंपी, कोष्टी हे देशमुखाची या ना त्या रूपाने सेवा करीत. सरकारी जकातीच्या उत्पन्नापैकी २ टक्के उत्पन्न त्याला मिळे. जनावरांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर काही ठिकाणी त्याला ३ रूके (तांब्याचे नाणे) मिळत. १

खंडी मिठावर १/४ मीठ, १ खंडी गुळावर २॥ शेर गूळ त्याला मिळत असे. हळद, सुंठ या वस्तूंचाही काही हिस्सा त्याला मिळे. गावावर बसविलेल्या सरकारी करांच्या उत्पन्नाचा काही हिस्सा त्याचा असे.

दरवर्षी महिना दोन महिन्यासाठी त्याला राबता महार मिळे. त्याच्या घरच्या भांड्यांना विनामूल्य कल्हई करून मिळे. तेल्याच्या घाण्यातून तो आपले तेल गाळून घेई.

देशमुखाच्या हकलाजिमांच्या या विस्तृत यादीवरून गोतसत्तेत त्याला किती महत्त्वाचे स्थान होते याची कल्पना येईल. अर्थात परगण्यातील प्रत्येक गावाकडून अशा तऱ्हेचे हक्क तो वसूल करीत असावा असे मानणे इष्ट होणार नाही. तसेच हे हकलाजिमे सर्वत्र सारखे होते असेही म्हणता येणार नाही. देशावरील आणि कोकणातील देशमुखांचे हक्क भिन्न असणे स्वाभाविक होते.

देशपांडे

गावची काही जमीन देशपांड्यांच्या मालकीची असे. परगण्यातील कुलकर्ण्याच्या कामावर देखरेख करणे हे याचे प्रमुख कार्य म्हणूनच कागदपत्रांतून त्याला 'देशलेखक' अथवा 'देशकुलकर्णी' असे म्हटले आहे. गावात कुलकर्ण्याचे जे काम तेच परगण्यात देशपांड्यांचे काम होय. परगण्याच्या कामासंबंधी तो देशमुखाला जबाबदार असे. या देशपांडेपणाबद्दल त्याला सरकारातून वतन मिळत असे; आणि ही वतनी जमीन सारामुक्त व वंशपरंपरा असे. परगण्यातील एखाद्या गावचे कुलकर्ण त्याच्या घराण्यात असे तेव्हा त्या कामाचे त्याला स्वतंत्र वतन असे. त्या गावचे हिशोब त्याला इतर कुलकर्ण्याप्रमाणे ठेवावे लागत. एखाद्या गावात कुलकर्णी नसेल तर वतनदार कुलकर्ण्याची नेमणूक होईपर्यंत त्याला त्या गावचे हिशोबाचे काम करावे लागे. हे काम काही वेळा तो आपल्या हस्तकाकरवी करून घेत असे. देशपांडे हे सामान्यत: ब्राह्मण जातीतले असत. पण हे वतन प्रभूंच्यातही आढळते.

परगण्याचे हिशोब ठेवणे, तपासणे हे त्याचे मुख्य काम होय. या कामात हयगय झाल्यास त्याला सरकारकडून ताकीद मिळत असे. कोकणातल्या एका देशकुलकर्ण्याला शिवाजी महाराजांनी जरब दिली आहे. ते म्हणतात,

''देशकुलकर्णी म्हणवितोस आणि वसूल लिहीत नाहीस म्हणून ताकीद करून खंड गुन्हेगारी घेतली.'' (शि.प.सं. ३ : २६१०)

हकलाजिमे

देशपांड्याला देखील इतर वतनदार अधिकाऱ्याप्रमाणे रोकड आणि वस्तूरूपाने हकलाजिमे मिळत. त्याचे हक्क सामान्यत: देशमुखाप्रमाणेच असत; पण त्या हक्कापासून जी मिळकत होई त्याचे प्रमाण देशमुखाहून जवळजवळ निम्म्याने असे. उदाहरणार्थ, देशमुखाला १० फणस मिळाले तर देशपांड्याला ५ मिळत. आमराईतून देशमुखाला १० टक्के आंबे मिळाले तर देशपांड्याला ५ टक्के मिळत. मकरसंक्रांतीला तीळ

खरेदीसाठी १ होन मिळे. प्रत्येक ऊसमळ्यामागे ५ शेर गूळ, एक उसाचा भारा आणि रसाची घागर मिळत असे. शेतकऱ्याकडून भाजीपाला, कोष्ट्याकडून पासोडी, चांभाराकडून पायपोशी, गुरवाकडून पत्रावळी, तांबोळ्याकडून पाने आणि तेल्याकडून काही टाक तेल याला मिळे. परगण्यातील प्रत्येक गावापासून वर्षातून १५ दिवसांसाठी राबता महार मिळे. न्हावी, सुतार आणि इतर ग्रामसेवकांकडून हवी ती सेवा विनामूल्य मिळे. गावातील लग्नप्रसंगी देशपांड्याला लग्नघरातून साखर, सुपारी, पान, शेलापागोटे मिळत असे. कोणत्याही तंट्यातील दोन्ही पक्षांकडून त्याला बक्षिसी मिळत असे. ज्याचा जय होई तो खुशीने काही इनाम देत असे त्याला 'हरकी' अथवा 'शेरणी' म्हणत. पण ज्याचा पराजय होई त्याला देखील 'गुन्हेगारी' या सदराखाली काही रक्कम द्यावी लागे. 'हरकी' आणि 'गुन्हेगारी' पासून जे उत्पन्न होई, त्याचा निम्मा भाग सरकारात जमा होई, आणि उरलेल्या भागाच्या १/३ देशपांड्याला व २/३ देशमुखाला मिळे.

तसे पाहू गेल्यास देशमुख आणि देशपांडे हे काही गावचे वतनदार अधिकारी नव्हेत; परंतु परगण्याच्या बहुतेक सर्व गावांतून त्यांची जमीन असल्याने साहजिकच गावच्या सर्व व्यवहाराकडे त्यांचे लक्ष असे. गोतसत्तेच्या महत्त्वाच्या सभांना ते हजर असत. गावच्या महजरावर त्यांचे सहीशिक्के असत.

देशमुख-देशपांडे हे परगण्याचे अधिकारी होते आणि त्यांना परगण्यातील सर्व गावकऱ्यांकडून काही मोबदला मिळत असे. गावकामगार पाटील-कुलकर्ण्याप्रमाणे ते गावच्या विकासासाठी व सुखासाठी झटत असत. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा योगक्षेम गावकरी वाहत असत, सरकार नव्हे.

मिरासदार आणि उपरी

गावच्या लोकसंख्येत प्रामुख्याने भरणा मिरासदारांचा असे आणि गावची जवळजवळ ७५ ते ८० टक्के जमीन या वर्गाच्या मालकीची असे. मिरासदारांना नागरिकत्वाचे सर्व हक्क उपभोगण्याचा अधिकार असे. ते स्वतःच्या मालकीची जमीन कसत आणि नियमाप्रमाणे शेतसारा भरत. गोतसत्तेच्या सर्व सभांना ते हजर राहत व त्यांच्या कामकाजात भाग घेत.

मिरासदारांना त्यांच्या शेतीच्या अथवा अन्य कामात मदत करण्यासाठी जे लोक गावात येत असत त्यांना उपरी म्हणत. गोतसत्तेशी यांचा काही संबंध नसे. गावच्या महजरात अथवा निवाडपत्रात वतनदाराबरोबर मिरासदार कुणब्यांची नावे आढळतात पण उपरींच्या नावाचा कोठे उल्लेख असत नाही. उपरींना परके मानीत त्यामुळे त्यांना गावात कसलेच स्थान नसे. काही वेळा गावची वाजट जमीन कसण्यासाठी हे सरकारातून मुदतीने घेत व कालांतराने त्या जमिनीचे मालकी हक्क त्यांना मिळत व त्यांची गणना मिरासदारांच्या वर्गात केली जात असे.

बलुतेदार अथवा ग्रामसेवक

गावकामगार, वतनदार मंडळी आणि मिरासदार यानंतरचे गावचे मानकरी म्हणजे बलुतेदार होत. गावची काही जमीन यांच्याकडे असे आणि बहुधा त्यावरील सारा माफ असे. गावच्या अभ्युदयासाठी आणि स्थैर्यासाठी बलुतेदार फार मोलाची कामगिरी बजावीत असत. खऱ्या अर्थाने ते ग्रामसेवक होते. त्यांना गावकऱ्यांकडून त्यांचा कामाचा मोबदला म्हणून पिकाचा काही हिस्सा मिळत असे. ग्रामसेवकाच्या वर्षभराच्या मेहनतीची मजुरी त्याला प्रतिवर्षी सुगीच्या हंगामात गावकऱ्यांकडून मिळत असे. सुगीच्या वेळी सरकारी हिस्सा बाजूला काढून ठेवीत तसाच या सेवकांचा हिस्साही बाजूला ठेवीत. याला 'बलुता' म्हणत. बलुता म्हणजे गावचे कारागीर आणि सेवक यांच्या उदरनिर्वाहासाठी गावाने दिलेला मोबदला होय. या मोबदल्यात त्यांची मजुरी आणि त्यांचे हक्क यांचा समावेश होत असे.

गावच्या महजरातून या बलुतेदारांची नावे आपल्याला आढळतात. सामान्यतः बलुतेदार बारा असत, असे मानण्याचा जरी प्रघात असला तरी प्रत्येक गावात ही संख्या बारा असेलच असे नाही. महजर हा प्रमाणभूत कागद मानला तर त्यात येणारी नावे आणि त्यांची संख्या प्रत्येक ठिकाणी निरनिराळी आढळते. काही ठिकाणी ही नावे बारापेक्षा कमी तर काही ठिकाणी बारापेक्षा अधिक आढळतात.

ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहासकार सातारा राज्याचा प्रशासक होता. साताऱ्याच्या जमीन महसूलाची पाहणी करताना त्याने तेथील बलुता पद्धतीचाही अभ्यास केला व त्याचा उपयोग आपल्या इतिहासलेखनासाठी करून घेतला. त्याने बारा बलुतेदारांची नावे व त्यांची कामे दिली आहेत. ती अशी : १. सुतार, २. लोहार, ३. चांभार, ४. महार अथवा ढेर. गावकीच्या कामात महाराचा वाटा फार मोठा असे. तो गावचा रक्षक असे. गावात येणाऱ्या परदेशी लोकांची देखभाल करणे हे त्याचे काम असे. डफ म्हणतो, महाराष्ट्रातील महार ही जमात अत्यंत कामसू, उपयुक्त आणि हुशार अशी आहे. ५. मांग : मोटेचे दोरखंड, चाबूक, चामड्याच्या वादी इत्यादी वस्तू करण्याचे काम तो करी. गावच्या रक्षकाचे काम त्याच्याकडे असे. ६. कुंभार, ७. न्हावी, ८. धोबी, ९. गुरव : ग्रामदेवतेचा हा पुजारी. पत्रावळी लावण्याचा याचा धंदा. वाजंत्र्याचे कामही तो करीत असे. १०. जोशी : पंचांग वाचन. ११. भाट अथवा शाहीर, आणि १२. मुलाणा.

परंतु ग्रँट डफची ही यादी प्रातिनिधिक स्वरूपाची आहे असे मानता येणार नाही.... कारण इतर काही कागदपत्रांतून सोनार, तराळ, रामोशी, तेली, तांबोळी, कोष्टी, शिंपी, धनगर इत्यादी ग्रामसेवकांचाही उल्लेख बलुतेदार म्हणून केलेला आढळतो.

बलुतेदारांची विभागणी सामान्यपणे तीन प्रमुख वर्गांत करता येईल :

१. **कारागीर आणि व्यावसायिक :** सुतार, लोहार, न्हावी, चांभार, कुंभार, धोबी इत्यादी ग्रामसेवक या पहिल्या वर्गात मोडतील. गावकऱ्यांना यांच्या सेवेची अनिवार्य गरज असे.

२. **सेवक वर्ग :** महार, तराळ, मांग, रामोशी इत्यादी मंडळी या दुसऱ्या वर्गात येतील. गावची हलकीसलकी कामे यांना करावी लागत. महार हा गावचा वतनदार सेवक आहे. त्याच्या वतनाला 'हडकी', 'हडोळा' अथवा 'पाडेवारी' म्हणत. गावातील मृत जनावरांना हालविण्याचे काम त्याच्याकडे असे. इंदापूरच्या महार-मांगामध्ये वृत्तीविषयी एकदा तंटा निर्माण झाला. तेव्हा त्याचा निवाडा करण्यासाठी तो पैठणला पाठविण्यात आला होता. त्यात असे ठरले,

"जे पड पडेल ते महारांनी न्यावी, आपली जीवन वृत्ती करावी. प्रेताचे वस्त्र व चार रूके घेणे ते महारांनी घ्यावे व महालक्ष्मीची सुवाशीण व पेढीयाची घागर गावाभोवती फिरवावी. मांगास संबंध नाही. मांगाने नाडे कातडीयाची व ताती करून आपली उपजीविका चालवावी." (निवाडपत्रे, नं. ११ पृ. ५६)

गावात घडणाऱ्या गोष्टींची खडान्‌खडा माहिती महाराला असे. पाडेवार म्हणजे गावकीवर नेमून दिलेला महार आणि राबता महार म्हणजे घरकामासाठी दिलेला महार. आपला धनी पाटील याचा तो संरक्षक असे. एका पत्रात असे म्हटले आहे की, मोकदमांना वाचविण्यासाठी गोंदनाक नावाच्या एका महाराने जीव धोक्यात घातला व तो मारला गेला. यासाठी त्याचा मुलगा अर्जनाक यास तराळाचे वतन करून दिले. तराळाचे आणि महारकीचे वतन बहुधा एकाच व्यक्तीकडे असे. सरकारी निरोप रयतेला पोहोचविण्याचे काम तराळ करी. गावात दवंडी पिटण्याचे काम त्याचे असे. मांग आणि रामोशी हे चोरी आणि इतर गुन्ह्यांचा तपास करीत.

३. **धार्मिक सेवा :** जोशी, गुरव, ठाकूर, जंगम, मुलाणा या धार्मिक कृत्ये करणाऱ्या लोकांचा समावेश या वर्गात करता येईल. गावकऱ्यांच्या धार्मिक आणि सामाजिक गरजा हा वर्ग पुरवीत असे. जोसी अथवा जोतिशी याला मार्क्सने कॅलेंडर ब्रॅम्हिन (Calender Brahmin) असे म्हटले आहे. पंचांग वाचून लावणी-संचणीसाठी अथवा मंगल कार्यासाठी मुहूर्त काढून देणे हे जोशाचे मुख्य काम. गुरव हा गावच्या मंदिराचा पुजारी; तो त्या मंदिराची देखभाल करीत असे. ठाकूर हा शूद्र जातीतील, विशेषत: जंगलात राहणाऱ्या काही जमातींचा पुरोहित असे. या ठाकूराविषयी मराठीत एक म्हण आहे, "ब्राह्मणाचे जन्माला जाशील तर लिहूं लिहूं करशील, वाण्याच्या जन्माला जाशील तर तोलूं तोलूं मरशील; पण ठाकराच्या जन्माला जाशील तर जंगलचा राजा होशील."

जंगम हा लिंगायतांचा पुरोहित होय. गावात बेल वाटण्याचे काम हा करीत असे. मुलाणा गावच्या मशिदीची आणि कबरस्थानाची देखभाल करीत असे. तसेच गावचा खाटीक अथवा कसाई म्हणूनही तो काम करी. मुलाण्याला गावच्या बलुत्यामध्ये स्थान

दिले आहे. यावरून मुसलमान समाज गावच्या सामाजिक जीवनाशी कसा एकरूप झाला होता याची कल्पना येईल. मुलाणसारा नावाची एक पट्टी देखील गावकऱ्यांवर लादली जात असे, आणि त्यातून मिळणारा पैसा मुलाण्याला त्याच्या निर्वाहासाठी दिला जाई. मुसलमान समाजाचे सर्व धार्मिक विधी मुलाणा करीत असे.

या बलुतेदारांखेरीज गावात इतरही कारागीर अथवा व्यावसायिक असत, परंतु गावकऱ्यांना त्यांची सेवा अनिवार्य वाटत नसावी; आणि म्हणूनच समाजव्यवस्थेत त्यांना विशेष असे स्थान दिले गेले नसावे. परंतु प्रसंगी त्यांची गरज लागत असल्याने गावात राहण्यास व आपली उपजीविका करण्यास त्यांना गावाने सवलत दिली असावी. त्यांचा दर्जा उपरी लोकांच्या सारखाच असावा. अशा सेवकांना 'आलुतेदार' म्हणण्याचा प्रघात आहे. आलुतेदारांची संख्या देखील बारा होती असे मानले जाते. ग्रँट डफने या आलुतेदारांची यादी दिली आहे, ती अशी : १. सोनार, नाणी पारखण्याचे काम हा करी, २. जंगम, ३. शिंपी, ४. कोळी अथवा पखाली, पाणी वाहणारा, ५. तराळ अथवा येसकर हा महार जातीचा असे, ६. माळी अथवा बागवान, ७. डावरी गोसावी-तुणतुणे वाजविणारा, ८. घडसी-बिन वाजविणारा, ९. रामोशी अथवा भिल्ल, १०. तेली, ११. तांबोळी आणि १२. गोंधळी

वरील यादीतील काही नावे काही महजरांतून बलुतेदारांच्या यादीतही आढळतात. बलुतेदार-आलुतेदार यांना कारू-नारू असेही म्हणत. बलुतेदार-आलुतेदार यांच्या वरील याद्यांवरून बलुतेदार वर्गात कोण येते आणि आलुतेदार वर्गात कोण येते हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. कागदपत्रांतून आलुता असा शब्दप्रयोग आढळत नाही. तेव्हा कदाचित आलुता-बलुता, कारू-नारू हा अनुप्रासाचा प्रकार असावा असे स्थूलमानाने म्हणता येईल. विल्सनने आपल्या शब्दकोशात वाजंत्री, कलावंतीण, वैद्य गारपगारी म्हणजे भविष्य सांगणारा इत्यादी लोकांचाही या ग्रामसेवकांच्या यादीत समावेश केला आहे. गावचे बलुतेदार कोण हे ठरविण्याचा हक्क गावकऱ्यांचा असावा असे म्हणता येईल.

यानंतरचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या बलुतेदारांना गावकऱ्यांकडून काय मिळत होते? त्याचे प्रमाण काय होते? गावात ते वंशपरंपरेने राहत त्या अर्थी त्यांना आपल्या उदरनिर्वाहापुरते मिळत असावे असे मानावयास हरकत नाही. काहींच्या मते गावच्या उत्पादनाच्या १/१० हिस्सा बलुतेदारांना दिला जाई; पण पुरेशा पुराव्याअभावी या बाबतीत निश्चित विधान करणे कठीण आहे. रूढीने, परंपरेने त्यांचा वाटा ठरवून दिला असावा आणि गावकरी तो विशेष खळखळ न करता देत असावेत.

बलुतेदारांना गोतसत्तेच्या सभांना हजर राहून कामकाजात भाग घेण्याचा अधिकार असे. गावच्या महजरावर त्याची नावनिशाणी असे. प्रत्येक बलुतेदाराची स्वतंत्र निशाणी असे व ती त्याच्या नावासमोर काढली जाई. कुंभाराची निशाणी चाँक, न्हाव्याचा आरसा, सुताराची तासणी, चांभाराचा टोच्या आणि दोरा, धोब्याचा दांडा, गुरवाची धूपारती, सोनाराची ऐरण, मुलाण्याचा चाकू इत्यादी निशाण्या महजरावर आढळून येतात.

बलुतेदार संस्थेचे स्वरूप

ग्रामसेवकांची संस्था भारतातील इतर प्रांतांतही आढळते. या संस्थेच्या स्वरूपाविषयी काही पाश्चिमात्य विद्वानांनी बराच विचार केलेला दिसून येतो. कार्ल मार्क्स या प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञाने आपल्या 'कॅपिटल' या ग्रंथात ब्रिटिश प्रशासकांनी लिहिलेल्या अहवालांच्या आधारे या संस्थेचे थोडेसे विवेचन केले आहे. त्याच्या विवेचनाचा निष्कर्ष असा की, हे डझनभर ग्रामसेवक सर्वस्वी गावकऱ्यांच्या जिवावर पोसले जातात. (This dozen of individuals is maintained at the expense of the whole community) बेडन पॅावेल या ब्रिटिश विद्वानाने आपल्या 'दि इंडियन व्हिलेज कम्युनिटी' (१८९६) या ग्रंथात ग्रामसेवकासंबंधी चर्चा केली असून असे म्हटले आहे की, कारागीर आणि चाकर यांना ठराविक वस्तुरूपाने मेहनताना देऊन अथवा सारामुक्त जमीन देऊन त्याच्या मोबदल्यात गावाची सेवा करून घेण्याची प्रथा भारतात फार पुरातन काळापासून चालत आली आहे. सरकारचा हिस्सा आपल्या उत्पादनातून काढण्यापूर्वी शेतकरी प्रथम या बलुतेदारांचा वाटा काढून ठेवीत असे. कारागिराला माल पुरवून गावकरी आपले काम करून घेत. मात्र त्याला त्याच्या श्रमाचा मोबदला प्रत्येक कामाच्या वेळी दिला जात नसे. तो फक्त वर्षाअखेरी धान्यरूपाने दिला जाई.

मॅक्स वेबर या जर्मन समाजशास्त्रज्ञाने ग्रामसेवकांच्या वरील प्रकारच्या चाकरीला डेमिअर्जिक नेमणूक पद्धती (Demiurgic mode of employment) असे नाव दिले आहे. त्याने 'जनरल इकॉनॉमिक हिस्ट्री' (१९२४) या ग्रंथात या संस्थेच्या स्वरूपाचा विचार केला आहे. कारागीर आणि सेवक यांना त्यांच्या कामाबद्दल वैयक्तिकरीत्या काही वेतन मिळत नाही. त्यांना गावच्या जमिनीचा काही भाग अथवा गावच्या उत्पादनाचा काही वाटा या कामाचा मोबदला म्हणून मिळतो. हे ग्रामसेवक म्हणजे प्रामुख्याने गावचे 'भूदास' (Serfs) होत. यालाच 'डेमिअर्जिक लेबर' असे मॅक्स वेबर म्हणतो.

गावची आर्थिक स्वायत्तता ही या ग्रामसेवकांवर अवलंबून असे. ही संस्था परंपरागत आहे. भारतीय समाज हा अशा संस्थांमुळेच अपरिवर्तनीय आहे, असे मार्क्स म्हणतो. मॅक्सवेबरच्या मते भारतीय समाजाला स्थैर्य प्राप्त झाले आहे त्याचे कारण जातीसंस्था आणि अद्भुत असा परंपरावाद (Magical traditionalism) हे होय. भारताच्या सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेतील ग्रामसेवकांचे ऐतिहासिक स्थान काय याबद्दल मार्क्स आणि वेबर यांचे मतभेद असले तरी या ग्रामसेवकांना गाव पोसत असे, या बाबतीत त्यांचे दुमत नाही.

मॅक्स वेबरचा हा 'डेमिअर्जिक लेबर' चा सिद्धांत डब्ल्यू. एच. वायझर या मानववंशशास्त्रज्ञाला मान्य नाही. या अमेरिकन ख्रिश्चन मिशनऱ्याने उत्तर भारतातील एका खेडेगावातील लोकांच्या आर्थिक संबंधांचा अभ्यास करून 'दि हिन्दू जजमानी सिस्टिम' (१९२५) नावाचा एक ग्रंथ लिहिला. जजमानी अथवा यजमानी पद्धत आणि हक्क हे शब्द गावकऱ्यांतील परस्परसंबंध दर्शविणारे आहेत. ही पद्धत काहीशी सामन्तशाहीसारखी आहे, पण या दोन्ही पद्धतीत भिन्नत्वही बरेच आहे. या पद्धतीनुसार

गावचा प्रत्येक कारागीर अथवा ग्रामसेवक काही ठराविक कुटुंबाची- ज्याला यजमान म्हणता येईल- सेवा चाकरी करतो व त्यांच्याकडून वर्षाअखेरी मिळणाऱ्या मोबदल्यावर आपली गुजराण करतो.

डॉ. हिरोशी फुकाजावा (प्राध्यापक, हितोत्सुबाशी विद्यापीठ, टोकिओ) यांनी, 'अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील ग्रामसेवक' नावाचा एक शोध-निबंध त्यांच्या विद्यापीठाच्या नियतकालिकात प्रसिद्ध केला आहे. (Hitotsubashi Journal of Economics. Vol. 12 No. 2 Feb. 1972 त्यांच्या Medieval Deccan या नव्या पुस्तकात तो आहे) त्यात त्यांनी महाराष्ट्रातील बलुतेदार पद्धत ही मॅक्सवेबरच्या मताप्रमाणे 'डेमिअर्जिक' आहे की वायझरच्या मताप्रमाणे 'जजमानी' आहे असा प्रश्न उपस्थित केला असून महाराष्ट्रातील पद्धत ही 'डेमिअर्जिक' स्वरूपाची होती असा अभिप्राय दिला आहे. 'जजमानी' पद्धत ही फारतर पुरोहितवर्गापुरती लागू पडेल, पण बारा बलुतेदारांना ती लागू करता येणार नाही.

तसे पाहून गेल्यास या दोन्ही पद्धतींचा संगम आपल्याला महाराष्ट्रात आढळतो. खेडे जर आकाराने लहान असेल तर ग्रामसेवकाला सर्व गावकऱ्यांची सेवा करणे शक्य असे; पण हेच खेडे जर मोठे असेल तर एकाच व्यक्तीकडून सर्व गावाचे काम होणे शक्य नसे. त्यासाठी श्रमविभागणीच्या तत्त्वाचा अवलंब करणे भाग असे. मोठ्या गावाला अधिक कारागीर लागत व प्रत्येकाची गिऱ्हाईके बांधून दिली जात.

थोडक्यात, वतनदार, मिरासदार, बलुतेदार आणि उपरी या सर्वांचा मिळून हा शिवकालीन गावगाडा बनलेला होता; आणि या गावगाड्यातील प्रत्येक घटक समाजाच्या विकासासाठी झटत होता.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य

या परंपरागत समाजरचनेत शिवकालात काही बदल झाला का हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी मराठी सत्ता प्रस्थापित करून अनेक प्रशासकीय आणि आर्थिक सुधारणा प्रसृत केल्या; परंतु शिवकालीन गावगाड्यांचे जे चित्र वर रेखाटले आहे ते शिवपूर्वकालाहून फारसे भिन्न नव्हते. या जुन्या समाजरचनेत बदल करणे कठीण होते. शिवाय शिवाजी राजा हा प्रामुख्याने राजक्रांती घडवून आणण्याच्या कार्यात दंग होता, त्याची भूमिका समाजसुधारकाची नव्हती.

शिवपूर्वकालात गावची वतनदारमंडळी परकीयांच्या चाकरीत होती, आणि त्या राजवटीत त्यांना बरेच स्वातंत्र्य होते. कारण स्थानिक व्यवहारांचे ज्ञान असलेल्या या वतनदार मंडळींच्या जोरावरच परकीयांना या देशात आपली सत्ता दृढ करणे शक्य असे. कृष्णाजी अनंत सभासद हा महाराजांचा चरित्रकार या वतनदारांच्या संदर्भात म्हणतो,

> ''इदलशाही, निजामशाही, मोगलाई देश कबज केला. त्या देशांत मुलकांचे पाटील, कुलकर्णी यांचे हाती कुल रयत. याणी कमाविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गावी मिरासदारांनी

घ्यावे, ते गावी दोनशे तीनशे दिवाणात खंडमक्ता द्यावा. त्यामुळे मिरासदार पैकेफरी होऊन गावास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुखी ठेऊन बळावले. दिवाणास भेटणे नाही. दिवाणाने गुंजाईस अधिक सांगितल्याने भांडावयास उभे राहतात. ये जातीने पुंड होऊन देश बळकाविले.''

याचा अर्थ परकीय राजवटीत वतनदारमंडळी गावचा शिरस्ता सोडून वागत होती. त्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देणे आवश्यक होते. सभासद म्हणतो,

> ''त्यास राजियाने देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. नामांकित कोट जाहाला तेथे (आपले) ठाणे ठेविले आणि मिरासदारांचे हाती नाहीसे ठेविले. असे करून मिरासदार इनाम इजारतीने मनास मानेसारखे आपण घेत होते ते सर्व अमानत करून जमीनदारास गल्ला व नख्त गाव पाहून देशमुखास व देशकुलकर्णी यांस व पाटील-कुलकर्णी यांसी हक्क बांधून दिला. जमीनदारांनी वाडा बुरुजांचा बांधू नये, घर बांधून राहावे. ऐसा मुलकाचा बंद केला.''

थोडक्यात मुजोर वतनदारांना नि:शस्त्र करून त्यांना गावकीच्या कामास जुंपले. काही लोकांची वतने जप्त केली तर काही लोकांना त्यांचे हक्क बांधून दिले. वतनदारांनी गावचे काम चोख करावे, रयतेवर जुलूम-जबरदस्ती, अन्याय करू नये म्हणूनच त्यांचे हक्क बांधून दिले आहेत.

सतराव्या शतकात वतनाचे महत्त्व किती होते हे शिवाजी महाराज ओळखून होते. आपल्याला लष्करी चाकरीत घ्यावे असे म्हणणाऱ्या एका वतनदाराला त्यांनी सांगितले,

> ''वतनी राहणे हेही काम थोर आहे....एकाने सिद्ध संरक्षण करावे, एकाने साध्य करावे. दोन्ही कामे साहेब बराबरीने मानिताती.''

वतनाचे काम करणे हे थोर आहे याची खात्री महाराजांना पटल्याने वतनसंस्था नष्ट करण्यापेक्षा ती अधिक कार्यक्षम करण्याकडे त्यांनी विशेष लक्ष पुरविले. त्यांनी काही लोकांची वतने जप्त केली पण ती कायमची खालसा केली नाहीत. वतनदार वठणीवर आला म्हणजे त्याचे जप्त केलेले वतन परत दिले जात असे. गावकीची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी त्यांनी नवी वतनेही निर्माण केली होती. शिवाजी महाराज हे अत्यंत धोरणी व व्यवहारी पुरुष होते. ग्रामीण समाजाला त्याची परंपरा पूर्णपणे उपभोगण्याचे त्यांनी स्वातंत्र्य दिले. त्यांनी त्यांच्याशी सहकार्य केले, विरोध केला नाही. सभासद म्हणतो,

> ''मुलखात जमीदार, देशमुख व देसाई यांचे जप्तीखाली कैदेत रयत नाही.''

याचा अर्थ असा की रयतेवर राजाशिवाय दुसऱ्या कोणाची सत्ता नाही. महाराजांनी रयतेशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केले; पण सभासदाचे हे वचन मर्यादित अर्थाने सत्य असावे. महाराजांची तशी सदिच्छा असावी. पण प्रत्यक्षात तसे घडणे व्यवहार्य नव्हते, हे महाराज ओळखून होते. सामाजिक संस्थांची मुळे समाजात खोलवर गेलेली असतात. अशा या संस्था सहजासहजी नेस्तनाबूत करता येत नाहीत. त्यांचे महत्त्व क्रमश:च कमी होणार. वतनदारांच्या विरुद्ध लोकांनी समूहाने उठाव केले आहेत अशी फारशी उदाहरणे आढळत नाहीत. वतनदारांच्या गैरवर्तनाबद्दल तक्रारी केल्या आहेत, पण वतनदारी नष्ट करावी अशी मागणी केलेली नाही. तत्कालीन समाज हा राजकीयदृष्ट्या जागृत नव्हता अथवा वतनसंस्थेवर त्यांची पूर्ण श्रद्धा होती याच कारणामुळे वतनसंस्थेला सामूहिकरीत्या विरोध झाला नसावा असे म्हणता येईल.

थोडक्यात, शिवाजी महाराजांनी काही परंपरागत संस्था नष्ट करण्याऐवजी त्यांचा आपल्या राष्ट्रउभारणीच्या कार्यासाठी उपयोगच करून घेतला असे दिसून येते.

■■

शिवकालीन शेतीव्यवसाय

जमिनीचे विभाजन

गावच्या शिवाराचे दोन प्रमुख भाग होते. एक वसाहतीची जागा, ज्याला 'पांढरी' म्हणत, आणि दुसरी नांगरटीची जागा, ज्याला 'काळी' म्हणत. या काळीचे दोन प्रमुख भाग- प्रत्यक्ष लागवडीखाली असलेली जमीन आणि दुसरी वाजट अथवा पडीक जमीन हे होत. वाजट जमिनीचा काही भाग गावच्या कुरणासाठी, जत्रेसाठी, बाजारासाठी इत्यादी सार्वजनिक कामासाठी राखून ठेवला जाई. वाजट जमीन लागवडीखाली आणण्याचे सतत प्रयत्न चालू असत.

सर्व जमिनीची मालकी ही राजाची असली तरी ती कसण्याचे काम राजा स्वत: करू शकत नसे. त्यासाठी जमिनीचे मालकी हक्क तो गावकऱ्यांना देई व त्याच्या मोबदल्यात त्यांच्याकडून खंड घेई. वतनदार, मिरासदार, बलुतेदार असे हे जमिनीचे मालक बनत. वाजट जमीन कसण्याकरिता ती काही मुदतीने उपरी लोकांना दिली जात असे. कालांतराने सरकारात नजराणा भरून ते त्या जमिनीचे मालक बनत असत. साधारणपणे गावची २० टक्के जमीन वतनदारांच्या कबजात होती असे काही उदाहरणांवरून दिसून येते.

धार्मिक इनामे

सतराव्या शतकात धर्माचे जीवनात विशेष स्थान होते. 'हे राज्य व्हावे हे श्रींच्या मनात फार आहे' अथवा 'स्वामींच्या अनुष्ठानबळे हे राज्य प्राप्त झाले' अथवा 'राज्य म्हणजे श्रींचा प्रसाद' अशा आशयाचे शिवाजी महाराजांच्या पत्रातील उद्‌गार त्यांच्या धर्मावरील श्रद्धेचे सूचक आहेत. याला अनुसरूनच अनेक धार्मिक संस्थांना अथवा धर्माचरण करणाऱ्या व्यक्तींना गावची काही जमीन इनाम दिलेली असे. मठ, मशिदी,

देवालये, संतांच्या समाधी यांना दिलेल्या जमिनीपासून येणाऱ्या उत्पन्नातून त्या संस्थांची देखभाल केली जाई. या देणग्या अथवा इनामे वंशपरंपरा असत. मात्र ही देवासाठी दिलेली इनामे, ज्यांना 'देवस्थान इनाम' म्हणत, त्यांचे सत्तांतर करता येत नसे. एखाद्या व्यक्तीला, संस्थेला अथवा सर्व गोतसत्तेला ते दुसऱ्याला देण्याचा अधिकार नसे.

शिवाजी महाराजांनी अशा प्रकारची बरीच धर्मादाय इनामे निरनिराळ्या संस्थांना दिली होती. आळंदीचे ज्ञानेश्वर मंदिर, इंदापूरचा काजी, भांबोड्याच्या मशिदीचा खिजमतगार, रामदासांचा चाफळ मठ, पाटगावचे मौनी बोवा, चिंचवडचे मोरया गोसावी, नींबचा सदानंद मठ, सासवडची सोपान देव समाधी इत्यादी संस्थांना महाराजांनी धर्मादाय इनामे दिल्याचे उल्लेख आहेत. स्नानसंध्या करून देवपूजा व स्वामींचे अभिष्ट चिंतून सुखाने राहण्यासाठी कित्येक हरिभक्त आणि धर्मपरायण ब्राह्मणांना वर्षासने मिळत होती. ही वर्षासने जमिनीच्या रूपाने अथवा रोख रकमेने मिळत. काही प्रसंगी एखादे संपूर्ण गाव ब्राह्मणांना दान दिले जाई. अशा देणगीला 'अग्रहार' म्हणत. मुरारजगदेव या सरदाराने हत्ती-तुला करून ते धन ब्राह्मणांस वाटले. ज्या नागरगावी हा समारंभ झाला त्याचे नाव बदलून 'तुलापूर' असे ठेवले व ते गाव ब्राह्मणांस अग्रहार दिले. (९१ क, खबर क, १९ आणि शि.च.सा.खं. २ : ३९५) जेव्हा अग्रहार गावावरचे सर्व सरकारी कर माफ केले असतील तेव्हा त्या इनामाला 'सर्व अग्रहार' इनाम म्हणत.

इनामांचे प्रकार

इनामे ही प्रामुख्याने दोन प्रकारची होती. एक 'सनदी' अथवा 'दिवाण निसबत' इनाम आणि दुसरे 'गावनिसबत' इनाम. सनदी अथवा दिवाण निसबत इनाम हे राजसत्तेने सनद अथवा फर्मान यांच्याद्वारे निर्माण केलेले असे. अशा इनामांना काही वेळा संपूर्ण सरकारी शेतसारा माफ केलेला असे, तर काही वेळा त्याचा काही भाग म्हणजे १/२, १/३ अथवा १/४ भाग इनामधारकाला द्यावा लागत असे. अशा तऱ्हेने जेव्हा इनामधारकाला साऱ्याचा काही भाग द्यावा लागत असे तेव्हा त्या इनामाला, इनाम निमाई, इनाम तिजाई, इनाम चौथाई असे म्हणत.

वतन हे एक प्रकारचे इनामच होय. शिवाजी महाराज वतनाच्या विरुद्ध होते असे म्हणणे इतिहासाला धरून होणार नाही. आवश्यकतेनुसार त्यांनी वतने निर्माण केल्याची उदाहरणे आहेत. कानदखोऱ्याच्या बाबाजी देशमुखाला त्याने केलेल्या साहाय्याबद्दल महाराजांनी वतन दिले होते. बाळाजी आवजी चिटणीस आणि रामचंद्र नीळकंठ यांना अनुक्रमे चिटणीसी आणि सबनिसी वतने राजाकडून मिळाली होती. (शि.प.सं.खं. ३ : २७०६) बंकाजी फर्जद या आपल्या विश्वासू सेवकाला महाराजांनी पाटिलकी वतन दिले होते. (शि.च.सं. खं. २ : ६२१, १७८१)

राजा आपल्या मुलीला काही इनाम देत असे, त्याला 'साडी-चोळी' अथवा 'दूध-भात' इनाम म्हणत (शि.च.सं. ३ : ४३१) जिजाबाईने एका कुलकर्ण्याच्या विधवेला

१ चावर जमीन इनाम दिली होती. या प्रकारच्या इनामाला 'चोळीखण' इनाम असेही म्हणत (सनदापत्रे, पृ. १०२) एका महाराने उत्तम सेवा केल्याबद्दल त्याला जमीन इनाम देण्यात आलेली आहे. (रा.खं. १५ : ७२) सूर्यग्रहणाच्या निमित्ताने दान म्हणून साताऱ्याच्या राजोपाध्येला १ चावर जमीन इनाम दिली होती. (रा.खं. १५ : ३९२) एका नर्तिकेला देखील जमीन इनाम मिळाली आहे. (सनदापत्रे, पृ. १४५) थोडक्यात, वतने अथवा इनामे राजाकडून बहाल केली जात म्हणूनच त्यांना 'सनदी' अथवा 'दिवाण निसबत' इनामे म्हणत.

राजसत्तेत बदल झाला म्हणजे इनामदार आपल्या सनदेचे नव्या राजसत्तेकडून नूतनीकरण करून घेत असे; आणि सामान्यत: या जुन्या इनामाच्या सनदेवर नवी राजवट शिक्कामोर्तब करीत असे. आदिलशाहीकडून जो मुलूख महाराजांच्या ताब्यात आला त्या मुलखातील इनामे त्या त्या व्यक्तीकडे चालू ठेवण्याची त्यांनी आज्ञा दिली होती. मावळ परगण्यातील शिवरे पाटलाची सरपाटीलकी त्याच्याचकडे चालू ठेवण्याचा आदेश त्यांनी मावळ परगण्याच्या सुभेदारांना व कारकुनांना दिला होता. (शि.प.खं. ३ : २७३९) पुणे परगण्यातील एका कुलकर्ण्याच्या दत्तकपुत्राचे कुलकर्ण आणि ज्योतिषी वतन महाराजांनी मान्य केले होते; आणि तशा तऱ्हेचा हुकूम मावळ परगण्यातील अधिकाऱ्यांना दिला होता. (शि.प.खं. ३ : २७८३) गुंजण मावळचे देशमुखी वतन महाराजांनी त्याच घराण्यात चालू ठेवले. आपली देशमुखी राजे काढून घेतील अशी गुंजणमावळच्या हैबतराव देशमुखाला भीती वाटत होती. त्यावर महाराजांनी त्याला खूप धीर दिला. ते म्हणतात,

> "तुम्हांस साहेब घरिच्या लेकरासारिखे जाणिती; तुमचे हजार गुन्हे माफ आहेती... तुम्हांसी आम्ही वाईट वर्तणूक करू तरी आम्हांसी महादेवाची आण असे व आईसाहेबांची आण असे....आमच्या इमानावरी आपली मान ठेऊनु आम्हापासी येणे.'' (मराठी दप्तर रुमाल ३, ले. २१)

दाभोळच्या देशमुखी वतनाचे प्रकरण नीटपणे तपासून ते सरदेसायाकडे चालू ठेवण्याचा राजाने आदेश दिला होता. (शि.प.खं. १ : ८८७) अफझलखानाने मराठी राज्यावर आक्रमण केले तेव्हा रोहिडखोऱ्याचे खोपडे देशमुख गनिमास मिळाले होते. अफझलखानाचा पराभव झाल्यानंतर या देशमुखास भीती वाटू लागली की महाराज आता आपल्याला काही वतनावर ठेवणार नाहीत. त्याने आपल्या परगण्यातील लोकांना उपद्रव देण्यास प्रारंभ केला. त्यावर शिवाजी महाराज त्याला लिहितात,

> "जे वख्ती अफझल साहेबाचे तरफेस आला होता ते वख्ती तुम्ही येक वजा समजोन गनिमास मिळाले. तयावरी गनिमाचा अमल बरतरफ जाला याकरिता तुम्ही शक अंदेशा धरून ता। (तपे) मजकुरास न येऊन आपल्या हक्काबद्दल गावगनास आजार देत आहा तरी यामधे तुम्ही आपला काये फायदा समजले आहा? साहेबासी गैररूजू असावे आणि आपल्या हक्कास खलाल करून घ्यावे हे अक्कल तुम्हांस कोणे दिधली आहे? या उपरि कोणे बाबे शक अंदेशा न करून आपल्या वतनास येणे आणि आपले देशमुखीचा इनाम व हक खाऊन खुशहालीने राहणे, साहेबांची, मेहरबानी तुम्हावरी बहुत आहे.'' (शि.च.सा. ५ : ७६२)

या पत्रावरून वतनदाराकडे पाहण्याचा महाराजांचा दृष्टिकोन आपल्या लक्षात येतो. वतनदार जर चुकला असेल आणि आपल्या कृत्याचा त्याला पश्चात्ताप होत असेल तर त्याला क्षमा करून वतनाच्या कामावर त्याला रुजू करून घेणे हे सर्वांच्या हिताचे आहे अशी महाराजांची भावना होती. वतनदाराच्या हातून चूक झाली म्हणून त्याचे वतन खालसा करून नवा वतनदार उभा केला नाही, तर जुन्या वतनदाराचीच समजूत काढली आहे.

इंदापूरकर, जेधे, घाटगे, सिलिमकर हे देशमुख; सिवरे, कल्याण, खामगाव, वाल्हे, इंदापूर येथील पाटील; पुरंदरे, ब्रह्मे, दीक्षित, चित्राव इत्यादी कुलकर्णी; ज्योतिषी तसेच ठाकर, पाध्ये, पानशी आटोल्ये ही वृत्तिवंत मंडळी शिवाजी महाराजांनी वतने, इनामे देऊन निर्माण केली.

एखाद्या कारागिराला अथवा सेवकाला समस्त गावकरी मंडळी अथवा गावातील एखादी व्यक्ती आपल्या कक्षेतील काही जमीन त्याच्या सेवेबद्दल इनाम देत असे. ही जमीन बहुधा सारामुक्त असे. अशा इनामांना 'टिकणाती बेगारी' अथवा 'देहांगी इनाम' असे कागदपत्रांत म्हटले आहे. अशा प्रकारच्या इनामांची संख्या अल्प असे. गावाने ही इनामे निर्माण केली असल्याने या इनामांना 'गावनिसबत इनाम' म्हटले आहे. इनामधारकाला जरी शेतसारा माफ असला तरी त्यामुळे सरकारचे जे नुकसान होई त्याची भरपाई गाव करीत असे.

राजाला जसा वतने, इनामे देण्याचा अथवा ती चालू ठेवण्याचा अधिकार होता तसा ती रद्दबातल अथवा जप्त करण्याचाही अधिकार असे. वतन अथवा इनाम ज्या विशिष्ट कार्यासाठी दिले असेल अथवा राजाशी ती व्यक्ती एकनिष्ठ नसेल तर ते वतन अमानत अथवा खालसा केले जात असे. पुण्याच्या देशकुलकर्ण्याने मुघलांशी हातमिळवणी केल्यामुळे राजाने त्याचे वतन अमानत केले (पे.द. ३१ : ३८). अमानत केलेली वतने खात्री पटल्यानंतर राजाने परतही केली आहेत. निराजी पंडिताने पुण्याच्या देशकुलकर्ण्याबद्दल हवाला दिला तेव्हा त्याचे वतन परत करण्यात आले. (पे.द. ३१ : ३८) मावळच्या जेधे देशमुखाने १६६८ साली राजाला विनंती केली की,

> "आपले वतन अमानत केल्याने आपला अवकात चालत नाही तेव्हा आपला अवकात चाले आणि साहेबाचे चाकरीस हाजीर राहो यैसे केले पाहिजे.''

तेव्हा राजाने त्याचे वतन परत केले. (शि.च.सा. २ : २२०)

पण काही वेळा वतनदारांच्या अशा विनंती अर्जांना भीक घातली जात नसावी. पुढे खोऱ्याच्या देशमुख देशकुलकर्ण्याची वतने जप्त करून त्यांना त्यांच्या वतनाबद्दल व हक्काबद्दल काही ठरावीक रक्कम नेमून दिली होती. पुढे राजाराम महाराजांच्या काळात ही वतनावरील जप्ती बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे उठलेली दिसते. १६९० साली ही मावळातील वतनदार मंडळी राजाकडे गेली व त्यांनी विनंती केली,

> ''मोगलाची धामधूम आपल्या राज्यात आजी तीस वर्षे होत आहे यामुळे मुलूख वैराण जाला त्यास सालगु।। (गुदस्ता) मोगलास राजगड कबज जाला मुलखात मोगलाईचा आंमल चालिला हली श्रीकृपेने आपल्या राज्याचा मामला थाटत चालला ऐशियास देशमुख व देशकुलकर्णीता। (तपे) मा (मजकूर) सुभा येऊन अर्ज केला की आपण वतनदार राजश्री साहेबांच्या पायाशी येकनिष्ठ आहो. राजश्री कैलासवासी स्वामीचे वेळेस आपली वतने अमानत करून हकाच्या मोइनी करून देत असेती. सांप्रत गनिमाचे धामधुमेकरिता व दुकाळाकरिता रयती गेली, मेली, जुजबी राहिली; त्यास खावयास व राहावयास नाही ये जातीचा रयतीचा विच्यार जाला आहे रयतीचा बहूत वजा दिलासा करून किर्द मामुरी करून साहेबाच्या किलाकोटासी मदती करावी लागते तरी साहेबी आम्हा वतनदारावरी कृपाद्रिस्टीने पाहोन आमची वतने इनामती व इसाफती हकलाजिमे जे आहेती ते आमची आमचे दुमाले केली पाहिजे म्हणून अर्ज केला त्यावरून हकीकत मनास आणून पाहता वतनदारांची वतने दरोबस्त दुमाले केलिया विरहित पोटतिडीक लागून मुलूख मामूर होत नाही व मुलकाचा जप्तरप्त होत नाही ऐसे कलो आले.'' (राजवाडे, १६ : २८, पृ. ४३-४४, पहा खंड १७ : २१)

हे सर्व जाणून राजाराम महाराजांनी वतनदारांची वतने परत केली आहेत. मुघली आक्रमणामुळे राजारामाच्या काळात स्वराज्यात अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले होते. मराठे सरदार मुघलांना जाऊन मिळण्याची भीती होती. स्वराज्य टिकले पाहिजे यासाठी लोकांनी 'पोटतिडीक लागून' काम करावे म्हणून शिवाजी महाराजांच्या काही धोरणांना राजारामाला मुरड घालावी लागली.

खेडेबारे तर्फेतील रांजे गावच्या बाबाजी बिन भिकाजी गुजर पाटील याच्या हातून काही बदअमल झाला. ही हकीगत जेव्हा शिवाजी महाराजांना कळली तेव्हा त्याला त्यांनी पकडून आणला आणि चौकशी केली, तेव्हा गोष्ट खरी ठरली म्हणून बाबाजीची पाटिलकी जप्त केली, त्याचे हात-पाय तोडून टाकले, पुढे गोताने त्याला तीनशे होन दंड केला. तो सोनाजी नावाच्या एका त्याच्या दूरच्या नातलगाने भरला. तसेच या

सोनाजीने दिवाणात २०० होन 'सेरणी' देऊन राजाकडून पाटिलकी मिळविली. या पत्रावरून गोताच्या संमतीस किती महत्त्व होते याची कल्पना येते. गोताने हमी घेतल्यानंतरच राजाने पाटिलकी सोनाजीस दिली आहे. हे पत्र १६४६ जानेवारी २८ चे आहे. शिवाजी महाराजांची ''प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।। शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते'' ही राजमुद्रा असलेल्या उपलब्ध पत्रांपैकी हे सर्वांत जुने पत्र होय. यावरून वतनदारांची गय करावयाची नाही हे शिवाजी महाराजांचे धोरण अगदी प्रारंभीपासूनचे होते असे मानावयास हरकत नाही. (शि.च.सा. २ : २३९)

एखाद्याचा निर्वंश झाला असेल तर ते वतन अथवा इनाम सरकारजमा होत असे आणि योग्य वारस पुढे आला तरच सरकार ते वतन सर्व हक्कासह दुसऱ्या व्यक्तीकडे सुपूर्त करीत असे. एका पाटलाच्या अनौरस मुलाने पाटिलकीच्या वतनावर आपला हक्क सांगितला, पण सरकारने तो मान्य केला नाही. कोरेगाव परगण्यातील भाडळे येथील घोरपडे पाटलासंबंधीच्या १६५४ च्या महजरात म्हटले आहे,

> ''नागोजी घोरपडा मयेत जाहाला, त्यास संतान नाही, निपुत्रिक त्याने माहलोजी पालक (बेटा) पालिक आहे तो काही अपुले जातीगोताचा नव्हे तो रोहिडेकर जगदेराऊ त्याचे बटकीचा त्यास पटेलगी लाभत नाही.'' (शि.च.सा. ५ : २०, पृ. १६६)

वतनदारांचे कज्जे शिवाजी महाराज स्वतः जातीने लक्ष घालून सोडवीत असत. खरा वतनदार कोण, खोटेपणा कोण करतो, याची त्यांना पुरती जाणीव असे. मावळ परगण्याच्या देशाधिकाऱ्याला उद्देशून लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात,

> ''स्वामी धाकुटपणापासून या देशात आहेत, मिरासदार कोण व गैरमिरासदार कोण हे जाणताती व माणसाचे माणूस वळखतात'' (पे.द. ३१ : ४१)

गावचे वतनदार पाटील-कुलकर्णी यांची नेमणूक करताना गावकऱ्यांची संमती घेतली जात असे. एका गावच्या गावकऱ्यांना एक व्यक्ती वतनदार पाटील म्हणून मुळीच नको होती. तेव्हा महाराजांनी त्याची नेमणूक केली नाही (९१ क.बखर, पृ ७४) एका गावच्या गावकऱ्यांनी आपला कुलकर्णी निवडला व त्याला सरकारची संमती मिळविली. (रा.खं. १५ : २७०)

वतनांची, इनामांची विक्री आजच्याप्रमाणे त्या काळातही होत असे. जमिनी अथवा वतनावरील हक्क गहाण टाकून त्यावर कर्ज काढल्याचेही अनेक उदाहरणे आढळतात. एखाद्या गावकामगाराने आपले वतन विक्रीस काढले तर त्यात सारे गावकरी भाग घेत असत. कारण हे वतन विकत घेऊन गावात येणारा नवा गावकामगार त्यांच्या पसंतीस उतरणे आवश्यक होते. कवठ्याच्या कुलकर्ण्याला आपले वतन असेच गावकऱ्यांच्या संमतीने विकावे लागले. (पसासं १ : १२५६)

१६३० च्या दुष्काळात पुष्कळ वतनदारांना आपली वतने पूर्णतः अथवा अंशतः

विकावी लागली होती. एका पाटलाने आपले अर्धे वतन सर्व हक्कांसह १०० होनांना विकले होते. काही वेळा पाटलाला सरकारातून घेतलेल्या रकमेसाठी हवाला म्हणून आपल्या वतनाचा काही भाग गहाण ठेवावा लागे. (शि.च.सा.खं. ३ : ६३३)

जमिनीला त्या काळात फार मोठी मागणी असली तरी ती विकणे इतके सोपे नव्हते. विशेषत: वतनदारांना आपली वतनी मालमत्ता विकण्यापूर्वी सर्व संभाव्य वारसदारांची संमती घ्यावी लागे, त्याखेरीज विकत घेणारा तयार होत नसे. अन्नान्नदशा होऊन मृत्युपंथाला टेकलेल्या एका पाटलाला आपले वतन विकण्यासाठी सर्व वारसदारांची संमती मिळविण्याकरिता २५० होन खर्चावे लागले. (रा.खं. १५ : ३९)

मोसेखोऱ्यातील एक पाटिलकी वतन विकत घेऊन शिवाजी महाराजांनी ते आपला विश्वासू सेवक माणकोजी यास दिले होते. (शि.च.सा. ७ : ५६) नांदेडच्या पोळापासून पाटिलकी विकत घेऊन ती बकाजी फर्जंद यास १०० होनांना विकली होती.

खरेदी, विक्री, गहाण यासंबंधीची अनेक उदाहरणे आढळत असली, तरी वतनाची शक्यतो विक्री होऊ नये अशीच गावकऱ्यांची व सरकारची इच्छा असे. मुजुमदाराच्या वतनाबाबत चाललेल्या तंट्यात महाराजांचा न्यायाधीश प्रल्हाद निराजी याने दिलेला निर्णय या प्रवृत्तीचा द्योतक आहे. तो म्हणतो,

> ''राजश्री छत्रपती स्वामींचा तह की वतनदाराचे वतन घेणारे घेऊ नये व देणारे देऊ नये, जो विकत घेईल त्यास शास्त करावी, गुन्हेगारी घ्यावी, वतनदार होऊन जो आपले वतन विकत देईल त्यास जोर ताकीद करावी.'' (शि.च.सा. १० : १५)

न्यायाधीशाचे हे उद्गार 'आज्ञापत्रा'तील वतनासंबंधीच्या विचाराशी सुसंगत असेच आहेत. 'आज्ञापत्रा'त म्हटले आहे,

> ''लहान अथवा थोर परंतु प्राचीन परंपरागत वृत्ती चालत आल्या असतील तो वृत्तिलोप परमपातक आहे. येकाची वृत्ती येकास सर्वथैव न द्यावी. स्वत: अपहार न करावा. कदाचित वृत्तिवंताने अपराध केला तथापि त्यास यथाशास्त्र शासन करावे. परंतु वृत्यपहार करावा हे विहित नव्हे.''

या धोरणामागील मुख्य हेतू वतनाचे महत्त्व व दर्जा कायम राहावा, ती सवंग होऊ नयेत; एखाद्या सामान्य वस्तूप्रमाणे त्यांची बाजारात देवाण-घेवाण होऊ नये असाच होता.

शेतकरी आणि त्याच्या गरजा

सतराव्या शतकात महाराष्ट्राचे आर्थिक जीवन शेती व्यवसायाशी संपूर्णपणे निगडित झाले होते. उद्योगधंदे, व्यापार आणि इतर व्यवसाय यांना आर्थिक व्यवस्थेत दुय्यम

दर्जाचे स्थान होते. ''उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी'' हे सुभाषित प्रसिद्धच आहे. शेती व्यवसाय हाच जीवनाचा एकमेव मार्ग असल्याने महाराष्ट्रात जमिनीला 'काळी आई' असे म्हणत असत. शेतीच्या उत्पादनावरच गावचे अधिकारी, मिरासदार, बलुतेदार, उपरे यांचे जीवन अवलंबून असे.

कुणबी, मुजेरी, रया, कुळवाडी अशा विविध नावांनी शेतकऱ्याचा उल्लेख कागदपत्रातून केलेला आढळतो. कुणबी हा शब्द 'कुळंबी' अथवा 'कुटुंबिक' या शब्दापासून तयार झाला असून त्याचा अर्थ शेतकरी अथवा शेती व्यवसायातील एक व्यक्ती असा आहे.

सतराव्या शतकात महाराष्ट्रात विविध राजकीय घडामोडी घडत होत्या आणि स्वाभाविकच त्याचे पडसाद शेतकऱ्याच्या जीवनावर आणि व्यवसायावर पडत होते. पावसाची अनिश्चितता, नेहमीचा युद्धाचा प्रसंग, आर्थिक मदतीचा अभाव, असह्य राज्यकारभार इत्यादी कारणांमुळे महाराष्ट्रातील शेती व्यवसाय आणि शेतकरी हे दोन्ही मागासलेल्या अवस्थेत होते.

अव्वल, दूम, सीम आणि वाजट अशी जमिनीच्या उत्पादनक्षमतेच्या कसावरून तिची प्रतवारी केली जात असे. अव्वल प्रतीच्या जमिनीचे प्रमाण अगदीच अल्प होते. गावच्या एकूण पिकाऊ जमिनीपैकी १ टक्का जमीनसुद्धा पहिल्या म्हणजे अव्वल दर्जाच्या प्रकारात मोडत नसे.

शेती व्यवसायाला मनुष्यबळाची फार मोठी गरज असते. कुटुंबातील आबालवृद्ध, स्त्री-पुरुष हे शेतीच्या कामासाठी हवे असतात. शिवकालात प्रारंभी एक मोठा दुष्काळ पडला होता. त्यात बरीच मनुष्यहानी झाली होती व ती सहजासहजी भरून निघण्यासारखी नव्हती. रामदास म्हणतात, ''वीसा लोकांत एकचि राहिले.'' याचा अर्थ महाराष्ट्राची १/५ लोकसंख्या या दुष्काळात जिवंत राहिली. या विधानातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी अपरिमित मनुष्यहानी झाली हे विधान आपल्याला मान्य करावे लागेल.

तसेच शिवाजी महाराजांनी या काळात स्वराज्याचा उद्योग आरंभिला होता. त्यामुळे लष्करी पेशा हा एक नवा मार्ग लोकांपुढे निर्माण झाला होता. गावची तरुण पिढी या स्वराज्याच्या कार्यात गुंतली असल्यास नवल नव्हते. भारताच्या सतराव्या शतकाचा एक आर्थिक इतिहासकार मोरलँड यांच्या मते साधारणपणे लोकसंख्येच्या १/३० भाग सैन्यात गुंतलेला होता. हे प्रमाण शिवकालीन महाराष्ट्राला लागू पडेल असे दिसत नाही. मराठी सैन्याचे जे काही आकडे सभासदाने आपल्या बखरीत दिले आहेत त्यावरून असे वाटते की, स्वराज्याच्या कार्यात गुंतलेल्या तरुण मावळ्यांचे प्रमाण उत्तर हिंदुस्थानातील लोकसंख्या आणि सैन्य यांच्या प्रमाणाहून अधिक असावे.

शेती व्यवसाय हा अत्यंत कष्टाचा होता. त्यामुळे अधिक मनुष्यबळाची गरज होती; पण दुष्काळातील मनुष्यहानीमुळे आणि घरची कर्ती माणसे स्वराज्याच्या कार्यात गुंतल्यामुळे शेतीव्यवसायासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होत नव्हते.

बैलजोडी ही व्यवसायाची महान शक्ती होती; परंतु गनीम आपली जनावरे उचलून नेईल याची धास्ती विशेषत: गावापासून दूर राहणाऱ्या अथवा गनिमाच्या शिवेवरील गावकऱ्यांना नेहमी असे. जनावरे गेली म्हणजे सारा व्यवसायच मोडकळीला येई. या काळात गुरेढोरे पळविण्याचे प्रकार वारंवार होत. गरजू शेतकऱ्यांना बैलजोडी विकत घेण्यासाठी आवश्यक ते आर्थिक साहाय्य द्यावे असे एका पत्रात म्हटले आहे :

"ज्याला सेत करावयास कुवत आहे आणि त्याला जोतास बैल, नांगर, पोटास दाणा नाही, त्यावीण तो आडोन निकामी जाला असेल, तरी त्याला रोख पैके हाती घेऊन दो चौ बैलांचे पैके द्यावे, बैल घेवावे."

तसेच हे पैसे बिनव्याजी द्यावेत आणि जेवढे दिले असतील तेवढेच शेतकऱ्याच्या सवडीप्रमाणे हप्त्या हप्त्याने वसूल करावेत असा अधिकाऱ्यांना आदेश दिला होता.

"बैलाचे वगल्याचे पैके वाढी दिढी न करता मुदलच उसनेच हळूहळू याचे तवानगी माफीक घेत घेत उसूल घ्यावा. जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे." (शि.च.सा. ९ : ५५)

कुणब्याची तिसरी गरज म्हणजे शेतीच्या उपकरणांची. नांगर अथवा कुळवांची संख्या हे त्या शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे द्योतक असे. एका नांगराचा, दोन नांगरांचा, चार नांगरांचा धनी असा तो गावात ओळखला जाई. उपकरणांची ही गरज सामान्यत: गावच्या कारागिराकडून भागविली जात होती. गावची आर्थिक रचनाही या शेतीच्या व्यवसायाला पोषक होईल अशाच स्वरूपाची त्या काळात होती. लाकूड आणि इतर सामान देऊन गावकरी, सुतार, लोहार, चांभार इत्यादी बलुतेदारांकडून आपली शेतीची उपकरणे बनवून घेत. शेतीची उपकरणे खरेदी करण्यासाठीसुद्धा सरकारातून कर्ज देण्याची व्यवस्था केली होती.

उत्तम शेतीसाठी उत्तम बी-बियाणे लागे. काही शेतकरी बियाणे म्हणून उत्तम दाणा काढून काळजीपूर्वक जतन करून ठेवीत; पण हे बियाणे देखील प्रसंग त्यांना पोटासाठी वापरावे लागे. तेव्हा अशा वेळी गावच्या सावकाराकडून दामदुपटीच्या बोलीने त्यांना हे बियाणे आणावे लागे. बियाणे घेण्यासाठी एखाद्याला पैशाची गरज असेल तर त्याला सरकारातून पैसा उपलब्ध करून द्यावा असा आदेश अधिकाऱ्यांना होता.

शेती व्यवसाय हा कालांतराने फलदायी होणारा व्यवसाय आहे. आज पेरले आणि उद्या उगवले असे या व्यवसायात घडत नाही. त्यामुळे वाट पाहत राहावी लागे. लावणी आणि उगवणी यामधला काळ फार खडतर असतो. शेती व्यवसाय सुरळीत चालू ठेवण्यासाठी व स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी हवा असणारा पैसा त्याला कर्जरूपाने गावच्या शेटे महाजनाकडून उभा करावा लागत असे. त्यांचे व्याजाचे दर जबरदस्त असत. प्रसंगी २५ टक्के दराने त्यांना कर्ज काढावे लागे. शिवाजी महाराजांनी अशा गरजू शेतकऱ्यांना सरकारी खजिन्यातून धान्य देण्याची व्यवस्था केली होती. "पोटास

दाणे नाही....तरी पोटास खांडे दो खांडे दाणे द्यावे." असे म्हटले आहे.

शेती व्यवसाय वाढीस लागला पाहिजे. शेतकरी सुखी तर राजा सुखी, शेतकरी गरीब तर राजा गरीब; आणि राजा गरीब तर राज्य गरीब ही त्या काळची अर्थनीती होती आणि त्याला अनुसरूनच महाराजांनी शेतकऱ्याला आर्थिक साहाय्य देण्याचे धोरण आखले होते. ते अधिकाऱ्याला म्हणतात,

"या कलमास (म्हणजे शेतकऱ्याला सर्व दृष्ट्या समर्थ करण्याच्या बाबीस) जरी दोन लाख लारी (एक चांदीचे नाणे) पावेतो खर्च करिसील, आणि कुणबिया कुनब्याची खबर घेऊन त्याला तवानगी ये ती करून कीर्द करिसील, आणि पड जमीन लाऊन दस्त जाजती करून देसील तरी साहेबा कबूल असतील." (शि.च.सा. ९ : ५५)

महाराष्ट्रातील कुणब्याला शेती व्यवसायासाठी त्या काळात प्रामुख्याने वरुण राजाच्या कृपेवर अवलंबून राहावे लागे. पाऊस वेळेवर आणि प्रमाणशीर पडला नाही तर गावाला दुष्काळाची अवकळा येई. पाऊस आणि जमीन पेरणीस योग्य झाली की कितीही अडचणी असल्या तरी लावणीची घात साधण्यासाठी शेतकऱ्याला शेताकडे धाव घ्यावी लागे. अशा वेळी घरात एखादे मयत झाले असले तरी त्याच्या उत्तरक्रियेचे काम त्याला बाजूला सारून लावणीची घात साधावी लागे. तुकाराम महाराज म्हणतात :

मढे झाकुनिया करिती पेरणी।
कुणाबियाचे वाणी लवलाहे।।११।।८२३

इतके काबाडकष्ट करून पिकविलेले शेत त्याला जनावरे, पक्षी आणि शत्रूचे हल्ले यांच्यापासून वाचवावे लागे. कणसात दाणा भरू लागला की पक्ष्यांची धाड पडत असे. गोफणीने दगडांचा मारा करून हे पक्षी हुसकवावे लागत. जनावरांना हाकलण्यासाठी बुजगावणे उभे करावे लागे. प्रस्तुत संदर्भात तुकारामाचे पुढील अभंग उद्बोधक आहेत.

सेत आले सुगी सांभाळे चारी कोण।
पिका आले परी केले पाहिजे जतन।।१।।
गोफणेसी गुंडा घाली पागोऱ्याच्या नेटे।
पळती हाहाकारे अवघी पाखरांची थाटे।।२।।
पेटवूनि आगटी राहे जागा पालटूनि..... ११४९
तिमाणे राखण ठेवियले सेता।
घालुनिया माथा चुना तया।।२२८९

उंदरांचा सुळसुळाटही प्रसंगी पिकांना हानीकारक ठरत असे. (रा.खं. १८.३३) लावणी-संचणी-उगवणीच्या काळात युद्धाला तोंड फुटले तर त्याच्या दैन्याला

काही पारावार राहत नसे. सैन्याच्या हालचाली पेरणीच्या मार्गात आड तर येतच, पण सैनिक उभी पिकेही काही वेळा कापून नेत अथवा नष्ट करीत, शेतकऱ्यांची घरे लुटीत. आपल्या सैनिकांना अशा अपकृत्यांपासून परावृत्त करावे असे आदेश महाराजांनी अधिकाऱ्यांना दिले होते. अर्थात त्याचा किती उपयोग झाला असावा हे सांगणे कठीण आहे. प्रस्तुत संदर्भात १६७४ साली शिवाजी महाराजांनी आपल्या जुमलेदार, हवालदार व कारकून या लष्करी चाकरीत असलेल्या अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र फार मोलाचे आहे. ते म्हणतात,

> "विलातीस तसवीस देऊ लागाल. ऐशास, लोक जातील, कोणी कुणब्याचे दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसें करू लागलेत म्हणजे जी कुणबी घर धरून जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील कितेक उपाशी मराया लागतील म्हणजे त्याला ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही! ऐसा तळतळाट होईल." (रा.खं. ८:२८)

शिवाजी महाराजांचे हे एक अप्रतिम पत्र असून लष्कराच्या शिस्तीसंबंधी त्यांनी किती बारकाईने विचार केला होता याची यावरून कल्पना येते. या पत्रासंबंधी इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, "या पत्रातील सर्व शब्द शिवाजीच्या तोंडचे आहेत. हे पत्र शिवाजीने सांगितले व बाळाजी आवजी चिटणीस यांनी लिहिले. भाषा कारकुनी नसून साहेबी आहे. शिपाई लोकांनी अमुक रीतीने का वागावे व अमुक रीतीने का वागू नये याची फोड करून दाखविली आहे. पत्रात जरब अतोनात असली तरी ती आपल्या हिताची आहे असेच सैनिकांना व अधिकाऱ्यांना वाटावे अशी पत्राची रचना व रोख आहे."

अशा आज्ञा करून महाराज कदाचित आपल्या सैनिकांपासून रयतेचे रक्षण करू शकले असतील, पण शत्रूकडून तर रयतेला उपद्रव देण्याला उत्तेजनच मिळत होते. विशेषत: लावणीच्या काळात जर शत्रूची धाड आली आणि लावणीची घात जर साधली गेली नाही तर शेतकऱ्याचे सारे वर्ष फुकट जात असे.

शिवाजी महाराजांच्या काळात तर सतत युद्धाचाच प्रसंग असे. शक्यतो शत्रूच्या भूमीवर जाऊन तेथे लढाई करावयाची ही त्यांची युद्धनीती असली तरी नेहमीच तसे घडत असे, असे नाही. पुणे, सासवड, चाकण, वाई, जावळी, कल्याण, भिवंडी, नाशिक जिल्ह्याचा काही भाग, दक्षिण कोकण, पन्हाळा आणि त्याचा परिसर, कुडाळ, सावंतवाडी या साऱ्या रणभूमी होत्या. या ठिकाणी राहणाऱ्या रयतेला गनिमांचा फार उपद्रव होत असे. त्यांच्यावर बरीच जुलूम, जबरदस्ती केली जात असे. अशा धामधुमीच्या काळात रयतेच्या हाती काही पीक लागत नसे. शत्रुपक्षाचे तंबू ज्या ठिकाणी ठोकले असतील तेथे तर सारी जनावरे, घोडी पिकात चरावयास सोडली जात

आणि सारे पीक उद्ध्वस्त होई. पिके जाळण्याचेही प्रकार घडत. शत्रूच्या भयाने अशा वेळी लोक जेवढे जमेल तेवढे घरातील साहित्य हातात, डोक्यावर घेऊन गावातून पळून जात आणि डोंगरकपारीत अथवा जंगलात जाऊन राहत.

शत्रूची 'रहदारी' झाली म्हणजे काय होत असे याची कल्पना पिंपळगावच्या पाटलाच्या पुढील पत्रावरून येईल. तो म्हणतो,

> "साल गुदस्ता मोगली गावावरी धावणी करून गाव मारिला. वस्तभाव, गुरेढोरे तमाम गावाचा बंद धरून नगरास आणिला. माणसे, दादले व बाइला व लेकरे यैसी सेदीडसे बंदी राहिली. कितेक बंदीखानी मेली. मग दरम्यान भले लोक होऊन खंडणी होनु २५०० झाडा करणे कुलबंद सोडनुक केली." (शि.प.सं. ३: २४२२)

ॲबे कॅरे नावाच्या एका समकालीन प्रवाशाने या संदर्भात आपले विचार नोंदवून ठेवले आहेत. तो म्हणतो, "शत्रूच्या भयामुळे अथवा हालचालीमुळे अथवा स्वाऱ्यामुळे माझ्या प्रवासाच्या मार्गावरील अनेक गावे ओस पडली होती. कुलाबा जिल्ह्यातील सावित्री नदीच्या काठावरील एका खेड्यातील सर्व माणसे आपली कुटुंबे आणि जनावरे घेऊन शेजारच्या डोंगरात लपून बसली होती. नदीकाठच्या प्रत्येक खेड्यातील लोकांना सिद्दी लोकांची फारच भीती वाटत होती. हे सिद्दी सैनिक सशस्त्र बोटीतून येत, एखाद्या खेड्यात घुसत आणि ते संपूर्ण लुटत, कोळ्यांच्या नावा जाळून टाकीत आणि परत जात."

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड या छोट्या शहरात तो गेला असताना तेथे देखील त्याला अशीच परिस्थिती आढळून आली. तेथील लोक सिद्द्यांच्या भीतीने जंगलात, डोंगरात पळून गेले होते. हे गाव सिद्दी लोकांनी उद्ध्वस्त करून टाकले होते.

नवा मुलूख संपादन करून मराठी सत्ता विस्तृत व दृढ करणे हे शिवाजी महाराजांचे ध्येय असल्याने युद्ध अटळ होते. शांततेचा काळ क्वचितच असे. त्यामुळे लूटमार नेहमीच मोठ्या प्रमाणावर होत असे. गुंडलोक शेतकऱ्याला मारहाण करीत. त्याला पोत्यात घालून बांधून समुद्रात टाकीत, काही वेळा त्याच्या घरची तरणीबांड मुले ओलीस धरून नेत व शेतकऱ्यांकडून पैसा उकळून नंतरच त्याच्या मुलांची सुटका करीत.

राजाराम महाराजांचा काळ हा महाराष्ट्राच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढ्याचा काळ म्हणून प्रसिद्ध आहे. या काळात मोगलांचा फेरा अविरत चालू होता. त्या वेळी रयतेस कसा उपद्रव होत असे याची कल्पना १७०४ सालच्या पुढील पत्रावरून येईल. शिरवळ परगण्यातील भोगोलीच्या रयतेने सरकारकडे तक्रार केली आहे,

> "परगणि रहदारी पडिली त्यामध्ये बलोच येऊन गावाचा गाव सेत सिवार चारिला, गाव लुटिला, गुरे नेली त्याने रयेती खराब होऊन गेली काही कुळे राहिली त्याणी साल मजकुरी कीर्दीकरून सेते पेरली तो

हंगामसीर पाऊस जाला नाही. खरीपाचे पीक नाबूद जाले रबीची पेरणी राहिली त्यामधे दुतरफा लस्कर वरचेवर फिरते त्याणीहि सेत सिवार जुजबी होता तो चारिला यैसी रयतेची वरचेवर खराबीच जाली.'' (शि.च.सा. २ : १९१)

थोडक्यात, वरील विविध कारणांमुळे जमिनीपासून शेतकऱ्याची मिळकत बेताची आणि अनिश्चित स्वरूपाची होती. शिवकालात या असहाय शेतकऱ्याला हरप्रकारे साहाय्य करण्याचे प्रयत्न झालेले दिसून येतात. गावात नवे शेतकरी आले तर त्यांना हरप्रकारे सहाय्य करावे असे राजाचे धोरण होते. सभासद म्हणतो,

''नवी रयत येईल त्यास गुरेढोरे द्यावी. बीजास दाणापैका द्यावा. भक्षावयासि दाणापैका द्यावा. तो ऐवज दोहों-चोहों वर्षांनी आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा. ये जातीचे रयतेचे पालग्रहण करावे.''

कोणत्याही कारणास्तव रयतेने गाव सोडून जाऊ नये याबाबत खबरदारी घेतली जात असे. (शि.प.सं. ३ : २४६८) वतनदार गावकामगारांना सूचना करण्यात आल्या होत्या की रयतेला सुखी ठेवून त्यांनी गावची जमीन नांगरटीखाली आणावी; आणि लागवडीखाली आणावयाच्या जमिनीत वाढ करावी. (शि.प.सं. ३ : २६९०) शेतीचा विकास साधण्यासाठी शेतसाऱ्याच्या थकबाकीत सूट देणे, सारामुक्त जमीन देणे, इत्यादी मार्गांचा सरकार अवलंब करीत असे. बाकी थकली तरी पेरणीच्या हंगामात एकाचे शेत काढून दुसऱ्याला देत नसत.

धामधुमीच्या काळात रयतेचे रक्षण करणे हे परगण्याच्या वतनदारांचे आद्यकर्तव्य मानले जाई. त्यांच्या कुचराईमुळे शेतकऱ्याला काही इजा पोहोचल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल अशी ताकीद देण्यात येत असे. रयतेचे रक्षण करून शेतीव्यवसायाच्या विकासाला उपयुक्त अशी परिस्थिती निर्माण करणे हे त्यांचे कर्तव्य होते आणि त्यांना वतन हे या कार्यासाठीच देण्यात आले होते. रोहिडखोऱ्याच्या सर्जेराव देशमुखाला १६६२ साली लिहिलेल्या पत्रात राजे म्हणतात,

''मोगल प्रस्तुत तुमच्या तपियात धावणीस येताती म्हणौन जासुदानी समाचार आणिला आहे. तरी तुम्हांस रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तपियात गावाचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाळे समवेत तमाम रयेती लोकांस घाटाखाले बाका जागा असेल तेथे पाठवणे. जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागीयासी त्यासी पाठवणे ये कामास हैगै न करणे. रोखा अहडताच सदरहू लिहिल्याप्रमाणे अमल करणे ऐसियासि तुम्हापासून अंतर पडलियावरी मोगल जे बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल ऐसे समजोन गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे

पाठविणे या कामास एक घडीचा दिरंग न करणे तुम्ही आपले जागा हुशार असणे गावगनाही सडेकडील सेतपोत जतन करावया जे असतील त्यासही तुम्ही सांगणे की डोंगरावर असिरा कुबल जागा आसरे ऐसे त्यासी सांगणे व गनीम दुरून नजरेस पडताच त्याचे धावणीची वाट चुकवून पलोन जाणे. तुम्ही आपले जागा हुशार असणे.'' (रा.खं. १५ : २७६)

हे पत्र अत्यंत बोलके आहे. स्वराज्य संपादनाच्या धामधुमीच्या काळातही महाराज शेतकऱ्याच्या संरक्षणाबद्दल किती जागरूक होते याची कल्पना येईल. १६६२ च्या सुमारास शाइस्तेखानाच्या नेतृत्वाखाली नूतन मराठी राज्यात मोगलांचा मोठा तळ पडला होता. त्याची झळ गरीब रयतेला पोहोचणे स्वाभाविक होते. शत्रूला तोंड कसे द्यावयाचे याचे मनसुबे रचत असताना महाराजांनी आपल्या रयतेकडे पुरविलेले लक्ष त्यांच्या मूलगामी धोरणाचे— म्हणजे हे राज्य रयतेच्या कल्याणासाठी आहे— द्योतक आहे.

शेतकरी सर्वस्वी सरकारच्या मदतीवर विसंबून राहत नसत. आपल्या गावकऱ्यांच्या सहकार्याने एखादा शेतकरी आपल्या शेताचे संरक्षण करताना आढळून येतो. एका शेतकऱ्याने चोरांचा जोरदार प्रतिकार करून त्याला ठार मारले. सरकारने त्या शेतकऱ्याची प्रशंसा केली आणि त्या चोराचे प्रेत गावच्या वेशीवर टांगून ठेवावे असा आदेश दिला. सरकारी गुरेढोरे शेतात शिरून पिकांची धूळधाण करीत. अशा वेळी शेतकऱ्याची मोठी पंचाईत होत असे; परंतु शेतकऱ्याच्या तक्रारीची दखल घेऊन अशा प्रसंगांना आळा घालावा असे अधिकाऱ्यांना हुकूम सुटले होते. (ऐ.फा.सा. २ : १५)

शेतकरी गाव सोडून जातो या घटनेला फार महत्त्व दिले जात असे. यासाठी गावकामगाराबरोबरच सरकारी अधिकाऱ्यांना देखील जबाबदार धरले जात असे. कदाचित सरकारी जुलमाला कंटाळून हे गावकरी गाव सोडून जात असतील. वाईच्या हवालदाराच्या जाचाला कंटाळून काही लोक गाव सोडून जात होते तेव्हा सरकारने त्या हवालदाराचीच बदली करून टाकली. (शि.प.सं. ३ : २४६८) वाई हा भाग अद्याप मराठ्यांच्या ताब्यात यावयाचा होता; परंतु अशा परिस्थितीत महाराजांनी देखील अशीच कारवाई केली असती असे मानावयास हरकत नाही.

लावणीच्या काळात शेतकऱ्याला संरक्षणाची विशेष गरज भासत होती. या काळात शेतकऱ्याला कसलीही तोशीस होता कामा नये असा सरकारचा आदेश होता. एखाद्या शेतकऱ्याच्या नावावर थकबाकी असली तरी लावणीच्या काळात त्याला कसलाही तगादा करू नये अशी अधिकाऱ्यांना ताकीद होती. (शि.च.सा. ५.९९६) दुसऱ्या एका पत्रात म्हटले आहे :

''तैसेचे कुलबी तरी आहे, पुढे कष्ट करावया उमेद धरतो, आणि मागील बाकीचे जलित त्यावरी केले आहे ते त्यापासून घ्यावया अवसर

(ऐपत) तरी काही नाही ते बाकीचे खडवे (खंडाचा भाग) तो कुलबी मोडोन निकाम जाला या उपरि जाऊन पहातो. येसी जे बाकी रयतेवरी आसेल ते कुलाचे कुल माफ करावया खडवे तोकुब करून पेस्तर (नंतर) साहेबास समजावणे की ये रवैसीने कीर्द करून साहेबाचा फायेदा केला आहे आणि आमकी येक बाकी गैर उसली (न झालेला वसूल) मफलिस (गरीब) कुलास माफ केली आहे यैसे समजावणे. साहेब ते माफीची सनद देतील.'' (शि.च.सा. ९ : ५५)

अधिकाऱ्याने आपल्या कक्षेत येणाऱ्या सर्व मुलकाची पाहणी करून रयतेच्या गरजा जाणून घेतल्या पाहिजेत आणि रयतेला आवश्यकतेप्रमाणे आर्थिक साहाय्य केले पाहिजे असा महाराजांचा दंडक होता. प्रभावली मामल्याच्या सुभेदाराला १६७६ साली जे पत्र महाराजांनी लिहिले आहे त्यावरून त्यांचे शेतीविषयक धोरण स्पष्ट होते. ते लिहितात–

"....चोरी न करावी, इमाने इतबारे साहेब काम करावे, येसी क्रियाच केली आहेस तेणेप्रमाणे येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरूस वर्तणे या उपरि कमावीस कारभारास लावणी-संचणी- उगवणी जेसी जेसी जे जे वेलेस जे करू ये ते ते करीत जाणे. हर भातेने साहेबाचा वतु (अधिक) .... होये ते करीत जाणे. मुलकात बटाईचा तह चालत आहे परंतु रयतेवरी जाल (न पडता?) रयतेचा वाटा रयेतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे रयेतीवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत येसे बरे समजणे. दुसरी गोष्ट की, रयेतीपासून यैन जिनसाचे नक्ष (नख्त) घ्यावे येसा एकंदर हुकूम नाही सर्वथा यैन जिनसाचे नख्त घेत नव जाणे यैन जिनसाचे यैन जिनसच उसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेलचे वेलेस विकीत जाणे की ज्या ज्या हुनरेने माहाग विकेल आणि फायेदा होये ते करीत जाणे उसूल हंगामशीर घ्यावा आणि साठवण करून आणि विकरा यैसा करावा की कोण्हे वेलेस कोण जिनसच विकावा ते हंगामी तो जिनस विकावा जिनस तर पडोन जाया नव्हे आणि विकरा तरी महाग यैसे हुनरेन नारल, खोबरे, सुपारी, मिरे विकीत जाणे. महाग धारण जरी दाहा बाजार यैन जिनस विकेल तर तो फायेदा जाहालियाचा मजरा (फायदा) तुझाच आहे. यैसे समजणे. त्या उपरि रयेतीस तवाना करावे आणि कीर्द करवावी हे गोष्टीस इलाज साहेबी तुज येसा फर्माविला आहे की कष्ट करून गावचा गाव फिरावे ज्या गावात जावे तेथील कुलबी किती आहेती ते गोला करावे त्यात ज्याला जे सेत करावया कुवत, माणुसबल आसेली त्या माफीक त्यापासी बैलदाणे आसीला तर बरेच

जाले. त्याचा तो कीर्द करील.'' (शि.च.सा. ९ : ५५)

पण ज्याच्यापाशी या गोष्टी नसतील त्याला त्या घेऊन द्याव्यात असे या पत्रात पुढे म्हटले आहे.

शिवाजी महाराजांनी जी थोडीफार पत्रे, विशेषत: अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेली पत्रे आहेत त्यात वरील पत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. 'येका भाजीच्या देठा' चीही अपेक्षा न करता तू नेकीने वागले पाहिजेस असे सुभेदाराला बजावले आहे. सरकारच्या हिताकडे लक्ष ठेवून त्याने कारभार केला पाहिजे. रयतेचा वाटा रयतेला पोहोचता करून राजभागाची वसुली झाली पाहिजे असे म्हटले आहे. राजभाग त्या काळात दोन पद्धतीने वसुल केला जात असे. एक 'रोकड' अथवा 'नख्त' आणि दुसरी, 'ऐन जित्रस' अथवा 'गला'. पण वस्तूच्या रूपाने सारा वसूल करणे, तो गुदामात नेणे आणि त्याचे संरक्षण करणे हे फार जिकिरीचे काम होते. त्यामुळे आपला त्रास चुकविण्याकरिता, वस्तुरूपाने वसूल घ्यावा असे ठरले असले तरी अधिकारी त्या वस्तू जेथल्या तेथे विकत अथवा चालू बाजारभावाने त्या वस्तूची किंमत त्या शेतकऱ्याकडून वसूल करीत; पण या व्यवहारात सरकारचा तोटा होत असे. सुगीच्या काळात धान्याचा पुरवठा भरपूर असल्याने धान्याचे भाव कमी असतात; पण हेच जित्रस जर टंचाईच्या काळात विकले तर अधिक किंमत येण्याची शक्यता असते. शिवाय 'पिकते तेथे विकत नाही' हा अर्थशास्त्राचा नियम आहे. कोकणात नारळ, सुपारीला काय भाव येणार? या वस्तू देशावरच खपणार. तेव्हा जित्रस अक्कलहुशारीने विकावेत आणि साहेबाचा म्हणजे सरकारचा फायदा करून द्यावा असे अधिकाऱ्यांना बजाविले आहे. अधिकाऱ्याने चावडीत अथवा आपल्या कचेरीत बसून काम न करता, गावचा गाव फिरून शेतकऱ्यांना भेटून त्यांच्या गरजा जाणून घ्याव्यात व त्याप्रमाणे योजना करावी असे येथे सुचविले आहे.

१६७६ साली मराठी राज्य स्थिर झाले होते. राज्याभिषेक करून घेऊन महाराजांनी आपली सत्ता मराठी मुलखावर दृढ केली होती. आतापावेतो आलेल्या अनुभवावरून त्यांनी हे पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांच्या विचारांची परिपक्वता दिसते. रयतेला गावकामगारांच्या अथवा आपल्या अधिकाऱ्यांच्या लहरीवर सोडून स्वस्थ बसणारे ते राजे नव्हते. सरकारी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याला हरप्रकारे साहाय्य केले पाहिजे असे त्यांचे धोरण होते. सरकार आणि रयत यांचे निकटचे संबंध आहेत याची जाणीव रयतेला झाली पाहिजे, राज्य हे लोकांच्या कल्याणाकरिता आहे हे त्यांना आपल्या कृतीने पटवून दिले पाहिजे, अशी महाराजांची धडपड होती; आणि म्हणूनच 'लोकांचा राजा' ही बिरुदावली त्यांना अधिक शोभून दिसणारी आहे.

पाटबंधारे

केवळ शेतीवर आधारलेल्या आर्थिक व्यवस्थेत पाटबंधाऱ्यांचे महत्त्व किती असते

हे सांगण्याची आवश्यकता नाही. शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या कार्याकडे अगदी अनादि कालापासून राजे लोकांनी लक्ष पुरविल्याची उदाहरणे इतिहासात आढळतात. शिवाजी महाराज किंवा महाराष्ट्रातील तत्पूर्वीचे राजे पारंपरिक धोरणाचा पाठपुरावा करीत असले तर त्यात काही नवल नव्हते. कारण शेतीला योग्य पाणीपुरवठा हाच एक शेती सुधारण्याचा मार्ग त्या कालात उपलब्ध होता.

बरीचशी शेती ही निसर्गाच्या मेहेरबानीवरच अवलंबून असे. त्यामुळे स्वाभाविकच 'जिरायत' जमिनीचे प्रमाण फार मोठे होते. पाऊस पडला नाही, धान्य पिकले नाही, तेव्हा साऱ्यात सूट द्यावी अथवा तो पूर्णतया माफ करावा अशा तक्रारी रयत करीत असल्याची अनेक उदाहरणे आपल्याला कागदपत्रात आढळतात.

कालव्यांच्या, पाटांच्या द्वारे शेतीला पाणीपुरवठा करण्याची पद्धती मराठी मुलकातही होती. अशा पद्धतीने ज्या शेतांना पाणीपुरवठा होत असे त्यास 'पाटस्थळ' असे म्हणत. गावकरी छोटे बांध घालून पावसाचे अथवा नदीचे पाणी अडवून ठेवीत. गावाशेजारून वाहणाऱ्या नदीनाल्यांचा यासाठी उपयोग केला जाई. अर्थात या पाटाच्या पाण्याचा पुरवठा पावसाच्या प्रमाणावर अवलंबून असे. तसेच उन्हाळ्यात नद्या, नाले कोरडे पडत असल्याने वर्षभर या पाटांचा उपयोग रयतेला होत नसे.

शेतात विहीर खणून त्या पाण्याचा उपयोग करणे ही प्रथा फार जुनी आहे. विहीर असलेल्या शेतांना 'मोटस्थळ' असे म्हणत. कालवे अथवा विहिरी यांच्या पाण्यावर पिकविल्या जाणाऱ्या जमिनीला 'बागाईत' म्हणत. विहिरीच्या पाणीपुरवठ्यावरही काही मर्यादा होत्या. प्रत्येक शेतात विहीर खणणे अथवा खणली तरी त्यापासून मुबलक पाणी मिळणे या गोष्टी दुरापास्त असत. त्यामुळे गावातील विहिरींची संख्या मर्यादित होती. पुणे परगण्यातील मौजे खोर या गावी बागायतीसाठी जुन्या फक्त तीन विहिरी होत्या आणि त्यापैकी 'गावानजीक माहारिकेमधे' एक होती, असा उल्लेख एक पत्रात आढळतो. (शि.च.सा. ७ : ६७)

बंधारे बांधणे, कालवे खोदणे आणि त्याची देखभाल करणे ही सामान्यत: गावच्या लोकांची जबाबदारी मानली जात असे. ज्यांना पाटाच्या पाण्याचा उपयोग होत असे, असे सारे शेतकरी परस्परांच्या सहकार्याने हे काम करीत होते. या पाण्याचे वाटप कसे करावयाचे यासंबंधीचे करार त्यांच्यामध्ये होते. कालवे-बंधारे जरी गावकऱ्यांनी बांधले तरी त्यावर सत्ता सरकारची असे. कारण पाणी ही निसर्गाची देणगी होती. त्यामुळे त्यावर मालकी सरकारची असे. अर्थात सरकार या बांधकामासाठी लागणाऱ्या खर्चाचा काही भाग अथवा संपूर्ण भाग उचलीत असणे स्वाभाविक आहे. पाटाच्या पाण्याचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांना इतरांपेक्षा थोडा जास्त शेतसारा द्यावा लागत असे.

१७८९ सालच्या पुण्याच्या देशपांड्यांच्या कागदपत्रात शिवापूरच्या कालव्याची एक मनोरंजक हकिगत आली आहे, ही हकिगत शिवकालातील आहे आणि त्यावरून पाटबंधाऱ्यांचे काम राजा लोकांकडून कसे करून घेत असे याची कल्पना येते. शिवापूर येथे बाग, आमराई करावी या हेतूने धरणाचे काम सुरू केले. त्या वेळी बरेच गावोगावचे

पाटील या कामासाठी जमा झाले होते; परंतु धरणाचे पाणी एका प्रचंड धोंड्यामुळे अडून राहिले होते. तेव्हा तेथे कामावर असलेल्या येस पाटील कोंढवेकर यास महाराजांनी आज्ञा केली की, "आम्ही स्वारीहून येतो तो पावेतो हर इलाज करून एवढा धोंडा फोडून काढून पाण्यास वाट करणे" महाराजांची ही आज्ञा शिरसावंद्य मानून येस पाटील कामास लागला आणि महाराज परत येण्याच्या आत धोंडा फोडून पाण्यास सुरळीत वाट करून दिली. महाराजांनी आल्यावर चौकशी केली की धोंडा कोणी फोडिला; समस्त गावकऱ्यांनी येस पाटलाचे नाव घेतले. तेव्हा त्यास महाराज बक्षीस देऊ लागले; पण येस पाटलाला सिंहगडाजवळील एका गावची मोकदमी पाहिजे होती. त्याने महाराजांनी विनंती केली, "वरकड बक्षीस नगदी दिल्हे तर खाऊन जाईल" तरी आपणांस पाटीलकी द्यावी. महाराजांनी खूश होऊन त्याची विनंती मान्य केली. (शि.च.सा. २, पृ. १४१)

१६७४ सालच्या एका महजरावरून पाटबंधाऱ्याच्या कामात लोक किती रस घेत होते याची कल्पना येते. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी परगण्यातील मोहाडी या खेडेगावातील लोकांनी आपल्या गावाशेजारून वाहणाऱ्या बाणगंगा नदीवर एक धरण बांधून आपल्या गावी काही बागाईत करावी अशी उमेद बाळगून कामास प्रारंभ केला; परंतु शेजारच्या जाणोरी गावाच्या पाटलाने या त्यांच्या कामाला हरकत घेतली. त्याचे म्हणणे असे की नदीवर येथे बांध घातले तर आपल्या गावच्या बांधास पाणी कमी होईल तरी हा बांध बांधू नये. बाणगंगा नदी मोहाडीच्या हद्दीतून जात नव्हती. तेथील शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने काही विहिरी खणल्या होत्या; परंतु पावसाचे प्रमाण कमी असल्याने त्या विहिरींतून वर्षभर पाणीपुरवठा होत नसे. त्यामुळे जिरायत जमिनीत पावसाच्या कृपेमुळे जे पिकेल त्यावरच त्यांना गुजराण करावी लागे. त्यामुळे तेथील रयतेची फार खराबी झाली होती. बाणगंगा नदीला मुबलक पाणी असून ठिकठिकाणी त्यावर बांध घालून त्या पाण्याचा उपयोग करून घेता येईल असे मोहाडीकरांना वाटे. बाणगंगेचे पाणी मिळाल्याखेरीज त्या गावचा उद्धार होणार नव्हता. मोहाडीकरांचे म्हणणे असे की,

> "कुदरती नदी जमीन आसमान आहे ते पासून आहे आणि बांधारे तरी सबब आबादानी हर कोन्ही हिमती धरून करितात हे सुदामद तमाम दुनियामधे खर्ज आहे यैसियास साहेबी इनसाफ करून आपणास बांद बांधावयाचा हुकूम केला पाहिजे."

थोडक्यात, नदी ही निसर्गाची देणगी आहे त्यामुळे त्यावर एकाच गावाचा अधिकार असता कामा नये, निसर्गाची खैरात ही सर्वांना खुली असली पाहिजे.

हा तंटा एका मोठ्या मजलसीपुढे नेण्यात आला. या मजलसीत गुलशनाबाद (नाशिक), दिंडोरी आणि वणी या तिन्ही परगण्यांचे मुत्सद्दी, जमीनदार हजर होते. त्यांनी दोन दिवस मोहाडीस मुक्काम करून सर्व पाहणी करून निर्णय दिला,

"हे जागा बंधारिया त्याख आहे, मेहनत बहुत आहे, टका खर्च होईल, अमा पानी पोहचेल."

मोहाडीकरांनी मेहनत केली आणि काही द्रव्य खर्च केले तर या जागी धरण बांधल्यास गावची बरीच जमीन पाण्याखाली येईल व त्या गावचा फायदा होईल, असे मजलसीचे मत पडले. या निवाडपत्रात पुढे म्हटले आहे, "जे कुदरती नदी आहे हर कोन्ही पाणी नेईल त्यास मना नाही" या नदीवर बांध घातला तर जाणोरकरांचे काही नुकसान होणार नाही, त्यांची हरकत 'नाहक' आहे. याच निवाड्यात मोहाडीच्या मुकादमास हुकूम केला आहे की, "काम बांधरियाचे चाली लावणे," तसेच या कामात कोणी मूठमर्दीकरून अडथळा आणील तर त्यापासून गावकऱ्यानी संरक्षण मिळेल असे आश्वासनही देण्यात आले. या निवाड्यामुळे मोहाडीच्या रयतेला बाणगंगेच्या पाण्याचा वापर करता येऊ लागला, अधिक जमीन पाण्याखाली आली आणि शेवटी सरकारचाच फायदा झाला. (ऐ.सं. सा. खंड १, पृ. १११-११३)

हा मजहर जरी मराठी राजवटीतील नसला तरी धरणांची बांधणी, गावकऱ्यांचे तंटे-बखेडे आणि सरकारचे धोरण या गोष्टी समजावून घेण्यास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिवाजीच्या मुलकातही याहून भिन्न वहिवाट असण्याची शक्यता नाही.

कॅरे या फ्रेंच प्रवाशाने पश्चिम किनाऱ्यावरील अनेक गावांना भेटी दिल्या होत्या. राजापूर आणि बांदे यांच्या मधल्या भागातील अनेक गावांनी डोंगरकपारीवरून पडणाऱ्या जलधारा आणि मैदानावरून वाहणाऱ्या नद्या यांच्या पाण्याचा उपयोग शेतीसाठी करून घेतला असल्याचे त्याला आढळून आले.

महसूल पद्धती

शिवकालात महसूल पद्धती कशी होती हे थोडक्यात समजावून घेणे इष्ट ठरेल. जमिनीचा सारा निश्चित करण्यापूर्वी जमिनीची मोजणी करणे आवश्यक होते. मोजणीसाठी जे साधन वापरीत त्यास 'शिवशाही काठी' असे म्हणत. या काठीच्या लांबीविषयी सभासद बखरीत म्हटले आहे,

> "पांच हात पांच मुठीची काठी, हात चवदा तसूच असावा हात व मुठी मिळून बैशी तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरस चौरस त्याचा बिघा एक. बिघे एकशेवीस यांचा एक चावर. अशी जमीन मोजून, आकारून गांवची गावं चौकशी केली."

काठीची लांबी सर्व ठिकाणी सारखीच होती असे दिसत नाही. काही ठिकाणी ८२ तसूच्या ऐवजी ८४ तसूची काठी सांगितली आहे.

> "पाहणीस काठी पाच जणाचे पांच हात व पांच घोडमुठी लांबीची काठी चौऱ्याऐसी तसूची काठी करून जमाबंदी केली."

असे एका कागदात म्हटले आहे. कोकणात काठीला पांड म्हणत आणि एका बिघ्यात २० औरस चौरस पांडाऐवजी २३ औरस चौरस पांड मोजीत. जमीन-मोजणीचे काम सामान्यत: महाराकडे असे. त्याच्या हाती असलेल्या काठीला 'चलती काठी' असे म्हणत. एक काठी जमीन मोजून झाली की दुसरी काठी टाकताना ही काठी उडी घेत असे. त्यामुळे साहजिकच बिघ्यातील एकंदर क्षेत्र प्रत्यक्षात वाढत असे. या कारणामुळे प्रत्येक ठिकाणी एका बिघ्यात सारखीच जमीन असेल असे म्हणता येणार नाही. जमिनीच्या या मोजणीला 'बिघावणी', 'चावराणा' अथवा 'चकबंदी' असे म्हणतात.

'सप्तप्रकरणात्मक चरित्र' या बखरीचा लेखक मल्हार रामराव चिटणीस म्हणतो की शिवकालात धारा निश्चित करण्याचे एकूण तीन प्रयत्न झाले. अगदी प्रारंभीचा म्हणजे दादोजी कोंडदेवाने केलेला प्रयत्न होय. पुणे, मुठेमावळ या भागात धारा ठरविण्याचे काम १६३६ च्या सुमारास त्याने केले होते. दुसरा प्रयत्न मोरो त्रिमळ पिंगळे याने १६४८-४९ च्या वर्षात शिरवळ परगण्यात केला. तिसरा महत्त्वाचा पद्धतशीर प्रयत्न अण्णाजी दत्तो सुरनीस (सचिव) या शिवाजीराजाच्या मंत्र्याने केला. १६७८ साली रोहिडखोरे परगण्याच्या अधिकाऱ्यांना त्याने जो एक 'कौलनामा' दिला आहे त्यावरून त्याच्या पद्धतीची कल्पना येते. राज्यसरकार, परगण्याचे अधिकारी आणि मिरासदार किंवा रयत यांच्यामध्येही हा 'कौलनामा' अथवा करार झाला आहे.

यातील पहिले महत्त्वाचे कलम म्हणजे लागवडीखाली असलेल्या गावच्या जमिनीचे एक पत्रक तयार करणे. त्या पत्रकात, अव्वल, दूम, सीम, चारहम अशी जमिनीची प्रतवारी नोंद करणे. त्यानंतर त्या जमिनीतून कोणते पीक येते, एकच पीक येते की दोन पिके येतात आणि प्रत्येक बिघ्यात साधारणपणे काय पीक येते याची माहिती गोळा करणे. अधिकाऱ्यांनी सरकारला अशीही माहिती पुरवावी की एखाद्या जमिनीच्या तुकड्यावर अधिक कष्ट केले तर त्याचे उत्पन्न अंदाजे किती वाढेल. तसेच मलिक अंबरी पद्धतीत त्या जमिनीतून किती उत्पन्न येत होते याचीही नोंद करावी. या प्रकाराला 'पीक पाहणी' असे म्हणतात.

प्रत्येक गावच्या अशा नोंदी करून परगण्याचे संपूर्ण अंदाजपत्रक मंत्र्याकडे छाननीसाठी पाठवावे. त्यानंतर मंत्री चाचणी घेण्यासाठी तीन गावांची निवड करतील. त्यापैकी एक डोंगराळ जमिनीचे, एक खाचर तळे जमिनीचे आणि एक काळ्या शेताचे असेल. त्याचप्रमाणे या प्रकारच्या जमिनीच्या सरहद्दीस लागून असलेल्या खेड्यांचाही विचार करतील. अशी परीक्षा करून मंत्री जे अंदाज करतील त्यांची गावकऱ्यांनी पाठविलेल्या पत्रकांशी तुलना केली जाईल आणि नंतर मंत्री आपला निर्णय देतील. या निर्णयामुळे जमिनीच्या धाऱ्यात काही प्रमाणात वाढ होईल ते मान्य करून त्याप्रमाणे वसूल करणे. याला 'सारा आकारणी' म्हणतात. 'बिघावणी', 'पीक पाहणी' आणि 'सारा आकारणी' हे महसूलपद्धतीतील तीन महत्त्वाचे टप्पे होत. (रा.खं. १५ : ३४०)

अण्णाजी दत्तोने अंदाजपत्रक तयार करण्याचे काम देशमुख-देशपांडे हे परगण्याचे

अधिकारी आणि गावकरी यांच्याकडे सुपूर्त केले होते. ब्राह्मण किंवा प्रभू कारकून मंडळी जर या कामासाठी नियुक्त केली असती तर त्यांच्या स्थानिक परिस्थितीच्या अज्ञानामुळे हे काम योग्यरीत्या होणार नाही अशी त्याला भीती वाटत होती. देशमुख, देशकुलकर्णी, पाटील व कुलकर्णी आणि गावचे चार प्रतिष्ठित रयत यांनी 'एक विचाराने गावचा गाव फिरोन' हे सारा आकारणीचे काम करावे असे त्याचे म्हणणे होते. गावच्या लोकांचाही यात समावेश केल्याने डॉ. बाळकृष्णांनी अण्णाजी दत्तोच्या सारा आकारणी पद्धतीला लोकांची धारापद्धती (Settlement by the People) असे म्हटले आहे.

सारा आकारणीची तत्त्वे

सारा आकारणीसाठी गावाची लागवडीखाली असलेली जमीन तेवढीच विचारात घेतली जात असे. अन्य जमिनीचा विचार केल्यास लोक तक्रार करीत असत. अशा तक्रारींची चौकशी करून त्याप्रमाणे गावचे दप्तर दुरुस्त केले जात असे. वाजट जमीन, जंगल, कुरण इत्यादी गावची जमीन साऱ्यासाठी विचारात घेतली जात नसे.

सारा आकारणी करताना पिकांचा प्रथम विचार केला जाई. निरनिराळ्या प्रकारच्या पिकांवर निरनिराळे दर आकारले जात. सारा आकारणीसाठी सरकारच्या दप्तरात लागवडीखालील जमीन, त्यात येणारी पिके आणि अंदाजे उत्पन्न या सर्वांची माहिती असावी लागे. बिघावणी प्रत्येक वर्षी होत नसे; पण कोणी तक्रार केल्यास तेवढ्यापुरती मोजणी करून याप्रमाणे दप्तर दुरुस्त केले जाई.

काही वेळा शेतकरी अशी तक्रार करीत की, अधिकाऱ्यांनी आपल्या शेतातील पिकाखाली असलेली जमीन अधिक दाखविल्यामुळे आपल्याला अधिक सारा भरावा लागतो. अशा वेळी पडजमीन किती आहे आणि पिकाखाली किती आहे याची चौकशी केली जात असे आणि तक्रारीत काही तथ्य आहे असे आढळून आल्यास पाटलास गावच्या दप्तरात दुरुस्ती नोंद करण्याचा आदेश दिला जाई.

प्रत्येक बिघ्यामागे सरकारी साऱ्याचे प्रमाण किती होते यासंबंधी सभासद म्हणतो,

> "बिघेयास पिकाचा आकार करून पांच तक्षिमा (भाग) पिकाचे करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या, दोन तक्षिमा दिवाण्यांत घ्याव्या, येणेप्रमाणे रयतेपासून घ्यावे."

मलिक अंबराच्या काळात देखील २।५ ची पद्धत रूढ होती. त्याने नंतरच्या काळात नक्तरूपाने वसूल घेण्यास प्रारंभ केला आणि उत्पादनाच्या किमतीच्या १।३ भाग हा सरकारी सारा ठरवला. मलिक अंबरने बिघ्यावर आकारणी केली नाही तर जमिनीच्या तुकड्यावर सारा आकारणी केली. प्रत्येक जमिनीच्या तुकड्याची उत्पादनक्षमता किती आहे याचा त्याने प्रामुख्याने विचार केला आणि साऱ्या गावच्या महसुलाचा आकडा निश्चित केला. याला 'मौजेवार' अथवा 'तनखा' पद्धती म्हणत. दादोजी कोंडदेवाने ही मलिकंबरी पद्धतच चालू ठेवली होती. नव्याने लागवडीखाली येणाऱ्या

जमिनीवर 'इस्तावा' पद्धतीने सुरुवातीच्या काही वर्षांत साराआकारणी केली जात असे आणि नंतर मलिकंबरी पद्धतीचा अवलंब केला जात असे.

शिवाजी महाराजांच्या काळात नक्त आणि ऐन जिन्नसी अशा दोन्ही स्वरूपांत वसूल घेतला जाई आणि हे दोन्हींचे मिळून साऱ्याचे प्रमाण बहुधा उत्पन्नाच्या २।५ इतके असावे. "राजभाग पचादुई" असा उल्लेख एका कागदात आहे. नक्त दर कसे ठरविले जात असत हे सांगणे साधनाअभावी कठीण आहे; पण या दरांचा उत्पन्नाशी संबंध असावा असे स्थूलमानाने म्हणता येईल. नक्त दर हे सामान्यतः बागाईत जमिनीतील पिकावर आकारले जात होते. पैसे घेऊन हे जिन्नस शेतकरी बाजारात विकत असल्याने नक्तरूपाने सारा देणे त्यांना कठीण जात नसावे. ऊस, सुंठ, हळद, भाजीपाले, फळफळावळे यांवर नक्त दर आकारल्याचे दिसून येते.

जेधे शकावलीत म्हटले आहे की १६६७ सालापासून शिवाजी राजांनी आपल्या मुलखात बटाईचा अंमल सुरू केला. बटाई म्हणजे उत्पन्नाचा निम्मा भाग. १६७४ साली पौणमावळच्या शेतकऱ्यांनी अशी तक्रार केली आहे की मुलकात बटाईचा तह झाल्यामुळे धान्याचे भाव वाढले आहेत. निम्मे धान्य सरकारच्या गुदामात जाऊन पडल्याने बाजारात धान्याची चणचण भासत असावी आणि त्यामुळे दर वाढले असावेत. अशा वेळी गुदामातील धान्य बाजारात आणून हे वाढलेले दर उतरविले जात असतील. बटाईचा प्रयोग स्वराज्याच्या सर्व भागात महाराजांनी सुरू केला असावा असे वाटत नाही. तसेच बटाईचा अर्थ उत्पन्नाचा निम्मा भाग लावणे बरोबर ठरणार नाही. बटाई म्हणजे प्रत्यक्ष उत्पन्नाचा काही भाग असाच अर्थ करणे इष्ट ठरेल. बटाईचा तह ज्या भागात असेल तेथे शेतकऱ्यांवर इतर सरकारी कर लादले जात नसत. त्यामुळे रयतेवरील एकंदर भार बटाईमुळे वाढला होता असे म्हणता येणार नाही. पौणमावळची गोष्ट ही अपवादात्मक असावी.

दुष्काळ

शेतकऱ्याला भेडसावणारे सर्वांत महान संकट म्हणजे दुष्काळ होय. दुष्काळ ही इतिहासाला अपरिचित अशी घटना नाही. इ. स. पूर्व दोन हजार वर्षांपासूनचे दुष्काळाचे उल्लेख आपल्याला आढळतात. अर्थात काळाच्या ओघात दुष्काळाचे स्वरूप बदलले. प्राचीन काली अथवा मध्ययुगात दुष्काळ ही एक नैसर्गिक आपत्ती अथवा दैवी प्रकोप असे मानण्यात येई. आधुनिक काळात दळणवळणाची साधने वाढल्यामुळे 'धान्यटंचाई' असे दुष्काळाचे स्वरूप राहिले नसून 'कामाची कमतरता' असे ते बनले आहे. मध्ययुगात शेती हाच प्रमुख व्यवसाय असल्याने दुष्काळाचा तडाखा या व संलग्न व्यवसायातील लोकांना फार मोठ्या प्रमाणावर सोसावा लागत असे. त्यांचे अर्थार्जनाचे साधन हरवल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची अथवा परागंदा होण्याची पाळी येत असे.

मध्ययुगात भारतावर दुष्काळाची अनेक अरिष्टे आली; पण त्यांची साद्यंत माहिती

फार थोडी उपलब्ध आहे. या दुष्काळामुळे झालेल्या हानीची माहिती काही मध्ययुगीन इतिहासकार आणि परदेशी प्रवासी यांनी नोंदवून ठेवलेली आहे. मुहम्मद तुघलकाच्या काळात (१३२५-१३५१ इ.) गंगा-यमुना नद्यांच्या खोऱ्यांच्या प्रदेशात अथवा दुआबात फार मोठा दुष्काळ पडला होता. दुष्काळपीडित लोकांना साहाय्य करण्यासाठी त्याने आखलेल्या साऱ्या योजना त्याच्या अप्रामाणिक अधिकाऱ्यांनी हाणून पाडल्या, अशी इतिहासकारांनी नोंद केली आहे. इ.स. १५४० च्या सुमारास केरळ प्रांतात फार मोठा दुष्काळ पडला होता आणि त्यात मनुष्यहानी फारच मोठ्या प्रमाणावर झाली होती. या दुष्काळात माणसेही विकली जात. एका लहान मुलाची किंमत एका रुपयाहूनही कमी होती.

१५५५ साली उत्तरेकडे पडलेल्या एका दुष्काळाचे फार भेदक असे वर्णन बदौनी नावाच्या एका मध्ययुगीन इतिहासकाराने केले आहे. तो म्हणतो,

> ''माणसें नरमांस खातांना मी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहे. दुष्काळामुळे त्रस्त झालेल्या भुकेल्या चेहऱ्यांचे दर्शन इतके भयानक होते की त्यांच्याकडे क्वचितच एखाद्याला पाहवले असते...सर्व प्रदेश वैराण वाळवंट बनला होता; आणि जमिनीची मशागत करण्यास एकही शेतकरी तेथे शिल्लक राहिला नव्हता.''

अबुल फझल या 'ऐने अकबरी'च्या लेखकाने वरील विधानाला पुष्टी दिली आहे. तो म्हणतो, ''एकमेकांना खाण्यापर्यंत माणसांनी मजल गाठली होती.''

१५९६ च्या उत्तरेकडील आणखी एका दुष्काळाचे ''माणूस माणसाला खात होता आणि लहान-मोठे रस्ते मृतदेहांनी व्यापून राहिले होते.'' असे वर्णन आहे.

थोरला दुष्काळ

मध्ययुगीन भारताचा आर्थिक इतिहास लिहिणाऱ्या मोरलड या संशोधकाने प्रवासवृत्ते, समकालीन ऐतिहासिक साधने यांच्या आधारे सतराव्या शतकातील लहान-मोठ्या दुष्काळांची माहिती दिली आहे. या सर्व दुष्काळात १६३० साली पडलेला दुष्काळ अत्यंत उग्र स्वरूपाचा होता असे त्याची जी निरनिराळी वर्णने साधनांतून आलेली आहेत त्यावरून म्हणता येते. हा दुष्काळ सर्व देश व्यापून राहिला होता म्हणून त्यास 'थोरला दुष्काळ' हे नामाभिधान योग्य ठरेल. डच कंपनीतील एक ज्येष्ठ व्यापारी व्हॅन ट्विस्ट म्हणतो,

> ''पाऊस इतका अल्प पडला की पेरणी केलेले बी तर वाय गेलेच पण साधे गवतसुद्धा उगवले नाही. गुरेढोरे मेली. शहरांतून आणि खेड्यांतून शेतात आणि रस्त्यांवर प्रेतांच्या राशी पडल्यामुळे इतकी दुर्गंधी सुटली होती की रस्त्यावरून जाणे भयावह होते. गवत नसल्यामुळे गुरेढोरे प्रेतेच खाऊ लागली. लोक प्राण्यांची प्रेते खाण्यासाठी घेऊ लागले.

> दुष्काळाची तीव्रता वाढू लागली तशी माणसे शहरे आणि खेडी सोडून निराशेने दाही दिशा भटकू लागली. दुष्काळपीडितांना ओळखणे सोपे होते. डोळे खोलवर खोबणीत रुतलेले, ओठ सुकलेले व लाळेने बरबटलेले, कातडी टणक बनलेली असे त्याचे दर्शन होते आणि जेथे जावे तेथे प्रेतांशिवाय आम्हांस काहीच दिसत नव्हते.''

> ''पुरुष बायका-मुलांना टाकून जात होते, स्त्रिया स्वत:ला गुलाम म्हणून विकून घेत, आया बालकांची विक्री करीत, काही कुटुंबानी विषप्राशन करून एकत्रितपणे मृत्यूला कवटाळले, काहींनी नद्यांमध्ये उड्या घेतल्या, काही शिळे मांस खात होते. प्रतिदिनी भयानक शोकांतिका दिसत होत्या. भुकेमुळे हजारोंनी माणसे मृत्युमुखी पडत होती. सारा देश प्रेतांनी व्यापलेला होता. त्यांचे दफन करणे अशक्य होते. माणसांचे मांस उघडपणे बाजारात विकले जात होते. ह्या भयंकर दैवी प्रकोपाची झळ प्रामुख्याने गरिबांना सोसावी लागली. कारण त्यांच्याकडे कसलाही संग्रह नव्हता.''

वर दिलेली वर्णने सामान्यत: उत्तर हिंदुस्थानची परिस्थितीनिर्देशक असली तरी महाराष्ट्रातील दुष्काळपीडित जनतेचे दु:ख याहून भिन्न होते असे मानता येणार नाही. १६३० पूर्वी लक्षात राहण्यासारखा महाराष्ट्रातील एक दुष्काळ म्हणजे १४७८ सालचा 'दुर्गादेवीचा' अथवा इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते 'सप्तवार्षिक दुर्गाडीचा दुष्काळ' होय. हा दुष्काळ बारा वर्षे टिकला असे म्हटले जाते. बिदर सरकारचा मंगळवेढ्याचा एक अधिकारी दामाजीपंत याने दुष्काळपीडित जनतेला बादशहाची धान्यकोठारे मुक्त करून दिली आणि पंढरीच्या विठुरायाने बादशहाच्या कचेरीत जाऊन त्याची भरपाई केली, अशी एक आख्यायिका आपल्याकडे आहे. ही आख्यायिका आपल्याला दुष्काळाचे उग्र स्वरूप समजावून घेण्यास पुरेशी आहे.

त्यानंतरचा मोठा दुष्काळ म्हणजे १६३० चा होय. महाराष्ट्राच्या आर्थिक इतिहासातील ही एक अपूर्व घटना होय. या दुष्काळाचे परिणाम मराठी मुलखाला दीर्घकाळ भोगावे लागले.

मोरलड या इतिहासकाराने उत्तरेकडील परिस्थितीचे दारूण चित्र रंगवले आहे; पण महाराष्ट्रात या दुष्काळाने उडविलेल्या हाहाकाराचे वर्णन मात्र तो करीत नाही. कारण ज्या युरोपीय आणि फारसी साधनांचा आधार त्याने घेतला आहे त्यात त्याला ते आढळले नाही. 'बादशहानामा' या फारसी ग्रंथाचा आधार घेऊन तो एवढेच म्हणतो की, या दुष्काळामुळे ''दक्षिणदेश निदान एक पिढीपर्यंत तरी दरिद्री राहिला.'' १६५३ पर्यंत दक्षिण देशातून बादशहाच्या खजिन्यात एक पैही जमा झाला नाही. एवढेच नव्हे, तर स्थानिक प्रशासनाचा खर्चही या भागाला करता येत नव्हता असे 'बादशहानामा'

म्हणतो. बादशहानाम्यात १६३० च्या दुष्काळाचे भेदक वर्णन आले आहे–

''भाकरीच्या तुकड्यासाठी लोक स्वतःला विकून घ्यावयास तयार होते, पण विकत घेणाराच कोणी नव्हता; एका भाकरीसाठी आपले लोक आपल्या पदाचा त्याग करावयास तयार होते, पण त्याची कोणाला पर्वा नव्हती; ज्या हातांनी इतरांना उदंड दान केले तेच हात आता भिक्षेसाठी पुढे पसरले होते; ज्या पावलांनी सदा सुखाचाच मार्ग क्रमिला होता; तीच पावले आता अन्नाच्या शोधासाठी पडत होती. कित्येक दिवस कुत्र्याचे मांस बकरीच्या मांसाच्या दराने विकले जात होते आणि मृतांच्या हाडांची भुकटी पिठात मिसळून ते विकले जात असे. शेवटी दारिद्र्य इतके शिगेला पोहोचले की, माणसे माणसांना खाऊ लागली आणि पुत्रप्रेमापेक्षा त्याचे मांस पित्याला प्रिय वाटू लागले. मृतदेहांनी गावच्या रस्त्यात अडथळे निर्माण केले आणि ज्यांना या यातनांनी मरण येत नव्हते आणि हालचाल करण्याचे त्राण अद्याप ज्यांच्यात होते ते परप्रांतात भटकेगिरी करण्यास निघून गेले.''

प्रादेशिक साधनांची छाननी केल्यास महाराष्ट्रातील दुष्काळाचे स्वरूप उत्तरेसारखेच भेसूर होते असे दिसून येईल. महाराष्ट्र आणि गुजरात या दोन भागांवर या दुष्काळाचे फार अनिष्ट परिणाम झाले. इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्डस्मध्ये असे म्हटले आहे की हा दुष्काळ इतका तीव्र स्वरूपाचा होता की या देशाच्या इतिहासात त्याला तोड सापडणार नाही. अवर्षणामुळे जी धान्यटंचाई निर्माण झाली तेच या थोरल्या दुष्काळाचे मुख्य कारण होते. दुर्गाडीच्या दुष्काळाप्रमाणेच याचेही परिणाम मराठी जनतेला दीर्घकाळ भोगावे लागले. कौटुंबिक जीवनाचे विघटन झाले होते कारण लोकांना अन्नासाठी दाही दिशांना भटकावे लागे. शेती व्यवसाय खचला. लोक स्वतःला गुलाम म्हणून विकून घेऊ लागले, आत्महत्या करू लागले अथवा भुकेने मरू लागले, उद्योगधंदे संपुष्टात आले. १६३२-३३ साली दुष्काळाचे सावट सरले तरी दुष्काळाने उद्ध्वस्त झालेली आर्थिक घडी तत्काळ नीट बसणे शक्य नव्हते.

महाराष्ट्रावर या दुष्काळाचे परिणाम काय झाले हे स्थानिक साधनांच्या अभ्यासावरून स्पष्ट होते. इतिहासाचार्य राजवाड्यांनी 'राधा माधव विलास चंपू'च्या प्रस्तावनेत या दुष्काळासंबंधी म्हटले आहे,

''शक १५५२ (१६३०स.) साली गोदातीरी अवर्षणाने भयंकर दुष्काळ पडला. एका हुनक्यास म्हणजे लहान होनास दोन शेर दाणे झाले. करवसुली शक्य नसल्यामुळे मूर्तिजाची आधीच खंगलेली तिजोरी पूर्णपणे शुष्क होऊन गेली. फौज परागंदा, कारभारी अजुर्दा व मुलूख उकीर्डा बनून मूर्तिजा हलाखीच्या अगदी शेवटच्या पायरीस पोहोचला.'' (पृ. ६१)

परमानंदाच्या 'शिवभारता'त दुष्काळाचा थोडास उल्लेख आहे आणि त्यात काव्याला शोभेल अशी अतिशयोक्तीही आहे. तो म्हणतो,

''पुष्कळ काळपर्यंत त्याच्या (अहमदनगरच्या निजामशहाच्या) देशात पाऊस न पडल्याने धान्य अत्यंत महाग झाले आणि सोने मात्र स्वस्त झाले. श्रीमंत लोक शेरभर रत्ने देऊन मोठ्या प्रयासाने शेरभर कुळीथ घेत. खाण्यास काही न मिळाल्यामुळे एकच हाहाकार उडून जाऊन पशू पशूंस आणि माणसे माणसांस अशी परस्परांस खाऊ लागली.'' (शिवभारत अ. ८ : ५३-५५)

अर्थात या दुष्काळाचे सर्व खापर परमानंद अहमदनगरच्या बादशहाच्या दुष्कृत्यांवर फोडतो. तो म्हणतो,

''त्या दुष्ट निजामशहाच्या अशा प्रकारच्या अनेक दुष्कृत्यांमुळे भयंकर अवर्षण पडून लोकांच्या फार हालअपेष्टा होऊ लागल्या.'' (शिवभारत अ. ८ : ५२)

राजा आपल्या कर्तव्यापासून च्युत झाला म्हणजे सर्व प्रकारच्या आपत्ती लोकांवर कोसळतात, या पारंपरिक समजुतीला अनुसरूनच कवींद्र परमानंदाचे हे विधान आहे. यातील अतिशयोक्तीचा भाग वगळला तरी दुष्काळाची तीव्रता ध्यानात येण्यास त्याचे हे उद्‌गार पुरेसे आहेत.

समकालीन संतवाङ्मयांतही या दुष्काळाचे उल्लेख आले आहेत. रामदास हे राजकारण, समाजकारण आणि धर्मकारण यात रस घेणारे एक निराळ्या प्रवृत्तीचे संत कवी. आपल्या रोखठोक मराठी भाषेत त्यांनी या दुष्काळाचे फारच हृदयद्रावक वर्णन आपल्या स्फुट काव्यातून केलेले आहे. पाऊस पडला नाही त्यामुळे सर्वत्र टंचाई निर्माण झाली, लोकांच्यावर उपासमारीची पाळी आली, ते परागंदा झाले, कित्येक मृत्युमुखी पडले इत्यादी वर्णन त्यांच्या काव्यात आले आहे. त्यांचे हे वर्णन वर आलेल्या व्हॅन ट्विस्टच्या वर्णनाशी बरेच मिळतेजुळते आहे. रामदास म्हणतात,

''तथापि मार्गचि चालेना। भिक्षा मागता मिळेना।
अवघे भिकारीच जना। काय म्हणावे।३९।।
बहुसाल कल्पांत लोकांसि आला।
महर्गे बहू धाडि केली जनाला।।
कितीयेक मृत्यासि ते योग्य आले।
कितीयेक ते देश त्यागूनी गेले।।१।।
कितीयेक ग्रामेचि ते वोस जाली।
पिके सर्व धान्येच नाना बुडाली।।
जन बुडाले बुडाले पोटेवीण गेले।

बहु कष्टले, कष्टले कितीयेक मेले।
वीसा लोकांत लोकांत एकचि राहिले।
तेणे उदंड उदंड दुःखचि साहिले।।२।।
काही मिळेना मिळेना मिळेना खायाला।
ठाव नाही रे नाही रे नाही रे जायाला।।
धान्य माहाग माहाग तैसेहि मिळेना।
कैसे होईल होईल होईल कळेना।।
काय होणार होणार होणार टळेना।
पुण्य गेले रे गेले रे काहीच फळेना।।६।।
बायेला लेकुरे लेकुरे सांडुनिया जाती।
भीक मागती मागती तिकडेचि मरती।
रांडापोरांच्या पोरांच्या तारांबळी होती।
मोल मजुरी भिकारी होऊनि वांचती।।९।।
नदी भरता भरता घालुनिया घेती।
वीख घेऊनी घेऊनी उदंड मरती।
अग्री लाऊनी लाऊनी जळोनिया जाती।
मोठी फजीती फजीती सांगावे ती किती।।११।।
लोक भलेसे दीसती खेटरे चोरीती।
वस्त्रे धोतरे पातळे लपउनि पळती।

पनाळगडी फार महर्ग जाले। बहु वीस्व तेणे गुणे वाज्य आले।
कधी देव पावेल काही कळेना। कदा धुंडिल्या एक दाणा मिळेना।।१।।
गुरे वीकिली सर्व वस्त्रेच पात्रे। भटी वीकिली सोवळी वोली धोत्रे।।२।।

थोडक्यात, या दुष्काळामुळे 'उदंड उदंड दुःखचि साहिले' असे रामदास म्हणतात. तुकाराम महाराजांच्या अभंगांतूनही समकालीन दुष्काळाची विषण्ण छाया दिसून येते. रामदासाहून भिन्न प्रवृत्तीचा हा संत असल्याने दुष्काळाचे साद्यंत वर्णन तो देत नाही. या दुष्काळामुळे सर्व नष्ट झाले, आता आपण भक्तिमार्गाचे आचरण करण्यास मुक्त झालो ही त्यांची भावना. दुष्काळाची कारणे आणि त्याचे परिणाम यांचा उल्लेख तुरळकपणे त्यांच्या काव्यातून आढळतो-

"मंद झाल्या मेघवृष्टि।
अपीक धान्ये दिवसे दिवसे।
गाई म्हैसी चेवल्या गोरसे।
नगरे दिसती उध्वंसे।।३०३५।।
दुष्काळे अटिले द्रव्य नेला मान।

स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली।
लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे।
वेवसाय देखे तुटी येता।।१३३३।।
बरे झाले देवा निघाले दिवाळे।
बरी या दुष्काळे पीडा केली।।१३३५।।

दुसऱ्या एका अभंगात ते म्हणतात,

"बाईल मेली मुक्त जाली।
देवे माया सोडविली।।१।।
पोर मेले बरे जाले।
देवे मायाविरहित केले।।२।।" ७७८

या अभंगांतून 'बरे जाले' असे तुकारामांनी म्हटले असले तरी दुष्काळामुळे त्यांची जी अपरिमित हानी झाली होती ती काही लपून राहत नाही. दुष्काळामुळे लोकांवर कशी कठीण परिस्थिती गुदरली होती हे सांगताना ते म्हणतात,

"बरगासाठी (दुष्काळासाठी) खादले शेण मिळता अन्न न सोडी।।८५१।।"

संतांच्या या वर्णनावर अतिशयोक्तीचा आरोप होण्याची शक्यता आहे. तरीसुद्धा इतर समकालीन वर्णनांशी त्यांची निवेदने ताडून पाहिली तर त्यात अतिशयोक्तीचा फारसा भाग आपल्याला आढळणार नाही. या दुष्काळाची छाया समकालीन कागदपत्रातूनही दिसून येते. 'जेधे शकावली' या एका शिवकालीन अस्सल साधनात 'शके १५५२ (१६३० स.) प्रमोद संवछरे ये वर्षी दुष्काळ पडिला' असा उल्लेख आढळतो. या दुष्काळामुळे लोक आपली घरे, वतने मिळेल त्या किमतीस विकू लागले. उदाहरणार्थ, सुपे परगण्यातील कोल्हालेबुद्रुकच्या कुलकर्णी तिमाजी खंडेराव हा दुष्काळात परागंदा झालेला माणूस सारे काही स्थिरस्थावर झाल्यावर मायदेशी येऊन आपल्या वतनाची परत मागणी करतो. हे वतन कुलकर्णपणाचे व ज्योतिषपणाचे- त्याने दुष्काळात अवघ्या वीस होनाला विकलेले असते. त्या काळात होनाची किंमत साधारणपणे ३।। ते ३।।। रुपयांपर्यंत होती. आपल्याला आपले वतन परत मिळावे अशी विनंती करताना तो लिहितो,

"थोरला दुकाल पडिला त्या दुकालामधे आपण उपासी मरो लागलो अन्न मिळेनासे जाले मुलेलेकरे अन्नेवीण राहिली हात-पाये सुजले, पदरी रुका नाही, दाणा न मिले मायेने आपली पोटीची लेकरे खादली धारण दर होनास दोनी पायली धान्य जाले यैसा कठीण समये पडला... आपण वाचत नाही पदरी तो काही नाही कहर थोर पडिला." (शि.च.सा.७ : ४४, पृ. ६६)

होनाजी निबरे नावाच्या गृहस्थाने आपले घर, भूमी एकूण २५ होनास विकली. यांपैकी १९ होन रोख व ६ पायली ज्वारी घेतली म्हणजे ज्वारीचा भाव १ पायलीस एक सुवर्णहोन होता असे दिसून येते. (शि.प.सा. १, ३२९)

गावचा पाटील हा मातब्बर वतनदार. तोही या दुष्काळाच्या संकटातून वाचला नाही. मुंढव्याच्या पाटलाची ही कैफियत पहा :

> ''याहि काल दुकोल प्रजा कुल बेमवसर जाली. गावची मिरासी गावी नाहीत. गाव लागत नाही.... काळ दुकोळ कहर पडला. दरमणी होन दीड जाला. आपले दाईज व गोत्रीज होते ते सुजोन मेले व आपली माणसे व आपण पोटाविण सुजो लागलो.'' (रा.खं. १५ : ४१४)

वरील काही उदाहरणे दुष्काळाची भीषणता दाखविण्यास पुरेशी आहेत. आपले पारंपरिक हक्क, वतने विकण्यास लोक तयार होत, पण विकत घेणाराच फार दुर्लभ झाला होता. उद्योगधंदे बसले, गुरेढोरे मेली, यामुळे दुष्काळानंतरचा काळ देखील दुःखाचाच होता.

या अपूर्व अशा दुष्काळाचे वर्णन इंग्रजांच्या फॅक्टरी रेकॉर्ड्सम्ध्येही आढळते. ''गुजरात ते गोवळकोंडा हा सारा प्रदेश म्हणजे एक मोठी स्मशानभूमीच बनली होती.'' आणि ''माणसाच्या स्मृतीत एवढा मोठा दुष्काळ आणि एवढी प्रचंड हानी याची नोंद नव्हती.'' असे उल्लेख इंग्रजी कागदपत्रात आढळतात. एक समकालीन डच व्यापारी म्हणतो, ''लोकांची एकच मागणी होती– आम्हांस अन्न द्या अथवा मारून टाका.''

या दुष्काळामुळे सारे ग्रामीण जीवन उद्ध्वस्त झाले होते. आर्थिक व्यवहार खुंटले, कारण लोक देशोधडीला लागले होते व गुरेढोरे दुष्काळाच्या भक्ष्यस्थानी पडली होती. गुलामगिरी, कमालीचे दारिद्र्य, शेती व्यवसायाची आणि कारागिरीची धूळधाण, महागाई, उपासमार अशा प्रकारच्या दुष्काळाच्या परिणामांना मराठी सत्ता उदयाच्या काळात तोंड देत होती.

शिवाजी महाराजांचा जन्म महाराष्ट्राच्या या विपन्नावस्थेच्या काळात झाला होता. काळाने त्यांना एक प्रकारे आव्हानच दिले होते. या पार्श्वभूमीवर शिवचरित्राचा अभ्यास केला असता त्यांच्या कार्याची थोरवी पटते. मरगळलेल्या महाराष्ट्रात त्यांनी कसे चैतन्य निर्माण केले आणि महाराष्ट्राच्या राजकीय अभ्युदयाबरोबरच आर्थिक विकास कसा साधला हे जाणून घेणे उद्बोधक ठरेल; आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा जो गाभा— म्हणजे शेती व्यवसाय- याकडे त्यांनी इतके का लक्ष पुरविले याचे मर्म ध्यानात येईल. १६३० सालच्या मराठी जनतेने 'उदंड उदंडचि दुःख साहिले' होते असे रामदास म्हणतात, पण त्याच संताने पुढे म्हटले आहे, ''उदंड जाहले पाणी स्नानसंध्या करावया— या आनंदभुवनी'' शिवकार्याची थोरवीच जणू त्यांनी या शब्दात वर्णन केली आहे, असे म्हणावयास हरकत नाही. महाराजांनी 'आनंदवनभुवन' निर्माण केले याचा

अर्थ मराठी मुलखाचा आर्थिक विकास साधून लोकांचे कल्याण साधले असे म्हणता येईल.

पुनर्वसाहत

दुष्काळाच्या काळात परागंदा झालेल्या लोकांना परत आणण्याचे तसेच लागवडीखाली अधिक जमीन आणण्याचे प्रयत्न शिवकालात झाले. पुण्याची जहागीर सांभाळण्याची जबाबदारी दादोजी कोंडदेवाने जेव्हा आपल्या शिरावर घेतली तेव्हा हा भाग उद्ध्वस्त झालेला होता. दुष्काळात भर म्हणूनच की काय मुरार जगदेव या विजापुरी सरदाराने पुणे शहर याच काळात जाळून टाकले होते. पुण्याच्या देशपांड्याला शासन करण्याच्या निमित्ताने ही कारवाई करण्यात आली होती; आणि नंतर हे शहर शहाजीकडे सुपूर्त करण्यात आले होते. मोरो तानदेव देशपांडे पुणेकर यावर मुरारराववाने पाळत राखून रानातून धरून आणले. नखी, सुया टोचून मार देऊन कैद केला. पुण्यातील कोट मोडून शहर मारिले. खरांचा नांगर पांढरीवर फिरविला. (९१ क ब. : २०)

१६३३ सालच्या एका पत्रात एका पाटलाने म्हटले आहे की, दुष्काळात आम्ही पांढरी टाकून गेलो आणि वाचल्यामुळे परत आलो. त्या वेळी दादोजीने,

> ''मुलुक लाविला देशमुख देशकुलकर्णी यास ताकीद केली की गांव लावणे, आपणास कौल देऊन गांव लाविला.'' (शि.प.सा. १ : ३७०) दुष्काळात मायेवाडीचे पाटील पांढरी टाकून परमुलकात गेले. ''यावरी दादोजी कोंडदेऊ सुभेदार दिवाण जाले याणी मुलुक लाविला यावरी देसमुक देसकुलकर्णी यास ताकीद केली की हा गांव पडिला पाटील आणून गांव लावणे.'' (शि.च.सा. २ : ९५)

१६३७ च्या सुमारास या मुलखात सर्वत्र हिंस्त्र पशू आणि चोर यांचा सुळसुळाट झाला होता. दादोजी कोंडदेवाने परागंदा झालेल्या मोरो तानदेव या देशपांड्याला परत येण्याची व गावची वसाहत करण्याच्या कामी आपल्याला मदत करण्याची विनंती केली. या भागातील मावळ्यांना त्याने आवहन केले की त्यांनी कोल्हे, हिंस्रपशू, चोर यांचा निःपात करून ही भूमी नांगरटीखाली आणावी व राजापासून इनाम घ्यावे. मावळ्यांनी त्याला साथ दिली आणि अगदी थोड्या अवधीत हा भाग लागवडीस योग्य करून दाखविला.

या निष्कंटक केलेल्या भागात त्यांनी वसाहत करावी अशी दादोजीने त्यांना विनंती केली. त्यासाठी त्यांना किफायतशीर सवलती दिल्या. कायम वसाहतीसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सनदा त्यांना दिल्या. जमिनीच्या साऱ्याबाबत असे ठरविण्यात आले की, पहिल्या वर्षी १ रुका, दुसऱ्या वर्षी ३ रुके, तिसऱ्या वर्षी ६ रुके, चौथ्या वर्षी ९ रुके, पाचव्या वर्षी १२ रुके, सहाव्या वर्षी १/२ रुपया आणि सातव्या वर्षी १ रुपया इतका सारा द्यावा. आठव्या वर्षापासून मलिक अंबर पद्धतीप्रमाणे जो वाजवी सारा

ठरेल तो देत जावा असा ठराव करून दिला. या योजनेमुळे पुष्कळ लोक या मुलखाकडे आकर्षित झाले आणि हा सारा भाग अगदी अल्पकाळात लागवडीखाली आला. खेडेबारे या ठिकाणी दादोजी कोंडदेवाने एक पेठ वसविली. बागायती, आमराया यांची वाढ ठिकठिकाणी घडवून आणली. (९१ क ब. : २०-२१)

मुठेमावळ तरफेत देखील दादोजीने १६३६ च्या सुमारास असाच प्रयत्न केला होता ते एका कागदावरून दिसून येते. हा भाग देखील उजाड पडला होता. दादोजींनी तेथील देशमुखाशी एक करार केला आणि त्याला वसाहतीच्या कामासाठी प्रवृत्त केले. बाहुली हे गाव या तरफेत येते. ते उजाड पडलेले गाव देशमुखाने दादोजीच्या प्रेरणेने भरभराटीस आणले. (पे.द. ३१ : १०) अशा रीतीने वसाहतीच्या कार्याला हात घालून स्थिर अर्थव्यवस्थेचा पाया दादोजीने घातला; आणि या त्याच्या प्रारंभीच्या महत्त्वपूर्ण कार्याचा फायदा पुढे शिवाजी राजांना भरपूर घेता आला.

■■

शिवकालीन उद्योगधंदे

ग्रामीण व्यवसाय

स्वावलंबन हे ग्रामीण जीवनाचे ध्येय असल्याने मध्ययुगातील खेड्यांतून निरनिराळे व्यवसाय निर्माण झाले होते. शेती हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे त्याच्या विकासासाठी लागणारे बरेचसे उपव्यवसाय या खेड्यातून सुरू झालेले दिसून येतात. गावातील कारागीर स्थानिक लोकांच्या गरजा पुरविण्याचे काम करीत. कारागिरांनी स्थलांतर करू नये म्हणून त्यांच्या योगक्षेमाची जबाबदारी गावकरी घेत असत. या कारागिरांना काही वेळा ग्रामकार्यासाठी जमीन देखील इनाम दिली जात असे, तर काही वेळा त्यांना बलुत्याच्या रूपाने आवश्यक ते धान्य गावकरी आपल्या उत्पादनातून देत असत. उत्पादनाचा मुख्य हेतू आवश्यक त्या उपयुक्ततेच्या वस्तू निर्माण करणे हा असतो. त्या दृष्टीने पाहू गेल्यास ग्रामीण उत्पादन हे ग्रामीण गरजा भागविण्यास पुरेसे होते म्हणजेच खेडे स्वयंपूर्ण होते असे म्हणता येईल.

शिवकालीन राजकवी परमानंद याच्या 'अनुपुराण' अथवा 'शिवभारत' या काव्यग्रंथात सतराव्या शतकातील काही व्यवसायांचे नामोल्लेख आले आहेत. सोनार, लोहार, तांबट, सुतार, चांभार, कुंभार, कोष्टी, बाणकरी, मांग, तेली, धनगर, कोमटी इत्यादी व्यवसायांचे उल्लेख या काव्यात तसेच काही कागदपत्रातून आढळतात. याखेरीज शिंपी, न्हावी, परीट, गवंडी, माळी, रंगारी हे देखील ग्रामीण कारागीर होते. पखवाजी, पावेकरी, टाळकरी, वीणेकरी ही वाद्ये वाजविण्याचा धंदा करणारी मंडळी देखील खेडेगावातून विखुरलेली होती. कीर्तनकार, गायक, नर्तिका, गारुडी इत्यादी कलाकार लोकरंजनाचे काम करीत असत. तांबोळी, कलाल (दारूविक्रेते) कासार, गंधी, भूतफरोशी (मूर्तिविके) इत्यादी व्यावसायिक मंडळीही या काळात आढळतात. 'राज्यव्यवहार कोशा'त, महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या व्यवसायांचा उल्लेख आला आहे.

शिवकालात खेडे हा आर्थिक जीवनाचा पाया होता आणि शेतीव्यवसाय हा या जीवनाचा मानबिंदू होता. ग्रामीण उत्पादन हे प्रामुख्याने ग्रामाच्या विनियोगासाठी असे. कसबी कारागीर आपल्या उत्तम वस्तू नजीकच्या कसब्याच्या बाजारात नेऊन विकत. जोडे, कांबळी, कापड, लाकूडसामान हे कसब्याच्या आठवड्याच्या बाजारात विकण्यासाठी नेल्याचे उल्लेख आढळतात. या कसब्यांचे बाजाराचे दिवस निरनिराळे असल्याने कारागिराला आपल्या वस्तू निरनिराळ्या बाजारात विकण्याची संधी मिळत असे.

व्यवसाय हे जातीवर आधारित असत आणि आपल्या जातीबाहेरचे व्यवसाय करण्याची फारशी प्रथा नव्हती. त्यामुळे प्रत्येक जातीला आणि व्यवसायाला समाजात निश्चित स्थान आणि संरक्षण असे. त्या काळात लोकांच्या गरजा अल्प असल्याने ग्रामीण उत्पादनावर ते संतुष्ट असत.

सोनाराचा धंदा बराच प्रगत स्वरूपाचा असावा असे दागिन्यांचे निरनिराळे उपलब्ध प्रकार पाहून वाटते. परमानंदाने आपल्या काव्यात अलंकारांची एक मोठी यादी दिली आहे. उदाहरणार्थ, जिजाबाईने ल्यालेल्या अलंकारांचे वर्णन करताना कवी म्हणतो,

> "तिच्या वेणींत नाना प्रकारच्या अलंकारांची गर्दी झाली होती. मोत्यें व रत्ने यांच्या मालांनी, रक्तवर्ण, तेजस्वी अशा डोकींतल्या फुलांनी तिचा शिरोभाग सुशोभित झाला होता. तिच्या ललाटभागावर रत्ने लटकत असून तिच्या कानांत सभोवती मोत्यें ओंवलेली अशी कुंडले झळकत होती. मोत्यें, रत्ने यांचे मोठमोठे हार व गुच्छ तिच्या गळ्यांत घातले होते. दंडांत बाजूबंद असून हातांत रत्नजडित बांगड्या होत्या. कृश अशा कटिप्रदेशावर कमरपट्टा, पायांत रुमझुम वाजणारे पैंजण, पायांच्या बोटांत मौल्यवान रत्नाभरणे" इ. (अध्याय २ : ५२ ते ५९)

बालशिवाजी राजाच्या अलंकारांचेही त्याने असेच रोचक वर्णन केले आहे. तो म्हणतो,

> "नाना प्रकारची रत्ने आणि मोत्यें यांनी युक्त असें सोन्याचे सुंदर कुंचडें त्याच्या डोक्यावर झळकत असे; चमकदार मोत्यांच्या हाराच्या टोकास लोंबणारे सोन्याचे पिंपळपान तो खेळतांना कपाळावर सारखें हलत असे. अमूल्य हिरे आणि चित्रविचित्र माणके (लाल) त्यांच्या किरणांनी (तेजाने) विलक्षण चकाकणारी बाहुभूषणें त्याला घातली होती. पाचेने जडित अणकुचीदार वाघनख जिच्यांमध्ये पटविले होते अशी काळी पोत गळ्यांत घातल्यामुळे तो शोभत असे. उत्तम रत्नांच्या समूहामध्ये उठून दिसणारी जीवांतिका देवीची (जिवतीची) सुवर्ण प्रतिमा त्याच्यावर पडलेली असे; पोवळी आणि नीळ यांनी संमिश्रित सुवर्णमण्यांच्या मनगट्या त्याच्या हातांत घातलेल्या होत्या. अहाहा! तो आनंदाची मूर्तीच होता! त्याच्या कमरेंत दिव्य करगोटा होता; पायांत लखलखित

> वाळे व चकाकणारे रत्नजडित चाळ होते. अत्यंत सुंदर असें सोन्याचें आंगडे त्याच्या अंगात घातलेले असे." (अध्याय ६ : ८१ ते ९०)

परमानंदाच्या या काव्यमय वर्णनात अतिशयोक्तीचा भाग असावा. जे सर्व सुंदर आणि मंगल ते आपल्या चरित्रनायकाच्या ठायी होते हे सांगण्याची कवींची पद्धत असे. त्याला अनुसरूनच परमानंदाने हे जिजाबाईच्या आणि बालशिवाजी राजाच्या अलंकारांचे अतिरंजित वर्णन केले असले, तरी ज्या अलंकारांची त्याने नावे दिली आहेत ते सतराव्या शतकात उपलब्ध असावेत आणि सोनार ते दागिने घडवीत असावेत असे स्थूलमानाने म्हणता येईल. सामराज या समकालीन कवीच्या 'रुक्मिणीहरण' या काव्यात देखील अनेक दागिन्यांची नावे आली आहेत. सामराज जरी रुक्मिणीच्या दागिन्यांचे वर्णन करीत असला तरी त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या काळातील अलंकारच असणार.

बाजारपेठा

कसब्याच्या अथवा पेठेच्या गावांत आठवड्यास बाजार भरत असे. या बाजारासाठी दैनंदिन लागणाऱ्या वस्तू खरेदी करण्यासाठी आजूबाजूच्या पंचक्रोशीतील लोक जमा होत असत. या कसब्याच्या बाजारासाठी बाहेरूनही काही व्यापारी आपल्या खास वस्तू विकण्यासाठी येत. धान्य, कापड, लोणी, पान, सुपारी, फळे, भाज्या, नारळ, मांस इत्यादी विविध वस्तू या बाजारात येत. संध्याकाळपर्यंत हा बाजार चाले. त्यानंतर आपले दुकान गुंडाळून हे फिरते व्यापारी दुसऱ्या गावच्या बाजारात जात. आपल्या आठवड्याच्या गरजेच्या वस्तू ग्रामीण लोक या कसब्याच्या बाजारात खरेदी करीत. कसब्याचा बाजार मोठा असे आणि तेथे विविध प्रकारची दुकाने असत. तेली, भाजीविके, चांभार, कोष्टी, विणकर, शिंपी, कलाल इत्यादी व्यापाऱ्यांची दुकाने कायम स्वरूपाची असत.

पेठेच्या वसाहतीची आणि विकासाची जबाबदारी शेटे या वतनदाराकडे असे आणि या पेठेचे हिशोब ठेवण्याचे काम महाजनाकडे असे. पेठेच्या वसाहतीच्या कामासाठी शेट्याला सारामाफ जमीन मिळत असे.

पेठेच्या वसाहतीसाठी शेट्याची आवश्यकता असली तरी ती संपन्न करण्यासाठी आणखी एका अधिकाऱ्याची गरज भासत असे. त्याला बिडवई म्हणत. या बिडवईला काही वर्षांच्या करारावर नेमले जात असे. पुणे परगण्यातील चाऱ्होली गावच्या रामसेटी शेटे याने शहाजी राजांना विनंती केली (१६३३ साली) की या पेठेची आबादी बरेच दिवस झाले मोडलेली आहे तेव्हा एका बिडवायाची नेमणूक करावी. शेटीयाने तत्पूर्वी पुण्याच्या विनायकभट ठकाराची संमती मिळविली होती व दिवाणातून महजर मिळाला तर ते काम आपण स्वीकारू असे त्याने कळविले होते. पूर्वीच्या रणकोजी देवकर नावाच्या इसमाकडे असलेली बिडवईपणाची सनद रद्द करून मौजे चाऱ्होली पेठेचे

बिडवईपण विनायकभटाला मिरास करून द्यावे असा आदेश परगण्याच्या अधिकाऱ्यांना शहाजी राजांनी दिला. (शि.च.सा. १ : ४०)

बिडवईपणाचे अधिकार काय होते आणि त्याला पेठेतून कोणते हक्क मिळत होते याचा निश्चितपणे उलगडा होत नाही. पेठेची मामुरी करणे असे मोघमपणे म्हटले आहे आणि त्यासाठी त्याला हे अधिकार मिरासी करून दिले आहेत. प्रस्तुत पत्रात महाजन व बिडवईपण एकाच व्यक्तीकडे दिले आहे. बिडवई हा महत्त्वाचा अधिकारी असावा कारण तुकाराम महाराजांनी विठोबाला पंढरीच्या पेठेचा बिडवई असे एका अभंगात म्हटले आहे.

बिडवई हा पेठेचा पुढारी असल्याने त्याचे मुख्य काम, व्यापाऱ्यांना आपल्या पेठेकडे आकर्षित करून घेणे, हे होते. पेठेत येणाऱ्या व्यापाऱ्यांवर जकात आकारली जात असे आणि याचा काही हिस्सा या बिडवईला मिळत असावा. कारण एका पत्रात एका अर्जदाराने बिडवईपण (येथे यास बिडवीवगत असे म्हटले आहे) आपणास मिरास औलादअफलाद करून दिल्यास आपण जकातीची वसूल नेटाने करू असे म्हटले आहे. तो म्हणतो, घाटावरून जे जिन्नस चेऊलच्या बाजारपेठेत येतात व घाटावर जे जिन्नस येथून जातात त्याच्या जकातीचा वसूल सरकारी जमा होत नाही, काही लोक जलमार्गाने माल सुरतेस नेतात व तेथून घाटावर आणतात, मुसलमान सौदागर यांना जकाती माफ असल्याने (१६९३ साली हा भाग मोगलाकडे परत गेला होता) मुसलमानाच्या नावे माल नेतात. थोडक्यात, सरकारची फसवणूक करून व्यापारी आपला फायदा करून घेतात तरी आपल्यास बिडवईपण दिले तर आपण त्यांचा बंदोबस्त करू असे आश्वासन दिले आहे. (शि.च.सा. १० : २२)

पेठेची भरभराट करण्यास सरकारास काही सवलती द्याव्या लागत. चेऊल परगण्यातील रुस्तुमाबाद या पेठेची भरभराट व्हावी अशी अधिकाऱ्यांची इच्छा होती. गावच्या शेटे, महाजन, चौगुले यांना हे मान्य होते, पण त्यासाठी बारा वर्षांच्या कौलाने व्यापाऱ्यांना जकाती व काही सवलती देणे आवश्यक होते. त्यांची ही विनंती मान्य झालेली दिसते. (शि.च.सा. ९ : ४०; शि.च.सा. १० : ३)

पेठेचे अधिकारी कोण याची नोंद एका पत्रात आली आहे. पाषाण येथील जिजापूर पेठेचे सर्व अधिकार पुण्याच्या वेदमूर्ती विनायकभट ठकार यास देण्यात आलेले आहेत. यात शेटेपण, महाजनपण, बिडवईपण, कोतवालकी, पेठेच्या प्रमुख व्यापाऱ्यांचे पुढारीपण (यास येथे पेठेच्या खुमाखुमाची मेहतरकी असे म्हटले आहे) डबहलकी, (मसुदा तयार करणे) आणि पानसरकी (वजनमापांचा अधिकारी) या हक्कांचा अथवा अधिकारांचा उल्लेख केला असून, १६५७ साली हे हक्क वंशपरंपरेने- लेकराचे लेकरी- ठकारांना दिले आहेत. (शि.च.सा. ८ : ५१) पुढे विनायकभटांचा नातू महादेव भट याने छत्रपती शाहू महाराजांकडून १७२० साली हे हक्क परत एकदा निश्चित करून घेतले आहेत. ठकार हे चिंचवडच्या मोरया देवस्थानाचे पुजारी होते. त्यांच्या या इनामाला वृत्ती असे म्हटले आहे. (शि.च.सा. ८ : ५३). या दोन्ही पत्रांवरून पेठेची

ही सर्व कामे ठकार स्वत: करीत होते, की या जागांवर निरनिराळ्या माणसांची नियुक्ती करून त्यांच्याकडून ही कामे करवून घेतली जात असत की काय याची कल्पना येत नाही. पण या सर्व अधिकाराच्या जागांपासून जे हकलाजिम्यांचे उत्पन्न येत असेल ते ठकारांच्या घराण्यात जात असावे. लहान पेठेतून ही सर्व कामे कदाचित शेटे आणि महाजन हे दोन वतनदार पेठेचे अधिकारीच पार पाडीत असावेत. शेटे हाच जर कोतवाल असेल तर पेठेच्या संरक्षणाचे आणि न्यायदानाचे काम तोच करीत असावा. बिडवईपण आणि महाजनकी एकाचकडे असण्याची शक्यता आहे. वर उल्लेखिलेल्या चाऱ्होली पेठेची महाजनकी आणि बिडवईपण ठकारांच्याकडे आहे. मात्र एकाच ठकार घराण्याकडे चाऱ्होली आणि पाषाण पेठेचे इतके अधिकार का देण्यात आले होते याचा उलगडा होत नाही.

शेटे हा गावच्या गोतसत्तेचा एक सभासद असे. गावच्या महजरावर त्याची नावनिशाणी असे. तो मिरासदार असल्याने त्याला राहण्यास पेठेत जागा मिळत असे. पेठेची उत्तम व्यवस्था राखता यावी म्हणून तो सर्व व्यापाऱ्यांची नोंद करून ठेवीत असे. घाटावरचे वतनदार अधिकारी घाटपांडे यांना जकात वसूल करण्याच्या कामी मदत करीत असे.

पेठेची वसाहत करण्यासाठी हुजुरातून आज्ञा निघत असे. मातोश्री जिजाबाईच्या आज्ञेनुसार पुण्याजवळील पाषाण येथे एक पेठ वसविली गेली व तिला पुढे 'जिजापूर' असे म्हणण्यात येऊ लागले. मालपुरा, खेलपुरा, परसपुरा, विठापुरा यादेखील मालोजी, खेलोजी, परसोजी आणि विठोजी यांच्या नावे औरंगाबाद येथे वसविलेल्या नव्या पेठाच असाव्यात. 'खेड'ला जोडून असलेले 'शिवापूर' ही शिवाजीच्या नावे वसविलेली पेठ होती. (शि.च.सा. ६ : ले १२८, पृ. ८८)

या पेठांतून कालानुक्रमे नवे सभासद दाखल करून घेतले जात. जुन्या आणि नव्या सभासदांची स्वतंत्रपणे नोंद केली जात असे. इंदापूरच्या एका यादीत 'कदीम' (जुने) या कलमाखाली ३ सराफ, १ सोनार, ५ तेली, २ शिंपी आणि 'जदीद' (नवे) या कलमाखाली ५ सराफ, २ सोनार आणि ९ तेली दाखविले आहेत. जुन्या लोकांच्या यादीत आणखी ५ जणांची नावे दिली आहेत, पण त्यांचे व्यवसाय सांगितलेले नाहीत. बाजारपेठेची वाढ कशी व का झाली हे समजून घेण्यास ही माहिती उपयुक्त ठरावी. हा कागद अपूर्ण असल्याने पेठेच्या विस्ताराची पूर्ण कल्पना येत नाही. (शि.च.सा. ३ : ६४६) याखेरीज पेठेचे मूळ रहिवाशी आणि परदेशी असा फरकही इतरत्र केल्याचे आढळते.

पेठेच्या विकासासाठी सुरक्षिततेची आणि संरक्षणाची आवश्यकता असे. बाजारपेठेत गस्त घालण्याची जबाबदारी सरकारची असे. पेठेवर दरोडे पडल्याची अनेक उदाहरणे होती. असा दरोडा पडण्याचे मुख्य कारण तेथील संरक्षणाच्या योग्य त्या व्यवस्थेचा अभाव हेच असे. व्यापारी आणि दुकानदार या कारणास्तव आपला व्यापार वाढविण्याची टाळाटाळ करीत. शिवाजी राजाने कायदा आणि सुरक्षिततेचे राज्य निर्माण करून

व्यापारवृद्धीला एक प्रकारे हातभारच लावला होता. चंद्रराव मोऱ्यासारखा एक जहागीरदार देखील व्यापाऱ्यांना अभयदान देताना म्हणतो, 'तागाचा तोडा गेला तर सोन्याचा करून देऊ.'

शिवाजी महाराजांचे लक्ष राज्याच्या सर्वांगीण उन्नतीकडे होते. व्यापारवृद्धीशिवाय राज्य भरभराटीला येणार नाही याची त्यांना खात्री होती. त्याकरिता व्यापाऱ्यांना अनेक सवलती व जकातीत सूट दिल्याची अनेक उदाहरणे आढळतात. रामचंद्रपंत अमात्यांच्या 'आज्ञा पत्रात' शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण सूत्ररूपाने आले आहे–

> "साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहुकाराकरिता राज्य अबादान होते. न मिळे ते वस्तुजात राज्यात येते. राज्य श्रीमंत होते. पडिले संकटप्रसंगी पाहिजे ते कर्जवाम मिळते. तेणेंकरून आले संकट परिहार होते. साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुत फायदा आहे. या करिता साहुकाराचा बहुमान चालवावा. कोण्हेविषयी त्यावरी जलल अथवा त्याचा अपमान होऊ न द्यावा. पेठापेठांत दुकाने वखारा घालून हत्ती, घोडे जरमिना (उंची कपडा) जरबाब (जरतारी वस्त्रे) पशमी (लोकरी कापड) आदिकरून वस्त्रजात व रत्ने व शस्त्रे आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदीम चालवावा. हुजूर बाजारमध्येही थोर थोर सावकार आणून ठेवावे. वर्षसंबंधे तैसेच लग्नादि महोत्सवी त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेने बोलावून आणून वस्त्रेपात्रे देऊन समाधान करीत जावे. परमुलकी जे जे सावकार असतील त्यांची समाधाने करून ते आणावे. त्यासी अनुकूल न पडे तरी असतील तेथेच त्यांचे समाधान रक्षून, आपली माया त्यास लाऊन, त्यांचे मुतालिक आणून त्यास अनुकूल ते जागा, दुकाने देऊन ठेवावे. तैसेच दर्यावर्दी सावकार यासही बंदरोबंदरी कौल पाठवून आमदरफ्ती करवावी."

महाराजांनी राजगड व रायगड या राजधानी किल्ल्यांवर बाजारपेठा वसविल्याचे सर्वश्रुत आहे. रायगडावरील बाजारपेठ बरीच मोठी होती. सरदाराला घोड्यावरून खाली न उतरता माल खरेदी करता यावा म्हणून दुकानांची जोती उंच केली होती.

सतराव्या शतकात भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक पाश्चिमात्यांनी आपल्या वखारी उघडल्या होत्या; आणि व्यापाराचे बस्तान बसविले होते. यात पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच, डॅनिश इत्यादी लोकांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. इराणी, अरब यांचे पुरातन कालापासून भारताशी व्यापारी संबंध होते. पोर्तुगिजांना तर व्यापारापेक्षा आपल्या कॅथॉलिक धर्माचा प्रसार वृद्धिंगत व्हावा असे वाटत असे. या परदेशी साहुकारांची अथवा टोपीकरांची चाल महाराजांनी ओळखली होती. आज्ञापत्रात म्हटले आहे–

> "ते वरकड (इतर) साहुकारासारिखे नव्हेत. त्यांचे खावंद प्रत्येक प्रत्येक राज्यच करितात. त्यांचे हुकमाने त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती सावकारीस येतात. राज्य करणारास स्थळ लोभ नाही यैसे काय घडो पाहतें? तथापि टोपीकरांचा या प्रांते प्रवेश करावा, राज्य वाढवावे, स्वमत प्रतिष्ठावे, हा पूर्ण अभिमान. त्याहिवरी ही हट्टी जात. हातास आले स्थळ मेलियाने सोडावयाचे नव्हेत. त्यासी केवळ नेहमी जागा देऊं नये. जंजिरेया समीप या लोकांचे येणे जाणे सहसा होऊ देऊ नये. कदाचित् वखारेस जागा देणे जालेच तर खाडीचे शेजारी समुद्रतीरी न द्यावा. तोही नीच जागा, शहराचे आहारी, शहराचा उपद्रव चुकवून नेमून देऊन वखारा घालवाव्या त्यासहि इमारतीचे घर बांधो देऊ नये."

वरील उतारा अत्यंत बोलका असून परकीय व्यापाऱ्यांविषयींचे महाराजांचे सावधानतेचे धोरण त्यांतून उत्तम प्रकारे व्यक्त होते. 'अखंड सावधान' हा मराठी राज्याचा आणि शिवाजी राजांचा 'मूलमंत्र' होता.

दळणवळणाची साधने

व्यापार आणि उद्योगधंद्यांच्या विकासास दळणवळणांच्या साधनांची उत्तम जोड असावी लागते. तयार वस्तू, माल दूरवर वाहून नेणे आणि त्या वस्तू तयार करण्यास लागणारा कच्चा माल आणणे यासाठी उत्तम रस्ते व वाहने यांची आवश्यकता असते. परंतु सतराव्या शतकात महाराष्ट्रात उद्योगधंदे अथवा व्यापार यांची इतकी वाढ झाली नसल्याने सुव्यवस्थित दळणवळणाची फारशी गरज भासली नसावी.

त्या वेळी या भागात बऱ्हाणपूर ते गोवळकोंडा यांना जोडणारा एकच हमरस्ता होता. तो महाराष्ट्राच्या काही भागांतून जात होता. पायवाटा आणि गाडीवाटा यांचाच अधिक भरणा या भागात होता. अंतर मोजण्याचे 'कोस' हे परिमाण होते. पण 'कोसात' नेमके किती अंतर येत होते हे सांगणे कठीण आहे. ट्रॅव्हर्नियरने कोस आणि कोस्टे (Cos and Coste) अशी दोन परिमाणे सांगितली असून ४ कोस्टेचा एक कोस होतो असे म्हटले आहे. एक कोस्टे हा एका 'लीग'चा असून 'लीग' हे अंतर आजच्या परिभाषेत सुमारे ३ मैल इतके भरेल. कोसाहून मोठ्या परिमाणाचा वापर केल्याचे आढळून येत नाही. ट्रॅव्हर्नियरने ज्या कोस्टेचा उल्लेख केला आहे तोच कदाचित प्रमाणभूत कोस असावा. कोस या शब्दाचा कागदपत्रात उल्लेख आढळतो, पण कोस्टेचा नाही. कदाचित कोस आणि कोस्टे हे समानार्थी शब्द असावेत.

> "रस्त्याच्या दोन्ही बाजूस सावलीसाठी वृक्षारोपण केले होते आणि सुमारे ५०० पावलांच्या किंवा फुटांच्या अंतरावर दगडांचे छोटे ढीग रचून ठेवले होते; आणि त्या ढिगांना वेळोवेळी चुना फासण्याचे काम गावकऱ्यांना करावे लागत असावे."

असे ट्रॅव्हर्नियरने एका रस्त्यासंबंधी म्हटले आहे. अंतरा-अंतरावर रचून ठेवलेले हे ढीग

म्हणजे अंतरदर्शक खुणा असाव्यात.

कोकणात जलमार्ग होते. समुद्रातून, खाडीतून लहान-मोठ्या नावा वापरल्या जात. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या कोकणाच्या भागात हे दृश्य नित्याचे होते. रत्नागिरीचा किनारा हा नेहमी गजबजलेला असे. बाणकोट, हर्णै, देवगड, दाभोळ, संगमेश्वर, राजापूर, मालवण, वेंगुर्ला इत्यादी पश्चिम किनारपट्टीवरील बंदरे वाहतुकीसाठी प्रसिद्ध होती.

गोदावरी आणि कृष्णा या दोनच मोठ्या नद्या महाराष्ट्राला लाभलेल्या आहेत. पश्चिम घाट ते पूर्व घाट अशी 'गोदावरी' ही नदी वाहते आणि महाराष्ट्रातील सुमारे ३०० मैलांच्या टापूतून ती जाते. नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद आणि नांदेड या महाराष्ट्राच्या जिल्ह्यांच्या काही भागातून ती वाहते. कृष्णा नदीचा प्रवाह महाराष्ट्रातील सुमारे ३०० मैलांच्या टापूतून जातो. भीमा, नीरा या नद्यादेखील महाराष्ट्राच्या आर्थिक समृद्धीस हातभार लावणाऱ्या आहेत. महाराष्ट्रातील या नद्यांतून माणसे आणि माल वाहून नेणाऱ्या छोट्या नावांची वाहतूक होत असे. अगदी जवळचे अंतर या नावांच्या साहाय्याने गाठता येई. कुलाबा जिल्ह्यातील अंबा नदीच्या नैसर्गिक जलमार्गाने, पेण, नागोठणे या ठिकाणाहून मुंबईला माल जात असे. अंबा नदीच्या या जलमार्गाकडे ईस्ट इंडिया कंपनीच्या लोकांनी बरेच लक्ष पुरविले होते. थॉमस निकोलस या कंपनीच्या एका अधिकाऱ्याला या नदीचा मार्ग, नदीची रुंदी, खोली, कोणत्या प्रकारच्या होड्या या नदीतून वाहतुकीसाठी वापरता येतील, या नदीच्या लाटा कशा प्रकारच्या आहेत, सामान उतरविण्याच्या आणि चढविण्याच्या काय सोयी या नदीच्या किनाऱ्यावर आहेत या सगळ्याचा अभ्यास करण्याचा आदेश देण्यात आला होता. (ई.रे.शि.भा. १, पृ. २४३-३०२)

वाहतुकीची साधने

सतराव्या शतकातील वाहतुकीची प्रमुख साधने म्हणजे बैल, उंट, तट्टू, गाढव, रेडा, बैलगाडी, पालखी, नावा ही होत. छोटी-मोठी ओझी स्त्री-पुरुष खांद्यावरून अथवा डोक्यावरून वाहून नेत.

घाटातून जड सामान वाहून नेण्याचे काम सामान्यत: बैल करीत. धान्याच्या आणि इतर सामानाच्या गोणी वाहणारे बैलांचे तांडे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी व्यापारी नेत असत. एका बैलाच्या पाठीवर ३०० ते ३५० पौंड वजनाचा माल लादला जाई. तांदूळ, ज्वारी, मीठ इत्यादी वस्तू दूरवर वाहून नेणारे हे तांडे प्रसंगी दहा-बारा हजार बैलांचे असत, असे ट्रॅव्हर्नियर म्हणतो. यावरून बैल हे या काळातील वाहतुकीचे फार महत्त्वाचे साधन होते, असे म्हणता येईल. धान्याखेरीज युद्धसाहित्य वाहून नेण्यासाठीही बैलांचा उपयोग केला जाई. एका बातमीपत्रात म्हटले आहे की बुऱ्हाणपुरापासून औरंगाबादेपर्यंत बंदुका नेण्याकरिता १०० बैल खरेदी केले. लढाईतील लूट मराठे बैलावर लादून आणीत असत. फ्रायर या समकालीन इंग्रज प्रवाशाला नाणे घाटात मीठ

नेणारा २०० बैलांचा एक तांडा आढळला. तुकारामांनी आपल्या एका अभंगात बैलाच्या पाठीवर साखरेच्या गोण्या लादल्याचा उल्लेख केला आहे–

साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी।
तयासी सेवटी करबाडे (३०७०)

घोडा अथवा तट्टू, गाढव, रेडा, उंट यांचादेखील या वाहतुकीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर वापर होत असे. बैलाप्रमाणेच रेड्यांचा उपयोग जड वस्तू वाहण्यासाठी केला जाई. पन्हाळ्यावर ३० तोफा नेण्यासाठी शिवाजी राजाने रेडे आणि काही कामगार यांची योजना केली होती. एका इंग्रजी बातमीपत्रात म्हटले आहे–

"शिवाजीने या प्रांतात अण्णाजीचा भाऊ सोमाजी पंडित हा अंकोला, कारवार, सिवेश्वर, फोंडा इत्यादी किल्ल्यांवरून ३० एक तोफा काढून पन्हाळ्यावर नेण्याकरिता पाठविला आहे. मजूर, रेडे वगैरे लावून त्या पन्हाळ्याकडे ओढीत नेल्या जातील." (शि.प.सा. २ : २१८३)

उंटावरून माल बाजारात नेला जात असे, पण त्या उंटाला काट्याशिवाय खायला काही मिळत नसे, असे तुकारामांनी एका अभंगात म्हटले आहे–

"मालाचे पै पेटे वाहाताती उंटे।
तयालागी कांटे भक्षावया।। (३०७०)

खांदाडिये, ओझेकरी अथवा बेगार म्हणजे हमाल यांचाही उपयोग मालवाहतुकीसाठी केला जात असे. हे हमाल कदाचित बरेच स्वस्त दरात मिळत असावेत.

बैलगाड्यादेखील माल नेण्यासाठी अनेक वेळा वापरीत. इंग्रजांनी एकदा अशी तक्रार केली आहे की धरणगावच्या लुटीत मिळालेली मालमत्ता वाहून नेण्यासाठी मराठ्यांनी बऱ्याच बैलगाड्या भाड्याने घेतल्यामुळे आपल्याला जबर भाडे देऊन बैलगाड्या घ्याव्या लागल्या. (इ.रे.शि. २ : १६५)

भात, नाचणी, मीठ आणि इतर वस्तू वाहण्यासाठी कोकणात पडावांचा वापर करीत. कंपनीच्या ताब्यातील बंदराकडून आपल्या बंदराकडे मीठ नेण्यासाठी शिवाजी राजाने खास जहाजे बांधली होती. त्याला मीठ जहाजांचा ताफा (Salt-fleet) म्हणत. मोरोपंत पिंगळ्यांनी एकदा अशी सूचना केली होती की महाराजांनी आपला मिठाच्या जहाजांचा ताफा न वापरता कंपनीच्या बोटीतूनच मीठ आणावे. कारण महाराजांच्या बंदराच्या व्यापाराच्या मार्गात सिद्दी फार अडचणी आणीत व ताफ्याला उपद्रव करीत. त्यावरून मिठासाठी कंपनीकडे बोटीची मागणी केली असता कंपनीच्या सुरतेच्या कचेरीने ती अमान्य केली. कारण एकदा मिठासाठी बोटींचा वापर केला म्हणजे त्या बोटी इतक्या खराब होतील की त्यांतून चांगला माल वाहून नेणे मुश्किल होईल. (इ.रे.शि. २, ५८-१०)

कोकणातून समुद्रमार्गे सुरतेला माल नेला जात असे. १६६४ सालच्या सुमारास शिवाजी महाराजांच्या ताब्यात ८ ते ९ लहान-मोठी महत्त्वाची बंदरे होती आणि त्या बंदरांतून इराण, बसरा, मक्का या ठिकाणापर्यंत प्रतिवर्षी निदान दोन ते तीन गलबते व्यापारानिमित्त बाहेर पडत. अर्थात इंग्रजांना वाटत होते की आपल्याला नामी संधी प्राप्त झाली असून, आपली १५० टनांची दोन-चार गलबते समुद्रावर सोडल्यास, मराठ्यांची गलबते पकडून आपल्या हक्कांची भरपाई करून घेता येईल. (शि.प.सा. १ : १०४३)

वाहने

माणसांना प्रवासासाठी वापरण्याकरिता बैल, घोडा, पालखी, गाडी आणि नावा इत्यादी वाहने होती. ट्रॅव्हर्नियर आणि थिव्हॅनो या प्रवाशांनी चॅरियट (Chariot) आणि कोच (Coach) हे शब्द बैलगाडी अथवा घोडागाडीसाठी वापरले असावेत. पालखी हे श्रीमंतांचे वाहन होते. बैल आणि घोडा यांचा वापर सामान्य माणसे करीत. फेरीबोटींचा अथवा छोट्या नावांचा वापर गावकरी खाडी अथवा नदी पार करण्यासाठी करीत.

प्रवास सुखाचा व्हावा म्हणून श्रीमंत लोक पालखी वापरीत असत. या पालखीच्या दांड्या प्रत्येक बाजूस सामान्यत: तीन तीन भोई लोक खांद्यावर ठेवून लांब लांब पावले टाकीत झपझप चालत. थिव्हॅनो आणि ट्रॅव्हर्नियर या प्रवाशांनी आपल्या पालखीतून केलेल्या प्रवासाची फार मनोरंजक वर्णने दिली आहेत.

थिव्हॅनोला पालखी म्हणजे एक चारपायी कोचासारखी वाटत होती. ती उत्तम रीतीने सजविलेली असे. काही पालख्यांचे छत चांदीने मढविलेले असत. काहीवर फुलांची आणि इतर काही अद्भुत चित्रे काढलेली असत. काहींना चकाकणारे लोलक अथवा गोळे लटकाविलेले असत. पिण्याच्या पाण्याच्या सुरया या पालख्यांना अडकवीत. त्या देखील उत्तम नक्षीकाम केलेल्या असत. पालखीची किंमत फारच असे. तिच्या मुख्य बांबूचीच किंमत मुघली २०० रुपये इतकी असे.

ट्रॅव्हर्नियरने देखील पालखीचे विस्तृत वर्णन केले आहे. पालखी ही सामान्यत: ६ ते ७ फूट लांब आणि ३ फूट रुंद असे आणि तिच्या सभोवती कठडे असत. सॅटिन अथवा जरतारी कापडाचे आच्छादन सूर्यापासून यजमानाचे संरक्षण करी.

बैलगाड्या वजनाने अगदी हलक्या असत आणि दूरवरच्या प्रवासासाठी त्यांचा वापर केला जाई. बैलगाडीत फक्त दोन माणसे बसत आणि अगदी हलकेफुलके सामान त्यात घातले जाई. त्यांचे बैल चांगलेच दणकट असत. रोज ३६ ते ४५ मैल वेगाने ते धावत आणि सतत ६० दिवसपर्यंत ते गाडी ओढू शकत.

घोडा, उंट, बैल यावर सवारी घेतली आहे. ट्रॅव्हर्नियरने बैलाबाबत प्रवाशाला एक इशारा दिला आहे. जो बैल सवारीसाठी भाड्याने घ्यावयाचा त्याची शिंगे १ फुटापेक्षा अधिक लांब असता कामा नयेत. कारण जेव्हा त्याच्या अंगावर माशा बसून त्याचा चावा घेऊ लागतात, तेव्हा तो बैल आपली शिंगे पुढे-मागे घुसळून त्या निवारण्याचा प्रयत्न करतो. अशा वेळी ती शिंगे चुकून सवारीच्या पोटात घुसण्याची शक्यता असते.

तो म्हणतो की असे पुष्कळ वेळा घडले आहे.

कॅरे नावाचा एक फ्रेंच प्रवासी १६७२ ते १६७४ या काळात दख्खनमध्ये प्रवास करीत होता. त्याच्या मते या भागातील जलमार्ग अथवा रस्ते अधिक संकटग्रस्त आणि धोक्याचे होते. जलमार्ग पत्करावा तर मलबारी चाच्यांचा उपद्रव होई. भूमार्गावर मराठ्यांचे सैनिक, सिद्दी आणि इतर किनारपट्टीवरील जहागीरदार यांचा उपसर्ग होई. शिवाय हे रस्ते, डोंगर, खिंडी, नद्या यांतून जात असल्यामुळे त्यावरून मार्गक्रमण करणे कठीण आणि त्रासाचे असे. प्रवाशाला, मग तो बैलगाडीतून जाणारा असो अथवा पालखीतून फिरणारा असो, स्वत:चे आणि मालमत्तेचे रक्षण करण्याकरिता काही संरक्षक भाड्याने आपल्याबरोबर घ्यावे लागत. ट्रॅव्हर्नियर म्हणतो, प्रवास जर सुखाचा आणि विनात्रासाचा व्हावयाचा असेल तर प्रवाशाला २० ते ३० सशस्त्र माणसे बरोबर घ्यावी लागत. हातात धनुष्य-बाण, बंदुका घेऊन पालखीच्या भोयांबरोबर ते धावत जात.

इंग्रजांनी देखील या भागातील रस्ते कसे असुरक्षित आणि धोक्याचे होते याची वर्णने केली आहेत. चोर त्याचप्रमाणे स्थानिक राजे या संधीचा फायदा घेऊन काफिले आणि व्यापारी यांना लुबाडीत. थिव्हॅनोने दोन शिपाई आपल्या चाकरीत सतत ठेवले होते. ते त्याच्या गाडीभोवती सतत पहारा करीत. या शिपायांचा त्याला फार उपयोग होई. ते आपल्या धन्याला हव्या त्या वस्तू बाजारातून आणून देत, धन्याची देखभाल करीत, आणि रात्रीच्या वेळी रक्षकाचे काम करीत. त्यांच्याजवळ तलवार, खंजीर, भाला, धनुष्य-बाण आणि बंदुका इत्यादी हत्यारे होती. सर्व प्रकारच्या शत्रूबरोबर युद्ध करण्यास ते नेहमी तयार असत. कॅरेनेदेखील या देशात प्रवास किती कठीण आहे याबद्दल तक्रार केली आहे. इंग्रज लोक मार्गावरील भुरट्या चोरांपासून रक्षण करून घेण्याकरिता काही सैनिकांची मदत घेत असत.

प्रवासाच्या वाटेत लागणाऱ्या छोट्या-मोठ्या प्रदेशावरील राजांच्या सैनिकांपासून त्रास होऊ नये म्हणून प्रवासी प्रथम संबंधित अधिकाऱ्याकडून त्यांच्या प्रदेशातून जाण्यासाठी परवाना काढीत. ॲबे कॅरेला राजापूरला जायचे होते, तेव्हा त्याने मराठ्यांच्या चौल येथील अधिकाऱ्यापासून एक परवाना काढला होता. त्यामुळे कालवण आणि संगमेश्वर या ठिकाणी त्याला मराठ्यांच्या सैनिकांपासून काही त्रास झाला नाही.

वाहनासाठी आणि हमालासाठी काय दर द्यावे लागत याची माहितीही आपल्याला मिळते. सुरत ते गोवळकोंडा हा प्रवास साधारणपणे ४० दिवसांचा होता. त्यासाठी ट्रॅव्हर्नियरने गाडीभाडे ४५ रुपये दिले. म्हणजे साधारणपणे एका गाडीचे एका दिवसाचे भाडे १ रुपया २ आणे इतके झाले. थिव्हॅनोने एक घोडागाडी १ महिन्यासाठी ३४ रुपयाला घेतली होती. गाड्यांचा पुरवठा कमी असल्याने त्यांचे दर दोईजड असल्याची तक्रार इंग्रजी पत्रातून दिसून येते. परकीयांना जादा दर आणि स्वकीयांना कमी दर असण्याची शक्यता आहे.

संरक्षक म्हणून घेतलेल्या माणसांची मजुरी निरनिराळी असे. थिव्हॅनोने दोन संरक्षक

नेमले होते आणि त्यांना तो महिना प्रत्येकी २ रुपये पगार व दररोजचा भत्ता म्हणून साधारणपणे १ आणा देत असे. ट्रॅव्हर्नियर म्हणतो, प्रवास जर ६० दिवसांचा असेल तर हा पगार दरमहा ५ रुपये असे, पण छोट्या प्रवासासाठी ४ रुपयांहून अधिक पडत नसत. पालखी उचलणारे भोई ६ ते ६॥ रुपये महिना या दराने मिळत. इतके पैसे दिल्यानंतर त्यांना दररोजचा भत्ता द्यावा लागत नसे. थिवॅनोने पगार आणि भत्ता यात फरक केला असल्याने त्याचे दर आपणास कमी वाटतात; पण प्रत्यक्षात तसा काही फरक पडत नसावा.

या मजुरांची स्थिती किती दयनीय होती याचे विदारक चित्र अॅबे कॅरे याने रेखाटले आहे. तो म्हणतो,

> "बिचोली सोडल्यापासून डोक्यावर जड ओझी घेऊन रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांचे थवे पाहून मला आश्चर्य वाटले. मला त्यांची दया आली. मी माझ्या नोकरांना विचारले, ही माणसे इतकी जड ओझी घेऊन डोंगरातील या कठीण वाटेने का जात आहेत? आमच्याजवळ अगदी हलके सामान आहे, पण आम्हांला हीच चढण चढताना किती त्रास होतो आहे. यावर त्या नोकराने सांगितले, हे लोक आपल्याच जातीचे असून, जड ओझी वाहून नेण्याखेरीज त्यांना अन्य कोणताही व्यवसाय नाही. ते गोव्याच्या किनाऱ्यावर राहतात. तेथून सुके मासे, नारळ, अरक आणि इतर खाद्यपदार्थ घेऊन ते विजापुरात नेऊन विकतात व त्यातून मिळणाऱ्या मजुरीवर आपली गुजराण करतात. कितीही मोठे वजन असले तरी ते वाहण्याकरिता त्यांना साधारणपणे ५ रुपये मिळतात. मला आश्चर्य वाटले. आपल्या पोटाला पुरेल इतकी यांची मिळकत असेल काय; आणि एका फेरीत २५ ते ३० दिवसांचे इतके परिश्रम हे कसे सहन करू शकतात? मला कोणी सांगितले असते की एवढी मिळकत त्यांना इतक्या लांबच्या प्रवासात उपजीविकेसाठी आणि तंदुरुस्तीसाठी पुरेशी आहे तर त्यावर माझा कदाचित एरवी विश्वास बसला असता; पण मला स्वत:ला रोज जे परिश्रम करावे लागतात त्यावरून ते मला खरे वाटत नाही. त्यांना जे थोडे पैसे मिळत ते, ते प्रवासात खर्च करीत नसत. आपल्या कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहासाठी तो पैसा घरी नेला जाई. माझ्याबरोबर ८ मजूर होते. त्यांपैकी ६ भोई आणि २ सामान उचलणारे हमाल होते. विजापूरला मला नेण्यासाठी मी प्रत्येकी तीन रुपये करार केला होता. त्यांना भाकरी देण्याची जबाबदारी माझ्यावर नव्हती. मला असे दिसून आले की, प्रवासाला निघण्यापूर्वी आपल्याला संपूर्ण प्रवासात पुरेल इतक्या अन्नाची शिदोरी ते घरून बांधून घेत. त्यात थोडा तांदूळ आणि सुके मासे असत. यासाठी त्यांना आपल्या देशात फारसा पैसा मोजावा लागत नसे. वाटेत लागणाऱ्या गावांतून ते दूध, फळे, धान्य इत्यादी वस्तू विकत घेत. धान्याचे ते पीठ करीत आणि बांधून आणलेल्या शिदोरीबरोबर या विकत घेतलेल्या वस्तू खात. तंबाखू हा त्यांचा मोठा आधार होता. ते सारखे तंबाखू ओढीत. इतर गोष्टींपेक्षा ते अधिक धूरच पोटात घेत. पाण्याखेरीज ते ताडी, कांजी, अरक ही मादक द्रव्ये पीत." (अॅबे कॅरे, भाग १, पृ. : २२६-७)

वाहने ओढणाऱ्या जनावरांना खाण्यास काय घालीत असत याची वर्णनेही आढळतात. डॉ. फ्रायर म्हणतो की, बैल हे उत्पन्नाचे मोठे साधन असूनही हे लोक त्यांना अत्यंत क्रूरतेने वागवितात. मरेपर्यंत त्यांच्याकडून काम करून घेतात आणि त्यांना पुरेसे खायला देत नाहीत. ट्रॅव्हर्नियर म्हणतो अर्धा दिवस झाल्यावर ते बैलांना गव्हाच्या पिठाच्या दोन-तीन साधारण मोठ्या गोळ्यांना लोणी आणि गूळ खायला देतात.

वाहतुकीसाठी अथवा प्रवासासाठी लागणारी जनावरे वंजारी लोक पुरवीत असत. वंजारी लोक अशी जनावरे पाळीत आणि सामान वाहून नेण्याचाच प्रामुख्याने धंदा करीत. हे लोक भटक्या जमातीचे होते. त्यांना घरदारे नसल्याने आपली बायका-मुले आणि बाडबिस्तारा जिप्सी लोकांप्रमाणे ते आपल्या बरोबर घेऊन जात. दुसऱ्या काफिल्याशी प्रसंगी यांचे निकराचे झगडे, मारामाऱ्या होत असत.

प्रवाशाला रात्रीच्या वेळी निवासासाठी जागा मिळणे मुश्किलीचे असे. गोव्याकडे जात असताना अॅबे कॅरेला खेड, संगमेश्वर इत्यादी गावे ओसाड पडलेली दिसली. अशाच एका गावातील रिकाम्या पडलेल्या घरात त्याने एक रात्र घालविली होती. हिंदूंच्या रूढी आणि समजुतीमुळे देखील या परकीय प्रवाशांना गावात आसरा मिळणे कठीण होत असे. आपण या परजातीच्या माणसाला घर दिले तर ते विटाळेल, आपल्यावर समाज बहिष्कार टाकेल, आपल्याला वाळीत टाकले जाईल याची त्यांना भीती वाटे. म्हणून प्रवाशांना चांगले निवासस्थान मिळणे दुर्लभ असे. बाजारात वाटसरूसाठी काही सामान्य जागा अथवा धर्मशाळा असत, तेथे हे प्रवासी रात्र काढीत. ब्ऱ्हाणपूरला आपल्याला दोन निवासस्थाने आढळली असे थिवॅनो म्हणतो.

अॅबे कॅरेची मात्र कोल्हापूर जिल्ह्यातील नेसरीजवळ असलेल्या जांबुळवाडी या खेड्यातील एका बाईच्या घरी उतरण्याची चांगली सोय झाली होती. आपल्या तीन मुलींच्यासमवेत त्या बाईने कॅरेचे स्वागत केले व त्याला आश्रय दिला. यावरून असे म्हणता येईल की कदाचित प्रवाशाच्या अशा टप्प्यावर काही खाजगी निवासस्थाने असावीत आणि माहीतगार हमाल प्रवाशांना अशा ठिकाणी रात्रीच्या मुक्कामाला नेत असावेत. त्या खेड्यातील आदरातिथ्य आणि सचोटी पाहून कॅरेला आश्चर्य वाटले. त्याने जांबुळवाडीच्या निवासस्थानाचे जे वर्णन दिले आहे ते आधुनिक काळातील कोठल्याही निवासस्थानाला लागू पडण्यासारखे आहे. (अॅबे कॅरे, भाग १, पृ. २२८)

टपालव्यवस्था

टपालाची सोय कशा प्रकारची होती याचीही काही वर्णने आढळतात. सरकार आपली पत्रे वाटण्यासाठी हरकारे नेमत असत. एका गावाहून दुसऱ्या गावी खाजगी पत्रे नेण्याचे कामही ते करीत असत. रायगड ते मुंबई हे सुमारे १२५ मैलांचे अंतर काटून जाण्यास शिवाजी राजाच्या एका हरकाऱ्याला ५ दिवस लागले, असा एका पत्रात उल्लेख आहे. (शि.प.सं. २ : १६२८) घोडेस्वार, सांडणीस्वार यांचाही या कामासाठी वापर केला जात असे.

ट्रॅव्हर्नियरच्या वर्णनावरून असे दिसते की, सबंध देशात घोडेस्वारापेक्षा पायी जाणारे हरकारे जलदपणे टपालाचे वाटप करीत असत. त्याने गोवळकोंड्याच्या टपालव्यवस्थेचे वर्णन केले आहे. दोन-तीन मैलांच्या अंतरावर छोट्या झोपड्या असत. तेथे हरकारा बसे. पहिला हरकारा दुसऱ्या झोपडीत टपालाची पिशवी नेऊन टाकी. तेथे पिशवी घेण्यासाठी तयारीत राहिलेला हरकारा ती पटकन उचलून पळत पळत जाऊन पुढच्या झोपडीत ती पिशवी टाके. अशा रीतीने ही टपाल नेण्याची व्यवस्था केली जात असे. यालाच डाक म्हणत. महाराष्ट्रात देखील गोवळकोंड्याप्रमाणे व्यवस्था असणे स्वाभाविक आहे.

व्यापारी लोकांची अथवा सरकारी पत्रे याच पद्धतीने पाठविली जात असावीत. अत्यंत महत्त्वाची पत्रे सांडणीस्वाराबरोबर बंदोबस्तात पाठविली जात असत. काही खाजगी लोक मजुरीने हे काम करवून घेत असावेत. जर पत्र ज्याला ते द्यावयाचे त्याला महत्त्वाचे असेल तर मजुरी त्या माणसाकडून वसूल करीत. यालाच मसाला म्हणत. गावचे टपाल तालुक्याला पोहोचविण्याचे काम महार करीत असे.

घाटमार्ग

महाराष्ट्राचे दोन नैसर्गिक विभाग म्हणजे देश आणि कोकण. सतराव्या शतकात देश आणि कोकण यांना जोडणारे अनेक घाटमार्ग होते. पश्चिम घाट अथवा सह्याद्रीची रांग ही साधारणपणे १००० मैल लांबीची असून दख्खनची पश्चिम सरहद्द या सह्यगिरीने निर्माण झालेली आहे. या प्रदेशाच्या उत्तरेकडून दक्षिणेकडे जाताना अनेक घाट लागतात. नाणेघाट, थळ घाट, जुन्नर आणि कोकणमधील पिंपरी घाट, बोर अथवा खंडाळा घाट (मुंबई-पुणे मधील), पारघाट, अंबाघाट (रत्नागिरी-कोल्हापूर मार्गावरील), फोंडा घाट, अंबोली घाट इत्यादी घाटमार्ग लोकांच्या नित्याच्या वापरातील होते. याखेरीज अनेक पायवाटा होत्या. या मार्गावर अनेक चौक्या बसविल्या होत्या व तेथे जकात वसूल केली जाई.

घाटावरच्या अधिकाऱ्याला घाटपांडे म्हणत. तो त्या घाटाचा वंशपरंपरा अधिकारी असे. घाटमार्ग सुरक्षित राखण्यासाठी तेथे गस्त घालण्याची व्यवस्था या घाटपांडेकडे असे. जकात वसूल करण्यासाठी अनेक दुय्यम अधिकारी नेमणे व त्यांच्या कामावर देखरेख करण्याचे काम याच्याकडे असे. पत्की, डांगी, पानसरे, पथकदार, मोडवी,

मेटकरी हे सेवक घाटपांड्याला जकातवसुलीच्या व घाटमार्गाचे रक्षण करण्याच्या कामी मदत करीत. पत्की हा चौकीचा प्रमुख अधिकारी असून, चौकीवर येणाऱ्या मालाचे वजन करण्यासाठी पानसरे नावाचा दुय्यम अधिकारी पत्कीला मदत करीत असे; आणि या दोघांची मदत घाटपांडेला जकात वसूल करण्याच्या कामी होत असे. घाटमार्गाचे रक्षण करण्यासाठी आणि काफिल्यांना संरक्षण देण्यासाठी गुजर नावाचे रक्षक नेमले होते. गुजरांची नेमणूक निरनिराळ्या चौक्यांवर केलेली असे. काफिल्याला एका चौकीपासून दुसऱ्या चौकीपर्यंत सुखरूपपणे पोहोचविण्याचे कार्य हे गुजर करीत. गुजरांचा उल्लेख मेटकरी असा केला आहे. काही मेटकऱ्यांना दर बैलामागे १ रुका वर्गणी घेण्याचा अधिकार होता. सरकारनियुक्त रक्षकांचा पगार सरकार देत असे.

पत्कीलाही काही अधिकार देण्यात आले होते. धान्य आणि मिठाच्या गोण्या घेऊन जाणाऱ्या दर बैलामागे दोन रुके, डाळी वाहणाऱ्या बैलामागे तीन रुके इतकी रक्कम गोळा करण्याचा त्यांना अधिकार होता. तंबाखू आणि इतर वस्तू नेणाऱ्या बैलामागे ६ रुके घेतले जात. कापडाचा गठ्ठा असेल तर १२ रुके घेत. याखेरीज इतर वस्तूवर, त्यांच्यावर ज्या प्रमाणात जकात आकारली जाई, त्या प्रमाणात वर्गणी घेतली जाई. घाटाच्या सर्व वतनदार अधिकाऱ्यांना हे हक्क उपभोगता येत. प्रत्येक महिन्याला घाटाचे दुय्यम अधिकारी जमा झालेल्या रकमेतून आपले हक्क काढून घेऊन बाकी रक्कम घाटपांडेला देत. त्यांच्याकडून या कामात कसूर झाली तर सरकार त्यांना ताकीद देत असे.

मोडवी हा अधिकारी घाटपांड्याला त्याच्या जकातवसुलीच्या कामावर देखरेख करण्याच्या कामी मदत करीत असे.

या वंशपरंपरागत अधिकारी आणि संरक्षकांखेरीज घाटाच्या कामावर सरकार एका खास अधिकाऱ्याची नेमणूक करीत असे. त्याला सभासद म्हणत असत. सैनिकांकडून व्यापारी आणि प्रवासी यांना उपद्रव होणार नाही हे पाहण्याचे काम त्याचे असे. परराज्यात जाणाऱ्या व्यापाऱ्यांना ओळखपत्रे देण्याचे काम याच्याकडे होते. पत्कींना खेड्यात जकातवसुलीसाठी जागा मिळवून द्यावी असे गावच्या शेटे-महाजनांना हाच विनंती करीत असे. (आधार : भा.इ.सं.मं., त्रै. ३५ पृ. १-२; ११-१३; शि.च.सा. ९: ८५, रा. १५ : ४८, शि.च.सा. ५ : ७७१, ऐ.सं.सा. खंड ४, पृ. १५-१७).

महाराष्ट्रातील व्यापाराची आणि उद्योगधंद्यांची प्रमुख केंद्रे

शिवकालात कोकण भागात बरीच गजबजलेली व्यापारी केंद्रे होती. चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पेण यांचा भरभराटीस आलेली औद्योगिक आणि व्यापारी केंद्रे असा उल्लेख फॅक्टरी रेकॉर्ड्समध्ये आढळतो. चौल आणि दाभोळ या बंदरांची तर सुरत आणि गोव्याशी तुलना केली जात असे. डहाणू, तारापूर, केळवे-माहीम, आगाशी, वसई, बांद्रे, माहीम, नागोठणे, श्रीवर्धन, जैतापूर, खारेपाटण या कोकणातील

इतर गावांचाही उल्लेख प्रस्तुत संदर्भात केला जातो. शिवाजी राजांच्या ताब्यात असलेली राजापूर, दाभोळ, केळेशी ही बंदरे मुंबईच्या व्यापाराला अत्यंत आवश्यक अशी होती. सुरतेपेक्षा अधिक स्वस्तात येथे वस्तू मिळतील अशी इंग्रजांची भावना होती. (इ.रे.शि. १ : ३१५)

चौल : चौल याचे दुसरे नाव मूर्तजाबाद असेही होते. कुलाबा जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यातील हे गाव एकेकाळी व्यापारी बंदर आणि उद्योगधंद्याचे केंद्र म्हणून बरेच नावारूपास आले होते. येथे दाट लोकवस्ती होती. १६७० नंतर हे ठिकाण शिवाजी राजांच्या ताब्यात आले. डॉ. फ्रायरने चौलला १६७२ नंतर भेट दिली. तो म्हणतो,

> "चौलचा वरचा भाग राजाच्या (शिवाजीच्या) ताब्यात असून पोर्तुगीज शहरापासून तो सुमारे दोन मैलांच्या अंतरावर आहे. पूर्वी दखखनमधील मालाची ही एक मोठी बाजारपेठ होती, पण आता हे ठिकाण भग्नावस्थेत आहे. याचे प्रमुख कारण शिवाजी राजा आणि मुघल यांच्यात अलीकडे चालू असलेली सततची युद्धे हे होय." (फ्रायर,भाग १,पृ.१९८-९९)

१६७४ साली येथे एक मोठी आग लागली आणि त्यात सुमारे ३ हजार घरे भस्मसात झाली. अनेक चौलकरांना मुंबईचा आश्रय घ्यावा लागला. (इ.रे.शि. भाग २, पृ. ८) तेव्हा १६७४ नंतर चौलचे महत्त्व व्यापारी केंद्र म्हणून कदाचित कमी झाले असावे.

चौलला रेशमाचा धंदा मोठा होता. घोड्यांचा व्यापार या बंदरातूनच होत असे. नीळ, अफू आणि रेशीम या वस्तू या बंदरातून निर्यात होत. युरोपीय अनेक वस्तू या देशात चौलमार्गे येत असत. गोवे आणि साऱ्या भारत देशाला पुरेल इतके रेशमी कापड येथे सोळाव्या शतकात होत होते; आणि हे रेशीम चीनच्या रेशमाहून उत्तम दर्जाचे होते असे म्हणतात. रेशमाखेरीज सुंदर पेट्या, छोट्या कोरीव वस्तू आणि इतर कलाकुसरीचे काम चौल येथे होत असे.

दक्षिणेची ही मोठी बाजारपेठ होती. १६६८ सालापर्यंत प्रतिवर्षी चौलमधून ५००० टॅफ्टाचे कापड तयार होत असे अशी नोंद आहे; परंतु राजकीयदृष्ट्या चौलचा प्रदेश अत्यंत अस्थिर असल्याने बरीच विणकर मंडळी पुढे चौल सोडून गेली. नंतरच्या काळात भिवंडीला हातमागाचा व्यवसाय वाढला याचे कारण कदाचित ही चौलची मंडळी या भागात येऊन स्थायिक झाली असावीत.

दाभोळ : १६६९ साली दाभोळ बंदर शिवाजी राजाच्या ताब्यात होते. शिवाजी राजांची जहाजे दाभोळ-मुंबई या मार्गावर व्यापारी हालचाली करीत असत. शिवाजी राजांची जहाजे दाभोळ येथे नांगरली जात. शेवटी ती कोठेही गेली तरी दाभोळ बंदराला येत असत. मुंबईच्या व्यापाराला सुरतेपेक्षा दाभोळ हे अत्यंत महत्त्वाचे आणि आवश्यक

असे बंदर आहे, असे मुंबईहून ईस्ट इंडिया कंपनीला पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. कारण युरोपात निर्यात करावयाच्या कितीतरी वस्तू येथे मुबलक प्रमाणात आणि स्वस्त भावाने मिळत असत. (इ.रे.शि. १ : पृ. २७७, ३१५).

दाभोळ हे एक भव्य आणि दाट लोकवस्तीचे सागरी ठिकाण होते. येथे अनेक धनिकांची सुंदर सुंदर घरे, उत्तम मंदिरे आणि जुन्या मशिदी होत्या. मलबार आणि खंबायतच्या गलबतांची भेट येथे होत असे. एकमेकांच्या जहाजांतील वस्तूंची देवाण-घेवाण येथे होत असे. देशाच्या अंतर्गत भागातून सामानाने भरलेले बैलांचे तांडे येथे येत असत.

कल्याण : सतराव्या शतकात कल्याण हेदेखील दाट वस्तीचे शहर होते. उत्तर हिंदुस्थान, गोवळकोंडे आणि केरळ येथून अनेक वस्तू मोठ्या प्रमाणावर व्यापाराच्या निमित्ताने येत असत. फ्रायर म्हणतो, "त्या बंडखोराच्या (शिवाजीच्या) प्रदेशात या बाजूने (मुंबईच्या) शिरावयाचे कल्याण हे नाके आहे" (The key this way (from Bombay) into that rebel's Country) १६७५ साली त्याने कल्याणला भेट दिली होती. त्या वेळी एकेकाळी समृद्ध असलेली ही प्रमुख बाजारपेठ त्याला उतरतीला लागलेली आढळून आली. (फ्रायर १ : पृ. ३१८)

भिवंडी : हेदेखील व्यापार आणि उद्योगधंद्यांचे एक महत्त्वाचे ठिकाण होते. विणकरांचा धंदा येथे तेजीत होता. इंग्रज लोकांनी अनेक विणकरांना मुंबईला येण्याची विनंती केली होती; परंतु तिचा त्यांनी अव्हेर केल्याचे दिसून येते. त्यापेक्षा येथून आपण मोठ्या प्रमाणावर कापडाचा पुरवठा करू असे अभिवचन त्यांनी इंग्रजांना दिले होते. (इ.रे.शि. २, पृ. १११, ११५)

कल्याण आणि भिवंडी येथे जहाजे आणि घरे बांधण्यासाठी लागणारे टिंबर जातीचे लाकूड मुबलक प्रमाणात होत असे. टिंबरला इंग्रजांनी 'भारताचा ओक वृक्ष' असे नाव दिले आहे. (इ.रे.शि. २, पृ. ११०) कंपनीला टिंबरची फार आवश्यकता लागे आणि टिंबर मिळविण्याचे सोयीचे आणि स्वस्त ठिकाण म्हणजे कल्याण-भिवंडी. टिंबर त्यांना प्रामुख्याने तोफा चढवावयाचे गाडे बनविण्याकरिता लागत असे. पण कल्याण-भिवंडीवर मुघल आणि मराठे दोघेही आपला ताबा सांगत असल्यामुळे त्या दोन सत्तांत नेहमी संघर्ष होत व त्याचा परिणाम टिंबरच्या पुरवठ्यावर होई. (इ.रे.शि. १, पृ. १५४)

कल्याण आणि भिवंडी ही ठाणी शिवाजी राजांनी १६५७ च्या सुमारास जिंकून घेतली आणि १६७४ च्या सुमारास या प्रदेशावर त्यांचा पूर्ण अंमल होता असे मानावयास हरकत नाही. कल्याण-भिवंडी येथील मुबलक टिंबरचा उपयोग जहाज बांधणीकडे करून घेता येण्यासारखा होता. शिवाजी राजाने आपली निरनिराळ्या आकाराची लहान-मोठी जहाजे बहुधा कल्याण येथेच बांधली असावीत. सभासदाने शिवाजी राजाकडे गुराब, गलबत, शिबार, तरांडे, तारु आणि पगार अशी सहा प्रकारची

जहाजे होती असे म्हटले आहे. आरमाराचे महत्त्व शिवाजी राजांनी पूर्णपणे ओळखले होते.

> "आरमार म्हणजे स्वतंत्र येक राज्यच आहे. जैसे ज्यास अश्वबळ त्याची पृथ्वी प्रजा आहे, तद्वतच ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. याकरिता आरमार अवश्यमेव करावे."

असे आज्ञापत्रात म्हटले आहे. इंग्रजांनी देखील म्हटले आहे की,

> "शिवाजी राजाच्या आरमारात बोटी, गुराब, गलबते यांचा समावेश असून १६७० साली त्याचे आरमार विचार करण्यासारखे मोठे होते," (इ.रे.शि. १, पृ २१७, २३३, भाग २, पृ. ६).

यावरून असे म्हणता येईल की जहाजे बांधणीचा उपयोग शिवाजी राजाने आपल्या उत्तर काळात मोठ्या प्रमाणावर सुरू केला असावा. शिवाजी राजांचा हा जहाज-बांधणीचा कारखाना कल्याण-भिवंडीच्या परिसरातच होता. (शि.प.सा. २ : १५०५)

राजापूर : रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर हे देखील व्यापाराच्या दृष्टीने एक महत्त्वाचे केंद्र होते. हे ठिकाण पूर्वी आदिलशाहाकडे होते. इंग्रजांना आदिलशाही सत्ता फार मोलाची वाटत होती. आपला व्यापार पश्चिम किनाऱ्यावर वाढावा म्हणून येथे त्यांनी वखार घातली होती.

वेंगुर्ले : वेंगुर्ले येथे डचांची वखार होती. १६६० च्या सुमारास बटाव्हिया, जपान, सिलोन, इराणची सामुद्रधुनी, तांबडा समुद्र या ठिकाणाहून वेंगुर्ल्यास बोटी येत.

महाड, कोल्हापूर, अष्टे, चिपळूण, पेण, नागोठाणे इत्यादी ठिकाणीही बऱ्यापैकी बाजारपेठा होत्या. राजापूर, दाभोळ, केळेशी ही बंदरे मुंबईच्या व्यापारास अत्यंत महत्त्वाची होती. या ठिकाणी सुरतेच्या बाजारपेठेहून स्वस्त दराने वस्तू मिळतात असे इंग्रज म्हणतात.

मिठाचा मामला : लाख मोलाचा

शिवाजी राजांच्या मिठाच्या व्यापारसंबंधीचे उल्लेख कंपनीच्या कागदपत्रात आढळतात–

> "शिवाजीच्या मिठाच्या गलबतांचा तांडा मुंबई बंदरात आला आहे आणि त्याच्या रक्षणासाठी २५० टनांचे जहाज आणि काही मचवे बरोबर आहेत असे १६७० साली मुंबई कंपनीने सुरतेला कळविले आहे." (शि.प.सा. १ : १३१२)

कोकण हा मराठी राज्याचा कणा होता. मीठ तयार करणे हा कोकणांतील एक प्रमुख उद्योगधंदा होता. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी या जिल्ह्यात पुष्कळ मिठागरे होती. पेण, पनवेल, नागोठणे, रेवदंडा, ठाणे सतराव्या शतकातील महत्त्वाची मिठागरे होती. शेतीव्यवसाय हा जीवनाचा नित्याचा व्यवसाय असला तरी तो सांभाळून मीठ तयार करण्याचा उद्योग करता येत असे. या मिठागरात तयार होणारे मीठ प्रामुख्याने देशावर विकले जात असे. मिठाच्या वाहतुकीसाठी खास गलबतांचा तांडा शिवाजी महाराजांनी निर्माण केला होता. या बोटी कल्याण-भिवंडीलाच बांधल्या जात असणार.

मिठाचा धंदा हा कोकणातील महत्त्वाचा धंदा असला तरी परकी मालापासून या धंद्याला फार मोठा धोका निर्माण झाला होता. मराठी राज्याच्या हद्दीला लागून पोर्तुगिजांची सरहद्द होती. गोव्याकडे मीठ तयार करणे, विकणे हा उद्योग मोठा होता. विशेषत: बारदेश भागात उत्तम मिठाची पैदास होत असे, आणि या ठिकाणी होणाऱ्या मिठाचा भाव मराठी मुलखातील मिठापेक्षा स्वस्त होता. तेव्हा साहजिकच देशावरील व्यापारी मीठ खरेदीसाठी स्वराज्याचा मुलूख ओलांडून बारदेशात जात व तेथून मीठ देशावर आणून विकत असत. वाहतुकीचा इतका त्रास आणि खर्च सोसून हे व्यापारी बारदेसात जात असत त्या अर्थी निश्चितच तेथील मीठ स्वस्त असणार. कदाचित त्या मिठाची प्रतही उत्तम असण्याची शक्यता आहे. 'पिकते तेथे विकत नाही' या न्यायाने कोकण-पट्टीत तयार होणारे मीठ कोकणातच किती खपणार! देशावरची ही मोठी बाजारपेठ परक्याने काबीज केल्याने आणि त्यांच्याशी भावाच्या बाबतीत स्पर्धा करणे जमत नसल्याने स्वराज्यातील बरीच मिठागरे ओस पडली. मिठाचा धंदा बसला. मिठावर सरकारी जकात होती. मिठाचा धंदाच बसल्याने जकातीचे उत्पन्न कमी झाले आणि सरकारचे नुकसान होऊ लागले.

या सर्व परिस्थितीचा पूर्ण विचार करून शिवाजी राजांनी मिठाच्या धंद्यास संरक्षण द्यावयाचे ठरविले. युरोपच्या अर्थव्यवस्थेत 'संरक्षण' या आर्थिक धोरणाचा प्रारंभ (Policy of Protection) एकोणिसाव्या शतकात झाला. अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि उद्योगधंद्यांच्या, उत्पादनाच्या बाबतीत इंग्लंडचे वर्चस्व वाढले. इंग्लंडशी स्पर्धा करणे युरोपातील इतर औद्योगिकदृष्ट्या अप्रगत राष्ट्रांना शक्य नव्हते. स्वत:च्या फायद्यासाठी विशेषत: कच्च्या मालाचा पुरवठा व पक्क्या मालाचे वाटप या बाबी आयाती-निर्यातीवरील जकातीशिवाय व्हाव्यात म्हणून इंग्लंडने खुल्या व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार केला. यामुळे त्यांना कच्चा माल स्वस्तात मिळू लागला; आणि त्यांच्या पक्क्या मालाशी स्पर्धा करणे कठीण असल्याने त्याला बाजारपेठाही मिळू लागल्या. या खुल्या धोरणाला जर्मन अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरिश लिस्ट याने एकोणिसाव्या शतकात विरोध करून संरक्षणाच्या धोरणाचा जोरदार पुरस्कार केला आणि त्यामुळे जर्मनीची अभूतपूर्व अशी औद्योगिक प्रगती घडून आली.

शिवाजी महाराजांनी अप्रत्यक्षरीत्या या धोरणाचा अवलंब सतराव्या शतकात केला होता. १६७१ साली कुडाळचा सर सुभेदार नरहरी आनंदराऊ यास मिठावरील

करासंबंधी जे पत्र लिहिले आहे त्यावरून मिठाच्या धंद्याला प्रोत्साहन कसे देता येईल यासंबंधीचे त्यांचे विचार म्हणजे अप्रत्यक्षरीत्या संरक्षणाचेच धोरण आहे.

प्रभावळीपासून कल्याण-भिवंडीपर्यंत मिठावरील जकातीचे दर कसे असावेत यासंबंधीचा एक ठराव महाराजांनी केला आणि त्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना दिली. महाराजांच्या असे लक्षात आले होते की कोकणातील मिठाचे भाव वाढल्यामुळे सारे व्यापारी लोक पोर्तुगिजांच्या मुलखातील बारदेशाकडे जात होते. यावर इलाज म्हणून महाराजांनी असे सुचविले की, बारदेशाहून स्वराज्यात येणाऱ्या मिठावर जबर जकात बसवा की ज्यायोगे बारदेशाहून येणाऱ्या मिठाची आणि आपल्या देशातील मिठाची किंमत सारखीच अथवा थोडी कमी राहील. महाराज लिहितात,

> "तुम्ही घाटी जकात जबर बैसविणे बारदेशात मीठ विकते त्याचा हिशोब प्रभावळीकडे संगमेश्वराकडे मीठ विकते त्याणे कित्येक जबर पडते ते मनास आणून त्या अजमासे जकाती जबर बैसवणे की संगमेश्वरी विकले आणि घाट पावेतो जे बेरीज पडेल त्या हिशोबे बारदेशीच्या मिठास जकाती घेवणे संगमेश्वराहून बारदेशीचे मीठ महाग पडेल ऐसा जकातीचा तह देणे." (रा. खं. : ८ : २७)

या धोरणाचा मिठाच्या व्यापारावर काय परिणाम होईल याचा अंदाज महाराजांनी केला होता. संगमेश्वराला जर मीठ स्वस्त मिळू लागले तर बारदेशाहून मीठ आणण्याच्या खटाटोपात देशावरील व्यापारी पडणार नाहीत. त्याच किंवा त्याहून कमी भावात त्यांना मीठ मिळाले तर त्यांचा वाहतुकीचा खर्च आणि त्रास वाचला असता. तेव्हा आपल्या मालाचा उठाव होण्याकरिता परक्या मालावर जबर जकात बसविणे भाग होते. तशी त्यांनी बसविली आणि या जकातीच्या कराराची कसोशीने अंमलबजावणी आपल्या संबंधित अधिकाऱ्यांनी करावी असे त्यांना बजावले. ते म्हणतात,

> "जरी जबर जकातीचा तह नेदा (दिला नाही) मुलाहिजा (उपेक्षा) कराल म्हणजे कुल उदमी खलक (सर्व व्यापारी लोक) बारदेशाकडे वोहडेल आणि कुल बंदरे पडतील... संगमेश्वराहून बारदेशीच्या मिठास जबर निरख पडे ती गोष्ट करणे ये गोष्टीचा एक जरा उजूर न करणे ये गोष्टीत साहेबाचा बहुत फायदा आहे."

या धोरणामुळे साहेबाचा म्हणजे सरकारचा फायदा कसा होईल? संरक्षणाचे धोरण हे सरकारला दोन दृष्टीने फायद्याचे असते. एखाद्या धंद्याला संरक्षण द्यावयाचे, परकी मालाच्या स्पर्धेपासून त्याचा बचाव करावयाचा म्हणजे प्रथम परकी मालावर जबर जकात बसवावी लागते. अशी जबर जकात बसविली म्हणजे साहजिकच या मालाच्या आयातीचा ओघ कमी होतो व देशी पेठांतील मालाला मागणी येते, मागणीमुळे उत्पादन वाढते व देशी धंद्याची भरभराट होते. बरे, जबर जकातीला न जुमानता काही

माल आलाच तर सरकारचे जकातीचे उत्पन्न वाढते आणि सरकारचा फायदाच होतो, तेव्हा जकातीचे उत्पन्न वाढविणे आणि देशी मालाचे उत्पादन वाढविणे हे दोन्ही हेतू संरक्षणाच्या या धोरणाने साधले जातात.

मिठावर जबर जकात बसवून महाराजांनी हे दोन्ही हेतू साधले होते. मीठ ही नित्याची गरजेची वस्तू. तेव्हा जबर किंमत देऊनसुद्धा ती लोक घेणारच हे महाराजांनी ओळखले असल्यामुळे मिठाच्या प्रश्नाची उपेक्षा करता कामा नये असे त्यांचे मत होते. ते म्हणतात,

> "मिठाचा मामला... कर्द लाख रुपये यावयाचा मामला आहे. तरी लिहिले प्रमाणे अंमल करणे."

महाराजांनी १६७१ साली मिठावर मणामागे १२ रुक्याचा जादा कर बसविला आणि त्याची अंमलबजावणी करण्याची सक्त ताकीद आपल्या अधिकाऱ्यांना दिली.

व्यापाराच्या वस्तू

महाराष्ट्राच्या निरनिराळ्या बाजारात येणाऱ्या वस्तूंचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करता येईल :

अन्नधान्य : कागदपत्रात याचा उल्लेख 'काटानी जिन्नस' असा येतो. यात सामान्यतः ज्या धान्याचे धाटे कापून, कणसे चोळून दाणे काढले जातात यांचा समावेश होतो. गहू, मूग, डाळी, मसूर, उडीद, भात, वर्णे, मका, नाचणी, तीळ इत्यादी वस्तूंचा उल्लेख प्रस्तुत संदर्भात करता येईल, रायबाग, लाल, तालीसर, महावार, खिवीसाल इत्यादी तांदळाचे प्रकार आहेत.

मसाल्याचे जिन्नस : मसाल्याच्या जिनसांचा उल्लेख 'गंधानी' असा केला आहे. लवंगा, लसूण, कांदा, मोहरी, कापूर, केशर, गुलाल, वेलदोडे, चिंच, पारा, गूळ, खडीसाखर, काकवी, सुंठ, हळद, चंदन, गोपीचंदन, अफू, सुवासिक तेले, (चमेली, मोगरा, चंपा), खोबरे, तूप, मध आणि इतर अनेक मसाल्याचे जिन्नस विक्रीस येत.

कापड : निरनिराळ्या प्रकारचे कापड बाजारात विक्रीस येत होते. तेलंगण, मलबार, विदर्भ, गुजरात, बंगाल, अयोध्या इत्यादी ठिकाणांहून विविध प्रकारचे कापड महाराष्ट्रात येते असे मुक्तेश्वर हा एक समकालीन कवी आपल्या 'सभापर्व' या काव्यग्रंथात म्हणतो. आणखी एक समकालीन कवी म्हणजे सामराज. 'रुक्मिणी-हरण' या त्याच्या काव्यात महाराष्ट्रात वापरल्या जाणाऱ्या विविध कपड्यांचे- विशेषतः स्त्रियांच्या लुगड्यांचे प्रकार त्याने दिले आहेत. ताफ्ता, चायनाताफ्ता, शेला, कोचकी, महाबान, मुंगीपाटण, मुसदर, पाटव, महामुदी, मलमल, कद, पीतांबर, सखलद,

खारा, पुर्तकाली, अष्टपुतळी, घाटी, लुगडी, धोतरे, कांबळी, गोधडी, पासोडी, चिटे (रंगीत), शाली, किनखाब, खंबायत, रुमाल, मखमलीच्या टोप्या, सूत, ताग इत्यादी कापडाचे विविध प्रकार कागदपत्रात आढळतात.

फळफळावळे आणि इतर खाद्यपदार्थ : कलिंगडे, नारळ, फणस, ऊस, लिंबे, केळी, आंबे, अननस, भाज्या, काजू, सुपारी, पाने, दूध, लोणी, मांस यांचा उल्लेख कागदपत्रातून येतो.

इतर संकीर्ण वस्तू : पायपोस, छोट्या नावा, फण्या, सुपे, संदुका, साबण, गाड्या, पलंग, कंदील, भांडी, तांबे, जस्त, दोऱ्या, कागद इत्यादी वस्तू विक्रीस येत.

प्राणी : घोडा, बैल, म्हैस, शेळी इत्यादी.

वर उल्लेखिलेल्या वस्तू भारताच्या इतर भागांतून अथवा परदेशातून मागवीत. युरोपियन देशांपैकी फ्रेंच, डच, इंग्लिश आणि पोर्तुगीज या लोकांचे महाराष्ट्राशी व्यापारी संबंध अत्यंत निकटचे होते.

तांबे, जस्त, लोखंड, दारूगोळा, बंदुका, तोफा, पारा, निरनिराळ्या प्रकारचे कापड इत्यादी वस्तू इंग्रज पुरवीत. जपानहून तांबे आणून डच लोक येथील बाजारपेठेत विकीत.

शिवाजी महाराज आणि इंग्रज

१६०० साली एका राजाज्ञेनुसार (Royal Charter) ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. ईस्ट इंडीज प्रदेशांशी संपूर्णतया व्यापार करणे हा या कंपनीचा मुख्य उद्देश होता. दख्खन देशातील त्यांच्या वखारी या प्रामुख्याने पश्चिम किनाऱ्यावर होत्या. प्रारंभी रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ बंदराकडे त्यांचे विशेष लक्ष होते. दाभोळ हे त्या काळी आदिलशाहीच्या ताब्यात होते. दाभोळ हे पुरातन बंदर असून सर्व तऱ्हेच्या व्यापारासाठी ते प्रसिद्ध होते. तेव्हा अशा बंदराशी आपले संबंध असावेत असे इंग्रजांना वाटणे स्वाभाविक होते. या बंदरांतून प्रतिवर्षी मालाने गच्च भरलेल्या दोन-तीन मोठ्या बोटी तांबडा समुद्र आणि आर्मज या ठिकाणी जात. आदिलशाहीकडून इंग्रजांनी दाभोळ येथे वखार घालण्याचे फर्मान १६३६ साली मिळविले. १६३७ साली आदिलशाही राज्यातील राजापूर येथे ही त्यांनी व्यापार सुरू केला आणि १६४९ साली तेथे एक वखार उघडली. राजापूर येथे कारवार, मिरजान, गिरसप्पा या ठिकाणाहून मिरी, वेलदोडे, सोरा (Saltpetre), सुपारी इत्यादी वस्तू येत. फ्रेंचांना देखील १६६८ साली शिवाजी राजांनी काही वस्त्रे व एक फर्मान देऊन राजापूर बंदरात मुक्तपणे व्यापार करण्यासाठी परवानगी दिली होती. मराठे आणि इंग्रज यांच्यात बेबनाव झाल्याने १६६२ ते १६७३ या काळात

इंग्रजांची राजापूर येथील वखार बंद ठेवण्यात आली होती.

डेलाँ या फ्रेंच प्रवाशाने १६७० साली राजापुरास भेट दिली होती. तो म्हणतो,

> ''इंग्रजांची येथे एक वखार होती, पण भारतीयांनी (म्हणजेच मराठ्यांनी) तेथून त्यांना हुसकावून लावले. फ्रेंचांनी नुकतीच तेथे वखार घातली असून तेथे एक सुंदर घर बांधले आहे. तेथे एका मोठ्या कारंज्याशेजारी एक बाग आहे. त्या कारंज्यातून एक गरम पाण्याचा झरा वाहतो. युरोपातील कुठल्याही कारंज्यापेक्षा तो कमी प्रतीचा नाही. सोरा आणि सुती कापड या राजापूरच्या पेठेतील प्रमुख वस्तू आहेत. पण मिरी देखील येथे जवळपास मोठ्या प्रमाणावर पिकते.''

दुसरा फ्रेंच प्रवासी म्हणजे ॲब कॅरे १६७२ साली तो राजापुरास गेला होता. तेथे त्याला हिंदू, मूर आणि इतर बरेच परदेशी लोक व्यापार करीत असल्याचे आढळले. येथील काही श्रीमंत व्यापाऱ्यांची जहाजे तांबडा समुद्र, इराणमधील बसरा आणि भारतातील सर्व ठिकाणी जातात, असे त्याने नमूद केले आहे.

वरील वर्णनावरून, सतराव्या शतकात राजापूर हे एक मोठे व्यापारी केंद्र होते असा निष्कर्ष काढता येईल. १६६१ साली राजापूर शिवाजी राजांनी आदिलशहाकडून जिंकून घेतले आणि तेव्हापासून ते मराठ्यांच्याकडे होते. मराठ्यांशी संघर्ष सुरू झाल्याने इंग्रजांनी आपली वखार १६६२ साली बंद केली. त्यानंतर ती सुरू करण्यासाठी उभयपक्षी प्रयत्न झाले आणि त्यातूनच शिवाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण निर्माण झाले. 'आज्ञापत्रा'तील टोपीकरांवरील प्रकरणाचे उगमस्थान शिवाजी राजांच्या राजापूरवखारी संबंधीच्या धोरणाशी निगडित करता येईल.

१६५९ सालापासूनच इंग्रजांना शिवाजी राजांच्या हालचालींची जाणीव होऊ लागली होती. पश्चिम किनाऱ्यावरील चौल आणि दाभोळ दरम्यानचा प्रदेश क्रमशः मराठ्यांचा वर्चस्वाखाली येत होता. त्यामुळे 'दख्खनमधील एक मातब्बर बंडखोर' असे शिवाजी राजांचे वर्णन करण्यात येऊ लागले. अफझल प्रसंगानंतर मराठ्यांसंबंधीची त्यांची भीती अधिकच वाढू लागली. ते गुप्तपणे मराठ्यांचा शत्रू सिद्दी याला मदत करू लागले. सिद्दी हे आदिलशहाच्या वर्चस्वाखाली होते आणि अफझलवधानंतरच्या पन्हाळ्याच्या वेढ्यात ते आदिलशहाच्या मदतीस धावून गेले होते. तेव्हा १६६१ साली विजापूरकरांची तमा न बाळगता शिवाजी राजांनी विजापूरकरांचे राजापूर हे महत्त्वाचे ठाणे बळकाविले, इंग्रजांची तेथील वखार लुटली आणि काही इंग्रजांना कारागृहात कोंडून ठेवले.

मुंबईच्या कंपनीने कैद्यांना मुक्त करण्याचा धोशा मराठ्यांच्या मागे लावला. तेव्हा शिवाजी राजांनी अट घातली की दंडा राजापुरी सिद्द्यांच्या कडून घेण्यास मदत करीत असाल तर त्यांची सुटका करतो. इंग्रजांनी मराठ्यांना धमकी देण्यास प्रारंभ केला की कैद्यांची सत्वर सुटका केली नाही तर आम्ही सुरत कचेरीला लिहून मोगलांना मराठ्यांच्या

मुलखावर हल्ला करण्यास प्रवृत्त करू. सुरतेच्या प्रेसिडेंट अँड्र्यूजला मुंबई कचेरीतून कैद्यांची सुटका करवून घेण्याविषयीची पत्रेही रवाना झाली; पण सुरतेच्या प्रेसिडेंटने मुंबईच्या अधिकाऱ्यांनाच दोष दिला. त्यांच्या मते कंपनीचे काम करीत असताना ते व्यापारी पकडले गेले नव्हते; अंतर्गत राजकारणात निष्कारण हस्तक्षेप केल्यामुळे ते पकडले गेले होते. सुरतेहून आलेले हे उत्तर अनपेक्षित होते. पण या उत्तरात कंपनीच्या भारतातील धोरणाचे सूत्र सांगितले होते. केवळ व्यापारात लक्ष घालणे, अंतर्गत राजकारणात स्वत:ला गुंतवून न घेणे हे कंपनीचे धोरण होते. शेवटी दोन वर्षांनी इंग्रज कैद्यांची मुक्तता झाली, पण राजापूरच्या वखारीची झालेली तूट भरून आली नाही.

इंग्रजांनी आपली वखार चालू ठेवावी परंतु नुकसानभरपाईसाठी फार खळखळ करू नये, अशी मराठ्यांची भूमिका होती. नुकसानभरपाईचे इंग्रजांचे म्हणणे संपूर्णतया मान्य केले तर त्यांचे वर्चस्व आपल्या राज्यात वाढेल, अशी महाराजांना भीती वाटत होती. इंग्रजांशी संबंध तर तोडावयाचे नाहीत आणि त्यांचे वर्चस्वही वाढू द्यावयाचे नाही म्हणून त्यांनी इंग्रजांशी प्रदीर्घ बोलणी करून नुकसानभरपाईचा प्रश्न शक्यतोवर लांबणीवर टाकला. महाराजांना आपल्या प्रदेशात व्यापार वाढावा असे वाटत असल्याने इंग्रज, फ्रेंच आणि इतर परदेशी व्यापाऱ्यांनी आपल्या प्रदेशात वास्तव्य करावे असे त्यांना वाटत होते; परंतु इंग्रजांच्या मनात मात्र शिवाजी राजांच्या हेतूबद्दल सतत संदेह होता. मराठ्यांच्या राज्यातील आपल्या वखारी बंद करण्याकडेच त्यांचा कल अधिक होता.

१६६५ साली मुंबई बेट पोर्तुगिजांकडून इंग्रजांना मिळाले. ते बेट प्रसंगी अत्यंत अविकसितावस्थेत होते. या बंदराची व्यापाराच्या दृष्टीने वाढ होण्याची शक्यता अधिक दिसत होती. त्यासाठी मराठ्यांशी सलोख्याचे धोरण स्वीकारणे आवश्यक होते. कारण शिवाजी राजांच्या प्रदेशांशी संलग्न असा हा भाग होता, आणि त्यामुळे मुंबईचा विकास हा मराठी मुलखाशी निगडित होता. शिवाय शिवाजी राजांनी १६६४ सालापर्यंत अफझल प्रकरणात आदिलशाही सत्तेला आणि शाइस्तेखान आणि सुरत प्रकरणात मोगली सत्तेला शह दिला होता. सुरत येथील मोगली अधिकारी तेथील व्यापाऱ्यांना संरक्षण देण्यास असमर्थ ठरले होते व त्यांचे धार्मिक धोरण हे परदेशीयांना प्रतिकूल असे होते. त्यामुळे सुरतेहून स्थलांतर करण्याकडेच व्यापाऱ्यांची प्रवृत्ती होती आणि अशा या कालात इंग्रजांना मुंबई गवसली. तेव्हा मुंबई बेटाच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी ते मराठ्यांशी नमते घ्यावयास तयार झाले होते.

शिवाजी महाराजांना इंग्रजांशी दोस्ती प्रामुख्याने दोन कारणांसाठी हवी होती. एक त्यांच्या मदतीने सिद्द्यांकडून दंडा राजापुरी घेणे आणि दुसरे त्यांच्याकडून युद्धसाहित्य मिळविणे. परस्परांना एकमेकांच्या मैत्रीची निकड असल्याने राजापूरचा प्रश्न तडजोडीने सोडवावा असे उभयतांना वाटत होते. त्यासाठी एकूण तीन शिष्टमंडळांची योजना झाली होती. १६७२ साली ले. उस्टिक, १६७३ साली थॉमस निकोल्स आणि १६७४ साली हेन्री ऑक्झिडेन, हे तीन इंग्रजांचे वकील शिवाजी राजांशी बोलणी

करण्यासाठी गेले होते. यांपैकी पहिल्या दोन वकिलांच्या पदरी काही विशेष यश पडले नाही; पण शिवराज्याभिषेकाच्या सुमारास गेलेल्या हेन्री ऑक्झिडेनने राजांशी मैत्रीचा तह करण्यात यश मिळविले; आणि त्यानुसार राजापूरची वखार परत उघडण्यात आली आणि कंपनीचा व्यापार सुरू झाला; परंतु हा तह इंग्रजांना समाधानकारक वाटत नव्हता. शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर १६८२ साली राजापूरची वखार कायमची बंद करण्यात आली.

शिवाजी महाराजांनी इंग्रजांना अंतर्गत व्यापारापासून दूर ठेवले होते. स्थानिक व्यापाऱ्यांना त्यांच्या स्पर्धेची झळ पोहोचू नये हा त्यांचा मुख्य हेतू होता. आपल्यावर इतकी बंधने येतील अशी कंपनीची अपेक्षा नव्हती. कंपनीच्या व्यापारास रास्त ते उत्तेजन देण्यास महाराज तयार होते, पण इंग्रजांचे स्तोम त्यांना माजवावयाचे नव्हते.

दख्खन देशातील कंपनीने व्यापाराचे धोरण ठेवले होते. आदिलशहा अथवा शिवाजी राजा या दोहोंपैकी कोणाचाच पक्ष घ्यावयाचा नाही, दोघांशी समानतेची वागणूक ठेवावयाची, केवळ व्यापाराचा पुरस्कार करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून व्यापाऱ्याला शोभेल अशी वर्तणूक करावयाची, दोघांशी सौजन्यपूर्ण वागावयाचे आणि विशेषत: ज्याच्या ताब्यात आपल्या व्यापाराचा प्रदेश असेल त्याच्याशी अधिक सौजन्याने वागावयाचे, ही कंपनीच्या धोरणाची दिशा होती.

ईस्ट इंडिया कंपनीच्या अहवालाप्रमाणे १६६४-६५ मध्ये दख्खनमधील व्यापाराची स्थिती अत्यंत गोंधळाची होती. स्वसंरक्षणासाठी व्यापारी लोक ठिकठिकाणी आश्रय शोधीत होते. राजकीयदृष्ट्या महाराष्ट्रात हा काळ अत्यंत अस्थिरतेचा होता. कोकण हा व्यापाराचा प्रमुख भाग, पण तेथे सतत युद्धे सुरू होती. महाराष्ट्रात शिवाजी राजांचा स्वराज्यस्थापनेचा जो उद्योग सुरू होता, त्यामुळे येथे सतत युद्धाचा प्रसंग असे व त्याचा व्यापारावर अनिष्ट परिणाम होई.

इंग्रजांना मोगल आणि आदिलशहाकडून व्यापारी सवलती मिळाल्या होत्या, आणि दख्खनमध्ये याच दोघांची सत्ता राहील, असे त्यांना वाटत होते. १६६४-६५ सालापर्यंत शिवाजी राजांनी आदिलशाही आणि मोगली सत्तेला शह दिला होता व कोकणपट्टीत आपला प्रभाव वाढविला होता. त्यामुळे इंग्रजांना चिंता वाटू लागली. 'बंडखोर', 'महान बंडखोर', 'लुटारू' अशी विशेषणे १६५९ पूर्वी इंग्रज लोक शिवाजी राजांना लावीत होते; पण त्यांच्या विचारात आता म्हणजे १६५९ नंतर बदल होऊ लागला होता. 'आमचा मित्र', 'आमचा शेजारी', 'राज दरबारात आणि देशात ज्याचा बोलबाला होत आहे असा राजा,' अशा शब्दांत ते शिवाजी राजांचे वर्णन करू लागले. मराठ्यांची सत्ता खच्ची करावयाची झाली तर त्यांना शस्त्रास्त्रे पुरवावयाची नाहीत आणि त्यांच्या शत्रूंना साहाय्य करावयाचे, ही ब्रिटिशनीती होती; पण शाइस्तेखान, कारतलबखान आणि सुरतेची लूट यामुळे मोगली सत्ता सुद्धा हबकली होती. त्यामुळे मराठ्यांशी सख्य करणे याशिवाय दुसरा पर्याय इंग्रजांसमोर नव्हता. मुंबईची वाढ ही मराठी प्रदेशावर अवलंबून असल्याने त्यांना मराठ्यांचे उघडपणे शत्रुत्व करणे शक्य नव्हते. तेव्हा शिवाजीसारख्या

उगवत्या सूर्याला अर्घ्य वाहणे आपले कर्तव्य आहे, असे त्यांना वाटू लागले. शिवाजी राजांनी स्वतंत्र राज्य स्थापून राज्याभिषेक करून घेतला तेव्हा तर ते त्यांना पूर्वेकडील ज्ञात जगतातील सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी वाटू लागले. (The greatest diplomat in the eastern part of the known world) (इ.रे.शि. १ पृ. १९९)

राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात व्यापाराची वृद्धी होण्यासाठी प्रयत्न केले असावेत. साहुकारांना सवलती देऊन त्यांना आपल्या राज्यात आणावे अशी त्यांची भावना होती. सवलती दिल्या तरी पण त्यांचे फाजील स्तोम माजविणे त्यांना पसंत नव्हते. ईस्ट इंडिया कंपनीला महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात व्यापार करावयाचा परवाना हवा होता तो त्यांनी दिला नाही. (इ.रे.शि. २ : पृ. ७२) असे असले तरी कंपनीशी सलोख्याचे संबंध राखण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. कंपनीच्या व्यापाराला आवश्यक तेवढे उत्तेजन त्यांनी दिले होते.

युरोपीय व्यापारी महाराष्ट्रात फारसे गुंतलेले दिसत नाहीत. महाराष्ट्र हा देश गरीब असल्याने कदाचित युरोपीय वस्तूंना हवा तसा उठाव येथे मिळत नसावा. ईस्ट इंडिया कंपनीला महाराष्ट्राशी आपला व्यापार वाढेल अशी अपेक्षा होती. विशेषत: तांबे, जस्त इत्यादी वस्तू येथे मोठ्या प्रमाणात खपतील असे त्यांना वाटे. शिवाय महाराजांनी अभिवचन दिले होते की मुंबई बंदरात आपल्या व्यापाऱ्यांची एक वखार काढून, आपल्याजवळ मोठ्या प्रमाणात पडून असलेल्या वस्तू तेथे ठेवू. असे झाले तर आपल्या बंदराचा व्यापार वाढेल आणि जकातीपासून होणाऱ्या उत्पन्नातही वाढ होईल अशी इंग्रजांची अपेक्षा होती (इ.रे.शि. १ : पृ. ३१५) पण प्रत्यक्षात या गोष्टी घडल्या नसल्या तरी आपल्या देशाचा व्यापार वाढला पाहिजे इकडे महाराजांचे कसे लक्ष होते याची कल्पना येते.

■■

स्वराज्य : विस्तार आणि लोकसंख्या

शिवाजी राजांच्या मृत्यूनंतर मराठी राज्यावर मुघली परचक्र आले, संभाजीच्या मृत्यूनंतर मराठ्यांची राजधानी रायगड मुघलांनी काबीज केली आणि या धामधुमीच्या काळात अनेक विश्वसनीय साधने नष्ट झाली. त्यामुळे स्वराज्याच्या सीमा, लोकसंख्या, उत्पन्न, खर्च या बाबतीत निश्चितपणे माहिती देणे कठीण झाले आहे. जी काही एतद्देशीय आणि परदेशी साधने तुरळक प्रमाणात उपलब्ध आहेत, त्यांच्या साहाय्याने काही अंदाज बांधणे एवढेच आज शक्य आहे.

स्वराज्याच्या सीमा

सतराव्या शतकात मराठी राज्यापुढे सतत युद्धाचा प्रसंग असल्याने, स्वराज्याच्या प्रदेशात नेहमी बदल होत असत. आज घेतलेला किल्ला अथवा मुलूख उद्या मराठ्यांच्याकडे असेलच असे नाही. त्यामुळे शिवाजीच्या स्वराज्याखाली निश्चित मुलूख किती होता हे सांगणे कठीण आहे. सोबत जोडलेल्या नकाशात, शहाजी राजांनी दिलेला पुणे मोकासा, त्यात शिवाजी राजांनी स्वपराक्रमाने स्वराज्यात आणि कर्नाटकात, घातलेली भर आणि या दोन्ही मुलखांना जोडणारा पट्टा, स्थूलमानाने दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

शिवाजी राजांच्या राज्यारोहणप्रसंगी मराठी राज्याची मर्यादा किती असावी याची माहिती, समकालीन सभासदाचे शिवचरित्र शंकराजी मल्हार याने मुघलांच्या माहितीसाठी अठराव्या शतकाच्या प्रारंभी तयार केलेला एक स्वराज्याचा जाबिता (अहवाल) आणि पेशवे दप्तरातील काही अप्रकाशित साधने यांच्या मदतीने मिळविणे शक्य झाले आहे. या तिन्ही साधनांचा साकल्याने विचार करून स्थूलमानाने असे म्हणता येईल की गोदावरी आणि तुंगभद्रा या दोन नद्यांच्या मधला बराचसा प्रदेश स्वराज्यात; आणि

तुंगभद्रा आणि कावेरी नद्यांमधील कर्नाटकातील काही प्रदेश ज्याला चंदीचे राज्य म्हणत या मराठी राज्याच्या मर्यादा होत्या.

शिवाजी राजांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात वडिलांनी दिलेल्या पुणे, सुपे, इंदापूर आणि चाकण, ज्याचा उल्लेख 'पुणे मोकासा' म्हणून केला जातो, या भीमा आणि नीरा या पुणे जिल्ह्यातील दोन नद्यांमधील प्रदेशात केली. शिवकालीन राजकवी परमानंद याच्या मते, शहाजीने आपल्या जहागिरीचा मुलूख स्वतंत्र कसा ठेवला होता, हे आपण मागे पाहिलेच आहे. हा प्रदेश शिवाजी राजांना मिळाल्याने, असे म्हणता येईल की एका स्वतंत्र प्रदेशाचा स्वामी म्हणूनच त्यांनी आपल्या कारकीर्दीस सुरुवात केली. अर्थात शहाजी हा आदिलशाहीत नोकरीत असल्याने शिवाजी राजांच्या राजकीय हालचालीवर काही बंधनं आली होती; परंतु स्वतंत्र जहागीर मिळाल्याने पाय रोवण्यास जागा मिळाल्याने, स्वराज्याची बांधणी करणे त्यांना सुलभ झाले होते.

उपलब्ध कागदपत्रांवरून असे दिसते की १६३६ साली, शहाजी राजाने 'कर्यात मावळ'चा पोटमोकासा प्रथम बालशिवाजीला दिला; आणि पुढे १६३९ साली त्यात चाकण परगण्याची भर घातली आणि राजा जेव्हा २५ वर्षांचा झाला तेव्हा १६४५ साली इंदापूर परगणा त्याच्याकडे सुपूर्त केला. शिवाजी राजांनी या प्रदेशाचा कारभार बहुधा स्वतंत्रपणे सुरू केला असावा. या विधानास पुष्टी देणाऱ्या दोन घटना म्हणजे त्यांनी निर्माण केलेले एक छोटेसे मंत्रिमंडळ; आणि त्यांनी १६४६ साली (कदाचित त्याच्याही अगोदर) वापरात आणलेली राजमुद्रा या होत. सभासद म्हणतो, ''तुकोजी चोर मराठा म्हणोन लष्करचा सरजोबत केला. शामराव नीळकंठ पेशवे, बाळकृष्णपंत मुजुमदार, नारोपंत, सोनाजीपंत, रघुनाथ बल्लाळ सबनीस असे कारभारी करून बहुत सावधपणे चौकशीने वर्तणूक करीत चालले.'' (सभासद पृ. ४)

२८ जानेवारी १६४६ च्या एका अस्सल पत्रावरील राजमुद्रा–

''प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता।।
शाहसूनो: शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते''

आणि लेखनपूर्तीची ''मर्यादेयं विराजते'' या नंतरच्या अनेक पत्रावर आढळणाऱ्या मुद्रा आपल्याला आज उपलब्ध असलेल्या कागदपत्रात प्रथमच आढळतात. रांजे या खेडेबारे तर्फेतील गावचा पाटील बाबाजी गुजर यास त्याच्या बदअमल अथवा अनैतिक वर्तनाबद्दल जबर शासन शिवाजीने केले आहे. ''याजकरिता बाबाजी मजकूर याची वतनी मोकदमी हुजूर अमानत केली बाबाजीचे हात-पाय तोडून दूर केला'' अशा प्रकारची कडक शिक्षा एका वतनदाराला करणे हे कृत्य राजांशिवाय कोण करणार?

सभासद बखरींत कालानुक्रमे घटना दिल्या नसल्या तरी अफझलखान प्रसंगापूर्वीच्या ज्या हालचालींची नोंद केली आहे; त्यांत जुन्नर, अहमदनगर, कोकणात कल्याण, भिवंडी, जावळी, शृंगारपूर इत्यादी ठिकाणे आणि कोंढाणा, माहुली, पुरंदरगड, प्रतापगड हे किल्ले काबीज केल्याचा उल्लेख आला आहे. मध्ययुगात अशी एक प्रथा

होती की, जहागिरीदाखल काही मुलूख दिला असला, तरी त्या मुलखात जे किल्ले असतील त्यावर मात्र सत्ता पातशहाची असे; पण ही प्रथा धुडकावून आपल्या जहागिरीतील काही प्रमुख किल्ले, सिंहगड (कोंढाणा) पुरंदर १६४६ पर्यंत जिंकून शिवाजीराजांनी आपले सार्वभौमत्व सिद्ध केले होते.

सभासदाच्या माहितीप्रमाणे शिवाजीच्या राज्याचे तीन प्रशासकीय विभाग होते. मंत्रिमंडळातील एक प्रधान सरकारकून म्हणून प्रत्येक विभागावर नेमला होता आणि त्या विभागाची संपूर्ण जबाबदारी त्याच्यावर सोपविली होती असे म्हटले आहे. हे तीन विभाग असे–

१. मोरोपंत पिंगळे, मुख्य प्रधान यांच्याकडे कल्याण, भिवंडीपासून कोळवण सालेरीपर्यंत कोकण व वरघाटचा (घाटावरचा) प्रदेश, लोहगड, जुन्नर आणि बारामावळे आणि हारोळ्याचे घाटापर्यंतचा सर्व प्रदेश स्वाधीन केला होता. स्वराज्याचा मुख्य कणा म्हणजे हा प्रदेश होय. स्वराज्याचा उत्तरविभाग असे याला म्हणता येईल.
२. अण्णाजी दत्तो हे मंत्रिमंडळात सुरनवीस किंवा सचिव म्हणून होते. त्यांच्याकडे कोकणातील चेऊल ते दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदे, फोंडा आणि कोप्पल (कर्नाटकची हद्द) हा सारा प्रदेश दिला होता. हा सारा प्रदेश म्हणजे तळकोकण अथवा तळघाट (घाटाखालचा) प्रदेश होय. याला स्वराज्याचा दक्षिण विभाग म्हणता येईल.
३. दत्ताजीपंत हे मंत्री अथवा वाकनीस म्हणून मंत्रिमंडळात होते, त्यांच्याकडे वरघाटावरील वाई प्रांतापासून कोप्पल, तुंगभद्रा पावेतो कर्नाटकातील प्रदेश होता. पन्हाळा हे त्याचे प्रमुख ठाणे होते. या प्रदेशास 'देश' अथवा नैऋत्य विभाग म्हणता येईल.

या तीन प्रमुख विभागांखेरीज मराठी राज्याच्या आधिपत्याखालचा प्रदेश म्हणजे मोगलाई. त्यावर पाच ते सात ब्राह्मण सुभेदार नेमले. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी काम करावयाचे होते. या ब्राह्मण सुभेदाराकडे बहुधा खंडणी वसूल करण्याचे काम असावे. (सभासद पृ. ७४-७५)

थोडक्यात, तळघाट, वरघाट आणि देश असे स्वराज्याचे तीन प्रमुख विभाग राज्यारोहणाच्या वेळी मराठी राज्याचे होते. आधुनिक महाराष्ट्राच्या कुलाबा (रायगड) रत्नागिरी, नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांचा बहुतांशी सर्व भाग हा स्वराज्यात मोडत होता.

राज्यारोहणानंतर (१६७४) शिवाजीराजांनी कर्नाटक प्रांतात दिग्विजयाची मोहीम काढली आणि कोप्पल, बेलवडी, होसकोटे, शिरे, कोलार, वेलोर, जिंजी हा महाराष्ट्र-कर्नाटकाला जोडणारा भूखंड काबीज केला; आणि त्यास 'चंदीचे राज्य' असे नाव दिले. संभाजी आणि राजाराम या आपल्या दोन मुलांत अनुक्रमे 'चंदीचे राज्य' आणि 'स्वराज्य' अशी विभागणी करण्याचा त्यांचा मानस होता.

'जाबिता स्वराज्य' या ऐतिहासिक साधनात शिवाजीच्या अमलाखाली असलेल्या मुलखांची यादी दिली आहे. सभासद बखर आणि जाबिता स्वराज्य यांचा एकत्रित विचार केल्यास, शिवाजी राजांच्या अंतकाली मराठी राज्याची मर्यादा किती होती हे समजून येईल. संभाजीचा पुत्र शाहू हा मुघलांच्या कैदेत १६८९ पासून औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १७०७ पर्यंत होता. कैदेतून सुटका झाल्यानंतर त्याने बादशहाकडे आपल्या मुलखाची मागणी केली. मराठ्यांचा मुलूख होता तरी किती याची शहानिशा करण्याच्या कामी माहीतगार म्हणून मुघलांनी शंकराजी मल्हारची नियुक्ती केली आणि १७१७ साली त्याने स्वराज्याचा जाबता तयार केला. शंकराजी मल्हार हा पूर्वी राजारामाच्या सेवेत होता, पण स्वामीशी मतभेद झाल्याने त्याने मुघलांची चाकरी पत्करली. मुघल पातशहा फरुक शायरने त्याला सय्यद बंधूंच्या हवाली केले. थोड्याच कालावधीत त्याने हुसैन सय्यदची मर्जी संपादन केली. हुसैनने १६८९ ते १७०७ या काळात मुघलांकडे आलेल्या मराठी मुलखाची मोजदाद करण्याचे व याबाबत मराठ्यांशी बोलणी करण्याचे महत्त्वपूर्ण काम त्याच्याकडे सोपविले. त्याने तयार केलेल्या जाबत्यात कोकण (तळघाट) आणि देश (वरघाट) या दोन विभागांतील स्वराज्यातील मुलखांची नोंद केली आहे. यात कोकणचे १३ सुभे आणि त्यांतील १२७ महाल आणि देशावरील १६ सुभे आणि त्यांतील १०१ महाल यांचा नामनिर्देश केला आहे. याखेरीज शिवाजीकडे असलेल्या १४५ किल्ल्यांची यादीदेखील या जाबत्यात आहे. शंकराजी मल्हार सचिव ह्यासारख्या जाणकार माणसाने हा अहवाल तयार केला असल्याने आणि सभासद बखरींतील माहितीशी तो बऱ्याच अंशी जुळणारा असल्याने, स्वराज्याच्या मुलखाची नोंद करण्यास उपयुक्त आहे. (मराठा राज्यसंबंधी अभिलेख (हिंदी) संपादक डॉ. रघुवीर सिंह, पृ. १४-३०)

पुण्याच्या पेशवे दप्तरात एक अप्रकाशित कागद आहे. शिवाजी राजांच्या स्वराज्याच्या कक्षा ठरविण्यास तो कागद उपयुक्त आहे. हा कागद सही-शिक्क्याचा नाही, बहुधा ती मूळ कागदाची नक्कल असावी, त्यावर तारीखदेखील नाही; परंतु अंतर्गत पुराव्यावरून व इतर समकालीन कागदांशी ताडून पाहता, त्यात आलेला मजकूर विश्वसनीय वाटतो आणि त्यामुळे मराठी राज्याचा विस्तार आणि त्याचे उत्पन्न जाणून घेण्यास तो उपयुक्त आहे. शिवाजीच्या राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेताना शंकराजी मल्हारने स्वराज्याचे तीन विभाग, तळकोकण (१३ सुभे), वरघाट (८ सुभे) आणि देश (१५ सुभे) असे एकूण ३६ सुभे सांगितले असून, त्यापासून मराठी राज्यास किती महसूल येत असे हे मांडले आहे. या जाबित्यास देशावरील बारामती, इंदापूर आणि जुन्नर या सुभ्यांचे उत्पन्न दिले नाही. शंकराजीला ते उपलब्ध झाले नाहीत की नकलकाराने ते गाळले हे समजण्यास मार्ग नाही. (परिशिष्ट २ प्रकरण ६ पहा) शंकराजी मल्हार याच्या 'जाबिता स्वराज्य' या अहवालाशी या दस्तऐवजातील माहिती जुळण्यासारखी आहे. थोडक्यात, सभासद बखर, शंकराजी मल्हारचे निवेदन आणि पेशवे दप्तरातील अप्रकाशित माहिती ही तिन्ही साधने स्वराज्याची मर्यादा ठरविण्याच्या दृष्टीने एकत्रितपणे वापरली पाहिजेत.

लोकसंख्या

सतराव्या शतकात महाराष्ट्राच्या अथवा स्वराज्याच्या लोकसंख्येचा अंदाज करण्यासाठी साधनांच्या अभावी तर्काचाच अधिक उपयोग करावा लागेल. सातव्या शतकात भारतात आलेला चिनी प्रवासी ह्युएनत्संग महाराष्ट्राचा उल्लेख "मोहोलाच्छा" अथवा "माहोलेश" असा करतो आणि त्याचा परिघ सुमारे ८०० मैलांचा असावा असे म्हणतो. तेराव्या शतकातील महानुभावी वाङ्मयात "साठी लक्ष देश महाराष्ट्र" असा या देशाचा लोकसंख्यानिर्देशक उल्लेख आढळतो. 'ऋद्धिपूर माहात्म्य' या महानुभावी ग्रंथाचा लेखक चक्रधर म्हणतो,

> *"विंध्याद्रिपासोनि दक्षिण दिशेसी:*
> *कृष्णा नदीपासुनि उत्तरेशी:*
> *झाडी मंडळापासोनि पश्चिमेसी:*
> *कोकणपर्यंत।।*
> *महाराष्ट्र बोलिजे चक्रधर।।"*

मूळ गुजरात प्रांतातील भडोचचा रहिवासी आणि महानुभावाचा एक थोर पुरस्कर्ता चक्रधर यांनी महाराष्ट्र हा आपला देश केला होता आणि 'महाराष्ट्रीं असावें' असा आपल्या शिष्यांना त्याने उपदेश केला होता.

> *'महंत म्हणजे महंत राष्ट्र।*
> *म्हणौन महाराष्ट्र।*
> *महंत म्हणजे थोर'*

असे महानुभावी 'आचार माहात्म्यात' महाराष्ट्राविषयी म्हटले आहे.

सातव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत महाराष्ट्राचे वर्णन वाङ्मयात आले असले तरी 'साठी लक्ष देश महाराष्ट्र' या एकमेव उल्लेखाखेरीज या देशाच्या लोकसंख्येबद्दल अन्यत्र कोठे उल्लेख आढळत नाही. महाराष्ट्रच काय, पण हिंदुस्थानातील इतर भागांची देखील सतराव्या शतकातील लोकसंख्या आपणास अद्याप उपलब्ध नाही. युरोपातील काही देशांची स्थिती याहून भिन्न नाही. पाश्चिमात्य देशांतील लोकसंख्या सतराव्या आणि अठराव्या शतकात किती प्रमाणात आणि का वाढली याविषयीची माहिती आज तरी अत्यंत अपुरी आहे, असे जागतिक लोकसंख्येच्या इतिहासाचा अभ्यासक डी.व्ही. ग्लास म्हणतो (पॉप्युलेशन इन हिस्ट्री, पृ. १३-१४). सतराव्या शतकाच्या प्रारंभी मुघल साम्राज्याची लोकसंख्या किती असावी याचा अंदाज डॉ. शिरीन मोसवी यांनी हिंदुस्थानची लोकसंख्या १६०१ च्या सुमारास साडेचौदा कोटींच्या आसपास असावी असा व्यक्त केला आहे. १८७२ साली पहिली शिरगणती झाली तेव्हा हिंदुस्थानची लोकसंख्या साडेपंचवीस कोटी होती. (द इकॉनॉमी ऑफ द मुघल एम्पायर, पृ. ४०५)

मुघल साम्राज्याच्या लोकसंख्येचा अंदाज व्यक्त करण्यासाठी 'ऐने अकबरी' सारखा

ग्रंथ उपलब्ध आहे. महाराष्ट्राबाबत तसा माहितीपूर्ण ग्रंथ नाही. तेव्हा शिवकालीन महाराष्ट्राच्या लोकसंख्येचा प्रश्न हाताळण्यासाठी काही नवीन संशोधन पद्धतीचा अवलंब करावा लागेल. सतराव्या शतकात सर्वसामान्य गावाची, कसब्याची, तीर्थक्षेत्रांची वस्ती किती असावी आणि त्यावर आधारित शिवकालीन महाराष्ट्राची किती असावी, यासंबंधीची काही अनुमाने समकालीन साधनांच्या साहाय्याने काढण्याचा एक प्राथमिक स्वरूपाचा प्रयत्न येथे केलेला आहे. यासंबंधी लेखकाचा कसलाही दावा नाही.

मुंबई इलाख्याची १८७२ साली पहिली शिरगणती झाली. शिवाजीच्या स्वराज्यातील, नाशिक, पुणे, सातारा, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील आकड्यांचा विचार केला तर ५९, १७,१७७ म्हणजे सुमारे साठ लाख असा लोकसंख्येचा आकडा मिळतो. या जिल्ह्यांची १९०१ च्या शिरगणतीनुसार लोकसंख्या ६४,५३,३३० म्हणजे पासष्ट लाखाच्या जवळपास होती.

मुघल इतिहासकार डब्ल्यू. एच. मोरलड याने दक्षिणेतील लोकसंख्या आणि सैन्य यांचे प्रमाण १/३० असावे असा अंदाज व्यक्त केला आहे. (इंडिया ॲट द डेथ ऑफ अकबर, पृ. १९-२०), सभासदाने पुरविलेल्या माहितीनुसार शिवाजीच्या सैन्यात २,०८,२६० लोक होते असे दिसते. हा आकडा १६७४ साली राज्याभिषेक झाला त्या वेळचा असावा. शेतीव्यवसाय बेताचा आणि उद्योगव्यापार कनिष्ठ प्रतीचा असल्याने मराठी माणसाला सैन्यात भरती होणे किफायतशीर होते. शिवाय तत्कालीन मुसलमानी राजवटीत सैन्य हे प्रामुख्याने मराठीच असे. शिवाजीने जेव्हा मावळ्यांना 'आपल्या पायाशी' येण्याचे आवाहन केले तेव्हा या स्वराज्याच्या उद्योगात अनेक लोक सामील झाले असणार. तेव्हा मोरलडने जे १/३० चे प्रमाण दिले आहे त्यापेक्षा ते अधिक असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. १/३० हे प्रमाण जरी मान्य केले तर १६७४ च्या सुमारास स्वराज्याची लोकसंख्या ६२,४७,८०० इतकी येते.

येथे अशी एक शंका उपस्थित करता येईल की १८७२ च्या शिरगणतीनुसार स्वराज्यातील मुलखाच्या लोकसंख्येचा जो आकडा येतो तो सतराव्या शतकातील शिवाजी राजांच्या स्वराज्याच्या लोकसंख्येशी मिळताजुळता येतो हे कसे शक्य आहे? १६७४ ते १८७२ या दोनशे वर्षांत स्वराज्याच्या मुलखातील लोकसंख्या सुमारे तीन लक्षाहून थोड्याशा अधिक संख्येने (३३०६२३) घटली आणि १९०१ च्या शिरगणतीनुसार ती फक्त २ दोन लक्षांनी (२०५५३०) अथवा १८७२ ते १९०१ या कालखंडात पाच लाखांहून थोडी अधिक (५,३६,१५३) संख्येने वाढली असे अनुमान काढावे लागेल.

दुष्काळ, सततचा युद्धाचा प्रसंग, साथी, रोगराई या सर्व कारणांमुळे लोकसंख्येत होणारी संभाव्य घट लक्षात घेऊनही १६७४ च्या वरील अंदाजाप्रमाणे आलेला सुमारे साठ लाख हा लोकसंख्येचा अंदाज संभवनीय वाटत नाही. याच्या स्पष्टीकरणासाठी आणखी एक मुद्दा लक्षात घेतला पाहिजे. १७०७ ते १८७१ या कालखंडात हिंदुस्थानची एकूण लोकसंख्या वाढली असली, तरी ही वाढ देशाच्या सर्व भागात समप्रमाणात झाली असावी असे म्हणता येणार नाही. नंतरच्या काळात महाराष्ट्रातील

लोकसंख्या अनेक कारणांमुळे वाढली असेल. मराठ्यांचा अंमल १८१८ पर्यंत टिकून राहिला होता. या कालखंडात लहान-मोठ्या अशा नवीन सरदार घराण्यांचा महाराष्ट्रात उदय झाला होता, महाराष्ट्रात बाहेरचा पैसाही येत होता. त्यामुळे १७०७ ते १८७१ च्या काळात महाराष्ट्राची लोकसंख्या वाढली असल्याने नाकारता येणार नाही; पण त्याचबरोबर मराठ्यांची सत्ता केंद्रे अठराव्या शतकात, मध्यप्रदेश, गुजरात, ग्वाल्हेर या ठिकाणी प्रस्थापित झाल्याने अनेक मराठी घराणी या नव्या प्रदेशात स्थायिक झाली असणार आणि त्यामुळे महाराष्ट्राच्या लोकसंख्येत थोडीशी घटही झाली असणार.

असे जरी असले तरी शिवकालीन महाराष्ट्राची लोकसंख्या ६२ लाखांहून अधिक होती हे पटण्यासारखे नाही. शिवाजीच्या लष्करात मोठ्या प्रमाणावर सैन्यभरती झाली असावी हे मान्य केले आणि निवाडपत्रात आपल्या नावासमोर दिलेल्या वयाच्या आकड्यांवरून महाराष्ट्रातील लोकांचे सरासरी आयुर्मान अधिक होते, असे मानले तरीसुद्धा हा आकडा तर्कशुद्ध वाटत नाही. सतराव्या शतकात १६२९-३० च्या सुमारास 'थोरला दुष्काळ' पडला होता, हे आपण मागे पाहिलेच आहे. या दुष्काळामुळे महाराष्ट्रात फक्त ५ टक्के लोक जिवंत राहिले, या रामदासांच्या विधानातील अतिशयोक्तीचा भाग सोडला तरी मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर झाली असणार हे उघड आहे. शिवाय या थोरल्या दुष्काळापूर्वी तसाच एक दुष्काळ ज्याला लोक दुर्गादेवीचा दुष्काळ म्हणत. त्याचे भयानक परिणाम महाराष्ट्राने भोगले होते. अस्मानी-सुलतानी संकटामुळे शिवकालात महाराष्ट्राची लोकसंख्या घटतच गेली असणार.

लोकसंख्येच्या वाढीस आळा घालणाऱ्या या सर्व संभाव्य संकटांचा विचार केल्यानंतर स्थूलमानाने असे म्हणता येईल की, राज्याभिषेकाच्या समयी (१६७४) शिवकालीन महाराष्ट्राची सैन्याच्या प्रमाणावर आधारित लोकसंख्या, किमान निम्म्याने तरी कमी म्हणजे ३१ लाखांच्या जवळपास असावी.

मध्ययुगात शेती हा उपजीविकेचा प्रमुख अथवा एकमेव मार्ग असल्याने खेड्यांची संख्या आणि तेथील लोकवस्ती ही कसबा (नगर) अथवा ठाणे (सरकारी ठिकाण) यांपेक्षा अधिक असे. अर्थात यासंबंधीची आकडेवारी उपलब्ध नसल्याने शिवकालीन महाराष्ट्रातील या ठिकाणांच्या लोकसंख्येविषयी ठोस विधान करता येत नाही. प्रत्यक्ष साधनांच्या अभावी अप्रत्यक्ष साधनांच्या मदतीने काही अंदाज व्यक्त करता येतात का ते पाहावयाचे आहे. त्यासाठी 'घरटका' (घरपट्टी), 'थळझाडा' (गावच्या जमिनीची अथवा कुळांची यादी), 'जिझिया' (मुसलमानी प्रदेशावरील हिंदूंवर आकारलेली दरडोई पट्टी), दक्षणा (क्षेत्राच्या ठिकाणी ब्राह्मणांना वाटलेली) इत्यादी साधने ज्यांत व्यक्ती अथवा कुटुंब यांचा संबंध आला आहे त्यांची छाननी करून काही तर्क करता येतील का हे पाहावयाचे आहे.

सतराव्या शतकात घरपट्टी प्रचलित होती आणि गावच्या हिशोबाच्या कागदात याचा उल्लेख आढळतो. मात्र प्रत्येक घरट्यावर किती पट्टी आकारली जात होती याची माहिती मिळत नाही. काही वसुलीच्या कागदातून एका तरफेमधून (तरफ- एक गावाचा

समूह) घरटका किती वसूल झाला याची नोंद मिळते, पण त्या तरफेतील एका गावाचा घरटका स्वतंत्रपणे दाखविलेला मिळत नाही. 'थळझाडा' हे त्यामानाने ग्रामीण लोकसंख्या मोजण्याचे एक अधिक उपयुक्त साधन आहे. गावची एकूण जमीन किती थळांत (स्थळ = जमिनीचा तुकडा) विभागली गेली आहे आणि प्रत्येक थळाचा, थळकरी (मालक) कोण याची माहिती काही थळझाड्यात आढळते; पण या थळझाड्यात गावच्या शेतमजुरांची, ज्यांची स्वत:ची कसण्याची जमीन नाही त्यांची नोंद नसते. काही शेतमजूर कायमचे एका गावी राहतात तर काही 'उपरे' असतात. गावची वाजट (नापीक अथवा पड) जमीन लागवडीखाली आणण्यासाठी यांचा उपयोग केला जात असे. 'जिझिया पट्टी' ही सर्व हिंदूंवर त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात आकारली जात असे. इंदापूरच्या कागदपत्रांत परगण्यातील प्रत्येक गावातून किती 'जिझिया' वसूल झाला, याची माहिती आली आहे; परंतु अशा कागदपत्रात फक्त ज्यांच्याकडून ही पट्टी वसूल केला जात असे त्यांचा उल्लेख असे. काही हिंदूंना या करातून मुक्त केलेले असे; तर काही विशेषत: अपंग व्यक्ती या कराच्या कक्षेत बसत नसत. गावात मुसलमानांची वस्ती असेल तर त्याची नोंद यात आढळणार नाही. क्षेत्राच्या ठिकाणी ब्राह्मणांना दक्षणा मिळत असे आणि त्यासंबंधीची माहिती देवस्थानाच्या कागदातून मिळते. यावरून त्या गावात ब्राह्मणांची संख्या किती असावी याची कल्पना येईल; पण दक्षिणापात्र ब्राह्मणांच्या यादीत परगावचे ब्राह्मणही काही प्रसंगांच्या अथवा उत्सवाच्या निमित्ताने आले असण्याचाही संभव आहे.

थोडक्यात घरटका, थळझाडा, जिझिया, दक्षणा या साधनांपासून संपूर्ण गावची लोकसंख्या मिळणे शक्य कोटीतले दिसत नाही, तरी प्रयत्न करून पाहण्यास हरकत नाही.

प्रत्यक्ष उदाहरणांवरून यासंबंधी काही बोध होतो का हे पाहणेही उपयुक्त ठरावे. चौल या कोकणच्या प्रांतातील, अमिनाबाद मामल्यातील अष्टमी या तरफेत एकूण ४८ गावे व एक कसबा होता असे १६६७ च्या एका कागदावरून दिसते. या तरफेतून १०३८ लारी (एक चांदीचे नाणे) इतका घरटका वसूल जमा झाल्याचे या कागदात दाखविले आहे. कसबा एकच आहे, त्याचा आकार दोन छोट्या गावांच्या वसतीइतका भरेल अशी कल्पना करून त्या तरफेत एकूण गावे ४५ होती असे आपण मानू. त्यानंतर घरटका हा प्रत्येक घरट्यावर समान असेल आणि ती सर्वसाधारणपणे १/४ लारी असेल असे गृहीत धरू. सरकारी उत्पन्न हे प्रामुख्याने रयतेकडूनच वसूल केले जात असल्याने घरटका १/४ लारी असेल असे मानणे अप्रस्तुत ठरणार नाही. या सर्व गृहितांवरून प्रत्येक गावात घरटका देणारी सरासरी घरे ९२ होती असे अनुमान निघते, आणि शेतीव्यवसायाचे महत्त्व लक्षात घेतल्यास हे अशक्य वाटण्याचे कारण नाही.

'घरटका' हा आधार मानून लोकसंख्येचा अंदाज बांधताना आणखी एक बाब लक्षात ठेवली पाहिजे. गावचे हकदार म्हणजे पाटील, कुलकर्णी, चौगुला, जोशी आणि इतर काही मंडळी या करापासून मुक्त असणार. प्रत्येक गावात पाटलाचे आणि त्याचा

सहकारी चौगुला यांची घरे बहुधा असतच. कुलकर्णी हा कदाचित दोन-तीन गावांचे कुलकर्णकाम सांभाळीत असेल, पण त्याचे घर एकाच गावी असेल. तीच गोष्ट ज्योतिषी अथवा जोशीची. याखेरीज इतर काही हकदारांची घरेही या तरफेत असणार. म्हणजे सरासरीने घरटका माफ असलेली किमान तीन तरी घरे तरफेच्या प्रत्येक गावात असतील असे गृहीत धरावयास हरकत नाही. गावात काही 'उपरे' लोकही वास्तव्य करून राहिले असणार. त्यांना स्वत:चे असे घर नसल्याने 'घरटका' या कक्षेत ते बसत नसले, तरी गावचे रहिवासी म्हणून शिरगणतीत त्यांचा विचार करावा लागेल.

मध्ययुगात एकत्र कुटुंबपद्धती सर्वत्र प्रचलित होती. शेतीचा व्यवसाय मनुष्यबळावर अवलंबून असल्याने कुटुंबेही आकाराने मोठी असत. प्रत्येक अविभक्त कुटुंबात १५ ते २० माणसे असण्याची शक्यता गृहीत धरली तर सरासरीने दर घरटी लहान-मोठी १५ माणसे असावीत असे मानण्यास हरकत नाही.

लोकसंख्येचा विचार करताना, लोकांचे आयुर्मान (longivity) लक्षात घेतले जाते. गावच्या अथवा परगण्याच्या गोतसभेत जे निर्णय घेतले जात त्या निकालपत्रास महजर अथवा निवाडपत्र म्हणत. या निवाडपत्रांचा मर्यादित अर्थाने आयुर्मानाचा अंदाज करण्यास उपयोग होण्याची शक्यता आहे. काही निवाडपत्रात गोतसभेस हजर असलेल्या व्यक्तींच्या नावापुढे त्यांचे वय नोंदविले जात असे. उदाहरणार्थ, जुन्नर परगण्यातील तांदळी या गावच्या मिरासीसंबंधीच्या निर्णयात एकूण ६४ लोकांची नावे आली आहेत, त्यांपैकी ३२ लोकांच्या नावापुढे त्यांच्या वयाची नोंद आहे. उदाहरणार्थ 'मोर सुतार उमर वरसे, २५; मुलाणा सेख नुरदी वलद सेख सेखु उमर वरसे, ६०; माहार विर्तीकार चादनाक बिल मालनाक उमर वरसे, ७५; धारोजी बिन बहिरजी नलगे उमर वरसे, ११५; सलाबत खानाचे वेलेस उपजला'' इत्यादी. या ३२ लोकांचे वयोगट पुढीलप्रमाणे होतील–

२० ते ५९ वर्षे - १७; ६० ते ७० वर्षे - ८
७१ ते ८० वर्षे - ६ आणि ८१ चे वर - १. एकूण : ३२

(शि.च.सा. : ३ : ४२७ सन १६७०)

चिंचवडचे चौगुले, थळकरी आणि बारा बलुतेदार यांनी गावच्या पाटीलकी वतनाच्या तंट्याबाबत तक्रार नोंदविताना आपली वय वर्षे घातली आहेत ती अशी–

"चौगुले - ४०; थळकरी - ९०; चांगोजी - ९०; गावडा - ४४;
जोशी-कुलकर्णी - ८०; कुंभार - २५; माहाला - ६०; सुतार - ५०;
गुरव - ३५; परीट - ६०; कोळी - ६०; महार -५०.

(गुणे, वि. त्र्यं., पृ. २७३ सन १६८१)

वयाचे हे आकडे गावकऱ्यांनी अंदाजे घातले असणार हे उघड आहे. अशाच प्रकारची आणखी काही सलग कागदपत्रे उपलब्ध झाली असती तर सरासरी आयुर्मानासंबंधी काही स्थूलमानाने अंदाज करता आला असता; पण जी काही तुरळक उदाहरणे

मिळतात त्यावरून लोकांचे आयुर्मान बऱ्यापैकी असावे आणि त्यामुळे अविभक्त कुटुंबाचा आकार आपण जो १५ गृहीत धरला आहे तो तितका असणे शक्य आहे.

थोडक्यात अष्टमी तरफेतील सरासरीने आलेली आणि घरटका भरणारी ९२ गावे अधिक घरटका माफ असलेली सरासरी ३ गावे म्हणजे एकूण गावे ९५; आणि प्रत्येक घरट्यातील अविभक्त कुटुंबातील लहान-मोठ्या माणसांची संख्या सरासरीने १५ या गृहीतांवरून, १६६७ च्या मागे-पुढे प्रत्येक गावची लोकसंख्या सरासरीने १४२५ इतकी भरते. या संख्येत काही उपरींची भर घातली तर ती संख्या १५०० ते १६०० च्या दरम्यान असू शकेल आणि साऱ्या अष्टमी तरफेची वसती अंदाजे ६७५०० ते ७२००० इतकी भरते.

काही ठिकाणी ही लोकवस्ती कमी असू शकेल. अमिनाबाद, मामला, चौलपरगणा या भागांतील अधार्णे तरफेमध्ये ४३ नावे असून तेथून फक्त ७० लारी घरटका वसूल झाला आहे. त्याच मामल्यातील अतोणे तरफेतदेखील ४३ च गावे आहेत, पण तेथून मात्र ११५ लारी घरटका वसूल केला आहे. याचा अर्थ असा की अतोणे या तरफेतील लोकसंख्येची घनता (density) ही अधार्णे तरफेपेक्षा अधिक होती, म्हणजेच तेथे दाट लोकवस्ती होती. असा फरक कदाचित तेथील आर्थिक व्यवहाराच्या कमी-अधिक प्रमाणामुळे पडत असावा.

अष्टमी तरफेची लोकसंख्या जाणून घेण्यासाठी ज्या कसोट्या आपण वापरल्या आहेत, त्या या दोन तरफास लागू केल्यास अधार्णे तरफेतील प्रत्येक गावात ८ घरे आणि अतोणे तरफेतील प्रत्येक गावात १४ घरे सरासरीने निघतात. या गावातील करमुक्त घरे आणि उपरी लोक यांची संख्या यात मिळविली म्हणजे अधार्णे तरफेतील एका गावची लोकवस्ती सरासरीने २०० आणि अतोणे तरफेतील एका गावची वस्ती सरासरीने ३०० भरते. अष्टमी तरफेशी या दोन तरफांची तुलना केल्यास असे अनुमान काढता येईल की, अधार्णे आणि अतोणे या दोन तरफेतील शेतीव्यवसाय आणि इतर आर्थिक व्यवहार मर्यादित स्वरूपाचे होते, आणि ही कोकणातील गावे म्हणजे एक प्रकारच्या वाड्याच होत्या. यावरून दुसरा एक तर्क असा करता येईल की, एकाच विभागातील काही गावांची लोकसंख्या अधिक तर काहींची कमी होती. अशी ही तफावत असण्याचे मुख्य कारण त्या गावांची आर्थिक परिस्थिती हे असावे. (शि. च. सा. ५ : ८७६, राजवाडे १५ : ३२४)

कोकणातील गावांचा विचार केल्यानंतर देशावरील गावांची लोकसंख्या किती असावी याचाही विचार केला पाहिजे. अहमदनगर 'सरकारां'तील (एक प्रशासकीय भाग) नेवासे परगण्याच्या देशपांडे घराण्याचे कागद या संदर्भात काही प्रमाणात उपयोगी पडतात. शिवकालात हा परगणा मुघलांच्या ताब्यात होता. १६८५ सालचा जिझिया कर आकारणीचा एक कागद अशी माहिती पुरवितो की, या परगण्यातील एकूण १४४ गावांपैकी, ७० गावे जिझिया कराच्या कक्षेत येत नाहीत आणि उरलेली ७४ गावे ही निव्वळ रयतेची असल्याने त्याची करपात्रता निकृष्ट दर्जाची होती, म्हणून

त्यांच्यावर हा कर लादला गेला नाही. म्हणजे ही सारी १४४ गावे या जिझिया करापासून मुक्त होती.

१६८५ साली या परगण्यांतील ७० गावांत एकूण तिसऱ्या दर्जाची ५६४ घरे होती, म्हणजे सरासरीने प्रत्येक गावात ८ घरे होती. याखेरीज पहिल्या दोन दर्जांची, काही घरे करमुक्त आणि काही घरे कराच्या कक्षेत न येणारी अशी असणार. तिसऱ्या वर्गातील घरे ही दुसऱ्या वर्गातील घरांच्या दुप्पट आणि दुसऱ्या वर्गातील घरे ही पहिल्या वर्गातील घरांच्या दुप्पट आहेत असे गृहीत धरून लोकसंख्येसंबंधी काही विधान करता येते का ते पाहू. या गृहीत तत्त्वाप्रमाणे पहिल्या वर्गात २, दुसऱ्या वर्गात ४ आणि तिसऱ्या वर्गात ८ अशी एकूण १४ घरे प्रत्येक गावात असावीत असा तर्क करता येईल. यात आपल्याला आणखी किती घरे मिळविता येतील हे पहावयाचे आहे. आपण असे गृहीत धरू की तिसऱ्या दर्जाच्या ८ गावांच्या दुप्पट घरांचा जिझिया करासाठी विचार करता येत नाही आणि प्रत्येक गावातील, हकदार मुसलमान यांची सुमारे ५ घरे ही संपूर्णपणे करमुक्त आहेत. या सर्वांची बेरीज केल्यास नेवासे परगण्यातील एका गावात सरासरीने ३५ घरे बसतात; आणि इतरत्र लागू केलेल्या कसोटीप्रमाणे सरासरीने गावची लोकसंख्या ५०० ते ५२५ पर्यंत भरते. अहमदनगर हा प्रदेश कमी पावसाचा आणि त्यामुळे सतत दुष्काळाच्या छायेत असणारा प्रदेश असल्याने, तेथील गावातून लोकवस्तीचे प्रमाण तुरळक असल्यास नवल नाही. (शि.च.सा. ४ : ६९४)

कसबा

कोकणातील अमिनाबाद मामल्यातील पाली महालात १ कसबा आणि १ मिरे (बंदर शहर) अशी दोन शहरे होती असा उल्लेख मागे आला आहे. या दोन शहरांतून ४११.१/४ लारी इतका घरटका वसूल केला आहे. आपण असे गृहीत धरू की नागरी विभागातील घरे ही ग्रामीण विभागातील घरांपेक्षा अधिक सुस्थितीत आणि बळकट बांधणीची असल्याने त्यावरील घरटका हा ग्रामीण विभागाच्या दुप्पट होता. या कसोटीनुसार पाली महालातील (एक प्रशासकीय भाग) दोन नागरी विभागात एकूण ८२३ घरे ही घरपट्टी देणारी होती. कोकणातील ही बंदरगावे तेथील आर्थिक आणि राजकीय व्यवहारामुळे गजबजलेली होती. त्यामुळे या दोन्ही गावांत मिळून सुमारे ९०० कुटुंबे निरनिराळ्या आर्थिक, राजकीय व्यवहारात गुंतलेली अशी होती असे गृहीत धरण्यास काही हरकत नसावी. कुटुंबसंस्थेत, हकदार, सरकारी अधिकारी, कारागीर, व्यापारी आणि उपरी यांची निवासस्थाने यांचा समावेश केलेला आहे. घरांची संख्या आणि अविभक्त कुटुंबपद्धती यांचा एकत्रित विचार केल्यास पाली महालातील या दोन शहरांची एकूण लोकसंख्या १६८५ च्या सुमारास १३,५०० आणि प्रत्येक शहराची सरासरीने ६,७५० इतकी भरते. या दोन्ही शहरात मिरे हे बंदर आकाराने लहान असल्याने त्याची लोकसंख्या कमी असण्याची शक्यता आहे.

देशावरील एखादा कसबा आकाराने किती मोठा होता याचाही विचार येथे क्रमप्राप्त

आहे. येथील लोकसंख्येच्या मोजमापासाठी 'घरटका' या कसोटीऐवजी 'थळझाडा' या कसोटीचा वापर करता येईल. वाई परगण्यात रहिमतपूर गावच्या एका थळझाड्यानुसार (१६७५ सन) तेथे एकूण ९१ च्या वर (१२० बिघे) जमीन लागवडीखाली होती आणि त्याची विभागणी ६५ थळांत केली होती. म्हणजे रहिमतपुरात १६७५ साली वतनदार, मिरासदार इत्यादींची किमान ६५ कुटुंबे राहत असणार. या मोजणीपत्रकात, देशमुख, देशकुलकर्णी, मोकदम (पाटील) कुलकर्णी, चौगुला ही वतनदार मंडळी, काझी, ज्योतिषी, महाजन, भट ही हकदार मंडळी; आणि इतर मिरासदारांची नावे आली आहेत. रहिमतपूर हे वाई परगण्याचे प्रमुख ठाणे असल्याने तेथे काही सरकारी अधिकारी, व्यापारी, कारागीर, उपरी यांचीदेखील निवासस्थाने असणार. ही संख्या मूळ थळकऱ्यांच्या कुटुंबाइतकी असणे सहज शक्य आहे. याचा अर्थ असा की १६७५ साली रहिमतपुरात एकूण १३० कुटुंबे राहत असावीत आणि त्या कसब्याची लोकसंख्या १९५० ते २१०० च्या दरम्यान असावी असा तर्क करता येईल.

कोकण आणि देश या स्वराज्याच्या विभागातील शहरांच्या लोकसंख्येत कसे फरक असत किंबहुना एकाच विभागातील शहरे कशी लहान-मोठी असत हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. कोकणच्या पाली महालातील कसब्याची लोकसंख्या येथे उपयोगात आणलेल्या कसोट्यांनुसार सुमारे सहा हजार, तर वाईच्या रहिमतपूर कसब्याची फक्त दोन हजारापर्यंत असावी असे अनुमान निघते. मध्ययुगात पश्चिम किनारपट्टी ही व्यापारात अग्रेसर होती. तेव्हा या किनारपट्टीवरील कोकणातील बंदरगावे अधिक दाट वसतीची असणे स्वाभाविक आहे.

काही शहरे येथे व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा मोठी असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. इंग्रजांच्या फॅक्टरी रेकॉर्डस्‌मधील नोंदीप्रमाणे (१६७४ साल) चौल या रेशीम धंद्याच्या केंद्राचे, एका दुर्दैवी आगीच्या घटनेमुळे अतोनात नुकसान झाले आणि त्यात सुमारे ३००० घरे भस्मसात झाली असे म्हटले आहे. हा घरांचा आकडा मान्य केल्यास आणि वर योजिलेल्या कसोटीनुसार संपूर्ण शहर भस्मसात झाले असे गृहीत धरल्यास, चौलची लोकसंख्या किमान ४५,००० तरी असावी असा अंदाज करता येईल. या भीषण संकटामुळे किमान ६००० माणसांनी स्थलांतर केले असावे असे इंग्रजांनी नोंदविले आहे. (इं.रे.शि. २ : १३) चौल बंदराचे राजकीय आणि आर्थिक व्यवहारातील स्थान लक्षात घेता, उत्तर आणि दक्षिण चौल या दोन विभागांची संख्या ४५०० इतकी भरते. अर्थात चौलच्या लोकसंख्येसंबंधीचा हा अंदाज प्रामुख्याने इंग्रजांच्या एका नोंदीवरून असल्याने, त्या नोंदीच्या सत्यतेवर हा अंदाज अवलंबून आहे. तेव्हा ४५,००० ही चौलची संख्या सकृतदर्शनी थोडीशी असंभवनीय वाटते; पण हे प्रमाण निम्म्याने जरी कमी केले, तरीसुद्धा चौल हे एक मोठेच शहर होते असे म्हणावे लागेल.

तीर्थक्षेत्र देखील दाट वसतीची ठिकाणे होती. अनेक गरीब ब्राह्मण कुटुंबे अर्थार्जनाकरिता क्षेत्राच्या ठिकाणी गर्दीने, दाटीवाटी करून राहत. शिवाजीच्या अष्ट प्रधानांपैकी पंडितराव

या प्रधानाकडे धर्मविषयक कामे असत. त्यांत ब्राह्मणांना दक्षणा देण्याचेही एक काम होते. पंडितरावाच्या एका नोंदीप्रमाणे वाई या क्षेत्राच्या ठिकाणी शिवकालांत साठ ब्राह्मणांची कुटुंबे होती. यावरून वाईच्या ब्राह्मणांची लोकसंख्या ९०० च्या दरम्यान असावी आणि संपूर्ण वाईची लोकसंख्या सुमारे ५०००पर्यंत असण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या एका साधनाप्रमाणे १८५ ब्राह्मणांना प्रत्येकी एक प्रताप म्हणजे अर्धाहोन प्रमाणे दक्षणा दिल्याची नोंद आहे. अर्थात ब्राह्मणांचा हा आकडा कुटुंबाचा दर्शक आहे की व्यक्तींचा आहे हे सांगणे कठीण आहे. पंढरपुरातील पंड्यांच्या प्रचलित प्रथेप्रमाणे हे १८५ ब्राह्मण म्हणजे तीर्थक्षेत्रात मिळणाऱ्या दक्षणाचे वाटेकरी असे मानले तर हे ब्राह्मण म्हणजे निरनिराळ्या कुटुंबाचे प्रतिनिधी असे मानावे लागेल. क्षेत्रांतील सगळेच ब्राह्मण हे पंडे अथवा दक्षणाचे वाटेकरी असतील असे नाही. तेव्हा दक्षणेचे अधिकारी आणि इतर ब्राह्मण यांची संख्या सुमारे २००० होती असे म्हणता येईल. ब्राह्मणांचीच संख्या एवढी असेल तर संपूर्ण तीर्थक्षेत्राची लोकसंख्या सहा-सात हजाराच्या दरम्यान असावी. कदाचित हे गाव अग्रहार असून तेथे केवळ ब्राह्मणांचीच प्रामुख्याने वसती होती असे मानले तर ही संख्या १५०० ते २००० ने कमी भरेल.

दुसऱ्या एका नोंदीप्रमाणे शिवापूर येथील निरनिराळ्या शाखेच्या १६७ ब्राह्मणांच्या योगक्षेमाचा खर्च देवळाच्या उत्पन्नातून केला जात होता. १६७ हा ब्राह्मण कुटुंबांचा आकडा असे मानल्यास शिवापुरात साधारणपणे २५०० पर्यंत ब्राह्मणांची लोकसंख्या असावी. १६९७ साली कऱ्हाड क्षेत्री २२८ ब्राह्मण कुटुंबे होती, म्हणजे कऱ्हाडात सुमारे ३००० ब्राह्मण वसती होती असे म्हणता येईल. संपूर्ण कऱ्हाडची लोकसंख्या सात ते आठ हजारपर्यंत असणे शक्य आहे.

लोकसंख्येबाबत येथवर केलेले विवेचन हे केवळ अंदाज अथवा बौद्धिक कसरतच असे म्हणावे लागेल. अंदाज हे पूर्णपणे सत्याच्या जवळपास येतील की नाही हे सांगणे कठीण असले, तरी सतराव्या शतकांतील गावांच्या, शहरांच्या लोकसंख्येचा विचार करताना त्या ठिकाणच्या व्यापारी उलाढाली, प्रशासकीय महत्त्व, धार्मिक महत्त्व, भौगोलिक वैशिष्ट्ये या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत हेच येथे प्रामुख्याने मांडावयाचे आहे. सैन्याच्या संख्येवर आधारित लोकसंख्या ठरविण्याच्या कसोटीनुसार शिवाजीच्या स्वराज्याची लोकसंख्या सुमारे ६२ लाखांवर होती असा निष्कर्ष काढला होता. महानुभावी लोक मराठी भाषेच्या सर्व मुलखात प्रवास करीत होते; आणि या संपूर्ण महाराष्ट्राची लोकसंख्या त्यांच्या मते तेराव्या शतकात ६० लक्ष इतकी होती. तेव्हा महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांची संख्या सतराव्या शतकात ६२ लाखांवर असणे असंभवनीय आहे. स्वराज्याची लोकसंख्या १६७४ च्या सुमारास ३० ते ३१ लाखांपर्यंत असावी असा तर्क प्रस्तुत विवेचनात प्रायोगिक स्वरूपात मांडला आहे.

■■

मराठी राज्य : उत्पन्न

सतराव्या शतकात राज्याचे उत्पन्न विविध प्रकारच्या करांची आकारणी करून मिळविले जात असे. 'मेस्तक' नावाच्या एका मध्ययुगीन मराठी पुस्तिकेत राज्याच्या उत्पन्नाच्या आठ बाबी सांगितल्या आहेत. मेस्तकात लेखनाचे विविध प्रकार, पद्धती, व्यवहारासंबंधीचे सर्वसाधारण नियम, याविषयी मार्गदर्शन केलेले आहे. आज जी मेस्तके उपलब्ध आहेत ती तेराव्या शतकात देवगिरीच्या रामचंद्रदेव यादवाचा प्रधानमंत्री हेमाडपंत याने तयार केली होती असे परंपरेने मानले जाते. या पुस्तिकेचा मुख्य उद्देश राज्याच्या आर्थिक व्यवहारांचे हिशोब पद्धतशीर कसे ठेवावेत यासंबंधीचे मार्गदर्शन करणे हा आहे. अर्थात आज उपलब्ध असलेली मेस्तके या तेराव्या शतकातील मूळ मेस्तकांच्या नकला आहेत.

(महाराष्ट्रेतिहासाची साधने भाग– १ संपादक वा. सी. बेंद्रे यात ही मेस्तके दिली आहेत.)

मेस्तकात उत्पन्नाच्या ज्या आठ बाबी सांगितल्या आहेत त्या अशा–

१. जकात : मालाची वाहतूक आणि उत्पादनावरील कर
२. जराईब : जिराईत जमिनीवरील सारा
३. बागाईत : बागाईत जमिनीवरील सारा
४. बारनगजग : आंबराईपासून मिळणारे उत्पन्न
५. बारगुजारत : वेलीपासून मिळणारे उत्पन्न
६. बादस्ती : झाडापासून मिळणारे उत्पन्न
७. कटुबाण : पडजमिनीपासून मिळणारे उत्पन्न
८. जुजुया : विविध प्रकारच्या करांपासून मिळणारे उत्पन्न

मेस्तकातील सर्व नियम प्रत्यक्षात पाळले जात होते असे उपलब्ध कागदपत्रांवरून

दिसत नाही. वर सांगितलेल्या आठ प्रकारांप्रमाणे राज्याच्या उत्पन्नाची नोंद सतराव्या शतकातील कागदपत्रातून अभावानेच आढळते. अर्थात मेस्तकातील उत्पन्नाच्या या सर्व बाबी सरकारने या ना त्या प्रकारे हाताळल्या होत्या असे स्थूलमानाने म्हणता येईल. प्रत्यक्ष कर ही उत्पन्नाची प्रमुख बाब असली तरी राज्याच्या उत्पन्नाचा बराचसा भाग हा अप्रत्यक्ष करांच्या रूपाने वसूल केला जात होता. जकात, वाहतूक कर, विक्रीकर, उत्पादनावरील कर, इत्यादी कर हे अप्रत्यक्ष करांच्या कक्षेत येतात. न्यायालय खात्यामार्फत वादी-प्रतिवादीकडून वसूल केलेले शुल्क आणि दंड या रूपानेही काही पैसा जमा होत असे.

कागदपत्रातून राज्याच्या विविध प्रकारच्या उत्पन्नाच्या बाबी आल्या आहेत. यात नियमित येणाऱ्या उत्पन्नाच्या बाबींखेरीज प्रासंगिक बाबींचाही प्रामुख्याने उल्लेख करता येईल. उदाहरणार्थ, ज्या मालमत्तेला कोणी वारसदार नसेल ती मालमत्ता राजाच्या मालकीची होत असे. अधिकारीवर्ग तसेच राजाच्या भेटीला आलेले काही परदेशी व्यापारी राजाची मर्जी संपादण्यासाठी, काही सवलती, हक्क मिळविण्यासाठी त्याला भेटवस्तू देत असत. लढाईत झालेली मिळकत, चौथ आणि सरदेशमुखीपासून खजिन्यात पडलेली भर, राज्याने स्वत: सुरू केलेल्या उद्योगांपासून विशेषत: पाटबंधारे, कालवे, टांकसाळी यांपासून होणारी प्राप्ती, सरकारतर्फे होणारे खरेदी-विक्रीचे व्यवहार यांमुळे होणारा नफा यांचा उल्लेख करता येईल.

रयतेकडून वसूल केलेला सर्व पैसा सरकारी खजिन्यात भरला जात होता असे मात्र नाही. शिवपूर्वकालात सरकारी अधिकारी, विशेषत: वतनदार आपल्या अधिकारात रयतेवर अनेक कर लादत आणि त्यापासून जमा झालेली रक्कम पूर्णतया सरकारात जमा केली जात नसे, असे सभासदाने म्हटले आहे. अशा रीतीने जमा केलेल्या रकमेच्या काही भागाला त्यांचे वेतन म्हणून सरकारने मान्यता दिलेली असेल; परंतु मान्य रकमेपेक्षा अधिक पैसा वसूल केला असेल तर तो जुलुम, जबरदस्ती या प्रकारात गणला जात असे. शिवकालात देखील रयतेकडून अशा मार्गाने जादा पैसा उकळला जात असेल, पण त्यासंबंधी निश्चित पुरावा आढळत नाही. येथे फक्त एवढेच म्हणता येईल की, शिवाजीच्या वतनदाराविषयीच्या कडक धोरणामुळे स्वराज्यात हे शोषणाचे प्रमाण कमी असावे.

सतराव्या शतकातील मराठी कागदपत्रातून आलेल्या करासंबंधी विचार करताना, हे सर्व कर त्या काळात एकाच वेळी प्रचलित होते असे मानता कामा नये. यातले काही कर म्हणजे वतनदारांना दिलेल्या हकलाजिमाचा भागही असू शकतील. मध्ययुगात शेतसारा, ज्याला 'राजभाग' असे म्हटले आहे ते राज्याच्या उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण साधन होते. 'काळी', 'खरीप', 'रबी', 'बागाईत', 'घुगरी', 'झाडझाडोरा', 'कडबा', 'बारगुजार' इत्यादी शब्द हे प्रामुख्याने शेतसाऱ्याच्या संदर्भात समकालीन कागदपत्रात वापरले आहेत. शेतसारा हा रोख अथवा धान्य अथवा दोन्ही रूपाने वसूल केला जात असे. शेतसाऱ्यासंबंधीचा सर्व विचार मागे आलाच आहे. त्यामुळे येथे तो भाग वगळला आहे.

प्रत्यक्ष कर : इनामपट्टी, इनामती खंडणी आणि मिरासपट्टी

सतराव्या शतकात प्रत्यक्ष करावर अधिक भर दिलेला दिसतो. व्यक्तीचे उत्पन्न, व्यवसाय आणि मालमत्ता यांवर करआकारणी केली जात असे.

परगण्याचे अथवा गावचे वतनदार अधिकारी यांच्या कमाईचा काही भाग कररूपाने सरकार वसूल करीत होते. अशा करांचा उल्लेख इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी, सरदेशमुखपट्टी या नावाने कागदपत्रात आला आहे. यांपैकी काही कर हे नैमित्तिक स्वरूपाचे होते.

इनामपट्टी ही एक अशा प्रकारची नैमित्तिक पट्टी इनामदाराकडून काही प्रसंगी वसूल केली जात होती. इनामदारांना दिलेली जमीन ही सामान्यतः सारासूट या पदरात मोडत असे; परंतु आणीबाणीच्या परिस्थितीत राज्याला जादा पैसा उभा करावयाचा असेल तर तो इनामदाराकडूनही केला जात असे. मात्र गोसावी अथवा मठ यांना दिलेल्या इनामावर, अशा आणीबाणीच्या प्रसंगीही इनामपट्टी लादली जात नसे.

इनामखंडणी ही देखील अशाच प्रकारची एक पट्टी. 'खंडणी' ही सामान्यतः नूतन इनामदारांकडून काही ठरावीक मुदतीपर्यंत वसूल केली जात होती; परंतु या बाबतीत निश्चित असा काही नियम असावा असे दिसत नाही. काही भागातील वतनदारांकडून ही नियमितपणे दरवर्षी वसूल केल्याचीही उदाहरणे आढळतात. (राजवाडे १८:२०, २५)

मिरासपट्टी अथवा मिरासदारपट्टी हीदेखील एक नैमित्तिक सदरात मोडणारी पट्टी होती. मिरासदार हा वंशपरंपरा जमिनीचा मालक होता. इनामदार अथवा वतनदार यांच्याप्रमाणे त्याला साऱ्यांत सूट मिळत नसे; परंतु ही मिरासपट्टी सरसहा सर्व मिरासदारांना आकारल्याचे दिसत नाही. एखादा मिरासदार छोट्या जमिनीचा मालक असेल आणि पोटापुरतीच कमाई त्या जमिनीपासून त्याची होत असेल. असे मिरासदार या कराच्या कक्षेत येत नसत. जे मिरासदार आपल्या मिरासीतून खूप फायदा मिळवीत, त्यांच्यावरच ही पट्टी बसविली जात असे. उदाहरणार्थ, मावळातील देशमुख, देशकुलकर्णी, पाटील आणि कुलकर्णी हे सारे हकदार वतनदार होते आणि परगण्याचे, गावचे अधिकारी म्हणूनही त्यांची कमाई लक्षणीय होती. वतनदाराप्रमाणेच इतर मातब्बर मिरासदारांकडूनही मिरासपट्टी वसूल केली जात असे; पण त्यांच्यावरील करआकारणीचे प्रमाण वतनदारापेक्षा थोडेसे निराळे होते.

> "कारबारी देसमुख व देसकुलकर्णी व पाटील व गाऊ कुलकर्णी यांवरी पटी घा (तली) की हकदक खाताती व काही गुज्यासी (नफा) करितात म्हणून त्यांसि मिरासीपटी घातली." (शि.च.सा. ३ : ४०१)

मिरासपट्टीचा आणखी एक विशेष म्हणजे एकाच वेळी राज्याच्या सर्व प्रदेशांवर ती आकारली जात नसे. पुणे तर्फ येथील एका इनामदाराने १६७५ साली सरकारात अशी तक्रार गुदरली की, त्या साली पुणे तर्फ हा मिरासपट्टीच्या कक्षेत येत नसल्याने सरकारी अधिकाऱ्यांना आपल्याकडून ती वसूल करण्याचा अधिकार नाही. प्रांताच्या सुभेदाराने

मिरासदाराची ही तक्रार मान्य केली आणि करपात्र व्यक्तींच्या यादीतून सदरहू मिरासदाराचे नाव कमी करण्याचे आदेश दिले.

> "त्यावरी (इनामदारावर) तुम्ही मिरासपटी पंचवीस होनु घालुनु पैका मागता म्हणऊन कलों आले तरी पा। मजकुरावरी मिरासपटी घातली नसता उगेच आपले भातेने पैके मागता हे कोण रवेश (रीत) या उपरी त्यास येक रुकेयाची तसवीस न देणे" (शि.च.सा. ३ : ४००)

मिरासपट्टीचे तिसरे लक्षण म्हणजे राज्याच्या प्रत्येक विभागातून तीन वर्षांतून एकदा ती वसूल केली जात होती. १६८०-८१ च्या एका कौलपत्रात अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

> "तिहीसाला आड येक साल मिरासपटी द्यावी यैसा तह केला आहे." (शि.च.सा. १० : १४)

अमात्यांच्या आज्ञापत्रातदेखील वर्ष दोन वर्षांतून वतनदारांकडून काहीतरी निमित्त सांगून पैसा वसूल करावा असे म्हटले आहे. आज्ञापत्रात सूचित केलेली ही पट्टी म्हणजे कदाचित मिरासपट्टीच असू शकेल.

> "वतनदार पाहून वर्षा दोन वर्षी काही समर्पक अंतर स्थापून अल्पस्वल्प द्रव्यादि ग्रहणे हलके करीतच असावे." (आज्ञापत्र प्रकरण ६)

इनामपट्टी, इनामतीखंडणी, मिरासपट्टी हे शब्दप्रयोग समानार्थी आहेत का हे सांगणे कठीण आहे. मराठी कागदपत्रातून अशी शब्दांची अनेक वेळा गफलत केलेली आढळते. वास्तविक पाहता 'वतन' आणि 'इनाम' याचे स्वरूप भिन्न आहे; पण 'वतन' याचा उल्लेख 'इनाम' असा वारंवार केलेला आढळतो. असे असले तरी या तिन्ही पट्ट्यांच्या बाबतीत आढळणारे एक समान लक्षण म्हणजे, जे शेतसारा भरत नाहीत, आणि ज्यांना त्यांच्या जमिनीपासून भरपूर फायदा मिळतो, त्यांच्याकडूनच या पट्ट्या वसूल केल्या जात.

शिरवळ परगण्याच्या एका अधिकृत, पण काहीशा अपुऱ्या, असलेल्या कागदावरून असे दिसून येते की, १६७४ साली, म्हणजे शिवराज्याभिषेकाच्या वर्षी, त्या परगण्यावर १००० होन इतकी मिरासपट्टी आकारली होती. त्यापैकी परगण्यांच्या वतनदारांकडून म्हणजे देशमुख ३६६ होन आणि देशकुलकर्णी १३४ होन असे एकूण ५०० होन वसूल करावयाचे होते. परगण्यातील ३९ गावांच्या पाटलाकडून २५० होन आणि कुलकर्ण्याकडून २०० होन, चौगुल्याकडून १४ होन आणि शेटे-महाजनाकडून ३० होन वसूल करावयाचे होते. हा कागद अपूर्ण असल्याने उरलेले ६ होन कोणी द्यावयाचे होते हे निश्चितपणे सांगता येत नाही. कदाचित हे शेटे-महाजनाकडून अथवा परगण्यांतील कोणा मातब्बर मिरासदाराकडून घ्यावयाचे असतील. प्रस्तुत अपूर्ण कागद अनेक अर्थाने

उपयुक्त असला तरी या कागदात दिलेला तक्ता त्या एका वर्षापुरता मर्यादित होता, की दरवर्षी अथवा दर तीन वर्षांनी अमलात आणावयाचा होता याचा बोध त्यावरून होत नाही; परंतु या कागदाचे जे वर्ष आहे ते राज्याभिषेकाचे असल्याने आणि या समारंभासाठी राज्याला अधिक पैशाची गरज असल्याने कदाचित ही मिरासपट्टी, विशेष पट्टी म्हणून त्या वर्षापुरती आकारली असावी अथवा शिरवळ परगण्याची पूर्वीची तीन वर्षे संपल्याने; आणि १६७४ साली त्यांची परत पाळी आली असल्याने या कराची आकारणी कदाचित थोड्याशा चढत्या दराने केली असावी. (शि.च.सा. १ : ५५)

इनामतीखंडणी आणि मिरासपट्टी हे शब्द समानार्थी असावेत असा जो तर्क पूर्वी मांडला आहे, त्यास दुजोरा देण्याच्या दृष्टीने हा कागद महत्त्वाचा आहे. शिरवळच्या कागदात मिरासपट्टीची विभागणी केली आहे तशाच तऱ्हेची विभागणी १६७५ च्या पुणे परगण्याच्या एका कागदात इनामतीखंडणीची वाटणी देशमुख आणि देशकुलकर्णी या दोन परगणा वतनदारांची दाखविली आहे. (राजवाडे १८ : २५)

सिंहासनपट्टी

सिंहासनपट्टी अथवा तख्तपट्टी हा राज्याभिषेक समारंभाच्या वेळी (१६७४ साल) स्वराज्यातील सर्व वतनदारांकडून वसूल केलेला एक प्रासंगिक कर होता. ही पट्टी स्वतंत्रपणे दाखविली असल्याने मिरासपट्टीहून ती भिन्न असावी असे मानण्यास हरकत नाही. (राजवाडे १६.२)

सिंहासनपट्टी आणि मिरासपट्टी या एकच होत असे काही वेळा म्हटले जाते. (शि.च.सा. ८ प्रस्तावना, पृ. ४) राज्याभिषेकाच्या वर्षी सर्व वतनदारांवर, मिरासदारांवर सिंहासनपट्टी बसविली होती असे म्हटले आहे.

> "स्वामी प्रथम सिंहासनारूढ जाहाले तें समई कुल
> वृत्तिवंतावर मिरासपट्टीचा तह केला"

असा उल्लेख कागदात आहे. (शि.च.सा. ५ : ९५३). पूर्वी निवेदन केलेली मिरासपट्टी हा एक जुना कर होता (शि.च.सा. ९ : ४३) आणि कदाचित ही पट्टी काही काल मिरासदाराकडून प्रतिवर्षी वसूल केली जात असावी; परंतु मिरासदारांनी या पट्टीला जेव्हा विरोध केला तेव्हा, या पट्टीची वसुली तीन वर्षांतून एकदा राज्याच्या निरनिराळ्या विभागांतून करण्याची प्रथा पडली असावी. (शि.च.सा. १० : १४)

सिंहासनपट्टी ही मिरासपट्टीहून भिन्न होती आणि एखाद्या विभागाला मिरासपट्टी १६७४ साली द्यावी लागत असली तरी सिंहासनपट्टीतून त्याची सुटका होत नसावी. (राजवाडे १६ : २, पृ. १२) शिरवळ परगण्यातील वतनदारांना १६७४ साली कदाचित वाढत्या दराने मिरासपट्टी द्यावी लागली असेल आणि त्यांत या सिंहासन-पट्टीचाही अंतर्भाव केला असावा.

सिंहासनपट्टीचा उल्लेख 'तख्तपट्टी' असाही केला आहे. यावरून शिवपूर्वकालांत,

जेव्हा जेव्हा नवा सुलतान अथवा पातशहा गादीवर येत असेल, तेव्हा तेव्हा मराठी मुलखातून अशी जादा 'तख्तपट्टी' वसूल करण्याची प्रथा रूढ असावी. 'तख्तपट्टी' या मुसलमान राजवटीतील जुन्या कराची पुनरावृत्ती शिवकालांत झाल्यास त्यात नवल नाही. मिरासपट्टीदेखील प्रथम शिवाजी राजांनी बसविली होती, असेही मानण्याचे कारण नाही. पूर्वीचे कर काही अंशाने शिवकालातही चालू होते हे एकंदर शिवकालीन अर्थव्यवस्थेचे सर्वेक्षण करताना सहज लक्षात येईल. जुने कर लोकांच्या अंगवळणी पडलेले असतात. त्यामुळे लोकांचा त्याला फारसा विरोध होत नाही.

थोडक्यात असे म्हणता येईल की इनामपट्टी, इनामत खंडणी आणि मिरासपट्टी हे कर ज्यांना शेतसारा सूट असेल अशा जमीनदारांकडून म्हणजे वतनदार आणि काही मातब्बर मिरासदार यांच्याकडून सरकारच्या गरजेप्रमाणे वसूल केले जात होते. ते सामान्यत: पैशाच्या रूपाने वसूल केले जात आणि प्रारंभी कदाचित नित्य स्वरूपाचे असलेले, कालाच्या ओघात नैमित्तिक स्वरूपाचे बनले आणि शिवकालांत ते नैमित्तिक स्वरूपाचेच असावेत असे दिसते.

व्यवसाय कर

राज्यातील बहुतेक किफायतशीर व्यवसाय हे करपात्र धरले जात. सामान्यत: ते धान्याच्या अथवा उत्पादित वस्तूंच्या स्वरूपात वसूल केले जात. पैशाच्या स्वरूपात देखील हा कर घेतला जात असे. कागदपत्रातून आलेल्या अशा काही करांचा अर्थ लावण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

सराफी अथवा सराफपट्टी : सोन्या-चांदीच्या खरेदी-विक्रीचे आणि नाण्यांचे व्यवहार करणाऱ्याला सराफ म्हणत. 'सराफी' अथवा 'सराफपट्टी' म्हणजे सराफांकडून वसूल केलेला व्यवसाय कर.

धनगर : काही वेळा एका व्यवसायातून दुसरा व्यवसाय निर्माण होतो. धनगरांचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेळ्यामेंढ्या पाळणे आणि त्यांचे कळप घेऊन उन्हाळ्यात गावोगाव फिरणे. मेंढ्यांच्या कळपाची शेतकरी आपल्या शेतात दोन-तीन दिवस बैठक बसवीत, कारण त्यांचे मल-मूत्र हे उत्तम खत मानले जात होते. शिवाय मेंढ्यांचा निर्वाह शेतातील झाडपाला खाऊन परस्पर होत असे. मेंढ्यांच्या लोकरीपासून धनगर घोंगडी बनवीत, अथवा त्यांच्या लोकरीच्या धाग्यापासून गुंडे तयार करून घोंगडी विणाऱ्यास ते विकीत. या धनगरी व्यवसायातून मिळणारे उत्पन्न हे करपात्र असे. याखेरीज त्याला वतनदाराला दरवर्षी एक मेंढी भेट द्यावी लागे. लोकरीचे गुंडे विकताना अथवा त्यापासून विणलेले घोंगडे विकताना त्याला विक्रीकर द्यावा लागत असे. हा कर वस्तूच्या रूपाने गावच्या अधिकाऱ्याकडे जमा करावा लागे. प्रत्येक कळपामागे पाच पौंड वजन भरेल इतकी लोकर द्यावी लागे; परंतु त्या लोकरीचे त्याने घोंगडे बनविले तर दर मागास एक घोंगडे कररूपाने द्यावे लागे. (पे.द. ३१ : ५५)

मागटका : मागटका हा विणकरांना द्यावा लागे. हा कर सामान्यत: एक मागास १/४ टका असे, काही वेळा हा कर वस्तूच्या रूपाने घेतला जात असे. उदाहरणार्थ खत्री जमातीकडून कापड, साळ्याकडून साडी, कोष्ट्याकडून धोती आणि मोमिनाकडून फेटा अथवा पटका घेतला जाई. (प.सा.सं. ३ : २६८७)

पायपोशी : चांभाराकडून पादत्राणांचा जोड घेतला जाई. डॉ. सेनांच्या मते 'पायपोशी' हा कर कशा प्रकारचा होता हे निश्चितपणे सांगता येत नाही; परंतु नव्याने उपलब्ध झालेल्या साधनावरून असे म्हणता येईल की, दरवर्षी चांभाराला गावच्या पाटील-कुलकर्ण्याला पादत्राणांचा एक जोड मोफत द्यावा लागत असे. शहाजीने आपल्या जहागिरीतील कारकुनाला चांभाराकडून पादत्राण जोड वसूल करण्याची आज्ञा एका पत्राद्वारे दिली आहे. (राजवाडे २० : १२, पे.द. ३१ : १९)

कारागीर : 'कारूक' नावाचा एक कर गावच्या कारागिराकडून वसूल केला जात असे. अर्थात या करातून गावचे बलुतेदार यांची मुक्तता केली असावी. बलुतेदार सोडून, न्हावी, परीट, सुतार, सोनार, शिंपी, लोहार इत्यादी व्यावसायिकांना प्रत्येकी १/४ टका कर प्रतिवर्षी द्यावा लागे.

मांग, कोळी यांचादेखील प्रस्तुत संदर्भात उल्लेख काही वेळा केला जातो; पण त्यांच्यापासून कर किती घेतला जात असे हे सांगता येत नाही. (शि.च.सा. ९ : ११, राजवाडे २१ : ६)

तेलपट्टी : तेल्याला घाण्यातून तयार केलेल्या तेलावर प्रत्येक घाण्यामागे दीडशेर तेल द्यावे लागे. (पे.द. : ३१ : १०४)

गवळी : अर्धा शेर लोणी देत. अर्थात हे केव्हा व कोणत्या प्रमाणात देत असत याचा तपशील आढळत नाही.

माळी : बागेपासून होणाऱ्या उत्पन्नावर पावटका कर देत. हा वार्षिक असावा.

कोळी : मासे वाहून नेणाऱ्या प्रत्येक बोटीमागे पाव टका कर कोळ्यांना द्यावा लागे.

वेठबेगार : एखाद्या व्यक्तीकडून मोफत चाकरी करून घेणे हा एक अप्रत्यक्ष, न दिसणारा असा करच मानावा लागेल. कुशल कारागीर अथवा मजूर याच्याकडून मोफत अथवा बाजारात प्रचलित असलेल्या दरांपेक्षा कमी दराने त्यांची सेवा सक्तीने घेणे, म्हणजे एका प्रकारचा उत्पन्नावरील करच होय, म्हणून या चाकरीची गणना व्यवसाय कर या सदरात करता येईल. वेठबिगार हा गावच्या वतनदार अधिकाऱ्यांचा खास हक्क होता. सरकारनेही हा हक्क मान्य केला होता याचे कारण तसे केले नसते तर या ग्रामाधिकाऱ्यांना सरकारी खर्चाने तशा प्रकारची सेवा उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त झाले असते.

मोहतर्फा : पेठेतील व्यापाऱ्यांकडून वसूल केलेल्या कराला मोहतर्फा असे म्हणत. पांढरीवर दुकाने थाटून बसणाऱ्या या छोट्या व्यापाऱ्यांना, फेरीवाल्यांना, उत्पादकांना, ते ज्या वस्तूंचा व्यापार करीत असतील त्याचा काही हिस्सा कर म्हणून द्यावा लागे. आठवड्यातला एक दिवस हा गावच्या बाजाराचा दिवस असे. त्या बाजारासाठी

परगावाचे व्यापारीही येत असत. गावच्या बाजारात दुकान अथवा 'पाल' टाकावयाची असेल तर त्यासाठी देशमुखाची परवानगी घ्यावी लागे. हे दुकान टाकण्यासाठी देशमुखाला द्यावी लागणारी रक्कम म्हणजे एक प्रकारे परवाना शुल्कच होते. सामान्यत: अशी दुकाने गावच्या वेशीबाहेर सरकारी जमिनीवर मांडली जात असल्याने 'मोहतर्फा' वसूल करण्याचा अधिकार देशमुखाला दिला असावा. भुसारी, कलाल (दारूविक्रेते), लोणीवाले, कापडविक्रेते, भाजी फेरीवाले, कसाई, पानवाले यांच्याकडून वस्तुरूपाने अथवा पैशाच्या रूपाने हा कर वसूल केला जात होता. थोडक्यात, मोहतर्फा म्हणजे गावच्या बाजारातील व्यापाऱ्यावर बसविलेला 'प्रत्यक्ष कर' होता.

फर्माईश अथवा फरमाश : वेठबिगारीतून मुक्तता मिळविण्यासाठी काही वेळा अशा व्यक्ती मालकाला पैसे देत आणि आपली सुटका करून घेत. अशा प्रकारच्या देण्याला फर्माईश अथवा फरमाश म्हणत. या कराची तुलना वेठबिगारशी करता येईल.

हेजीबपट्टी : 'हेजीब' म्हणजे संदेशवाहक अथवा दूत. या दूताचा खर्च वसूल करण्यासाठी ज्याला संदेश पोहोचवावयाचा त्याच्याकडून घेतलेल्या रकमेस 'हेजीबपट्टी' म्हटले जाते. 'मसाला' हा शब्दसुद्धा निरोप्याच्या खर्चवसुलीच्या संदर्भात वापरला जातो.

जकात : अप्रत्यक्ष कर विविध प्रकारचे असत आणि सरकारी उत्पन्नाची ती एक खास बाब होती. अप्रत्यक्ष कराच्या बाबतीत सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे जकात. राज्यात येणाऱ्या आणि राज्याबाहेर जाणाऱ्या वस्तूवर म्हणजेच आयात-निर्यातीवर आकारला जाणारा कायदेशीर कर म्हणजे जकात. सामान्यपणे राज्याची सीमा ओलांडून दुसऱ्या राज्यात जाणाऱ्या अथवा परराज्यातून राज्यात येणाऱ्या वस्तू जकातीच्या सदरात मोडत. चौल, राजापूर, वेंगुर्ला, दाभोळ, रत्नागिरी ही मराठी राज्याची प्रमुख बंदरे होती; आणि महाराष्ट्राचा आयात-निर्यात व्यापार मुख्यत्वे-करून या बंदरांतून होत असे. मराठी राज्याच्या भोवतालच्या मुसलमानी आणि पोर्तुगीज मुलखातून मालाची देवाण-घेवाण होत असे. काही वेळा परदेशी व्यापाऱ्यांना मराठा मुलखातून आपला माल दुसऱ्या राज्यात न्यावा लागे. अशा वेळी या व्यापाऱ्याकडून मराठी सरकार जकात वसूल करीत असे.

'जकात' ही राज्याच्या उत्पन्नाची महत्त्वाची बाब होती असे मेस्तक पुस्तकात म्हटले आहे. ताळेबंदात 'सायेर' या मथळ्याखाली जकातीपासून झालेला वसुलीचा आकडा स्वतंत्रपणे दिला जातो. जकात हा शब्द मराठी कागदपत्रात फार व्यापक स्वरूपाने वापरला आहे. 'रहदारी' कराचा म्हणजे राज्यातून केवळ महालांच्या मर्यादेत अथवा राज्याच्या सीमेत होणाऱ्या हालचालीवर आकारलेल्या कराचा देखील जकात या सदराखाली उल्लेख करावा लागेल. शिवकालात जकातवसुलीची पद्धती काय होती यासंबंधी तपशीलवार माहिती देणारी फारच मोजकी साधने आज उपलब्ध आहेत.

प्रस्तुत संदर्भात जी साधने उपलब्ध आहेत ती एक तर मलिक अंबरी काळ (अहमदनगरच्या निजामशाहीचा) अथवा पेशवेकाळ यांच्याविषयी माहिती देणारी आहेत; परंतु शिवकालातील जकातपद्धती ही शिवपूर्वकालापासून फारशी भिन्न होती असे वाटत नाही. या प्रकरणाच्या शेवटी जोडलेला एक अप्रकाशित कागद कसबे चांदवड येथील जकातपद्धतीची सविस्तर माहिती देणारा आहे. या कागदावर तारीख नसली तरी अक्षराच्या वळणावरून आणि आतील मजकुरावरून तो शिवकालीन असावा असे मानावयास प्रत्यवाय नसावा. अप्रत्यक्ष कराबाबत सर्व मराठी प्रदेशात एक समान पद्धती नव्हती ही गोष्ट जकातीचा अभ्यास करताना लक्षात ठेवली पाहिजे.

जुन्नर परगण्याच्या घाटपांडे घराण्याची कागदपत्रे शिवकालीन आहेत; पण मराठी राज्याच्या सीमा ओलांडताना व्यापाऱ्यांना निरनिराळ्या वस्तूंसाठी द्याव्या लागणाऱ्या जकातीच्या दरांचा उल्लेख या कागदपत्रात आढळत नाही; परंतु जकातवसुलीसाठी जी यंत्रणा उभी केली होती त्याची पूर्ण कल्पना या कागदावरून येते.

वस्तूंच्या गोणी अथवा लहान-मोठी ओझी वाहून नेण्याचे काम माणसे आणि जनावरे करीत. बैलावरून वाहून नेलेल्या मालाचा एक घटक मानला जात असे. तेवढ्याच वजनाचा माल घोड्यावरून नेल्यास त्यावर बैलावरील जकातीच्या १/२, गाढवावरून नेल्यास १/३ आणि खांद्यावरून (खांदाड्या) नेल्यास १/४ जकात द्यावी लागे. ही दरपद्धती मालाच्या वजनावर अवलंबून होती, असे वरील दरातील फरकावरून अनुमान काढता येईल.

स्थानिक व्यापारी आणि परके व्यापारी असा भेदभाव करून, त्यांच्यावर आकारल्या जाणाऱ्या दरात देखील फरक केला आहे. परक्या व्यापाऱ्यांना नेहमीच्या दरापेक्षा 'चुंगी' नावाचा कर बैल ओझ्यावर द्यावा लागत होता. (शि.च.सा. ५ : ९१९) 'चुंगी' या शब्दाचा अर्थ देखील जकात असाच होतो.

जकातीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे व्यापाऱ्यांना नेहमीच्या जकातीपेक्षा, वस्तू अथवा पैशाच्या रूपाने आणखी एक प्रकारचा कर अथवा बक्षिसी द्यावी लागे. त्यास 'वानगी' म्हणत. सामान्यत: खाद्यवस्तूंच्या 'वानगी' अथवा नमुना म्हणून काही वस्तू व्यापाऱ्यांच्या गोणीतून उचलल्या जात. मालाचा भाव काही असो, प्रत्येक गोणीतून सव्वाशेर माल वानगीदाखल घेतला जात असे. कलिंगडे, नारळ, केळी अथवा इतर काही फळफळावळे असल्यास सुमारे एक ते पंचवीस फळे वानगी म्हणून घेतली जात. धान्य पाखडावयाची सुपे, बांबू अशा वस्तू विक्रेते डोक्यावरून वाहून आणीत. अशा वेळी दरडोई एक सूप आणि सव्वादोन बांबू जकात स्वरूपात काढून घेत. एखाद्याने एक हजार ऊस आणले असतील तर दहा ऊस वानगीदाखल घेत. फणीविक्रेत्यांना एक फणी वानगीदाखल द्यावी लागे.

'वानगी'चे समानार्थी दुसरे शब्द म्हणजे 'फसकी', 'पळकी' आणि 'सेवधारा'. 'फसकी' म्हणजे धान्याच्या ओझ्यातून काढलेले पसाभर धान्य; 'पळकी' म्हणजे तेल्याकडून बुधल्यामागे घेतलेले पळीभर तेल; 'सेवधारा' हा जोडशब्द आहे. 'सेव' म्हणजे फळे, फुले आणि भाजीपाला यातून घेतलेला काही माल आणि 'धारा' म्हणजे तूप अथवा तेल यांची 'धार' म्हणजेच काही भाग.

'वानगी' सामान्यत: वस्तूंच्या रूपाने घेणे सोयीची असे; पण वस्तूंच्या ऐवजी पैशाच्या रूपात त्याची भरपाई केली तरी त्याचा स्वीकार होत असे.

'उरी-दलाली' म्हणजे बंदराच्या ठिकाणी केलेली मालाची उचल. 'उरी' म्हणजे उरलेला अथवा शेष भाग आणि 'दलाली' म्हणजे मालाचे वजन-माप करण्यासाठी दिलेला कर. प्रत्येक वस्तू प्रथम वजन केली जाई अथवा मोजली जाई. यानंतर पूर्ण वजन अथवा माप करून जो भाग शिल्लक राही तो अधिकारी घेत.

चौल हे पश्चिम किनाऱ्यावरील बंदर, सतराव्या शतकात आयात-निर्यात व्यापारासाठी प्रसिद्ध होते. पुढील तक्त्यावरून त्या बंदरात येणाऱ्या आणि जाणाऱ्या विविध प्रकारच्या वस्तूंवर जकात कशी आकारली जात होती याची कल्पना येईल.

वस्तू प्रकार	आयात कर	निर्यात कर
भात आणि नाचणे गोणीमागे	१२ रुके	१२ रुके
गुळाचे ओझे	२० रुके	३० रुके
मसाले ओझे	३६ रुके	३६ रुके
ऊस दरहजारी	१.१/२ लारी	१.१/२ लारी
आले डोईओझे	१० रुके	१० रुके
कापड गठ्ठे	८ रुके	६ रुके
तंबाखू ओझे	१.१/२ लारी	१२ रुके
सूत दर ओझ्यामागे	२४ रुके	२४ रुके
कांबळे एका नगास	८ रुके	६ रुके
घोडा	१ लारी	१/४ लारी
म्हैस	१/२ लारी	१/४ लारी
बैल	१८ रुके	१८ रुके
खुर्दा दरडोई ओझे	१० रुके	१० रुके

सूचना : १ लारी = ४० टके (अंदाजे)
१ टका = ४८ रुके

स्थानिक जकात (Octroi) आणि पथकर (Toll) यामधील फरक म्हणजे एखाद्या परगण्यात उपभोगासाठी जेव्हा काही वस्तू आणल्या जातात, तेव्हा जो कर द्यावा लागतो त्यास स्थानिक जकात म्हणता येईल; आणि एखाद्या व्यापाऱ्याला परगण्यातील रस्ते, पूल अथवा फेरी मालाच्या वाहतुकीसाठी वापरावयाचे असतील तर त्यावर जो कर द्यावा लागतो तो पथकर (Toll) होय. 'रहदारी' म्हणून कागदपत्रात याचा उल्लेख आढळतो.

व्यापाऱ्याला माल नेण्यासाठी अनेक जकातनाकी पार करावी लागतात. पूर्वी लागलेल्या नाक्यात आपण जकात भरली आहे याची पावती दाखल केल्याखेरीज नाके कारकून त्याला पुढे जाऊ देत नसे. जकातनाकी ही परगण्यातील हमरस्त्यांवर असत. त्यास 'उभा मार्ग' म्हणत. 'उभा मार्ग' हा शब्द जकात या अर्थीदेखील वापरलेला आढळतो. सामान्यत: 'चुंगी' आणि 'मजुरा' हे शब्द नाक्यावरील जकातीच्या संदर्भात आढळतात. (शि.च.सा. ५ : ९१९, पृ. १५९) निरनिराळ्या नाक्यावर वस्तूंवर जकात गोळा केली जात असे, त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल :

१. **धान्ये :** गहू, डाळ, मूग, तूरडाळ यावर एका गोणीस तीस रुके म्हणजे १० पैसे जकात घेत. एक रुका म्हणजे १/३ पैसा असा दर होता. तिरुका म्हणजे एक पैसा. परदेशी व्यापारी आणि स्थानिक व्यापारी यांच्याकडून घेतलेल्या जकातीत फरक असे. उदाहरणार्थ, भाताच्या ओझ्याला स्थानिक व्यापाऱ्याला ९ रुके तर परदेशी व्यापाऱ्याला १८ रुके जकात द्यावी लागे. उडीद, मसूर, तूर इत्यादी कडधान्यांवर गोणीस १८ रुके जकात होती. सर्व प्रकारच्या धान्यांची टरफले म्हणजे 'भुसा' याची जकात लहान गोणीला ३ रुके आणि मोठ्या गोणीला ६ रुके अशी होती.

२. **मसाले आणि इतर जिन्नस :** हे जिन्नस बैलावरून आणल्यास बैल ओझे ६ रुके, घोड्यावरच्या ओझ्यास ३ रुके, गाढवावरच्या ओझ्यास २ रुके आणि डोई ओझ्यास १.१/२ रुके असा दर आढळतो.

केशर, कस्तुरी यांच्यावर १/४ रुपया छोट्या पेटीमागे जकात घेतली जाई. गूळ, साखर, लसूण, कांदा, काकवी, हळद, चिंच, मिरी, सुपारी, खोबरे, खजूर या ओझ्यास १२ रुके अशी सरसकट जकात घेत. तूप, मध, तेल यांवर प्रत्येक ओझ्यास १/४ रुपया जकात द्यावी लागे.

३. **कापड आणि इतर वस्तू :** कापडाचे विविध प्रकार बाजारात विक्रीस येत 'सिती' (पांढरे कापड), पटाव (रंगीत कापड), ताफ्ता (रेशमी रंगीत कापड), 'खारा' (एक प्रकारचे रेशमी कापड), मुसदर (रेशमी कापड) यांच्यावर दर यार्डामागे जकात घेत. उदाहरणार्थ, 'सिती, पाच रुके, पटाव, १/२ लारी, घाटी (देशावर तयार झालेले कापड असावे) आणि 'अष्टपुतळी' (कलाकुसरीचे कापड), १८ रुके; ताफ्ता ६ रुके, खारा आणि मुसदर ४ रुके अशी जकात वसूल केली जात असे. पीतांबर या रेशमी वस्त्रासाठी एका यार्डास १/२ ते १ टक्क्यापर्यंत जकात पडे. 'सखलाद' हे साध्या विणीचे नेहमीपेक्षा दुप्पट पन्ह्याचे काळ्या रंगाचे पोर्तुगाल आणि लाहोर येथून पश्चिम किनाऱ्यावर येत असे. पोर्तुगीज सखलादीवर ९ रुके आणि लाहोरी सखलादीवर यार्डामागे १२ रुके जकात आकारली जाई. रंगीत कपड्यावर ४ रुपये आणि कलाकुसरीच्या कपड्यावर ७.१/२ रुपये जकात होती.

'कद' नावाच्या आणखी एका रेशमी वस्त्रावर प्रत्येकी १.३/४ लारी जकात होती. रंगीत चिटाचे लहान ओझे असल्यास ६ रुके आणि मोठा गठ्ठा असल्यास १/२ लारी जकात पडे.

येवले, जळगाव, अष्टी, सिन्नर, कोल्हापूर या ठिकाणांहून येणाऱ्या उत्तम आणि जाड्याभरड्या कापडांच्या एका गठ्ठ्यास १ रुपयाप्रमाणे जकात देत असत.

स्थानिक कापडावर शिक्का मारला जात असे आणि त्यावरील कर कदाचित कमी दराने घेतला जात असावा अथवा ते करमुक्तही असावे.

सुताच्या एका ओझ्यास २४ रुके जकात पडे. ताग १० रुके, नवार १४ रुके प्रतिओझ्यास, कांबळे ३ ते ४ रुके, गोणपाट-प्रतियार्ड १४ रुके असे जकातीचे दर होते.

लहान-मोठ्या टोप्यांवर निरनिराळ्या दराने करआकारणी होत असे. २० लहान टोप्यांच्या एका कोडीस १२ रुके आणि मोठ्या टोपीस नगास ४ रुके, मखमली टोपीस १२ रुके जकात भरावी लागे.

येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, जकातीचे दर स्थानिक बाजारातील परिस्थितीवर अवलंबून असल्याने, ते सर्वत्र सारखे नसत. वर दिलेल्या माहितीवरून बाजारात कशा प्रकारच्या वस्तू येत असत आणि त्यावर करआकारणी कशी होत असावी याची कल्पना यावी.

४. **फळफळावळे आणि इतर खाद्यपदार्थ :** कलिंगडेवाहू बोटीस ३.१/२ लारी आणि दरडोई ओझे १० रुके, नारळ, फणस, लिंबू, सुपारी, खाऊची पाने, केळी, मासे दरडोई ओझ्यास १० रुके जकात द्यावी लागे.

५. **इतर किरकोळ वस्तू :** काच १० रुके ओझे; चंदन दर शेरास ३ ते ४ रुके; फणी– कोडीस (२० वस्तू) १० रुके; पेट्या लहान– १/४ लारी, मोठी– १/२ लारी, सूपे, बांबू, दरडोई ओझे १० रुके प्रत्येकी; साबण दरडोई ओझे ४ रुके; जोडे पेटीस १ लारी अथवा एक जोडास १० रुके; पलंग २४ रुके; कंदील १० रुके; पत्रावळी– लहान गठ्ठा ५ रुके; मोठा, १२ रुके; कोळ्याचे जाळे १२ रुके; लहान बोट १२ रुके; बैलगाडी– मोठी १२ रुके, लहान ६ रुके, पालखी ६ रुके ते १ लारी इत्यादी.

वस्तूवर आकारलेले हे कर बहुधा उत्पादनशुल्क अथवा अबकारी कर (excise duty) असावा. कोकणातील या कागदपत्रात तसा स्पष्ट उल्लेख आढळत नाही. चेऊल मामल्यातील बारीकसारीक तपशील बराच दिला आहे. या कागदपत्रातून आलेल्या वस्तू या मुखत्वेकरून उपभोग्य वस्तू (consumption goods) आहेत आणि म्हणूनच त्यावरील कर हा उत्पादन अथवा अबकारी कर म्हणता येईल.

६. **जनावरे आणि गुलाम :** बाजारात अनेक जनावरे विक्रीसाठी आणली जात. जनावरांच्या खरेदी-विक्रीवर कर आकारला जात असे. कागदपत्रातून 'शिंगशिंगोटी' हा शब्द जनावरावरील जकातीच्या संदर्भात येतो. 'शिंगशिंगोटी' म्हणजे शिंगे असलेला प्राणी. खरेदीदारास ही 'शिंगोटी' जकात द्यावी लागे.

मराठी कागदपत्रात जनावरावर आकारलेले कर सामान्यत: पुढीलप्रमाणे आढळतात– म्हशीवर ६ रुक्यापासून १ टका ६ रुक्यापर्यंत कर आकारलेला दिसतो. काही वेळा

म्हैस खरेदीदाराकडून २ लारी कर घेतला आहे. बैल ३ रुके ते १ टका; वासरू (नर) १.१/२ रुका ते १/२ टकापर्यंत; शेळी ५ रुके इत्यादी.

काही वेळा जनावरावरील कर म्हणजे विक्रीकर असावा असे दिसते. बैल, म्हैस, गाय यांच्या विक्रीच्या किमतीवर दर रुपयास ३ रुके विक्रीकर घेतला आहे. 'तेजी' अथवा 'ताजी' हा घोड्याच्या विक्रीवरील कर होता; आणि तो विक्रीच्या किमतीवर २.१/२ टक्के रुक्याप्रमाणे वसूल केला जात असे. हा कर खरेदीदाराला द्यावा लागे. 'ताजी' याचा अर्थ अरबी घोडा असा आहे.

उंटपट्टी ही वाहतुकीसाठी वापरलेल्या दर उंटावर आकारली जात होती. 'वण टक्का' म्हणजे जनावराच्या काबिल्यावरील अथवा ताफ्यावरील कर. 'सेल-बेल' नावाचा कर देखील वाहतुकीच्या कामासाठी वापरलेल्या जनावरावर लादलेला कर होता. 'वणटका' आणि 'सेलबेल' हे समानार्थी शब्द असावेत.

स्त्री अथवा पुरुष 'गुलामा'ची खरेदी करणाऱ्यास दरडोई ५ लारी कर द्यावा लागे.

७. मीठ : कोकणात मीठ तयार करणे हा एक जोडधंदा होता आणि मिठाच्या व्यापारापासून सरकारास बराच फायदा होत असे. पश्चिम किनाऱ्यावर अशी बरीच मिठागरे होती. कागदपत्रातील उल्लेखावरून कुडाळ येथे तयार होणाऱ्या मिठावर दर मणास १२ रुके इतका कर आकारला होता. (राजवाडे ८ : २७, शि.च.सा. ९ : ६९)

जकातीसंबंधी काही निष्कर्ष

१. जकातीसंबंधीचे कागद प्रामुख्याने कोकणातील किनारपट्टीवरील बंदरे, परगणे या भागातून मिळतात. याचे कारण किनाऱ्यावरील ही बंदरेच व्यापाराची प्रमुख ठाणी होती व मालांची आयात-निर्यात या ठिकाणी अधिक प्रमाणात होत असे.

२. घाटातील जकातवसुलीचे काम घाटपांडे या वतनदाराकडे दिले होते. घाटातील चौक्यांवर घाटपांडेची माणसे नेमली जात व त्यांच्यातर्फे वसुलीचे काम हे चौकीदार करीत. जुन्नर ही मालाच्या वाहतुकीची एक प्रमुख बाजारपेठ होती याचे मुख्य कारण म्हणजे कोकण आणि देश यांना जोडणारा नाणेघाट हे होय. घाट म्हणजे डोंगरातील मार्ग अथवा वाट आणि पांडे म्हणजे लेखनाधिकारी अथवा लेखक. थोडक्यात, घाटमार्गावरील व्यवहारासंबंधीचे लेखनाधिकारी म्हणजे घाटपांडे. परगण्याचे आर्थिक व्यवहार जसे 'देशपांडे'कडे तसे 'घाटाचे' घाटपांडेकडे असत. मुक्तेश्वराच्या 'भारतात' जुनर देश घाटपांडेपण। बाराघाट सत्तावीस पथके' असा उल्लेख आला आहे. बिडवई (फिरत्या व्यापाऱ्यांच्या तळाचे संरक्षक), मोढवे (रस्ता बांधणे, दुरुस्त ठेवणे), पानसरे व पथकदार (मार्गसंरक्षक) हे सामान्यत: घाटपांडेचे मदतनीस होते. चौकीवरून टेहळणीचे काम केले जात असे, व चौऱ्यावर प्रत्यक्ष जकात वसुलीचे काम केले जाई.

जुन्नर घाटपांडेकडे असलेल्या उंबरे गावाच्या चौऱ्यामध्ये नऊ लाखापर्यंत (नाणे कोणते तो उल्लेख नाही) वसूल होत असे म्हणून त्या गावचे नाव 'उंबरे नवलाख' असे पडले होते. जुन्नर-घाटपांडे यांचे जे कागदपत्र उपलब्ध आहेत त्यावरून जकात वसूल करण्याच्या पद्धतीवर बराच प्रकाश पडतो. (ऐ.सं.सा.खंड ९ : मराठी राजवटीतील काही घाटमार्ग व चौक्या, पृ. १-३०)

३. जकातवसुलीचे काम काही वेळा ठेकेदाराकडे दिले जात असे. चौल मामल्यातील एका महालाचा ठेका दिला आहे; पण असे करीत असताना जकातीसंबंधीचे सर्व नियम, दर यांचे तपशीलवार वर्णन केले आहे. कोणत्या वस्तूवर किती कर आकारावा, वानगीदाखल ठेकेदाराने किती प्रमाणात वस्तू व्यापाऱ्याकडून घ्याव्यात यासंबंधी सविस्तर विवेचन या कागदात केले आहे. कोकणच्या बाजारात येणाऱ्या (पैसाळू) आणि कोकणातून बाहेर जाणाऱ्या (निकाळू) वस्तू कोणत्या होत्या याचे स्वरूप या जकातीसंबंधीच्या कागदावरून कळते. आर्थिक इतिहास जाणून घेण्यास ही माहिती अत्यंत उपयुक्त आहे.

४. 'पैसाळू' आणि 'निकाळू' माल कसब्याच्या हमरस्त्यावरून- उभ्या मार्गावरून-जात असता कसब्याचा संरक्षक कोतवाल याला आपला हक्क म्हणून व्यापाऱ्याकडून काय घेता येईल, यासंबंधीचेही काही कायदेकानू रूढ होते. चांदवड कसब्याच्या कोतवालाचे हक्क (लाजिमा) यासंबंधीच्या कानूंची कल्पना या प्रकरणाशेवटी जोडलेल्या एका शिवकालीन अप्रकाशित कागदावरून येईल. अर्थात ही सर्व वसुली कोतवालाची खाजगी मिळकत असे, की त्यापैकी काही हिस्सा सरकारात जमा होत असे हे सांगणे कठीण आहे. कदाचित कोतवालाला बहाल केलेले हे हक्क म्हणजे त्याच्या सेवेचे वेतन असावे.

५. प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष करांच्या दरासंबंधीची येथे दिलेली माहिती ही त्या त्या स्थळापुरती आणि काळापुरती मर्यादित आहे. सर्व 'स्वराज्यात' एकच करपद्धती रूढ होती असा निष्कर्ष त्यामुळे काढता येणार नाही. कारण मध्ययुगात करपद्धती ही अत्यंत लवचीक अशी होती आणि राजवटीनुसार, परिस्थितीनुसार त्यात बदल होत असत. कोकणात बोंबिल (मासे) विकणाऱ्या कोळ्यांकडून जकात घेत नसत, वानगीदाखल काही मासे घेत. जकात हा शब्द मराठी कागदात फार व्यापक अर्थाने वापरला आहे. सीमाशुल्क (Customs), स्थानिक जकात (Octroi), पथकर (Toll), अबकारी अथवा उत्पादन शुल्क (Excise duty) इत्यादी विविध करांचा समावेश जकात या शब्दात केलेला आहे. करआकारणी करताना, स्थानिक, परके व्यापारी, जुने-नवे व्यापारी असा भेदभावही केला आहे. मुसलमानी राजवटीत हिंदू आणि मुसलमान यांच्यावरील करआकारणी भिन्न प्रकारची असे, याचा तपशीलवार विचार पुढे करावयाचा आहे.

इतर विविध प्रकारचे कर

राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी सरकार उत्पन्नाच्या नव्या नव्या वाटा सतत धुंडाळत असे. पुढे ज्या पट्ट्यांची चर्चा केली आहे, त्यांना 'नित्याचे कर' असे म्हणता येणार नाही. आणीबाणीच्या प्रसंगी काही नैमित्तिक वसुली निरनिराळे कर लादून केली जात होती. अर्थात काही कर नियमितपणेही वसूल केले जात असण्याची शक्यता आहे.

सादिलवारपट्टी : 'सादिलवार' हा शब्द अनेक वेळा कागदपत्रातून येतो. यावरून तो एक नित्याचा कर असावा असे दिसते. सरकारी अंदाजपत्रकात नसलेल्या स्थानिक प्रशासकीय खर्चासाठी म्हणून अधिकारी जमीन महसुलाबरोबर काही जादा रक्कम गोळा करीत त्यास 'सादिलवार' अथवा 'महाल सादिरवारीद' म्हणत. या कराची आकारणी कमी दराने पण प्रतिवर्षी केली जात होती. डॉ. अ.स. आळतेकर यांनी 'पश्चिम भारतातील ग्रामीण समाज' या आपल्या ग्रंथात 'सादिलवार' पट्टी हा एक व्यापक स्वरूपाचा कर असून त्यात इनामदारांवरील दुकलपट्टी, मिरासपट्टी, मोहतर्फा, घरटका, पाटदाम, वऱ्हाडटका, शिंगशिंगोटी इत्यादी अनेक करांचा समावेश केला जात होता असे म्हटले आहे; परंतु डॉ. आळतेकर यांचा हा युक्तिवाद बरोबर नाही. कारण त्यांनी सादिलवारच्या अंतर्भूत म्हणून जे कर सांगितले आहेत ते कागदपत्रातून अनेक वेळा स्वतंत्रपणे सादिलवारपट्टीबरोबर आले आहेत. तेव्हा 'सादिलवारपट्टी' ही स्थानिक प्रशासनाचा खर्च भागविण्यासाठी रयतेकडून प्रतिवर्षी शेतसाऱ्याबरोबर वसूल केला जाणारा एक नित्याचा कर असे मानावे लागेल.

खर्चपट्टी : परगण्यात अथवा गावात, रस्ते, पूल अथवा गावकामगार आणि ग्रामसेवक यांना द्यावे लागणारे सर्वमान्य असे हक्क यासाठी लागणारा पैसा गावातूनच कर-रूपाने उभा केला जाई. या सार्वजनिक कामासाठी लागणाऱ्या खर्चापोटी 'खर्चपट्टी' नावाचा कर प्रतिवर्षी रयतेकडून वसूल केला जाई. 'गावखर्च' असाही या कराचा उल्लेख इतरत्र आढळतो.

वराडटका अथवा लग्नटका : गावात लागलेले लग्न अथवा निघालेली लग्नाची वरात ही करपात्र होती. कागदपत्रात 'वराडटका' कराचा उल्लेख असून पाव रुपया 'वराडटका' (लग्नटका) म्हणून काही ठिकाणी वसूल केला आहे.

पाटदाम : ग्रामीण समाजात, उच्चवर्णीय वगळता पुनर्विवाहाची आणि घटस्फोटाची चाल समाजात रूढ होती. अशा प्रकारच्या लग्नाचा 'मोहतूर' म्हणून उल्लेख केलेला आढळतो. सामान्यत: जातपंचायतीच्या संमतीने अशा प्रकारचे विवाह होत असत. 'घटस्फोट'चा उल्लेख 'काडीमोड' म्हणून केला जाई. अशा प्रकारच्या विवाहावर आकारला जाणारा कर म्हणजे 'पाटदाम' होय, आणि त्याचा दर देखील काही ठिकाणी वराडटक्याप्रमाणे पाव रुपया असा आढळतो.

घरटका : हा एक नित्याचा कर असून प्रतिघरटे हा कर लादला जात होता. 'टका' हे एक चांदीचे नाणे असून प्रत्येक घरावर १ टका कर होता असे मानणे योग्य होणार नाही. 'टका' या शब्दाचा अर्थ 'पट्टी' असा घेणे येथे रास्त ठरेल.

तूटपट्टी : कागदपत्रात येणारे 'तूटपट्टी', 'नुकसान पट्टी', 'राखनुकसानपट्टी' (सर्वनाश), अथवा 'गावखर्च तूटपट्टी' हे समानार्थी शब्द आहेत. डॉ. बाळकृष्णांच्या मते वजनमाप करीत असताना येणारी संभाव्य तूट ही अगोदरीच 'तूटपट्टी' म्हणून वसूल केली जात होती. शेतसारा हा धान्याच्या रूपाने वसूल केला जाई. हे धान्य बैलगाडीतून वाहून नेताना काही घस होत असे. हा घसारा भरून काढण्यासाठी जी पट्टी आकारली जाई त्यास 'तूटपट्टी' म्हणत. असे विल्सन यांनी आपल्या शब्दसंग्रहात (glossary) म्हटले आहे. थोडक्यात, धान्य अथवा द्रवपदार्थ यांच्या मूळच्या वजन-मापात, दळणवळणामुळे जो फरक पडत असेल तो भरून काढण्यासाठी वसूल केलेला कर म्हणजे 'तूटपट्टी' असे म्हणता येईल.

कापूरपाईक : कापूर म्हणजे मशाल आणि पाईक म्हणजे सैनिक. कापूरपाईक म्हणजे मशालधारक; आणि या मशालधारकाचा खर्च भागविण्यासाठी लादलेला कर म्हणजे कापूरपाईक. हा कर सर्वत्र नसावा. ज्या गावात अथवा परगण्यात अशा मशालजीची गरज असेल तेथील रयतेकडून हा कर वसूल केला जात असावा.

नफरटका : नफर म्हणजे माणूस. सामान्यत: एका खालच्या पातळीवरील हलक्या प्रतीचे काम करणारा चाकर अथवा गुलाम. नफरटका हा कदाचित अशा प्रकारच्या चाकराकडून अथवा गुलामाकडून त्याच्या मिळकतीच्या प्रमाणात वसूल केलेला कर असावा.

कोतवाली : कसबा अथवा शहरात कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापिण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यावर असे त्यास कोतवाल म्हणत. कोतवालाचा पगार देण्यासाठी नगरवासियांकडून जो कर वसूल केला जात असे त्यास 'कोतवाली' म्हणत. कदाचित करआकारणी आणि वसुली ही दोन्ही कामे कोतवाल स्वत:च करीत असावा. कोतवालाचे जकातीसंबंधीच्या हक्काचा, मागे उल्लेखिलेला, एक अप्रसिद्ध कागद या प्रकरणासोबत जोडला आहे त्यावरून 'कोतवाली'ची कल्पना येईल.

कार इमारती अथवा इमारतपट्टी : सरकारी इमारतीच्या बांधकामासाठी लागणारा खर्च त्या त्या भागातील लोकांच्याकडून वसूल केला जात असे. इमारतबांधणीचा संपूर्ण खर्च अथवा स्थानिक मोलमजुरीवर येणारा खर्च भरून काढण्यासाठी, गावकऱ्यांकडून कररूपाने वसूल केलेली रक्कम म्हणजे कर-इमारती अथवा इमारतपट्टी होय.

गडछावणी : लष्कराच्या तळाची अथवा छावणीची विशेषत: गडावर ठेवावयाच्या सैनिकांच्या निवासाची व्यवस्था करावयाची असेल, तेव्हा या कामाची जबाबदारी गडाच्या परिसरातील अधिकाऱ्यावर पडत असे. या कामासाठी मजुरांची गरज असे. अशा मजुरांची सेवा संपूर्णतया मोफत घेणे शक्य नसे. काही प्रमाणात मजुरी त्यांना देणे भाग असे. वेठबिगारीची पद्धत महाराष्ट्रात पूर्वापार रूढ होती. कोकणातील चौल अधिकाऱ्यांच्या कागदपत्रांवरून या वेठबिगारीबद्दल रयत कशी नाराज होती याची कल्पना येते. कोकणातील रायगड, खांदेरी, कुलाबा, पद्मदुर्ग या किल्ल्यांवरील

वेठबिगारी आपल्याच्याने करवत नाही असा स्पष्ट जबाब रयतेने अधिकाऱ्यांना दिला आहे. एका पत्रात म्हटले आहे,

"अनाडी (उपरे) याचे पाठीसी हमेशा वेठबिगारी लागली आहे ते दुरी केली पाहिजे वेठीकरितां सेताचा राबकस्ट राहाताती व वाडीचे कुपकुडण व झाडांस सेणपाणी होत नाहीं खराब पडतें तरी वेठबिगारीची तसवीस दूर केली पाहिजे" (शि.च.सा. ९:७१; ६३)

अशा परिस्थितीत गडछावणीसाठी वेठबिगार घेणे कठीण पडत असावे. गडावर काम करण्यासाठी काही मजुरी द्यावी लागणारच, मग ती बाजारभावाने असो किंवा कमी भावाने असो याची अधिकाऱ्यांना कल्पना होती, आणि म्हणूनच ही 'गडछावणी' नावाच्या पट्टीची योजना केली असणार. अल्पवेतनावर अथवा विनावेतन काम करणाऱ्या मजुरांना पोटापुरते धान्य द्यावे लागे. त्यास 'अडीसेरी' (२.१/२ शेर) म्हणत. या बिगारांचा खर्च भागविण्यासाठी 'बिगारपट्टी' नावाचा एक कर वसूल केला जात असे. गडावरील तात्पुरत्या उभ्या केलेल्या छावणीसाठी, ज्या मजुरांची योजना केली जात होती त्याच्या वेतनाची भरपाई 'गडछावणी' या नैमित्तिक करातून केली जात असणार.

करसाई अथवा कारसाई : हादेखील प्रामुख्याने गडाच्या संदर्भात विशेषत: कडबा, बागेतील वस्तू, या स्वरूपात वसूल केला जाणारा एक करच होता. गावकरी नजीकच्या गडावर सुरक्षिततेसाठी अवलंबून असत. त्यामुळे या वस्तू ते स्वखुशीने देत असावेत. परगण्याचे अधिकारी गावच्या दौऱ्यावर असत तेव्हा कडबा, खुंट, फळे इत्यादी ज्या वस्तू रयतेकडून घेत त्यालादेखील 'कारसाई' म्हणत. ही एक प्रकारे अधिकाऱ्यांची केलेली सरबराई असे. गावच्या सरकारी इमारतींसाठी शाकारणी करण्यासाठी देखील काही शाकारणीस उपयुक्त अशा वस्तू घेत त्याचाही समावेश या करात केला जाई. 'कारसाई' हा एक जादा स्थानिक कर असावा.

कॅरे नावाचा एक फ्रेंच प्रवासी या काळात रत्नागिरीच्या दौऱ्यावर होता, तेव्हा त्याला खेडनजीक असलेल्या किल्ल्यांच्या दिशेने धान्य वाहून नेणारे अनेक लोक दिसले. तो म्हणतो, माझ्या मार्गावर सुमारे ऐंशी अथवा शंभर माणसांचे स्त्री-पुरुषांचे अनेक थवे पाहून मला आश्चर्य वाटले. प्रत्येकाच्या डोक्यावर, भात अथवा इतर धान्याच्या गोण्या, पेट्या होत्या; आणि निरनिराळ्या दिशेने ते येत होते. मी त्यांना विचारले, हे अन्नधान्य घेऊन तुम्ही कोठे चाललात. ते म्हणाले की, आम्ही या वस्तू किल्ल्यावर असलेल्या शिवाजीच्या सैनिकांसाठी घेऊन जात आहोत, कारण ते सैन्य आमच्या गावांचे रक्षण करतात. सुमारे पंधरा कोसाच्या परिसरातील गावांवर असे धान्य पुरविण्याची जबाबदारी टाकलेली असे. (ॲबे कॅरे, खंड १, पृ. १९७) ॲबे कॅरेने ज्या गडांचा उल्लेख केला आहे ते खेडच्या पश्चिमेस सुमारे १२ मैलांवर असलेला 'रसाळगड' आणि संगमेश्वरच्या पश्चिमेस सहा मैलांवरील प्राचीगड तथा उचितगड असावेत. 'गडछावणी' आणि 'कारसाई' हे दोन उपकर (levy) समजण्यास ॲबे कॅरेचे

निवेदन उपयुक्त आहे.

नदीटोकरा : नदी पार करून जाण्यासाठी जे सरकारी वाहन वापरले जाई त्यावर द्यावयाचे शुल्क म्हणजे 'नदीटोकरा' होय. टोकरा ही एक छोटीशी नौका असे. 'नदीटोकरा' हा सरकारने बसविलेला एक प्रकारचा पथकर असे मानावयास हरकत नाही. मेस्तकात, बोटी, नौका, सौदागर, टांकसाळ इत्यादींपासून सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नाचा उल्लेख 'हांसील अंमल' या सदराखाली केला जातो.

कर्जाची पट्टी : सरकारी कर्जे फेडण्यासाठी लोकांकडून कररूपाने रक्कम वसूल केली जात असे, ती कर्जपट्टी होय. याची फेड करणे हे सरकारचे काम असे.

कापड पट्टी : कापडविक्रेत्यावर अथवा निर्मात्यावर बसविलेली पट्टी ती 'कापडपट्टी' असावी.

बोखार टका : बुखार म्हणजे गावात पसरणारी रोगराई. या सांसर्गिक रोगापासून गावचे रक्षण करण्यासाठी येणारा खर्च 'बोखार टका' या करातून वसूल केला जाई.

गादीतंबाखू : गादीतंबाखू कशा प्रकारचा कर होता हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. गादी याचा शब्दश: अर्थ मक्ता. एखाद्या वस्तूच्या विक्रीचे सर्वाधिकार असा होतो. तंबाखूविक्रीचा एकाधिकार देण्यासाठी आकारलेले परवाना शुल्क म्हणजे 'गादीतंबाखू' असा या शब्दाचा अर्थ लावता येईल. गादी याचा अर्थ किराणाभुसार मालाचे दुकान. अशा दुकानात तंबाखूची विक्री होत असेल, त्यावर आकारलेला स्वतंत्र कर म्हणजे गादीतंबाखू असे म्हणता येईल.

ग्रामीण जीवनात रूढ असलेला 'गादी' या शब्दाचा आणखी एक अर्थ म्हणजे गावची 'चावडी.' चावडीला भेट देणाऱ्या सरकारी अथवा परगण्याच्या अधिकाऱ्यांची धूम्रपानाची सोय करण्यासाठी रयतेकडून काही वेळा तंबाखू वसूल केली जात असे. गादी तंबाखू हा उपकर, वस्तूच्या अथवा पैशाच्या रूपाने गोळा करण्याची प्रथा रूढ झाली असावी. सनदापत्रातून 'तंबाखू'चा उपकर म्हणून अनेक उल्लेख आढळतात. तंबाखू हा एक सरकारी हक्क असावा असे 'तंबाखू'च्या कागदपत्रातील उल्लेखावरून वाटते. यावरून 'गादीतंबाखू' हा प्रथम प्रासंगिक असलेला उपकर नंतरच्या काळात नित्याचा कर बनला असावा.

बेलेकटी : 'गादीतंबाखू' प्रमाणेच समाधानकारकरीत्या ज्याचे स्पष्टीकरण करता येत नाही अशी एक वसुली म्हणजे 'बेलेकटी', 'बिलिकटी', अथवा 'बेलकटी' होय. डॉ. सेन यांनी 'बालकटी' असे या शब्दाचे वाचन करून, सुगीच्या सुमारास जी पिकांची कापणी (बालकटाई) होत असे, तेव्हा वसूल केलेला कर म्हणजे बेलेकटी असे म्हटले आहे. डॉ. सेनांचे हे मत डॉ. बाळकृष्णांनीही मान्य केले आहे.

परंतु 'बेलेकटी'चा अर्थ समाधानकारक वाटत नाही. हा कर कोण भरत हे अर्थातून ध्वनित होत नाही. 'बेल' हा कानडी शब्द असून, मोकळे रान, मैदान असा त्याचा अर्थ होतो. 'कट्टी' म्हणजे 'कट्टा', अथवा 'मंचक'. 'बेलेकटी' याचा अर्थ मोकळ्या रानात उभे केलेले कट्टे अथवा मंचक असा होता. बाजाराच्या दिवशी जे परकीय व्यापारी

धंद्याच्या दृष्टीने गावात येत असत, त्यांना हे कट्टे भाड्याने दिले जात होते. हे भाडे अथवा शुल्क म्हणजे 'बेलेकटी' हा कर असावा असे वाटते.

गावकऱ्यांवरील अन्य ओझे : स्थानिक खर्च भागविण्यासाठी गावकऱ्यांकडून नाना मार्गाने पैसा वसूल केला जात असे. उल्फापट्टी, जंगमपट्टी, मेजवानीपट्टी, बकरपट्टी, तोरणभेट, दसरा पट्टी, गावखंडी, ठाणा पट्टी या गावकऱ्यावर बसविलेल्या प्रासंगिक पट्ट्या होत्या. मेस्तकात या पट्ट्यांचा उल्लेख 'बाजे महाल पटिया' असा केला आहे.

उल्फापट्टी : उल्फा याचा अर्थ 'शिधा' असा आहे. सरकारी अधिकारी अथवा इतर कोणी महत्त्वाची व्यक्ती गावात आली असेल, अथवा त्यांच्या गावातून जात असेल तर त्यांची सरबराई गावातर्फे केली जात असे. या सरकारी सरबराईसाठी गावकऱ्याकडून धान्य अथवा इतर खाद्यपदार्थांच्या वस्तू गोळा केल्या जात, त्यास 'उल्फापट्टी' म्हणत. या वसुलीस सरकारी मंजुरी नंतर घेतली जात असावी.

अठराव्या शतकात 'उल्फापटी'च्या स्वरूपाची आणखी एक वसुली गावकऱ्याकडून केली जात होती ती म्हणजे 'उचापत'. शिवकालांतही तशी वसुली केली जात असावी, पण तशी कागदपत्रे मिळत नसल्याने ठोसपणे अशा वसुलीचा उल्लेख येथे करता येत नाही. 'उचापत' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या वसुलीचा तपशील ज्या कागदात आढळतो त्यास उचापत झाडा म्हणतात. 'उचापत' या शब्दाचा रूढार्थ आणि ऐतिहासिक कागदपत्रात हिशोबाच्या संदर्भात येणारा अर्थ यात महदंतर आहे. कागदपत्रात गावच्या खर्चासाठी उधारीने आणलेल्या वस्तू अथवा काढलेली कर्जाऊ रक्कम अशा अर्थाने हा शब्द येतो. गावच्या प्रतिष्ठेसाठी काही खर्च अनपेक्षितपणे करावे लागत. तेव्हा प्रथम खर्च करून नंतर सरकारी मंजुरी मिळविली जात असे. या अनपेक्षित घडलेल्या खर्चाचा तपशील असलेल्या कागदास 'उचापत झाडा' म्हणत. (ऐ.सं.सा. खंड १४ : उचापत, पृ. ६१-७०)

जंगमपट्टी : जंगम हा लिंगायत लोकांचा पुजारी. या पुजाऱ्याच्या योगक्षेमासाठी गावातून जी वसुली केली जात असे ती 'जंगम पट्टी' होय. याखेरीज खेड्यातील लिंगायतांच्या घरी सोमवारी आणि शिवरात्रीसारख्या सणांच्या दिवशी 'बेलाची पाने' टाकून हा काही शिधा गोळा करीत असे. 'जोशी' नावाचा गावचा बलुतेदार ब्राह्मणदेखील वार्षिक बलुत्याबरोबरच आपल्या गावकऱ्यांची काही प्रासंगिक धर्मसेवा करून मूठभर धान्याची कमाई करीत असे.

दसरापट्टी : दसरापट्टीचा संबंध रब्बी पिकावरील शेतसाऱ्याशी काही वेळा जोडला जातो. मोल्सवर्थ आणि विल्सन या दोन्ही कोशकारांनी या अर्थाबरोबरच आणखी एक अर्थ दिला आहे. तो म्हणजे दसऱ्याचा सण साजरा करण्याकरिता देवस्थानाला दिलेला वसुलीचा अधिकार. दसरा हा एक सार्वजनिक उत्सव असे. सीमोल्लंघन करून आपट्याची पाने- (सोने) - लुटून आणण्याचा कार्यक्रम मोठ्या समारंभाने गावकरी पार पाडीत. या सार्वजनिक समारंभासाठी प्रत्येक घरातून कुवतीप्रमाणे

वर्गणी गोळा केली जाई. त्या वर्गणीस 'दसरापट्टी' म्हणणे योग्य होईल. दसरा बकरे, दसरा कोंबडे हे जे वतनदारचे अथवा गावचे हक्क म्हणून वसूल केले जात असत ते या दसरापट्टीच्या अंतर्गत होते.

मेजवानी पट्टी : गावात आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना अथवा सत्पुरुषांस मेजवानी देण्याची प्रथा काही गावात असे. त्यासाठी केलेला वसूल म्हणजे 'मेजवानी पट्टी'. 'उल्फापट्टी' अथवा 'उचापत' प्रमाणेच गावकऱ्यांकडून सार्वजनिक कामासाठी केलेली ही वसुली होती. डॉ. सेनांनी ही पट्टी कोणाकडून आणि कोणत्या निमित्ताने वसूल केली जात होती हे समजत नाही असे म्हटले आहे; परंतु वरील स्पष्टीकरणावरून या दोन्ही शंका दूर व्हाव्यात. प्रारंभी ही पट्टी प्रासंगिक असेल, पण सरकारी अधिकारी अथवा साधुसंताच्या भेटी ही काळाच्या ओघात नित्याचीच बाब झाल्याने मेजवानी पट्टी हीदेखील नित्याची वसुली बनली असावी.

तोरणभेटी : गावास जेव्हा थोर व्यक्ती भेट देत, तेव्हा त्यांच्या स्वागतासाठी वेशीवर कमानी चढवून तोरणे बांधीत. कमानी, तोरणे इत्यादी सजावटीसाठी येणारा सर्व खर्च गावकऱ्यांकडून वसूल केला जाई, त्यास तोरणभेटी म्हणत. 'भेटी' अथवा 'भेटपट्टी' आणि 'तोरणभेटी' हे सारे शब्द समानार्थी असावेत.

गावटका : गावकऱ्यांकडून 'गावटका' म्हणून काही ठिकाणी वसुली केली जात होती, पण तिच्या मागचा हेतू कळण्यास मार्ग नाही. काही वेळा गावच्या सार्वजनिक खर्चासाठी केलेली वसुली निरनिराळ्या शब्दात व्यक्त केली जात असे. 'गावटका' हा त्यातलाच एक प्रकार असावा.

ठाणपट्टी अथवा ठाणेपट्टी : ठाणा याचा मूळ अर्थ ठिकाण असा आहे. परंतु तो शब्द सरकारी ठाणे, लष्करी ठाणे, पोलिस ठाणे अशा संदर्भात कागदपत्रात वापरला जातो. तेव्हा जेथे असा शब्दप्रयोग आला असेल तेथे त्याचा अर्थ त्या गावावर अथवा परगण्यावर ठाण्याचा खर्च भागविण्यासाठी बसविलेली पट्टी म्हणजे 'ठाणेपट्टी' असा होतो.

मोहीमपट्टी : 'मोहीमपट्टी', 'मोहीम खर्च', 'जंगपट्टी' हे समानार्थी शब्द आहेत. मोहिमेचा खर्च भरून काढण्यासाठी गावकऱ्यांना लष्करी स्वारीच्या वेळी हा प्रासंगिक कर द्यावा लागे. प्रत्येक गावातून मोहिमेसाठी किती रक्कम उभी करावयाची याचे अंदाजपत्रक केले जाई आणि गावकामगारांना, त्यांच्या गावातून ती 'मोहीम-पट्टी' वसूल करण्याचा आदेश दिला जाई. डॉ. बाळकृष्णांनी 'मोहीमपट्टी' आणि 'जंगपट्टी' यांत फरक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते 'मोहीमपट्टी' ही आक्रमण आणि प्रतिकार अथवा संरक्षण या दोन्ही कामासाठी वसूल केली जात असे, तर 'जंगपट्टी' ही 'परचक्र' आले असता स्वप्रदेशाचे केवळ रक्षण करण्यासाठी केलेली वसुली ही जंगपट्टीखाली येत असे.

बकरापट्टी : सैनिक लढाईच्या हंगामात गावकऱ्यांकडून बकऱ्याची मागणी करीत, आणि ती गावाकडून पुरविली जाई. बकरापट्टीचा उल्लेख सामान्यतः लष्करी

हालचालीच्या संदर्भात येतो.

जमातीवरील कर : येथवर व्यक्तीकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या वसूल केलेल्या करांचा आपण विचार केला; पण काही वेळा समाजावर कर बसविलेला आढळतो. सोलापूर भागातील लिंगायत जमातीकडून 'गणाचारी' नावाचा एक कर वसूल केला जात होता; परंतु काही काळ हा कर तहकूब करून १६४७ साली लिंगायत समाजावर 'खानखुशी' नावाचा कर बसविला. लिंगायत समाजाचे त्यांच्या उत्पन्नानुसार ४ वर्ग कल्पिले असून, पहिल्या वर्गास तीन चवल, दुसऱ्या वर्गास दोन चवल, तिसऱ्या वर्गास दीड चवल आणि चौथ्या वर्गास एक चवल असा कर द्यावा लागे. आठ चवल म्हणजे एक होन होत असे. १६४७ साली सोलापूर हे विजापूरच्या आदिलशाहीत होते. जिजियासारखा हा गणाचारी अथवा खानखुशी कर तेथे बसविला असण्याची शक्यता आहे; परंतु या वसुलीचे स्वरूप प्रासंगिक असावे. (ऐ.फा.सा. ५ : ७१, पृ. ७१ पृ. १४६)

मुसलमानी कर : सतराव्या शतकात मराठी भाषिकांचा बराच मुलूख मुसलमानी राजवटीखाली होता. या मुसलमानी मराठी मुलखात काही खास मुसलमानी कर बसविले होते. मराठी अमलाखाली जेव्हा यापैकी काही मुलूख आला तेव्हा मुसलमान जमातीला उपयुक्त असे काही कर तसेच चालू ठेवले होते तर काही रद्द करण्यात आले होते.

नाशिक, अहमदनगर हा मराठी प्रदेश मुघलांच्याकडे होता आणि मुसलमान व्यापारी आणि हिंदू व्यापारी यावर आकारलेल्या जकातीच्या दरात विषमता होती असे काही अप्रकाशित कागदपत्रांवरून इतिहाससंशोधक ग. ह. खरे यांनी मांडले आहे. बाजारात विक्रीसाठी आणलेल्या वस्तूंच्या किमतीवर हिंदूंना ५ टक्के तर मुसलमानांना २.५ टक्के कर आकारावा असा सरकारी आदेश होता. ''हिंदू दर सदे (शेकडा) रु॥ ५ मुसलमान दर सदे २॥'' इतर जनावरांवर कर असला तरी 'गाईस हसील नाही' असा स्पष्ट उल्लेख या आदेशात आहे. गायीवर कर का नसावा यासंबंधी ग. ह. खरे यांचा तर्क असा की, ''ईद व इतर सणावारांस बळी देण्यासाठी गाय स्वस्तात मिळावी हा त्याच्या मुळाशी हेतू असला पाहिजे'' हे स्पष्टीकरण फारसे पटण्यासारखे नाही. गाय हे हिंदूंचे पवित्र दैवत असल्याने आणि हिंदू राजवटीत गाय ही करमुक्त असल्याने मुसलमानांनी ती प्रथा तशीच चालू ठेवली असेल. 'गाईस हसील नाही' या आदेशामागे हिंदू समाजाला खूश करण्याचा राज्यकर्त्यांचा हेतू असण्याची शक्यता पटण्यासारखी आहे.

हिंदूस 'पचोतरा', मुसलमानास 'अडिचोतरा' जकात औरंगजेबाच्या राज्यात सर्वत्र रूढ होती, असे त्याच्या १६६५ च्या फर्मानावरून दिसते; परंतु मुसलमान व्यापाऱ्याकडून २.५ टक्के जकात घेणेसुद्धा धर्माला धरून नाही असे वाटल्याने १६६७ साली दुसऱ्या एका फतव्याने औरंगजेबाने मुसलमान व्यापाऱ्यांना जकात आकारणीतून पूर्ण मुक्त केले. या सवलतीचा फायदा हिंदू-मुसलमान व्यापारी परस्परांच्या संगनमताने घेऊ

लागल्याचे सरकारच्या लक्षात आले. मुसलमान व्यापारी जकातमुक्त झाल्याने हिंदू व्यापारी आपला माल मुसलमान व्यापाऱ्यांमार्फत विकून वाचलेला कर आपसात वाटून घेऊ लागले. यावर आळा घालण्यासाठी औरंगजेबाने १६८२ च्या फर्मानाने मुसलमान व्यापाऱ्याकडून पूर्ववत २॥ टक्के विक्रीकर घेण्यास सुरुवात केली. (ऐ.सं.निबंध खंड ११, त्रैमासिक वर्ष ५१, पृ. ७८-८०)

शिवकालीन कागदपत्रात ईदसुभराती, बकरीद, हुमायूनपट्टी, कोंबडीपट्टी, उरूस-पट्टी, भूत फरोशी, शिक्केपट्टी इत्यादी कर त्यांच्या नावावरूनच मुसलमानी आहेत हे समजते.

ईदसुभराती : हा कर वस्तुरूपाने गावच्या तेल्याकडून मशिदीच्या रोषणाईसाठी वसूल केला जात असे. मशिदीची देखभाल करणाऱ्या काझीच्या सनदेत त्या कराचा उल्लेख आढळतो. बकरीद आणि ईदसुभराती हे दोन्ही कर ईदच्या संदर्भातील आहेत.

हुमायूनपट्टी अथवा कार-इ-हुमायुनी : राजघराण्यातील व्यक्तींच्या वाढदिवसाच्या अथवा काही मुसलमानी सणांच्या निमित्ताने हा पातशहाने बसविला असावा.

कोंबडीपट्टी : ही हिंदूंच्याकडून सक्तीने अथवा धमकी देऊन वसूल केलेली कोंबडी अथवा कोंबड्या असाव्यात असे कोशकार मोल्सवर्थ म्हणतो. कोंबडीऐवजी कदाचित तिच्या किमतीएवढा पैसा कर म्हणून घेतला जाण्याची शक्यता आहे.

उरूसपट्टी : मुसलमानी सत्पुरुषाच्या दर्ग्याला अर्पण करण्याच्या, पूजा बांधण्याच्या उत्सवाला उरूस म्हणतात. ज्या गावात हा उरूस भरत असे, त्या गावातील लोकांकडून ऊरसाच्या खर्चासाठी जी रक्कम वसूल केली जाते ती 'उरूस पट्टी' होय. प्रारंभीच्या काळात हा कर मुसलमानी राजवटीत सुरू झाला असेल, पण पीराच्या पूजनाने आपल्या मनोकामना पूर्ण होतात अशी श्रद्धा जनमानसात निर्माण झाल्याने मुसलमानी सत्ता नष्ट झाल्यावरही मराठी राजवटीत ही 'उरूसपट्टी' जारी राहिली असावी. आजदेखील मुसलमानांच्या सणात विशेषतः ऊरसांत हिंदू मोठ्या संख्येने भाग घेताना दिसतात.

भूतफरोशी : भूतफरोशी याचा एक अर्थ मूर्ती विकणारा. 'भूतफरोशी' हा कर मूर्ती विकणाऱ्या व्यक्तीकडून वसूल केला जात असावा, असे मानले जाते. मुसलमानी राजवटीत हा कर प्रचलित होता. मूर्तीमध्ये केवळ देवतांच्या प्रतिकृती नव्हे, तर विविध प्रकारची खेळणी असण्याचा संभव आहे. भूतफरोशी हा एक व्यवसायकर असावा असा अर्थ केला तर मुसलमानी राजवटीत सुरू झालेला हा कर शिवाजीच्या राज्यातही प्रचलित असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

पण नव्याने उपलब्ध झालेल्या कागदपत्रांवरून या कराच्या स्वरूपाविषयी अधिक विवेचन करणे शक्य झाले आहे. हा कर साधारणपणे निजामशाहीच्या अथवा थोड्या नंतरच्या काळातील कागदपत्रातून आढळतो. येथे अशी एक रास्त शंका उत्पन्न केली जाते आणि ती म्हणजे मुसलमान हे मूर्तिपूजक नव्हे, तर मूर्तिभंजक म्हणून ओळखले

जात असत, तेव्हा अशा या मुसलमानी राजवटीत मूर्ती तयार करण्याची परवानगी दिली जात असेल आणि या व्यवसायाची इतकी भरभराट होऊ दिली असेल की, ज्यामुळे या धंद्यावर एक स्वतंत्र कर बसविण्याचा सरकारने विचार करावा हे संभवत नाही. अर्थात येथे असाही युक्तिवाद करता येईल की, अहमदनगरच्या निजामशाहीतील कागदात जेथे 'भूतफरोशी'चे उल्लेख आढळतात, तेथे मराठा पक्षाचे प्राबल्य होते, तेथील सुलतान मुस्लीमधर्मी असला तरी मूळचा ब्राह्मण कुलातील होता. त्यामुळे मूर्तिविक्रीवर बंधन घालणेही संभवत नाही. कदाचित हिंदू प्रजेची मर्जी सांभाळण्याकरिता सुलतानाने या व्यवसायावर बंधन घातले नसेल.

ग.ह. खरे यांना पेशवेदप्तरात जे निजामशाहीतील अप्रसिद्ध कागद सापडले त्यात भूतफरोशी करापासून कमावीस किती झाली याचा तपशील दिला आहे. कसबे भिंगारच्या तपशिलावरून, गावकऱ्यांवर १२ रुके आणि बाहेरील व्यक्तींवर रुके २४ असा कर बसविला असून, मोकदम व मानकरी यांना यातून वगळले आहे. अहमदनगर, भिंगार, नादेगाव, चांदोरी, भोगूर, देवळाली या ठिकाणच्या उपलब्ध कागदात भूतफरोशीचा दर १२ रुके दिला आहे. फक्त भिंगारच्या कागदात गावकरी आणि बाहेरील असा उल्लेख केला आहे. या कागदावरून खरे यांनी काढलेले निष्कर्ष असे- हा कर हिंदू मनुष्याकडून वसूल केला जात होता, तो बाहेरच्यांकडून गावकऱ्यांपेक्षा दुप्पट दराने वसूल केला जात होता आणि या कराचा देवाच्या मूर्तीशी काही संबंध होता. सोमनाथावर स्वारी करणारा महंमूद गझनी म्हणत असे, "मी बुत्फरूश नसून बुत्शिकन आहे" या दंतकथेचा आधार घेऊन बुत्फरोशी म्हणजे मूर्तिविक्या असा अर्थ गृहीत धरून 'बुत्फिरोशी' हा मूर्तिविक्रीवर बसविलेला कर असा अंदाज केला जात होता, तो चुकीचा आहे. (ऐ. सं. निबंध खंड ११, पृ. ७६-८०)

विल्सन यांनी आपल्या शब्दकोशात या मूळ फारसी शब्दाची फोड करून बुत् म्हणजे मूर्ती (idol) आणि 'पर्वरिश' म्हणजे हृदयस्थ, प्रेमाचे स्थान (cherishing) असा दिला आहे. डॉ. खरे यांनी पर्वरिशचा अर्थ उपासना असा घेतला असून, भूतफरोशीचा अर्थ मूर्तीची उपासना करण्यासाठी द्यावयाचा (अर्थात हिंदूंनी) कर असा लावला आहे आणि निजामशाहीतील उपलब्ध कागदांवरून तो अर्थ 'पक्का होत आहे' असा निष्कर्ष काढला आहे.

विल्सन यांनी दिलेल्या स्पष्टीकरणावरून 'बुत्फरोशी' म्हणजे गावच्या संरक्षक (tutelary) देवतेच्या उत्सवासाठी होणाऱ्या खर्चाची गावच्या व्यावसायिकांकडून करद्वारे केलेली भरपाई असा होतो. (A tax levied on different trades in a town or village to defray the cost of celebratins the worship of tutelary divinity) या शब्दाचा पर्यायी अर्थ देताना विल्सनच्या मते, गावच्या कनिष्ठ जातींच्या सणावर आणि त्या वेळी वाजविल्या जाणाऱ्या ढोलासारख्या वाद्यावर जो कर बसविला जात होता त्यास बुत्फरोशी म्हणत.

१६३६ च्या चौल मामल्यातील एका मिळकतीच्या विक्रीच्या कागदात "भूतफरोशी

व कुलबाब व कुलकानू व पटीपायपोसी...", "मामले मजकूर व महाल मजकूर व भूतफरोशी कुलबाब लारि १५" असा उल्लेख आला आहे. (शि.च.सा. ९ : ३६) सदरहू विक्रीखत चेऊल मामल्यातील केहीम महालाच्या नारोबा गणोबा बरवा याने चेऊल मामल्यांच्या आपाजी ताऊजी देसाई व देसकुलकर्णी यांना करून दिले आहे आणि त्यात असे म्हटले आहे की बरवा याचेकडे, अष्टागरातील करदीळवाडीच्या काही पट्ट्यांच्या वसुलीचा मक्ता होता, त्याचे १५ लारी दरसाल नव्या मालकाने केहीम महालाच्या कचेरीत भरणे. पट्ट्यांची जी यादी दिली आहे त्यात 'भूतफरोशी'चा उल्लेख आहे. निजामशाहीतील भूतफरोशी कमाविसीचा तपशील प्रारंभी दिलेला आहे. तसेच विल्सन ग्लॉसरीच्या आधारे भूतफरोशीचा ग.ह. खरे यांनी लावलेला अर्थ आणि विल्सनचे स्पष्टीकरण या सर्वांचा एकत्रितपणे विचार करता पुढील निष्कर्ष संभवतात.

१. भूतफरोशी हा कर उपलब्ध प्रकाशित आणि अप्रकाशित साधनांवरून एक प्रकारचा धार्मिक स्वरूपाचा कर असावा; आणि तो एखाद्या देवतेच्या उत्सवाच्या प्रसंगी, नवस फेडण्याकरिता जे गावचे आणि बाहेरचे लोक येत असत त्यांच्याकडून धार्मिक विधीच्या संदर्भात वसूल केला जात असावा आणि तो मुसलमानपूर्वकालीन असावा. मुसलमानी अमलात प्रारंभी स्थानिक कर अशा स्वरूपाच्या कराला राजकीय पातळीवर नेण्यात आले तेव्हा त्याचे नाव 'बुत्फरोशी' असे झाले असावे; पण मुसलमानपूर्वकाळात याचे नाव काय होते हे कागदपत्राअभावी सांगता येत नाही. विल्सन यांनी या कराचा जो अर्थ लावला आहे; आणि ग. ह. खरे यांनी जो मान्य केला आहे तो ग्राह्य मानून उपासकाकडून उत्सवप्रसंगी धार्मिक कृत्याकरिता वसूल केलेले शुल्क म्हणजे भूतफरोशी असे म्हणता येईल.
२. गावकरी आणि बाहेरील असा फरक या कराबाबत केला आहे. गावकरी यांना ज्या धार्मिक कृत्यासाठी १२ रुके द्यावे लागत, त्यासाठी बाहेरील उपासकांना २४ रुके द्यावे लागत असत. असा फरक असण्याचे कारण या कामासाठी ज्या स्थानिक कारागीर म्हणजे कुंभार अथवा नापित यांची सेवा लागे, त्यांना गावकऱ्यांकडून 'बुलता' मिळत असे, पण बाहेरील लोकांना ही सवलत नसे. त्यामुळे त्यांना पूर्ण कर द्यावा लागे.
३. हा कर अर्थातच हिंदू उपासकांकडूनच वसूल केला जात असे. 'फरोशी' याचा अर्थ विक्रेता असा प्रस्तुत संदर्भात लागू पडत नसल्याने हा व्यवसाय कर होता असे म्हणता येणार नाही. तसेच हा 'यात्रा'करही मानता येणार नाही. कारण 'यात्राकर' गावकऱ्यांवर बसविला जात नाही.
४. विल्सनने दिलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे निरनिराळ्या व्यावसायिकांकडून (different trades) वसूल केलेला कर असा अर्थ घेतला तर गावचे मोकदम, मानकरी, सेटे, महाजन, पटवारी, भट व मुसलमान यांची या करापासून मुक्तता केली आहे आणि बाकी लोकांस गावकरी १२ व बाहेरील २४ असा दर दिला आहे.

त्यावरून विल्सन म्हणतो त्याप्रमाणे हा केवळ व्यावसायिकांवरील कर नाही, तर सर्व लोकांवरचा आहे.

५. चौदाव्या शतकातील एका कागदात गावच्या दोन जुन्या जत्रांचा उल्लेख केला आहे आणि ज्या जत्रांच्या वेळी जी कमाई झाली त्यात भूतफरोशीचा उल्लेख आला आहे.

६. वरील विवेचनावरून असा निष्कर्ष काढता येईल की, 'भूतफरोशी' हा एक प्रकारचा धार्मिक स्वरूपाचा कर असून मुसलमानी राजवटीत, गावच्या जत्रेच्या खर्चासाठी गावकऱ्यांकडून १२ रुके आणि बाहेरून येणाऱ्या लोकांसाठी २४ रुके कररूपाने वसूल केले जात त्यास भूतफरोशी म्हणत. मध्ययुगीन शिरस्त्याप्रमाणे मोकदम आणि इतर मानकरी यांना या कराच्या वसुलीतून वगळले आहे. तसेच जत्रा ही प्रामुख्याने हिंदूंची असल्याने मुसलमान जमातीस तो कर माफ केला आहे.

थोडक्यात, मुसलमानी राजवटीत गावच्या जत्रांच्या खर्चासाठी काही हकदार व मानकरी आणि मुसलमान जमात वगळता गावकरी आणि इतर यांच्याकडून जी रक्कम करद्वारे वसूल केली जात होती, त्या करास 'भूतफरोशी' म्हणत.

अर्थात, वरील सारे विवेचन 'फरोशी'चा अर्थ 'पर्वरिश' असा धरून केला आहे; परंतु 'फरोशी' या फारसी शब्दाचा अर्थ 'विक्रेता' असा केला तर 'भूतफरोशी' म्हणजे मूर्तिविक्या असा करावयास हरकत नाही. आणि त्या मूर्ती देवांच्या असोत, खेळणी असोत अथवा शिल्पाकृती असोत, त्या उत्पादित वस्तूंवर कर आकारणे स्वाभाविक वाटते. मध्ययुगीन परंपरेला धरून, मुसलमानी राजवटीत मुसलमानांना सवलती मिळणे आणि स्थानिक परंपरेनुसार, गावचे व्यापारी, बाहेरचे व्यापारी, जुने (कदीम) व्यापारी, नवे व्यापारी (जदीद) असे फरक करणे हेही स्वाभाविक वाटते. अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात चौदाव्या शतकात शिल्पकलेचे मोठे केंद्र होते, असे अलीकडील संशोधनावरून सिद्ध झाले आहे. पाथर्डी तालुक्यातील भालगाव, एकनाथवाडी, मुंगुसवाडी या परिसरात अहमदनगर जिल्हा संशोधक मंडळाच्या संशोधकांना जे काही शिल्पाकृतींचे अवशेष सापडले त्यावरून शिल्पाकृती तयार करणे, त्या विकणे हा व्यवसाय येथे मोठ्या प्रमाणावर असला पाहिजे. अशा मूर्तिकारांवर निजामशाही राजवटीत 'व्यवसाय कर' बसविणे अगदी स्वाभाविक वाटते.

अहमदनगरच्या निजामशाही राजवटीत रूढ असलेला 'भूतफरोशी' हा कर म्हणजे या मूर्तिकारांवरील कर असावा. मूर्ती बनविणारे व विकणारे कारागीर हे कदाचित मूळचे हिंदू असावेत; आणि आपला घराण्याचा व्यवसाय त्यांनी धर्मांतरानंतरही चालू ठेवला असावा. धर्मांतरामुळे त्यांना 'मुसलमान' म्हणून काही खास सवलती मिळाल्या असतील.

वरील विवेचनावरून 'भूतफरोशी' हा नवस फेडण्यासाठी आकारलेला एक स्थानिक कर असावा, तसेच तो मूर्ती, खेळणी विकणाऱ्या व्यावसायिकांवरही आकारला जात

असावा. यावर अधिक कागदपत्र उपलब्ध झाल्यावरच यासंबंधी नेमके विधान करता येईल.

मुलाणसारा : गावच्या मशिदीची देखभाल करण्यासाठी नेमलेला सेवक म्हणजे मुलाणा. मुसलमानांच्या कबरस्थानाची व्यवस्था तो पाहत असे व त्या जमातीसाठी सणाच्या दिवशी कसायाचे कामही करीत असे. या मुलाण्याच्या योगक्षेमासाठी गावातून दर चावरामागे १२ रुके वसूल केले जात. या वसुलीस मुलाणसारा म्हणत. मुलाणा हा ग्रामव्यवस्थेतील एक घटक गणला जात असे; आणि त्याला 'बलुतेदार' मानले जात होते. गावच्या पंचायतीत तो भाग घेत असे आणि निवाडापत्रावर आपले नाव नोंदताना 'सुरा'ही व्यावसायिक खूण इतर बलुतेदारांप्रमाणे निशाणी म्हणून वापरीत असे. निझामी कागदपत्रांवर तशी ती दाखविली जात असे. मुलाणसारा हा कर कदाचित मुसलमानी राजवटीत रूढ झाला असेल; पण गावची मुसलमान वस्ती आणि त्या जमातीस लागणारी सेवा यांचा विचार करून मराठी राजवटीत 'मुलाणा' ग्रामीण समाजाचा एक घटक म्हणून मान्यता पावला आणि 'मुलाणसारा' हा कर ग्रामवासियांकडून वसूल केला जाऊ लागला.

शिक्केपट्टी अथवा शिक्के बादशाही : शिक्का म्हणजे राजमुद्रा आणि तो शिक्का एखाद्या दस्तऐवजावर हवा असेल तर त्यासाठी मोजावे लागणारे शुल्क म्हणजे शिक्कापट्टी. नावावरून हा कर जरी मुसलमानी असला तरी मराठी राज्यात देखील 'शिक्कामोर्तबा'साठी व्यक्तीला काही किंमत मोजावी लागत असणारच. त्यामुळे शिवकालातही ही प्रथा रूढ असावी.

गजपट्टी : या कराचा अर्थ लावणे थोडेसे कठीण आहे. गज म्हणजे हत्ती, पण महाराष्ट्रात या प्राण्यावर कर बसविणे संभवत नाही. 'गज' हा फारसी शब्द 'गझ'चा अपभ्रंश असावा. 'गझ' म्हणजे लांबी मोजण्यासाठी- विशेषतः कापडाची लांबी, रुंदी वापरावयाची बहुधा लोखंडाची बनविलेली मोजपट्टी. मुसलमानी राज्यात, नवा राजा तख्तावर आला की नवी गझपट्टी बाजारात येई. कारण रूढीप्रमाणे गझपट्टीची लांबी नव्या राजाच्या हाताच्या लांबीप्रमाणे निश्चित केली जात असे. गझपट्टी हा नवीन मोजपट्टीचा खर्च भरून काढण्यासाठी बसविलेला एक प्रासंगिक स्वरूपाचा कर असावा. करांच्या बाबतीत असे म्हणता येईल की, सुरुवातीस प्रासंगिक अथवा नैमित्तिक म्हणून बसविलेले कर कालांतराने नित्याचे कर बनतात. गजपट्टी हा एक त्यातलाच प्रकार असावा.

धार्मिक कर-सिंहस्थपट्टी : सिंहस्थाची पर्वणी १२ वर्षांतून एकदा येते. अशा सिंहस्थाच्या काळात गोदावरी नदीकाठी वसलेल्या नाशिक या तीर्थक्षेत्रात लोकांची मोठी गर्दी होत असे. गोदावरीस मराठी माणूस गंगा मानतो आणि सिंहस्थ पर्वणीच्या काळात गोदामातेच्या पवित्र जळात स्नान करण्यासाठी अनेक यात्रेकरू ठिकठिकाणाहून येतात. या मेळाव्यास 'कुंभमेळा' म्हणतात आणि ही परंपरा नाशिक येथे अद्याप टिकून आहे. साधारणपणे एक वर्ष यात्रेकरूंची या तीर्थक्षेत्रासाठी

ये-जा चालू असते. स्थानिक लोक वगळता सिंहस्थाच्या काळात नाशिक क्षेत्राला भेट देणाऱ्या हरएक यात्रेकरूला जो यात्राकर द्यावा लागत असे त्यास सिंहस्थपट्टी म्हणत. शिवकालात ही प्राचीन परंपरा चालू असणार आणि सिंहस्थपट्टी वसूल केली जात असणार असे मानावयास हरकत नाही.

निपुत्रिक : ज्या मालमत्तेवर कोणीही हक्क सांगण्यास पुढे येत नाही अथवा तसे सिद्ध होत नाही ती मालमत्ता राजाच्या मालकीची होत असे; परंतु कालांतराने अशा जप्त मालमत्तेचा कायदेशीर मालक पुढे आला आणि आपल्या मालमत्तेचा ताबा मागू लागला तर त्यासाठी त्याला जी रक्कम मोजावी लागे त्यास 'निपुत्रिक' असे म्हणत. सततचे युद्ध आणि वारंवार पडणारे दुष्काळ यामुळे मालमत्तेला धनी नसल्याचे प्रसंग वारंवार येत व राज्याला त्यापासून बऱ्यापैकी उत्पन्न मिळे.

सरकारी उद्योगधंदे : सभासदाने शिवाजी राजाच्या नावावर अठरा कारखाने आणि बारा महाल दाखविले आहेत. अठरा कारखाने असे : खजिना, जव्हाहीरखाना, आंबारखाना (धान्याचा साठा), आबदारखाना (जलस्थान), नगारखाना, तालीमखाना, जामदारखाना, (वसनागार), जिरातेखाना (शस्त्रागार), मुदबखखाना (पाकालय), शरबतखाना, शिकारखाना, दारूखाना, शहतखाना (आरोग्यगृह), पीलखाना (हत्तीशाळा), फरासखाना (डेरे, राहुट्या ठेवण्याची जागा), उष्टरखाना (उंटशाला), तोफखाना आणि दप्तरखाना.

येथे कारखाना हे नामाभिधान फसवे आहे हे वरील यादीवरून स्पष्ट होईल. कारखाना हा शब्द येथे वस्तू उत्पादन करण्याचे ठिकाण या अर्थी वापरला नसून वस्तू संग्रहित करून ठेवण्याचे ठिकाण या अर्थी वापरला आहे. मुघलापासून आपण हा शब्द घेतला; पण मुघलांचे कारखाने म्हणजे उत्पादनाची साधने होती आणि त्यापासून पातशहाला फायद्याची अपेक्षा असे. राजघराण्याला लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा हे कारखाने करीतच; पण त्याचबरोबर कलाकुसरीची सुबक कामे करून पातशहाचा फायदा करून देत.

सभासदाने जे बारा महाल सांगितले आहेत त्यांचे देखील स्वरूप कारखान्यासारखेच आहे. हे बारा महाल असे : पोते (कोषागार), भट्टी (गोशाला), सेरी (खाजगी विहार बाग), वहिली (रथशाळा), कोठी (धान्याचे कोठार), सौदागीर (व्यापारी), टंकसाळ, दरूनी (अन्त:पूर), पागा (अश्वशाला), इमारत (बांधकाम), पालखी आणि छबिना (पहारा). या नावावरून राजाच्या सेवेतील ही विविध खाती होती आणि 'कारखाना' आणि 'महाल' याबाबत काही द्विरुक्तीही झालेली आहे हे सहज लक्षात येईल.

थोडक्यात, कारखाने आणि महाल ही काही मराठी राज्याची उत्पन्नाची साधने नव्हती, तर राजाला मिळालेल्या वस्तूंचा संग्रह करणारी व राजघराण्याच्या वैयक्तिक गरजा पुरविणारी राजधानीतील ठिकाणे होती असे म्हणता येईल.

असे असले तर मराठी राज्याने ज्या उद्योगांची अथवा व्यवहाराची जबाबदारी स्वीकारली असेल, त्यापासून सरकारला निश्चितपणे काही फायदा मिळत असणार.

उदाहरणार्थ, मिठाचा मक्ता सरकारकडे होता. मीठ ही गरजेची उपभोग्य वस्तू असल्याने आणि कोकणातील मिठागरे शिवाजीच्या कक्षेत येत असल्याने, मिठाच्या व्यापारातून मराठी राज्याला फायदा होत असणार.

तसेच शेतसारा हा धान्याच्या स्वरूपात प्रामुख्याने वसूल केला जात असे. या धान्याचा साठा करून ज्या प्रदेशात एखाद्या वस्तूला अधिक मागणी; आणि पुरवठा कमी अशी स्थिती असेल तेथे हा सरकारी गुदामातील माल विकून, सरकारचा फायदा करून देण्याची जबाबदारी राजाने अधिकाऱ्यांवर टाकली होती. हा धान्यविक्रीचा व्यवहारही अशा रीतीने किफायतशीर होत असणार.

कल्याण-भिवंडी भागात उत्तम प्रकारचे इमारती लाकूड (Timber) भरपूर प्रमाणात मिळत असे. ब्रिटिशांनी या लाकडाची तुलना युरोपातील 'ओक' (Oak) वृक्षाशी केली आहे. बोटी बांधण्यासाठी हे लाकूड अत्यंत उपयुक्त असल्याने शिवाजीने कल्याण-भिवंडी येथे बोटी बांधण्याचा कारखाना काढला होता. १६७२ सालच्या मुंबईहून सुरतेला गेलेल्या कंपनीच्या पत्रात शिवाजीने कल्याण-भिवंडी येथे ६ नव्या बोटी बांधल्याचा उल्लेख आला आहे.

मिठाच्या धंद्यास शिवाजीने कसे संरक्षण दिले होते याचा विचार मागील प्रकरण चारमध्ये आलाच आहे. पोर्तुगिजांच्या प्रदेशातून देशावर येणाऱ्या मिठावर जबर कर बसवून स्वत:च्या मिठागरांना संरक्षण तर दिलेच; पण त्याचबरोबर आयात करापासून होणाऱ्या उत्पन्नातही भर घातली.

शिवाजीराजांकडे व्यापारी बोटींचा काही ताफा होता का यासंबंधीची निश्चित स्वरूपाची माहिती उपलब्ध नाही. शिवाजीच्या बोटी मीठ खरेदीसाठी करंजा ट्रॉम्बे या ठिकाणी गेल्याचा उल्लेख इंग्रजी रेकॉर्डस्‌मध्ये आढळतो. १६६२-६३ च्या सुमारास कंपनीच्या सुरतेच्या कचेरीस शिवाजीच्या व्यापारी बोटीसंबंधी काही माहिती मिळाली होती. शिवाजीने मोचा बंदरात पाठविण्यासाठी दोन मोठी जहाजे बांधल्याचे वृत्त कंपनीला मिळाले होते. दख्खन देशातील आठ ते नऊ बंदरे शिवाजीच्या ताब्यात असून तेथून दरवर्षी दोन ते तीन मालवाहू बोटी इराण, बसरा, मोचा या ठिकाणी पाठवीत अशी ही सुरतेच्या फॅक्टरीत नोंद झाली होती. शिवाजीचे एक गलबत एडनहून मुंबई बंदरात १६६९ साली दाखल झाल्याची बातमी सुरतेच्या दप्तरी होती. कारवारहून १६६९ साली सुरतेस आलेल्या एका पत्रात वादळामुळे, शिवाजीची गलबते आणि भातवाहू बोटींचे विशेषत: एका मालाने भरगच्च भरलेल्या बोटीचे, नुकसान झाल्याचे वृत्त कंपनीला मिळाले होते. राजापूर येथे शिवाजीची शिडाची चार-पाच गलबते व्यापारासाठी मस्कत आणि इतर ठिकाणी जाण्यासाठी सिद्ध होती असे मुंबईच्या फॅक्टरी रेकॉर्डस्‌मध्ये नोंदलेले होते.

थोडक्यात, या सर्व उल्लेखांवरून असे म्हणता येईल की, अंतर्गत आणि समुद्रमार्गे आपला व्यापार वाढविण्याचा, शिवाजी राजा कसा प्रयत्न करीत होता, याची कल्पना यावी. सागरी सत्ता व्यापारवृद्धी आणि राज्यवृद्धीसाठी कशी वापरावयाची याची शिवाजी

राजा प्रारंभापासूनच धोरणे बांधत असणार. सरकारच्या या व्यापारविषयक धोरणामुळे सरकारी खजिन्यात निश्चितच भर पडत असणार. अर्थात यासंबंधी आकडे आपल्याकडे नाहीत; पण परदेशी साधनात आलेल्या उल्लेखावरून काही अंदाज बांधणे शक्य आहे.

वतनाचे मध्ययुगातील महत्त्व ओळखून शिवाजी राजांनी वतनांची खरेदी करून ती फायदा घेऊन विकल्याची उदाहरणे कागदपत्रात आढळतात. सरकारने एका देशमुखाकडून त्याचे पाटिलकी वतन विकत घेऊन, राजाच्या एका विश्वासू सेवकाला ते बहाल केल्याचा उल्लेख एका कागदात आला आहे. दादोजी कोंडदेवाने शिवाजी राजांसाठी मावळच्या देशमुखापासून पाटिलकी खरेदी करून ती सरकारच्या मालकीची केली होती. १६७६ साली राजाने त्या गावची पाटिलकी ''माणकोजी बिन बालोजी गायकवाड चाकर राजश्री माहाराज यासी कदीमावरी व शाबित इनामावरी मेहरबान होऊन अजराह मराहमत केली आहे. पाटिलकी याचे दुमाळे करणे, पाटिलकीचे काम याचे हाते घेत जाणे'' असे मावळच्या सुबेदार, कारकून, देशकांना बजावले आहे. (शि.च.सा. ७ : ५६) या व्यवहारात सरकारने गायकवाडांकडून काही नजराणा घेतला असण्याची शक्यता आहे.

'शेरी' जमिनी यावर संपूर्ण मालकी सरकारची असे. त्या जमिनीपासून होणारे उत्पन्न 'सरकारी उद्योग' या सदरात मोडावयास हरकत नाही. कदाचित या जमिनीपासून मिळणारे उत्पन्न राजाच्या खाजगी खजिन्यात दाखल केले असावे. आपल्या वतनी जमिनीपासून येणाऱ्या उत्पन्नाचा स्वतंत्र हिशोब ठेवण्याचे आदेश शिवाजीने आपल्या अधिकाऱ्यांना दिले होते.

भेटवस्तू : वरिष्ठांच्या भेटीस रिक्त हस्ताने जाऊ नये असा मध्ययुगातील एक रीतीरिवाज होता. संस्कृत भाषेत–

''रिक्त हस्ते न गन्तव्यं राजानं ब्राह्मणं गुरूम् ।।''

असे एक सुभाषित आहे. राजा, ब्राह्मण आणि गुरू यांच्या भेटीस रिक्त हस्ताने जाऊ नये असे म्हणत. बर्नियर या प्रवाशाने देखील आशिया खंडातील लोकांच्या या पद्धतीची नोंद केली आहे. राजा अथवा उच्चपदस्थ सरकारी अधिकारी यांना भेटीदाखल मिळणाऱ्या वस्तूंचा 'भेटी', 'पेशकश', 'तोफापट्टी', 'नजराणा' या शब्दांनी कागदपत्रात उल्लेख केलेला आहे. 'पेशकश' म्हणजे राजाला दिलेली खंडणी होय. सुप्याच्या मेहतरांनी शहाजीराजाला विनंती केली की, त्याने वसुली धान्याच्या अथवा वस्तूच्या रूपाने करावी आणि तसे केल्यास आपण ७५ होन पेशकश देऊ असे मान्य केले. सरकारात नजराणा भरून एखादी जमीन 'मिरास' म्हणजे वंशपरंपरागत मालकीची करून घेतली जाई. शिवाजी राजाची मर्जी संपादन करण्यासाठी राज्याभिषेकाच्या वेळी आणि अन्य प्रसंगी इंग्रजांच्या कंपनीने अनेक प्रकारच्या मौल्यवान भेटवस्तू दिल्या आहेत. शिवाजी राजा, संभाजी, मोरोपंत, अण्णाजी पंडित, नारोजी पंडित, रावजी सुमंत यांना देण्याच्या भेटवस्तूंचा तपशील, मे १६७४ च्या एका पत्रात निश्चित केला

आहे. चाईल्डस्, ऑक्सिनडेन आणि उस्टिक यांनी राज्याभिषेकाची ही 'भेट' वस्तूंची यादी संमत केली होती. कंपनीतर्फे ऑक्सिनडन ही भेट देण्यास उत्सवाच्या प्रसंगी रायगडावर हजर होता.

शिवाजी राजा-

	रुपये
हिरेजडित शिरपेच (१)	६९०
हिरेजडित कंकणे (२)	४५०
दोन मोती (कर्णभूषणे)	५१०
	१६५०

संभाजी राजा-

रत्नजडित कंकणे (२)	१२५
आठ हिऱ्यांचा कंठमणी (१)	२५०
	३७५

मोरोपंडित शिवाजीच्या विशेष खास मर्जीतला मंत्री, त्यास दोन मोठे मोती	४५०
अण्णाजी पंडित, शिवाजीच्या खास मर्जीतील मंत्री, त्यास ७ तोळे वजनाच्या सोन्याच्या दोन साखळ्या	१२५
नारोजी पंडित आणखी एक मर्जीतला अधिकारी (हा बहुधा नारो नीळकंठ, मुजुमदार तथा अमात्य असावा) यास दोन पामऱ्या	७०
रावजी सुमंत, शिवाजीचा सचिव (सुमंत असेल तर त्याचे नाव रामचंद्रपंत हवे) दोन पामऱ्या	७०
	= २६५
	= एकूण २६९०

याखेरीज लहान-मोठ्या भेटी व्यक्तीच्या योग्यतेप्रमाणे देण्याचा अधिकार ऑक्झिनडेन यास दिला होता. (इ.रे.शि. २ : पृ. ४७४)

शुल्क, दंड इ. : न्यायालयीन शुल्क आणि दंड यापासूनही सरकारला काही उत्पन्न मिळत असणार. हरकी अथवा शेरणी आणि गुन्हेगारी या न्यायालयापासून मिळणाऱ्या दोन प्रमुख उत्पन्नाच्या बाबींचे उल्लेख मराठी कागदपत्रांतून आढळतात. हरकी

अथवा शेरणी म्हणजे एखादा दावा जिंकल्यानंतर वादीने कृतज्ञताबुद्धीने सरकारात जमा केलेली रक्कम. काही वेळा ही रक्कम निकालपत्रात नोंदविलेली असे. 'गुन्हेगारी' म्हणजे पराजित अथवा गुन्हेगार याच्याकडून वसूल केलेला दंड. शेरणीप्रमाणेच याचीदेखील नोंद निकालपत्रात केलेली असे. थोडक्यात, एखाद्या दाव्यातील वादी आणि प्रतिवादी या दोघांच्याकडून शुल्क अथवा दंड या रूपाने सरकार काही पैसा मिळवत असणार.

'शेरणी अथवा गुन्हेगारी' यासंबंधी काही निश्चित नियम नव्हते. रूढी आणि चालीरीतींवरून एखाद्या दाव्यातील 'शेरणी' आणि गुन्हेगारीची रक्कम निश्चित केली जात असे. काही वेळा वादी आणि प्रतिवादीकडून दाव्याचा निकाल काहीही लागो, आपण शेरणी अथवा गुन्हेगारी सरकारात भरू याची कबुली अगोदर घेतली जात असे. वतनाच्या खटल्यात विजयी पक्षाला शेरणी भरावी लागे आणि ती ते आनंदाने भरत असत; म्हणूनच या शुल्काला 'हरकी' असेही म्हटले जात होते.

शिरवळ देशपांडे यांच्याकडील १६९३ च्या एका कागदात न्यायालयाच्या संदर्भात 'किताबत' अथवा 'किताब' आणि 'पारखाऊ' या आणखी दोन शुल्कांचा उल्लेख आला आहे. 'किताबत' अथवा 'किताब' हे लेखनशुल्क असावे. कागदपत्रात येणारी 'कबुलातपट्टी' आणि 'किताबत' हे समानार्थी शब्द असावेत. कबुलातपट्टी ही कदाचित आजकालच्या 'स्टँप ड्युटी' प्रमाणे न्यायालयाने आकारलेली पट्टी असावी. 'पारखाऊ' हा 'पारख' शब्दाचा अपभ्रंश आहे. 'पारख' म्हणजे परीक्षा, नाण्याची अथवा न्यायालय-प्रविष्ट कागदाची छाननी. ही परीक्षा अथवा छाननी करून घेण्यासाठी आकारलेली फी म्हणजे 'पारखाऊ'.

नाझीरपट्टी अथवा सर नाझीरपट्टी, म्हणजे एखाद्या मालमत्तेच्या व्यवस्थेसाठी सरकारने नेमलेल्या अधिकाऱ्याच्या वेतनासाठी संबंधित व्यक्तीकडून वसूल केलेली रक्कम.

'फुरोई' हा कमावीसदाराने वसूल केलेला, पण कायद्याच्या कक्षेत न बसणारा दंड होय. अशा मार्गाने राज्याला मिळणाऱ्या उत्पन्नाचा उल्लेख 'गैरमहसूल' असा मेस्तक पुस्तकात आलेला आहे.

टांकसाळ, नाणी : टांकसाळ आणि राज्यातील चलन यावर सरकारी नियंत्रण असे. या व्यवहारापासून सरकारला काही प्राप्ती होत असे. नाणी पाडण्यासाठी सरकारी परवाना लागे आणि त्यासाठी परवानाधारकाला पाडलेल्या नाण्यांचा काही हिस्सा सरकारात परवाना शुल्काच्या स्वरूपात द्यावा लागे व तसा करार सरकारशी करावा लागे. कोकणातील एका शेट्टीने लारी आणि तांब्याची नाणी पाडण्याचा परवाना मागितला, तेव्हा परवाना देताना सरकारने १०० लारीस, १ लारी आणि १ मण वजनाच्या तांब्याच्या नाण्यास ५ लारी अशी अट त्याच्यावर लादली. हा परवाना केवळ पाच वर्षांसाठी दिला होता. अमिनाबादच्या जमाबंदी पत्रकात 'नाणे' नावाची एक उत्पन्नाची बाब सांगितली आहे. त्याचा अर्थ नाणी पाडण्यासाठी दिलेल्या परवान्याचे शुल्क असावे. दुसरा अर्थ संभवतो, तो म्हणजे नाण्यांची परीक्षा

सरकारातून करून घ्यावयाची असेल तर त्यासाठी आकारलेले शुल्क असाही होऊ शकेल. थोडक्यात, नाणे ह्या शब्दाचा अर्थ, चलनाच्या विविध व्यवहारांपासून सरकारला होणारी प्राप्ती असा लावता येईल.

युद्धजन्य उत्पन्न : मध्ययुगात जित राष्ट्रांना युद्धापासून काही प्राप्ती होत असे, तिचा राज्यकारभाराच्या कामी बराच हातभार लागत असावा. शिवाजी राजाला पराजितापासून अथवा ज्यांनी त्याचे स्वामित्व मान्य केले होते, अशा सत्तांपासून मिळणारे उत्पन्न खंडणी अथवा चौथ या सदराखाली येते. तसेच गनिमाचा प्रदेश लुटूनही काही संपत्ती मराठ्यांनी गोळा केली होती. शिवाजीच्या नवनिर्मित राज्याला स्वकीय आणि परकीय असे दोन्ही प्रकारचे शत्रू होते आणि त्यांचे दमन करण्याचे, ज्या संपत्तीमुळे ते माजोर झाले होते ती हरण करण्याची एकही संधी शिवाजी राजा शक्यतो टाळीत नसे. सभासद आणि कवींद्र परमानंद या शिवचरित्रकारांनी अफझलखान प्रकरणात शिवाजीस किती प्राप्ती झाली याचे तपशील दिले आहेत. सभासदांच्या मते ६५ हत्ती-हत्तिणी, ४००० घोडे, १२०० उंट, २००० कापड गठ्ठे, ३,००,००० जडजवाहीर, ७,००,००० नगद व मोहोरा व होन सोने रुपये इतके साहित्य मिळाले. (सभासद पृ. १७-१८). कारतलबखान आणि शाइस्तेखान यांच्या छावण्या लुटून शिवाजीला किती वस्तू मिळाल्या याचे परमानंदाने विस्तृत वर्णन केले आहे. (शिवभारत, सर्ग ३० : ११-२३) शृंगारपूर, प्रभानवली, सुपा, जावळी इत्यादी कोकणातील सत्ता मोडून काढून शिवाजी राजाने आपल्या तिजोरीत प्रारंभीच्या काळी बरीच भर टाकली असणार. (सभासद, पृ. ४-५)

१६६४ साली सुरतेवर शिवाजी राजाने जी पहिली चढाई केली त्यात त्याच्या हाती बरीच रत्ने आणि नाणी लागली आणि काही वस्तूही मिळाल्या. यदुनाथ सरकारांच्या मते या सुरतेच्या पहिल्या लुटीत शिवाजीला एक कोटीहून अधिक रुपयांची मिळकत झाली असावी. १६७० च्या लुटीत मराठ्यांनी सुरतेतील श्रीमंतांच्या मोठ्या हवेल्या शांतपणे लुटून अमाप संपत्ती, कापड आणि मौल्यवान वस्तू हस्तगत केल्या असे एक मोघम विधान यदुनाथांनी केले आहे. सुरतेवरील सर्व लुटीपासून मराठी राज्याच्या तिजोरीत किती भर पडली यासंबंधी सभासद लिहितो,

> "सावकारांचे वाडे काबीज करून सोने, रुपे, मोती, पोवळे, माणिक, हिरे, पाचू, गोमेदराज, वेडूर्य असे नवरत्ने नाणे, मोहोरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या, असर्फ्या, होन नाणे नाना जातीचे. इतक्या जिनसांच्या धोकटिया भरल्या. कापड, भांडे, तांब्याचे वरकड हान (अन्य) जिन्नस यास हात लाविलाच नाही. असे शहर दोन दिवस अहोरात्र लुटिले. उत्तम घोडे जितके युद्धात व सावकारांच्या घरात सापडले तितके घेतले." "मालमत्ता सुरतेची आकार करिता सर्व बिशात (लूट) पांच क्रोड होनाची आणली. चार हजार घोडी आणिली ती पागा केली." (सभासद पृ. ६०-६२)

शिवाजीच्या लष्कराने मोगलाईत प्रवेश करून खानदेश, बागलाण, गुजरात, बुऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर, जालनापूर इत्यादी प्रदेश लुटले, त्यापासून राज्याची बरीच मिळकत झाली.

इंग्रजांच्या मराठी आणि कानडी मुलखातील फॅक्टरीवर, शिवाजीच्या सैनिकांनी छापे घालून, मराठी राज्याला बरीच लूट मिळवून दिली. इंग्लिश रेकॉर्डस्मध्ये चोपडा, धरणगाव, रायबाग, अथणी, कारवार, हुबळी मध्ये मराठ्यांनी छापे घातल्याची नोंद आहे. अफझल प्रसंगातील विजयामुळे आत्मविश्वास वाढलेल्या शिवाजी राजाने १६६१ साली इंग्रजांची पश्चिम किनाऱ्यावरील राजापूरची महत्त्वाची वखार लुटून अगणित संपत्ती मिळविली असे परमानंद म्हणतो. (सर्ग ३० : ५-१३) परंतु हे विधान अतिशयोक्त वाटते. फॅक्टरी रेकॉर्डप्रमाणे, कंपनीचे सुमारे एक लाख रुपयापर्यंतचे नुकसान झाले असावे. (सरकार, शिवाजी, पृ. ३२८)

मोहिमेवरून सैनिक जेव्हा परत येत, तेव्हा त्याची झडती घेतली जात असे. लढाईत मिळालेली सर्व लूट राजापुढे ठेवण्याची त्यांना ताकीद दिली होती. सभासद म्हणतो,

> "वैशाख मासी परतोन छावणीस येताच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील बिशादीचे (लुटीचे सामान) जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कात धरावी. थोर किमतीची वस्तभाव असलियास दिवाणात द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारांस जाहलियाने शासन करावे. लष्कर छावणीस आलियावर हिशोब करून सोने, रुपे, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनी बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावे." (सभासद पृ. २३-२४)

शिवाजी राजाची कर्नाटकावरील स्वारी आर्थिकदृष्ट्या सफल झालेली दिसते. १६७४ च्या राज्याभिषेकामुळे रिकामा झालेला खजिना भरून काढण्यासाठी त्याने १६७७ साली कर्नाटक दिग्विजयाची मोहीम आखली. भागानगर तथा हैद्राबाद येथे त्याचे उत्स्फूर्त स्वागत झाले आणि त्याच्यावर सोन्या-रुप्याची फुले उधळली गेली आणि राजाला संतुष्ट करण्यासाठी "जडजवाहीर, रत्नाचे अलंकार, हत्ती, घोडे अपरमित दिधले." (सभासद पृ. ८६)

सभासदाने शिवाजीच्या राज्याची मोजदाद करताना नाणे, कापड, रत्ने यांची, जी विस्तृत यादी दिली आहे ती सारी मालमत्ता प्रामुख्याने मराठी राज्याला सततच्या युद्धापासून मिळालेली आहे. (सभासद, पृ. ९५ ते ९७)

चौथ : 'चौथ' अथवा 'चवथाई' ही युद्धापासून निर्माण झालेली मराठी राज्याच्या उत्पन्नाची एक महत्त्वाची बाब होय. चौथची सुरुवात कशी झाली हा इतिहास समजावून घेणे आवश्यक आहे. अठराव्या शतकातील मराठ्यांच्या उत्तरेकडील लष्करी हालचालीस प्रामुख्याने कारणीभूत झालेली ही 'चौथ' पद्धती कशी आणि

केव्हा सुरू झाली? शिवाजी राजाने ती सुरू केली का, का त्यांनी ती दुसऱ्या कोणत्या सत्तेपासून घेतली? शिवचरित्रात किंवा शिवकालीन अस्सल कागदपत्रांत हा शब्द फारसा आढळत नाही. उपलब्ध पुराव्यावरून अठराव्या शतकात ज्या तऱ्हेने ती रूढ झाली होती, त्यावरून चौथ पद्धतीची कल्पना ही शिवाजी राजाची होती असे दिसत नाही. फारतर असे म्हणता येईल की, त्याच्या शेवटच्या काळात या पद्धतीचा वापर करण्यास त्याने सुरुवात केली होती.

चौथचा प्रारंभ पोर्तुगिजांनी केला असे दिसते. 'दमण'चा प्रदेश पोर्तुगिजांच्या वर्चस्वाखाली १५५९ साली आला. 'दमण'चे रहिवासी आपल्या प्रदेशाचा १/८ हिस्सा शेजारच्या डोंगरी मुलखातील रामनगरच्या राजाला, त्याच्यापासून सतत होणाऱ्या हल्ल्यापासून आपला बचाव करून घेण्यासाठी देत असत. पोर्तुगिजांनी ही पद्धती चालू ठेवली आणि या प्रतिवर्षीच्या खंडणीला ते 'चौथ' म्हणू लागले व रामनगरच्या राजाला 'चौथिया राजा' म्हणून संबोधू लागले. पुढे रामनगरच्या राजाविरुद्ध जव्हारचा कोळी राजा बंड करून उठला आणि रामनगरच्या राजाला दिल्या जाणाऱ्या 'चौथ'ची मागणी त्याने पोर्तुगिजांकडे केली. कोळी राजाचे बंड रामनगरच्या राजाला मोडून काढता आले नाहीं, म्हणून पोर्तुगिजांनी, कोळी राजाचा उपद्रव टाळण्यासाठी त्याला 'चौथ' देण्याचे मान्य केले. रामनगर आणि पोर्तुगीज यांनी कोळी राजाला नेस्तनाबूत करण्याचे बरेच प्रयत्न केले पण ते अयशस्वी झाले. शेवटी रामनगरचा नाद सोडून पोर्तुगिजांनी शिवाजी राजाला कोळी राजाचा बंदोबस्त करण्याची विनंती केली; आणि मोरोपंत पिंगळे याने जून-जुलै १६७२ मध्ये "रामनगर व जवाहीर हा देश घेतला" (सभासद ६९) रामनगर काबीज केल्यावर साहजिकच शिवाजीने पोर्तुगिजांकडे चौथाईची मागणी केली. कारण रामनगरच्या या चौथियाराजाला पोर्तुगीज दर साल चौथ चुकता करीत होते; पण १६७१ च्या कोळी राजाच्या बंडाव्यापासून ही स्थगित केली होती. शिवाजीची मागणी फेटाळताना पोर्तुगिजांनी असा युक्तिवाद केला की, रामनगरचे संपूर्ण राज्य शिवाजीने हस्तगत न केल्याने चौथवर त्याचा अधिकार पोहोचत नाही. यावर शिवाजीने काही काळ मौन धारण केले. आपल्या राज्याभिषेकाच्या तयारीत तो गुंतला होता. १६७७च्या सुमारास मराठ्यांनी रामनगरवर हल्ला करून तो संपूर्ण प्रदेश हस्तगत केला आणि पोर्तुगिजांकडे परत एकवार चौथची मागणी केली. दमणच्या रहिवाशांनी ही मागणी मान्य केली आणि गोव्याच्या विजरईला (व्हॉइसरॉय) शिवाजी राजाला चौथ देण्याची शिफारस केली. १६७८ साली गोव्याच्या विजरईने संपूर्ण रामनगर राज्य काबीज केलेल्या दिवसापासून शिवाजी राजाला चौथ देण्याचे मान्य केले; परंतु अनावश्यक पत्रव्यवहारात वेळ घालवून पोर्तुगीज हा चौथचा हिशोब पुरा करीत नव्हते. पीतांबर शेणवी, जिवाजी शेणवी आणि गणेश शेठ ह्या शिवाजीच्या वकिलांनी दीर्घकालपर्यंत विजरईशी बोलणी केली; परंतु काहीतरी सबब काढून काळकाढूपणाचे धोरण पोर्तुगिजांनी अवलंबिले आणि शिवाजी राजाला ही चौथ कधीच मिळाली नाही.

पोर्तुगिजांकडे चौथ म्हणून शिवाजीचे सुमारे ९०७७ अश्रफी इतके देणे निघत होते.

पोर्तुगिजांनी याची फेड तर केली नाहीच; पण रामनगरच्या राजाला शिवाजीविरुद्धचा लढा चालू ठेवण्याची चिथावणी दिली आणि त्यासाठी गुप्तपणे सुमारे १३ हजार अश्रफींचे साहाय्य केले.

शिवाजीशी शांतीचे आणि मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे हे पोर्तुगिजांना भाग होते. 'चौथ' पद्धतीचा उगम कसा झाला यासंबंधी विचार करता पोर्तुगिजांना असे आढळून आले की, दमणच्या नागरिकांनी, विजरई अथवा स्थानिक अधिकारी यांची परवानगी न घेता, रामनगरच्या राजाचे सैनिक दमणमध्ये शिरून जी लूटमार करीत ती थांबविण्यासाठी स्वयंप्रेरणेने चौथिया राजाशी आपल्या प्रदेशाच्या उत्पन्नाचा १/४ भाग देण्याचे मान्य केले होते. तेव्हा चौथिया राजाची मागणी मान्य करण्यापूर्वी पोर्तुगीज सरकारला दमणच्या नागरिकांशी विचारपूस करावी असे वाटले. त्यानुसार काही अधिकाऱ्यांची नियुक्ती करून दमणवासियांनी कोणत्या परिस्थितीत या पद्धतीला मान्यता दिली होती याची चौकशी करण्याचे पोर्तुगिजांनी ठरविले. या सर्व प्रकरणात, शिवाजीची चौथची मागणी मागे पडली आणि त्याच्या आयुष्यात पोर्तुगिजांकडून ती पूर्ण झाली नाही.

शिवाजी राजाने सर्वप्रथम १६६४ साली सुरतेवर चौथ लादली असे मानले जाते. डॉ. सेन म्हणतात की, सुरतेवर चाल करून जाताना त्याला वाटेत रामनगरच्या राजाचा प्रदेश लागला आणि या चौथियाच्या राजापासून शिवाजीने चौथची कल्पना घेतली असावी आणि तिचा पहिला प्रयोग सुरतेवर केला असावा. 'चौथ' याचा शब्दशः अर्थ १/४ असा असला तरी प्रत्यक्षात त्याची वसुली गावच्या उत्पन्नाच्या १० ते २५ टक्क्यांपर्यंत कोठेतरी निश्चित केलेली दिसते. शिवाजीने सुरतेवर पहिला हल्ला चढवला तो १६६४ च्या जानेवारीत. फॅक्टरी रेकॉर्डसच्या १६६४ नोव्हेंबरच्या एका पत्रावरून शिवाजीने सुरतेवर चौथ बसविली असा तर्क डॉ. सेन यांनी केला आहे. त्या पत्रात असे म्हटले आहे की, शिवाजीचा या प्रदेशावर परत हल्ला होईल अशी सुरतवासियांना सारखी भीती वाटते, कारण त्याने अशी धमकी दिली आहे की, शहरे आणि गावे यांच्याकडून मला दरवर्षी जो चवथा भाग मिळतो तो देण्याचे राजाने मान्य केले नाही, तर त्याला या प्रदेशावर परत चालून जाणे भाग पडेल. अर्थात या पत्रावरून शिवाजीने कोणत्या शहरावर आणि खेड्यावर चवथा भाग बसविला होता; आणि सुरत शहर त्यात समाविष्ट होते का याचा खुलासा होत नाही. चौथ असा स्पष्ट शब्दप्रयोग या पत्रात आलेला नाही. यात फक्त "नगरे आणि ग्रामीण भाग याकडून प्रतिवर्षी १/४ त्याला मिळते" (The fourths of what he receives of the town and country yearly." (ER I : 96 p. 91 at 26 Nov. 1664) असे म्हटले आहे. इंग्रजांपुढे कदाचित रामनगरच्या चौथिया राजाचे उदाहरण असल्याने शिवाजीदेखील तशाच प्रकारची मागणी करेल असे त्यांनी गृहीत धरले असावे. सभासद बखरीत कोणत्याही वार्षिक खंडणीचा उल्लेख नाही, फक्त 'असे शहर दोन दिवस अहोरात्र लुटिले' एवढाच उल्लेख आहे.

कंपनीच्या रेकॉर्डस्मध्ये १६७२ च्या पत्रव्यवहारात मोरोपंत पिंगळ्याने पोर्तुगिजांकडून त्यांच्या मुलखाच्या उत्पन्नाच्या १/३ ते १/४ हिश्शाची मागणी केली आणि तसे न केल्यास सारा मुलूख उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली आहे असे म्हटले आहे." मराठ्यांच्या पोर्तुगिजांसंबंधीच्या या आक्रमक धोरणामुळे मुंबई बंदराची भरभराट होईल असे इंग्रजांना वाटत होते. (इ.रे.शि. १ : ३०६) मोरोपंडिताने याच वर्षी (१६७२) जव्हार हे कोळ्यांचे राज्य हस्तगत केले व रामनगरच्या दिशेने कूच केली. रामनगरचा राजा राजधानीतून भीतीग्रस्त होऊन पळाला होता. मोरोपंताने सुरतेच्या गव्हर्नराला आणि मिर्झा मोसुम या प्रमुख व्यापाऱ्याला शिवाजीची पत्रे पाठविली आणि राजाच्या उत्पन्नाच्या चौथी (chouty) अथवा एक चतुर्थांश हिश्शाची मागणी केली. ही रक्कम जवळजवळ ४ लक्ष रुपये इतकी होती आणि ती ताबडतोब रवाना केली नाही, तर मराठ्यांच्या सैन्याचा तळ तेथे पडून राहील, अशी धमकी मोरोपंताने दिली होती, असे इंग्रजी रेकॉर्डस्मध्ये म्हटले आहे. (इ.रे.शि. १ : ३०७)

जव्हारच्या कोळी राजाकडून मोरोपंताने १७ लाख रुपये वसूल केले होते. अर्थात ही रक्कम काही चौथच्या स्वरूपात नव्हती, तर युद्धातून झालेली प्राप्ती होती. मोरोपंताने सुरतेच्या गव्हर्नराला आणि व्यापाऱ्यांना वारंवार बजावले होते की, त्यांच्या राजाने (मुघल पातशहाने) शिवाजी राजाला आपल्या लोकांचे आणि प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी सैन्य ठेवणे भाग पाडले आहे आणि त्या सैन्याचा पगार दिला पाहिजे, तेव्हा सुरतेहून अति जलदगतीने पैसा आला नाही, तर शहरानजीक आपल्यास एक मोठी हवेली द्यावी की जेथे बसून तो शेतसारा आणि जकात वसूल करू शकेल. आपल्याला अडवणारी कोणतीही शक्ती आता आपल्या मार्गात उरली नाही असेही त्याने सुरतेच्या अधिकाऱ्यांना कळविले होते. सुरतेच्या गव्हर्नराने शहरातल्या मुसलमान आणि बनिया जमातीच्या श्रीमंत व्यापाऱ्यांना सैद महमूद या व्यापाऱ्याच्या घरी मराठ्यांची मागणी पूर्ण कशी करावयाची यासंबंधी चर्चा करण्यासाठी बोलाविले. बैठकीत गव्हर्नराने ही मागणी पूर्ण करण्याची सरकारची असमर्थता व्यक्त करून, असा प्रस्ताव मांडला की, व्यापाऱ्यांनी १ लाख रुपये आणि देसायांनी आपल्या परगण्यांतील रयतेकडून २ लाख रुपये उभे करावेत. देसायांनी स्पष्ट सांगितले की, आपण गेल्या वर्षीपर्यंतचा सारा शेतसारा सरकारच्या तिजोरीत भरला आहे आणि आता परत आपण गरीब रयतेकडून काहीही पैसा वसूल करू शकत नाही. व्यापाऱ्यांनीही आपण १ लाख देऊ शकत नाही असे सांगितले. रात्रंदिवस चर्चा करून गव्हर्नरने शेवटी असे सुचविले, की शत्रूंचे संकट तात्पुरते निवारण करण्यासाठी सर्वांनी मिळून ६० हजार रुपये जमा करावेत, त्यात व्यापाऱ्यांचा हिस्सा २० हजार रुपये आणि देसायांचा ४० हजार रुपये असा असेल. ६० हजार रुपये देऊन उरलेली रक्कम नंतर देऊ असे आश्वासन द्यावे, असा आपला विचार आहे असे त्याने सुचविले; पण स्वतःची तुंबडी भरण्यासाठी गव्हर्नराने ही चालबाजी केली आहे, संकट निवारण्याचा त्याचा मुळीच हेतू नाही असे व्यापाऱ्यांना आणि देसायांना वाटल्याने त्यांनी हा गव्हर्नराचा प्रस्ताव फेटाळला. (इ.रे.शि.१:३१०)

मोरोपंत गुजरातच्या या प्रदेशात तळ ठोकून होता. रामनगरची मोहीम अर्ध्यावर टाकून दिलेरखानाशी मुकाबला करण्यासाठी त्याला माघार घ्यावी लागली; पण

शिवाजीचे भरारी मारणारे सैन्य (flying forces) केव्हा परत येतील याचा नेम नसल्याने सुरतकर हवालदिल झाले आहेत, असे इंग्रजी कंपनीचे वृत्त होते.

चौथसंबंधीचा शिवकालातील आणखी एक उल्लेख १६७९-८० च्या कंपनीच्या दप्तरी आहे. शिवाजीच्या सैन्याने आसपासचा बराच मुलूख जाळला अथवा लुटला आहे; पण ज्या शहरांनी १/४ (चौथ म्हटले आहे) देण्याचे मान्य केले आहे तेथे मात्र त्यांनी काही हस्तक्षेप केला नाही असे चोपडा या खानदेशातील ब्रिटिश फॅक्टरीकडून सुरतेला गेलेल्या पत्रात म्हटले आहे. (इ.रे.शि. २ : ४८५)

पोर्तुगीज आणि इंग्रजी साधनांवरून चौथसंबंधीची जी माहिती मिळते त्यावरून शिवाजीने चौथची मागणी प्रामुख्याने पोर्तुगीज आणि मुघल यांच्याकडून, आपल्या कारकीर्दीच्या अगदी शेवटी शेवटी केलेली दिसते. या चौथ पद्धतीपासून शिवकालीन मराठी राज्याचा नफा-तोटा किती झाला हे सांगणे कठीण आहे; पण एवढे मात्र म्हणता येईल की, अठराव्या शतकात चौथाईसाठी मराठ्यांना जी सतत युद्धे करावी लागत, त्यासाठी लागणारा पैसा कर्जरूपाने उभा करावा लागे अशी परिस्थिती शिवकालात नव्हती. कदाचित चौथ पद्धती अद्याप रूढ व्हावयाची होती म्हणूनही असे घडत असेल. ज्या पोर्तुगिजांमुळे शिवाजीने 'चौथ'ची पद्धती स्वीकारली, त्यांनी तर शिवाजीचे देणे तत्त्वत: मान्य करून ते शेवटपर्यंत दिले नाही; आणि गुजरातेतील मुघलांच्या विशेषत: सुरतेवर ही पद्धत लादण्याचा मराठ्यांचा प्रयत्न काही यशस्वी झाला नाही. सुरतेतील लोकांच्या बैठकीचा जो वर उल्लेख केला आहे त्यावरून असे दिसते की, परचक्राचे संकट निवारण्यासाठी, आपल्या मालमत्तेचे आणि कुटुंबीयांचे रक्षण करण्यासाठी, पोर्तुगीज प्रदेशातील दमणच्या रहिवाशांप्रमाणेच, सुरतच्या नागरिकांना या व्यवहारात पुढाकार घ्यावा लागत होता.

थोडक्यात, एक उत्पन्नाची बाब म्हणून नव्याने सुरू केलेल्या, पण अद्याप पूर्णपणे न स्थिरावलेल्या चौथ पद्धतीचा विशेष लाभ शिवकालात मराठी सत्तेला उठविता आला नसावा असे दिसते. युद्धातील लूट आणि चौथ यातील मुख्य फरक म्हणजे, लूट ही तात्कालिक स्वरूपाची असते, तर चौथ ही एक कायम स्वरूपाची उत्पन्नाची बाब होती. आपल्यावर हल्ला होऊ नये म्हणून दुर्बल सत्ता प्रबल सत्तेला वार्षिक देणगी देत व आपल्या भागाचे संरक्षण करीत. चौथ देण्याबाबत सरकारपेक्षा लोकांचाच पुढाकार अधिक होता असे दिसते. न्यायमूर्ती रानडे यांनी 'चौथ'ची तुलना, कंपनी सरकारने अठराव्या शतकात सुरू केलेल्या लॉर्ड वेलेस्लीच्या तैनाती फौजेशी (Subsidiary alliance) केली आहे परंतु ती अप्रस्तुत वाटते. तैनाती फौज स्वीकारली की त्या राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी कंपनीकडे असे. चौथ पद्धतीत ही संरक्षणाची अट अभिप्रेत नाही, फक्त चौथचा स्वीकार करणाऱ्या राज्यावर हल्ला न करण्याचे आश्वासन चौथची मागणी करणारी सत्ता देत असे.

सरदेशमुखी

चौथाई आणि सरदेशमुखी या सरकारी उत्पन्नाच्या मराठी राज्याच्या खास बाबी होत. या दोन्ही बाबींचा वारंवार संयुक्तपणे विचार केला जातो, पण या दोन्हींच्या स्वरूपात फरक आहे. चौथाई ही परमुलखातून म्हणजे मोगलाईतून वसूल केली जाते असे, तर सरदेशमुखी हा एक राजाचा खास हक्क असून स्वामी या नात्याने स्वराज्याच्या मुलखातून अथवा अंकित मुलखातून तो वसूल केला जात असे. चौथाईचा दर हा सामान्यत: ज्या प्रदेशांतून ती वसूल करावयाची असेल त्याच्या वार्षिक उत्पन्नाच्या सामान्यत: १/४ रक्कम इतका होता. 'चौथ' म्हणून उभयतांनी जी रक्कम मान्य केली असेल तिचा भरणा केला म्हणजे त्या प्रदेशात चौथाधिकारी सत्ता हस्तक्षेप करीत नाही. सरदेशमुखी ही स्वराज्यातून जो सरकारी महसूल वसूल केला जात असे त्याच्या १/१० रक्कम ही राजाकडे खाजगी तिजोरीत त्याच्या वैयक्तिक खर्चासाठी म्हणून जमा केली जात असे. सरदेशमुखीचे हे प्रारंभीचे स्वरूप अठराव्या शतकात काही अंशी बदलल्यासारखे वाटते. पेशवे मुघलांच्याकडे उत्तरेकडील प्रदेशात सरदेशमुखीचे हक्क मागताना आढळतात.

सरदेशमुखीचा हक्क हा देखील शिवाजीने प्रथम सुरू केला असे दिसत नाही. शिवाजीच्या उदयापूर्वी कोकणातील देसाई, म्हणजे परगण्याचे प्रमुख आणि स्वतंत्र स्वामी, हे आपल्या रयतेकडून सरदेशमुखी वसूल करीत आले. शिवाजीच्या ताब्यात जसे हे मुलूख आले तसे त्याने पूर्वीच्या देसायांप्रमाणे सरदेशमुखीचा हक्क मागण्यास प्रारंभ केला. ही राजाच्या खाजगी उत्पन्नाची बाब असे मानले जात असे आणि या उत्पन्नातून राजा आपले खाजगी स्वरूपाचे खर्च भागवीत असे. चौथाईच्या बाबतीत सुद्धा शिवाजी राजाने रामनगरच्या चौथिया राजाच्या राज्यात जी प्रथा होती तीच तो प्रदेश जिंकल्यानंतर चालू करण्याच्या दृष्टीने पोर्तुगिजांकडून चौथाईची मागणी केली होती हे आपण मागे पाहिले आहे.

आपण जिंकलेल्या प्रदेशाचे सार्वभौम स्वामी आहोत या भावनेने शिवाजीने सरदेशमुखीची मागणी केली असणार; परंतु प्रजेने याला सर्वसामान्यपणे मान्यता दिली होती का हे शंकास्पद वाटते. सरदेशमुखी आणि सरदेशमुखपट्टी ही एकच होत, असे डॉ. बाळकृष्ण मानतात. सरदेशमुखपट्टी ही कदाचित मिरासपट्टीसारखी प्रासंगिक स्वरूपाची पट्टी असेल आणि सरदेशमुखीशी तिचा संबंध नसावा.

शिवाजीने अथवा मराठ्यांनी ही पट्टी बसविली होती असे सामान्यपणे इतिहासकार मानतात. चेऊल मामल्यातील लोकांनी १६८७ च्या सुमारास सरकारकडे फिर्याद करून शेतसारा आणि सरदेशमुखी यापासून सूट मागितली होती, कारण गनिमाने ती सारी भूमी उद्ध्वस्त करून टाकली होती. सुभेदाराने या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार केला आणि रयतेला ज्या अनेक सवलती दिल्या त्यात सरदेशमुखीची सूट एक होती. स्थानिक अधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते की, जमाबंदीच्या वेळी सरदेशमुखीची आकारणी करावी आणि पत्रकात त्याची नोंद करावी, पण ती वसूल करू नये किंवा

वसुलीसाठी कोणाला उपद्रव देऊ नये. यावरून सरदेशमुखी ही कायम स्वरूपाची उत्पन्नाची बाब असून वसूल होवो अगर न होवो, कागदोपत्री मात्र त्याची दरवर्षी नोंद झाली पाहिजे असा दंडक असावा.

मराठी राज्याचे एकूण उत्पन्न

आवश्यक त्या साधनाभावी मराठी राज्याचे वार्षिक उत्पन्न किती होते यासंबंधीचे अंदाज बांधणे कठीण झाले आहे. सभासदाच्या नोंदीप्रमाणे शहाजीकडून मिळालेल्या ४० हजार होन उत्पन्नाच्या पुणे महालापासून प्रारंभ करून राज्याभिषेकाच्या सुमारास त्याच्या राज्याचे उत्पन्न सुमारे १ कोटी होन म्हणजे तीन ते चार कोटी रुपये झाले होते असे स्थूलमानाने विधान करता येईल. मलकारे वाकनीस रचित एका समकालीन बखरीत - (९१ कलमी बखर) म्हटले आहे,

> "आम्ही चार लक्ष होनांची तनखा मिळविली. पन्नास साठ लक्षांचा मुलूख मिळविला. ऐंशी लक्ष होन खंडण्या घेतल्या."

(९१ क बखर साने प्रत क्र. ७५, सरकार प्रतीत खंडणी अथवा चौथ असे म्हटले आहे. सरकार यांनी 'तारीखे शिवाजी' या फारसी ग्रंथाचे भाषांतर केले आहे. चौथ हा शब्द इतर ३ प्रतींत भारतवर्ष (पारसनीस) राजवाडे, फॉरेस्ट- आढळत नाही.)

यदुनाथ सरकार यांनी आपल्या शिवचरित्रात शिवाजीच्या उत्पन्नाचा सभासद बखरीतील म्हणून जो आकडा दिला आहे तो चुकीचा आहे, असे म्हटले आहे. चौथपासून ८० लाख होन वसुली येत होती हे विधान सभासद बखरीत नाही. ९१ कलमी बखरींत (७५ कलम) ८० लाख होनांचा 'खंडणी' म्हणून उल्लेख आला आहे. यदुनाथांनी या दोन्ही बखरीतील आपल्यास हवे ते उल्लेख एकत्रित केले आहेत आणि म्हटले आहे की, बखरकारांची ही विधाने मान्य केली तर शिवाजीच्या राज्याचे उत्पन्न ७ कोटी रुपये होते; पण हे कागदी अंदाज असंभवनीय वाटतात, ते जास्तीत जास्त या आकड्याच्या १/१० इतके असावे असे म्हटले आहे. यदुनाथांनी होनाचा भाव ७ रु. धरला आहे ते बरोबर नाही. शिवकालात होनाची (सुवर्ण नाणी) किंमत पावणेचार ते चार रुपयांहून अधिक केव्हाच नव्हती. (सरकार, शिवाजी पृ. ३५८)

सभासदाने दिलेला शिवाजीच्या राज्याच्या उत्पन्नाचा आकडा यदुनाथ सरकारना अतिशयोक्त आणि अविश्वसनीय वाटतो; पण आपले नवनिर्मित राज्य आर्थिकदृष्ट्या समर्थ करण्यासाठी शेतीव्यवसाय, उद्योगधंदे यांच्या विकासासाठी शिवाजी राजाने जे प्रयत्न केले होते, त्यावरून सभासदाने दिलेला आकडा असंभवनीय वाटण्याचे कारण नाही.

पेशवे दप्तरात सापडलेल्या एका अप्रकाशित हिशोबाच्या कागदामुळे शिवाजी राजाच्या राज्याच्या उत्पन्नाचा काही अंदाज करणे शक्य झाले आहे. या अप्रकाशित कागदावर तारीख नाही, शिक्का नाही त्यामुळे तो अस्सल मानता येणार नाही; पण

त्यातील मजकूर सभासद बखर आणि शिवाजीच्या राज्याच्या सीमा सांगणारा 'स्वराज्याचा जाबता' याचा जो मागे उल्लेख आला आहे यांच्याशी ताडून पाहता, हा अप्रकाशित कागद म्हणजे एक अस्सलबरहुकूम नक्कल असावी असे वाटते. (हा कागद या प्रकरणासोबत जोडला आहे.)

शिवाजीच्या राज्याचे कमाल उत्पन्न या हिशोबाच्या कागदात पातशाही होनात दिले आहे ते पुढीलप्रमाणे :

१.	तळकोकण (१३ सुभे)	१,४२,००,००० होन
२.	वरघाट (८ सुभे)	७,२५,००० होन
३.	देश (१५ सुभे)	१५,७५,००० होन
		१, ६५,००,०००

या उत्पन्नात सुभे बारामती, इंदापूर परगणा आणि जुन्नरच्या ज्या १३ तर्फा शिवाजीकडे होत्या, त्यांच्याकडून वसूल केलेल्या रकमांचे आकडे आलेले नाहीत.

पातशाही होनांचे आलमगिरी रुपयांत विनिमयमूल्य पावणेचार रुपये होते. या कागदात दिलेले आकडे हे यदुनाथ सरकारांचा तर्क खोडून तर काढतातच, पण ते सभासदाने दिलेल्या आकड्यांच्या जवळपास आलेले दिसतात. तेव्हा सभासदाचे विधान अतिशयोक्त तर नाहीच, पण संभाव्य वाटण्यासारखे आहे. या दोन्ही साधनांचा बखर आणि पेशवे दप्तरातील कागद एकत्रित विचार करून मराठी राज्याचे वार्षिक उत्पन्न एक कोटी होनाहून अधिक असावे असे मानावयास हरकत नाही.

समारोप

मराठी राज्याच्या उत्पन्नाच्या विविध बाबींच्या येथवर केलेल्या विवेचनावर, शिवकालात राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी किती प्रकारचे कर आकारले जात होते याची कल्पना आली असेल. समाजातील कोणत्याही घटकाला करापासून मुक्तता नसे, सरकारी खजिन्यात प्रत्येकाला काही ना काही भर घालावी लागत असे. गरीब लोक अप्रत्यक्षरीत्या कर देत, मिठावरील कर तर कोणालाच चुकला नव्हता. कारागीर व्यावसायिक कर देत, तर शेतकऱ्याला शेतसारा चुकविता येत नसे, कारण मध्ययुगात सरकारची सारी भिस्त जमीन महसुलावर होती. १६७० साली शिवाजी राजाने 'बटाई'चा तह आपल्या राज्यातील काही भागांवर बसविला आणि काही कर रद्द केले. यामुळे शेतसाऱ्याचा दर २/५ वरून १/२ झाला असला तरी रद्द केलेल्या करामुळे राज्याच्या उत्पन्नात झालेली घट भरून निघाली असेल असे वाटत नाही.

जकात आणि रहदारी कर व्यापाऱ्याकडून वसूल केले जात असले, तरी शेवटी त्याचा बोजा गिऱ्हाइकावरच पडत असतो, कारण कराची रक्कम व्यापारी वस्तूच्या किमतीत मिळवितात. वतनदार आणि इतर वंशपरंपरा अधिकारी यांना आपल्या उत्पन्नाचा काही भाग सरकारात कररूपाने द्यावा लागत असे आणि त्याचबरोबर काही प्रासंगिक

भेटवस्तू अथवा नजराणे राजाला अथवा आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना द्याव्या लागत. वतनदारांचे रयतेवरील वर्चस्व कमी करण्याच्या हेतूने शिवाजी राजाने काही वतनदारांची वतने अमानत करून अथवा त्यांचे काही हक्क रद्दबातल करून त्यांना शासन करण्याचा प्रयत्न केला होता. सरकारी खजिन्यात यामुळे काही भर पडली असणार.

उत्पन्नाच्या बाबींचा वर जो प्रपंच केला आहे त्यावरून शिवकालात संपूर्ण स्वराज्यात एकच एक करपद्धती रूढ होती असे म्हणता येणार नाही. प्रत्येक प्रदेशाची आर्थिक परिस्थिती, रीतीरिवाज, रूढी यांचा विचार करून तेथील करपद्धती निश्चित केली जात असावी. उदाहरणार्थ, कोकणातील कर हे देशावर आकारलेल्या करासारखेच असतील असे नाही. वतनदारांना दिलेल्या सनदापत्रातून करासंबंधी अथवा करवसुलीसंबंधी काही उल्लेख केलेले असतात. करवसुली कायद्याप्रमाणे (कुलकानू) रोखाने अथवा वस्तुरूपाने (नकदी अथवा जिनसी) एखाद्या व्यक्तीच्या नावे (इस्मी) अथवा स्थानिक रिवाजाप्रमाणे (रस्मी), लिखित नियमाप्रमाणे (कलमी) की रूढीप्रमाणे (कदमी) करावयाची याच्या सूचना सनदापत्रात दिल्या जात असत. करासंबंधी आणि त्यांच्या वसुलीसंबंधी जे विविध शब्द येथे दिले आहेत त्यावरून शिवकालीन करयंत्रणा किती लवचीक स्वरूपाची होती याची कल्पना येईल.

या प्रकरणात ज्या करासंबंधी चर्चा केली आहे त्यांपैकी बरेचसे कर हे ग्रामाधिकारी अथवा परगण्याचे अधिकारी यांचे 'हकलाजिमा' आहेत हे सहज लक्षात येते. सरकार अशा करांपैकी काही हिस्सा आपल्याकडे ठेवून घेऊन, वंशपरंपरागत अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवेचे वेतन म्हणून परत करीत असावे. वतनाच्या सनदापत्रात 'हालीपटी', 'पेस्तरपटी' आणि 'बाजेपटिया' असे शब्दप्रयोग वारंवार येतात. हे शब्द वतनदारांचे करवसुलीसंबंधीचे अधिकार दर्शवितात. 'हालीपटी' म्हणजे प्रचलित कर आणि 'पेस्तरपटी' म्हणजे नंतरच्या काळात बसविले जाणारे संभाव्य कर; आणि 'बाजेपटिया' म्हणजे सनदापत्रात ज्यांचा उल्लेख राहून गेला असेल पण प्रत्यक्षात ज्या प्रचलित होत्या अशा पट्ट्या अथवा कर वसूल करण्याचे अधिकार वतनदारांना सनदापत्राद्वारे दिले होते.

कर हा शब्द आधुनिक काळात निश्चित दराने आणि नित्यनियमाने वसूल केलेली रक्कम असा केला जातो; परंतु शिवकालातील प्रशासक एका विशिष्ट कालखंडांतील राज्याच्या गरजेप्रमाणे आणि आपल्या अधिकाराचा पूर्ण उपयोग करून निरनिराळ्या व्यक्तींकडून अथवा वर्गाकडून आपल्या मनास पटेल तसा वसूल करीत असल्याचे दिसते. सामान्यत:, काही बाबी वगळल्यास, करांचे दर क्वचितच निश्चित केलेले आढळतात; आणि उत्पन्नाच्या बाबींचे स्पष्टपणे वर्गीकरण केल्याचे दिसत नाही. मेस्तक पुस्तकात करवसुलीची पद्धती, विशेषत: जमीन महसुलासंबंधीची दिली आहे, पण प्रत्यक्षात तिचे तंतोतंत पालन केले जात होते असे दिसत नाही.

काही व्यक्तींना करापासून मुक्त केलेले आढळते. उपलब्ध कागदपत्रांवरून असे दिसून येते की, ब्राह्मणवर्ग अथवा धार्मिक व्यवहारात गुंतलेले मठाधिपती अथवा इतर संघटनाप्रमुख यांच्याकडून कर वसूल केला जात नसावा; त्यांना पूर्णपणे अथवा अंशत:

करमुक्त केले असावे. उदाहरणार्थ, चाफळच्या एका ब्राह्मणाला १ खंडी (२० मण) ज्वारी आणि ४ गाई मठाकडे नेताना मार्गात कसलीही जकात अथवा कर द्यावा लागत नाही. (प.सा.सं. २ : २०८८) आपणास इनामपट्टीतून मुक्तता मिळाली पाहिजे असा दावा करताना एक गोसावी आढळतो. (राजवाडे १५ : ९२)

करांचा बोजा लोकांवर त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणात किती पडत असावा हे साधनाअभावी, तसेच एकच एक करपद्धती सर्वत्र लागू नसल्याने, सांगणे कठीण आहे. असे असले तरी शिवकालात शेतसारा असह्य झाला, करपट्ट्या जुलूम-जबरदस्तीने सरसहा वसूल केल्या जातात म्हणून लोकांनी उठाव केला आहे अथवा शेतसारा आणि कर देताना खळखळ केली आहे, अशी फारशी उदाहरणे आढळत नाहीत. जेव्हा माणसाच्या गरजा मर्यादित होत्या आणि त्या पूर्ण करण्याची साधने सर्वसाधारणपणे उपलब्ध होत असत, अशा परिस्थितीत लोकांना तक्रार करण्यास फारसा वाव नसे.

अर्थात बेकायदेशीर कर अथवा जबरदस्तीने केलेली वसुली लोक मुकाटपणे सहन करीत होते, असा याचा अर्थ करता कामा नये. पुणे परगण्यातील एका इनामदाराने मिरासपट्टी देण्याचे साफ नाकारल्याचे व सुभेदाराकडे आपली तक्रार ठोसपणे मांडल्याचे एक उदाहरण मागे दिले आहे. त्याचा विरोध मिरासपट्टीला नव्हता, तर ज्या वर्षी ती वसूल केली जात होती त्या वर्षी पुणे परगणा त्या कराच्या कक्षेत येत नव्हता. सरकारला या तक्रारीची दखल घ्यावी लागली आणि सुभेदारामार्फत पूर्ण चौकशी करून इनामदाराची बाजू सत्य आहे असे पटल्यावर पुणे परगण्यावरील मिरासपट्टी मागे घ्यावी लागली.

शिवकालीन करपद्धतीचा सूक्ष्म अभ्यास केल्यावर असे आढळून येते की, या कालखंडातसुद्धा करांचा बोजा श्रीमंतांपेक्षा गरीब समाजावरच अधिक पडत होता. गरिबांवरील हा बोजा कमी करण्याच्या हेतूने वतनदारांचे हकलाजिमा कमी करण्याचा अथवा प्रसंगी रद्दबातल करण्याचा, मुसलमान राजवटीतील काही अनावश्यक कर रद्द करण्याचा आटोकाट प्रयत्न शिवाजी राजाने केला होता हे नाकारता येणार नाही. असे असले तरी राज्यकर्त्याला संपूर्ण उदारपणाचे धोरण अवलंबिता येत नाही. रयतेची आर्थिक भरभराट झाली तर हा करभार सुसह्य होईल, अशा विचाराने प्रेरित होऊन शिवाजी राजाने शेती आणि उद्योगधंदे यांच्या विकासाला प्रेरणा देण्यासाठी आर्थिक साहाय्य देण्याच्या धोरणाचा सतत पाठपुरावा केलेला दिसतो.

■■

परिशिष्ट : १ (प्रकरण ६)

कानुलाजिमा कोतवाल कसबे चांदवड दर नगे के शाही निकाळू व पैसाळू व उभा मार्गे

केणे उभा मार्ग
व नि।। व पैसाळू
दर नगे 6३
सिगोटी
म्हैसीस 6६ बैलास
6३
बाटीस निमे गोऱ्ही
6१।।
6३
घोडा विकेलियास
पैसाळू
व नि।। व उभा मार्ग
मोठा घोडियास
.।।.
बटी विकेली त्यास
.।।.

रुई दर नगे

दरगो 6६ बेदीस 6३
पाने दरभारियासी ५०

भूस दर नगे
6।।

लहानास
.।.

टीक दर नगे
.।।.

गाडा व वहिली व
गाडी
गाडियास रुके
वहिलीस 6६

कापड दर नगे

बारीक
.।।.
तेल दर जोडीस
66१ जोडीस
66.।. दर मणे

तूप
66१
66.।.

गाडलीस 6६

घोंगडे
.।.
सूत दर मणे
वजन बरीदी
6१।। बारीक दर मणे
१ घोंगडे
काबलीस दर नगे रुके
6६
घाणा लागेल त्यास
तमाखू दर नगे 6२।

बांद व गाईस रुके 6२

सबजीचा भरा येईल
त्यास एक नि।। वजन
६
बरीदी 66२।।
पाटी येईल त्यास मुठी
१ घेणे
मादगाई बकर कसाब
करील त्यास रोजा
आठा बरी (दी)
सेर सवा 66१।

भूस कानू दर नगे रुके
बारा .।.
यासिकमाविस सदरहू
नगाचा पाऊण नग
मजुरा देऊनू घेत
असेती
जिनस भूस
जोरी सजगुरे गहू चणे
मसूर नागल्या
मूग मठ अबाडिया

आंसी व सुरजी दर

नगी कानू टके ३6
यासिकमाविस
कारकीर्दी
मलिक अंबर
नगाच्या
पाऊण नग मजुरा
देऊन घेती टका २6
घोडियासी कानू

मोठ्या घोड्यास
होनू १6 टका १6
सिगरू अगर यारेदी

यासिकमाविस
कारकीर्दी मलिक
अंबर टका एक १6
गोऱ्हा असेली
त्यास निमे

लाकडाच्या मोळीस
लाकूड एक १
गोवारी गुरे राखेल
त्यास दर माहे रुके

मद दर जोडीस 66२
दरमणे 66।

निबाच्या भरिया (स)
(सु)मार निबे ५
सिगोटी
बैलास टके १।.३
म्हैस कानू टके २

यसिकमाविस
कारकीर्दी मलिक
अंबर टके १ 6६
बाटीस निमे

कापडकानू
बारीक नगी
होन .।।. रूके .।।.
यासिकमाविस
कारकीर्दी
मलिक अंबर नगाचा
पाऊण नग मजुरा

देऊनू चौकडीस
रुके .।।.
घोंगडे नगी टके ३6

यासिकमाविस
कारकीर्दी
मलिक अंबर
नगाचा पाऊण
नग मजुरा देऊनू

लाहान
असेली त्यास होनू .।.
रुके .।.
यासिकमाविस
कारकीर्दी मलिक
अंबर घेत
असेती

मोठे घोडे	लहान घोडे	सिगरू
होनू .॥. रुके .॥.	होनू.।.	रुके .।.

यादी हर बाबी केली
त्यास कानू
होनू .॥. रुके .॥.
यासिकमाविस
कारकीर्दी मलिक अंबर
घेती
होनू .।. रुके .।.
तंबाखूचे सवारीस रुके
.॥३
यासिकमाविस खोत
दरम्यान
जाला त्याने कमावीस
केली
रुपया नीम .॥. घेत
असेती

चौकडीस
घेती रुके .।.

काबली दर नगास टके
२।. यासिकमाविस
कारकीर्दी मलिक
अंबर घेत असेती
टके १॥

लोहकरी दर नगी कानू
टके २।
कमावीस नगाच्या
पाऊण नग
मजुरा देऊनू कारकीर्दी

मलिक अंबर घेती टके
१॥. रुई दर सवारास
टक २
दोनी यासिकमाविस

कारकीर्दी मलिक अंबर

नगाच्या पाऊण नग

मजुरा देऊनू टका एक
घेती १6

(भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे, ग. ह. खरे संग्रहित, अप्रकाशित कागदाची ही नक्कल आहे. हा कागद नाशिकच्या राजेबहादर यांचा आहे. चांदवड कसब्यातील कोतवालाचे हक्क यात सांगितले आहेत. या कागदावर तारीख नसली तरी अक्षरवटिकेवरून हा कागद शिवकालीन असावा असे वाटते.)

परिशिष्ट : २ (प्रकरण ६)

श्री

जमाई स्वराज्याचा कमालदस्त कारकीर्दी राजश्री सिवाजीराजे होन इजमाईली होन पातशाही वाड यानी निवडलेले कागद (R.No.5)

तल कोकण

होन	
१०००००	सुबा आकोले
१०००००	सुबा फोंडे
१२५०००	सुबा भिवगड
१५००००	सुबे कुडाळ
२२५०००	सुबे राजापूर प्रभावली
१७५०००	सुबे दाभोल
१७००००	सुबे जावली वले मुऱ्हे
१०००००	सुबे राजपुरी
१०००००	सुबा चेऊल
१०००००	सुबे कल्याण
७५०००	सुबे भिवंडी जवार
१४०००००	रामनगर बमय घर्णा देवी सह

वरघाट
किता माहाल ८ अजमास

होन	
७५०००	बेलगाव पातशहापूर
१०००००	प्रा।। संपगाव
१२५०००	पा।। गदग (१)
१०००००	पा।। लक्ष्मेश्वर
७५०००	पा।। नवलगुंद
१०००००	पा।। कोपळ
१०००००	पा।। बेटगिरे खुदावंदपूर
५००००	पा।। हल्याळ
७२५०००	८

देश

१०००००	सुबे अजिरे
१०००००	सुबा तारळे
१०००००	सुबा कोल्हापूर
२०००००	सुबा पनाळा
१०००००	सुबा मलकापूर
१५००००	सुबा कऱ्हाड
१०००००	सुबा सातारा
२०००००	सुबे वाई
१०००००	सुबा खटाऊ
१०००००	सुबा माण परगणे फलटण
२०००००	सुबा मावले १३
१२५०००	सुबा पुणे
	सुबा बारामती
	सुबा प ।। इंदापूर
	सुबा जुन्नर पैकी १३ तरफा
१५७५०००	

१ इजमाईली होन म्हणजे एकूण होन

(प्रस्तुत अप्रकाशित कागद वाड यांनी पेशवे दप्तर, पुणे येथील अधिक संशोधनासाठी निवडलेल्या कागदांपैकी रुमाल नं. ५ मधील आहे. हा कागद अपूर्ण असून यावर तारीख आणि शिक्का नाही. मूळ कागदाची ही नक्कल असावी.)

महाराष्ट्र राज्य : प्रशासन खर्च

नवीन राज्य संपादन केल्यानंतर त्याच्या प्रशासनाची, संरक्षणाची उत्तम व्यवस्था ठेवणे हे राजाचे आद्यकर्तव्य असते. सरकारी खर्चात अनेक बाबी येतात. यात राजा व त्याच्या घराण्यावर खर्च, मुलकी आणि लष्करी व्यवस्थेवरील खर्च, आर्थिक विकासाच्या कार्यावरील, विशेषत: शेती आणि इतर उद्योगधंद्यांच्या उत्तेजनार्थ करावा लागणारा खर्च, यांचा प्रामुख्याने विचार करावा लागतो. प्रशासन परिणामकारक होण्याच्या दृष्टीने राज्याचे लहान-मोठे विभाग करावे लागतात. त्यावर निरनिराळ्या कार्यक्षम अधिकाऱ्यांच्या नेमणुका कराव्या लागतात. मुलकी खात्यास, लष्करी चाकरीस कोणती माणसे योग्य आहेत याची पारख करून योग्य निवड करावी लागते. प्रस्तुत संदर्भात सभासद म्हणतो,

> "दफ्तरदारीमध्ये शहाणा पाहून मुलखात ठेवावा... पुढे होता होता शहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा. सुभ्याचा मजूमदार लिहिणार, चौकस, हिशेब जाणता त्यासच मामला माहालाचा सांगावा. केवळ लिहिणे येईना, कमाविशी न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा आणि पादशाहीत चाकरी करणे, अगर घोडे घेऊन शिलेदारी करणे असे सांगोन निरोप द्यावा." (सभासद पृ. २५)

'शहाणा आणि चौकस' या सभासदाच्या शब्दप्रयोगावरून योग्य माणसाच्या निवडीबाबत शिवाजी राजे किती कटाक्षाने पाहत याची कल्पना येते. अयोग्य व्यक्तीला पादशाहीत जाऊन नोकरी कर अथवा स्वत: घोडे घेऊन शिलेदार होण्याचा प्रयत्न कर व राजाच्या लष्करी सेवेत जागा मिळविण्याची खटपट कर असे सांगण्यास ते मागे-पुढे पाहत नसत. केवळ मराठी अथवा आपला माणूस म्हणून त्याला मराठी राज्यात

नोकरी मिळण्याची शक्यता नसे. शिवपूर्वकालात विशेषत: लष्करी अधिकाऱ्यांना पगारापोटी मोकासे देण्याची प्रथा होती. शिवाजी राजांनी ही अनिष्ट प्रथा बंद करून, अशा अधिकाऱ्यांचे तनखे, तैनाती ठरवून दिल्या. त्यामुळे प्रशासनावरील खर्चाची सारी जबाबदारी सरकारवर येऊन पडली होती. सरकारी उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ घालून मराठी राज्य लोककल्याणकारी कसे होईल यासाठी शिवाजी राजांनी जे प्रयत्न केले ते जाणून घेणे उपयुक्त ठरेल.

राजावरील खर्च

मराठी राजाचे खाजगी जीवन अत्यंत साधे असावे असे दिसते. मुघली अथवा मुसलमानी पादशहांचा थाट मराठी दरबारात अभावानेच आढळून येतो. अर्थात योग्य त्या कागदपत्रांच्या अभावामुळे शिवाजी राजांच्या वैयक्तिक जीवनावर किती खर्च होत होता हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. तरीसुद्धा उपलब्ध इतर माहितीवरून मराठी राजा आणि त्याचे घराणे यावर सरकारी तिजोरीतून होणारा खर्च मर्यादित स्वरूपाचा असावा असे अनुमान काढण्यास प्रत्यवाय नसावा. याला एकच अपवाद म्हणजे राज्याभिषेक प्रसंगी शिवाजी राजांनी मराठी राज्याचे वैभव प्रस्थापित करण्यासाठी आपला खजिना रिकामा होईल इतका उदारपणे केलेला खर्च हे होय; परंतु एरवी हे खर्चाचे प्रमाण अवास्तव नसावे असे म्हणता येईल.

शिवाजी राजांचे कुटुंब तसे मोठे होते. त्यांना आठ बायका आणि आठ मुले होती. संभाजी आणि राजाराम हे पुत्र आणि उरलेल्या सहा कन्या होत्या. या सर्व अपत्यांचे विवाह शिवाजी राजांच्या हयातीतच झाले होते; परंतु या लग्नांची वर्णने उपलब्ध नसल्यामुळे या मंगल कार्यावर किती खर्च झाला असावा याचा अंदाज करणे कठीण आहे.

रायगड हा शिवाजी महाराजांच्या राजधानीचा दुर्ग. राजधानीला शोभेल आणि आवश्यक अशा इमारती, राजवाडे, सज्जे, प्रशस्त महाल, राण्यांसाठी स्वतंत्र महाल ज्याला राणीवसा म्हणत, किल्ल्यावर महाराजांसमवेत राहणाऱ्या मंत्र्यांची, लष्करी अधिकाऱ्यांची आणि काही विश्वासू सेवकांची निवासस्थाने यांचा प्रामुख्याने समावेश करता येईल. याखेरीज पीलखाना, उष्टरखाना, रथशाळा, अंबारखाना, फरासखाना, तालीमखाना, दारूखाना, दप्तरखाना इत्यादी अठरा कारखान्यांसाठी आणि बाजारपेठेसाठी इमारती गडावर बांधल्या होत्या. तसेच लहान लहान लष्करी, मुलकी अधिकाऱ्यांचीही घरे होती. (सभासद पृ. ६९, इंग्लिश रेकॉर्डस् १ : ३७२) डॉ. फ्रायर या प्रवाशाने गडावर लहान-मोठ्या अशा सुमारे ३०० इमारती होत्या असे म्हटले आहे. (फ्रायर पृ. २०३) गडावरील अशा मोठ्या प्रमाणावरील बांधकामासाठी सरकारी तिजोरीतून बराच पैसा खर्ची पडला असावा.

मराठी राज्याची सारी मदार गिरिदुर्ग, जलदुर्ग, भूदुर्गांवर उभी असल्याने नवीन किल्ले बांधणे, जुन्या किल्ल्यांची डागडुजी करणे, त्यात सुधारणा करणे यासाठी

शिवाजी महाराजांनी एक लक्ष पंचवीस हजार होन (एक होन म्हणजे साडेतीन ते पावणेचार रुपये) इतकी रक्कम मंजूर केल्याचा उल्लेख एका कागदपत्रात आढळतो. विशेषत: सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, प्रतापगड, पुरंदरगड, राजगड इत्यादी किल्ल्यांच्या देखभालीकडे राजाचे विशेष लक्ष असल्याचे दिसून येते. (राजवाडे ८ : २२)

शिवाजी राजाच्या खजिन्यात अनेक रत्ने, माणके, दागिने यांचा संचय होता, असे सभासद बखर, हणमंते रचित 'राज्यव्यवहार कोश' या समकालीन साधनातील उल्लेखावरून दिसून येते. यात अनेक हिरे, माणके, पन्ना, पोखराज, मोती, लसण्या (एक प्रकारचा मौल्यवान पाषाण), गोमेद, अंगठ्या, रत्नजडित तलवारी-कट्यारीच्या म्याना, पदके अथवा धुगधुगी (गळ्यातील दागिना), मोतीमाळ, सरपेच, चंद्ररेखा, शिसफूल, नागबिनी (नथ), बाजूबंद, तोडे, काकणे, पट्टे, कर्णभूषणे इत्यादी अलंकारांचा उल्लेख आलेला आहे. यांखेरीज अनेक सोन्या-रुप्यांची नाणी, वस्त्राभरणे यांचाही उल्लेख या साधनांतून आढळतो. यदुनाथ सरकारांनी आपल्या 'हाऊस ऑफ शिवाजी' या पुस्तकात यासंबंधी विस्तृत माहिती दिली आहे. (सभासद पृ. ९५-९७, राज्य व्यवहार कोश, शिवचरित्र प्रदीप प्रकरण २, सरकार पृ. १८२-१८६)

शिवाजी राजांचा जामदारखाना अथवा वसनागारात मुंगा पाटण अथवा जरतारी कापडाचे १ लाख नग, दुपट्टे, रेशमी कापड, शाली आणि इतर लोकरी कपडे, पट्टे, किनखाब, साधे आणि रंगीत कापड, मुंडासे, झगे, मंदील, कमरपट्टे, चादरी, डगले, सखलाद, मखमल, ताफ्ता, सोनेरी रुपेरी छिटे, साधे आणि रंगीत कापड, चिकाचे कापड, पासोडी, साडी, पटाव, मुकटे इत्यादी विविध प्रकारची वस्त्राभरणे होती असे राज्यव्यवहार कोशावरून समजते (प्रकरण २ : ५६-६९). छपन्न देश आणि समुद्रमार्गे जमा केलेल्या वसनागारातील कपड्यांची किंमत अजमासे एक कोटी नेहमीचे होन आणि पन्नास हजारी निशाणी होन इतकी भरेल असे सभासद म्हणतो. (सभासद पृ. ९७) शिवाजी राजांनी जव्हाहीरखाना आणि वसनागारातील या मौल्यवान वस्तू स्वत: खरेदी केल्या होत्या अथवा त्या त्यांना भेटीदाखल मिळाल्या होत्या अथवा त्यातला काही हिस्सा लढाईत संपादलेल्या वस्तूंचा होता, हे निश्चित पुराव्याअभावी सांगणे कठीण आहे.

शिवाजी राजांनी आपल्या राज्याभिषेकासाठी बरीच संपत्ती वेचली होती असे उपलब्ध माहितीवरून दिसून येते. 'कलयुगीचा ब्रह्मदेव' असे ज्याचे वर्णन सभासद करतो; 'राजियाची कीर्ती ऐकून जो वाराणशीहून रायगडी महाराजांच्या दर्शनास येतो, त्या वेदमूर्ती गागाभट्टाची भेट घेऊन त्याला मोठ्या सन्मानाने आणले होते. त्याला रत्नखचित अलंकार, पालखी, घोडे, हत्ती देऊन मोठ्या सन्मानाने रायगडावर त्याचे स्वागत केले जाते, तेव्हा संतुष्ट होऊन गागाभट्ट म्हणतो,

> "मुसलमान बादशहा तख्ती बसून छत्र चामर धरून पातशाही करतात आणि शिवाजीराजे यांनीही चार पादशाही दबावल्या आणि पाऊण लाख

घोडा, लष्कर गडकोट (मेळविले) असता त्यास तक्त नाही. याकरिता मऱ्हाठराजा छत्रपती व्हावा असे चित्तात आणिले.'' (सभासद ८०)

शिवाजी राजांनाही हा विचार पटला आणि ६ जून १६७४ रोजी त्यांनी राज्याभिषेक करून घेतला आणि नवा राजशक सुरू केला. या समारंभासाठी बनविलेले सिंहासन सोन्याचे होते व त्याचे वजन ३२ मण होते व त्यात नाना प्रकारच्या मौल्यवान वस्तू जडविल्या होत्या. राज्यारोहण समारंभप्रसंगी वापरण्यासाठी निरनिराळ्या आकाराचे सोन्याचे सोळा कुंभ महत्त्वाच्या व्यक्तींसाठी बनविले होते. राजासाठी सोन्याचा खास मंच घडविला होता. राज्याभिषेकासाठी देशाच्या निरनिराळ्या भागातून ब्राह्मणांना पाचारण केले गेले होते. त्यांना कित्येक दिवस मिष्टान्न दिले, दक्षणा आणि मंत्र्यांना प्रत्येकी एक लक्ष होन बक्षीस, हत्ती, घोडे इत्यादी भेटवस्तू दिल्या. विविध क्षेत्रातील नद्यांच्या पवित्र पाण्याचे कुंभ आणविले (फ्रायर : १, पृ. २०५-६, सभासद पृ. ८२) शिवाजी राजांना २४ सप्टेंबर १६७४ रोजी निश्चलपुरी गोसावी या तांत्रिकाच्या सल्ल्यानुसार दुसरा राज्याभिषेक करावा लागला. त्यासाठीही दानधर्मापायी काही खर्च झाला असणार.

या समारंभावर सभासदाच्या मते, अंदाजे एक कोटी बेचाळीस लाख होन इतकी रक्कम खर्ची पडली असावी, असे आहे. कदाचित हा आकडा फुगवून सांगितला असावा असे काही इतिहासकारांना वाटते. कारण सभासदच एके ठिकाणी म्हणतो की, मराठी राज्याचे वार्षिक उत्पन्न एक कोटीचे होते. अर्थात राज्याभिषेकाच्या खर्चाचा भार सर्वस्वी सरकारी तिजोरीवर पडला होता असे म्हणता येणार नाही. आपल्या वैयक्तिक खजिन्यातून राजांनी काही खर्च केला असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

यदुनाथ सरकारांच्या मते, ''राजाने मिष्टान्न भोजन, दक्षणा, भेटवस्तू दिल्या, भारी सिंहासन बनविले, अलंकार घडविले हे सारे मान्य केले तरी या राज्याभिषेकासाठी दहा लाख होन अथवा पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च झाला नसावा'' (सरकार शिवाजी पृ. २०४) अर्थात सरकारांचा हा तर्क पटण्यासारखा नाही. आपल्या दुसऱ्या एका ग्रंथात 'शिवाजी राजाच्या संपत्तीची मोजदाद' या प्रकरणात त्यांनीच दिलेल्या आकड्यांवरून कित्येक शतकानंतर एका हिंदू राजाच्या होणाऱ्या या अभूतपूर्व राज्याभिषेक सोहोळ्यावर, सभासद या समकालीन चरित्रकाराने दिलेली रक्कम खर्च झाली असल्यास त्यात अशक्य वाटण्यासारखे काही नाही. या राज्याभिषेकासाठी किमान कोटी सव्वा कोटी होन वेचणे मराठी सत्तेला त्या वेळी अशक्य नव्हते. सभासद म्हणतो त्याप्रमाणे,

''मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती झाला ही गोष्ट काही सामान्य झाली नाही.'' (सरकार हाऊस पृ. १८२-१८९, सभासद, ८२)

धर्मादाय

मराठी राज्य धर्माधिष्ठित नसले तरी मध्ययुगातील मानवी जीवनावरील धर्माचा पगडा विसरता येणार नाही. शिवाजी राजांनी धर्माच्या बाबतीत सहिष्णुतेचे आणि

औदार्याचे धोरण स्वीकारले होते. त्यामुळे धार्मिक कार्यांवर तिजोरीतील काही द्रव्य खर्ची पडले असल्यास त्यात काही नवल नव्हते. त्यांनी धर्मासाठी दिलेल्या देणग्यांत हिंदू-मुसलमान असा भेदभाव मात्र केलेला नव्हता. मुसलमान पीरांना त्यांच्या योगक्षेमासाठी, दर्ग्यांना, मशिदींना, रोषणाई आणि व्यवस्थेसाठी त्यांनी दिलेल्या देणग्यांचा कागदपत्रातून उल्लेख आढळतो. साधुपुरुषांना मिळालेल्या जुन्या देणग्यांचे नूतनीकरण आणि नव्याने दिलेल्या देणग्या यांचे उल्लेख समकालीन सनदापत्रावरून स्पष्ट होतात.

मुसलमानांना दिलेल्या देणग्यांमध्ये इंदापूरचा काझी, भांबवड्याचा खिदमतगार, केळशीचा बाबा याकूत याचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. ''हे राज्य व्हावे हे श्रींच्या मनात फार आहे.'' अथवा ''स्वामीच्या अनुष्ठान बळे'' आपल्यास राज्यप्राप्ती झाली, असे शिवाजी राजांची मनोधारणा असल्याने हिंदू सत्पुरुषांना, मठांना त्याने उदारहस्ते देणग्या दिल्या. यात दैनंदिन धार्मिक विधी निर्वेधपणे आणि शांत चित्ताने करता यावेत म्हणून ब्राह्मणांना दिलेली वर्षासने, ग्रहण प्रसंगी दिलेली दाने, रामदास (चाफळ), मौनीबुवा (पाटगाव), मोरया गोसावी (चिंचवड), कमलनयन गिरी (निंब) आणि इतरांना त्यांच्या मठांच्या व्यवस्थेसाठी दिलेली इनामे, नवीन देवळांच्या उभारणीसाठी झालेला खर्च यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

प्रस्तुत संदर्भात सभासद म्हणतो,

'मुलखात देवस्थाने जागा जागा होती त्यास दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून यथायोग्य चालविले. मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य स्थान पाहून चालविले. वैदिक ब्राह्मण यासि योगक्षेम, ब्राह्मण विद्यावंत, वेदशास्त्रसंपन्न, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी, गावोगावी सत्पुरुष पाहून अन्नवस्त्र ज्यास लागेल त्याप्रमाणे धान्य, द्रव्य त्यास गावचे गावी माहाली नेमून देऊन साल दरसाल त्यास कारकुनानी पाठवावे. ब्राह्मणांनी ते अन्न भक्षून, स्नानसंध्या करून, राजियासी कल्याण चिंतून सुखरूप असावे.'' (पृ. २७)

सभासदाच्या या निवेदनावरून शिवाजी राजांच्या धार्मिक धोरणाची तर कल्पना येतेच; पण या धोरणाच्या कार्यवाहीसाठी तिजोरीतून पैसा कसा खर्चिला जात असावा याचीही कल्पना येते.

रामदास स्वामींच्या चाफळच्या मठाला ३५ गावे, निरनिराळ्या खेड्यांतून ४१० बिघे जमीन आणि सुमारे १२१ खंडी धान्य इतकी भरघोस देणगी मठाच्या दैनंदिन व्यवहारासाठी आणि विविध सोहोळ्यासाठी दिली होती. पाटगावच्या मौनीबुवाला मठाच्या अन्नछत्रात दररोज एक हजार अतिथींना मोफत भोजन देता येईल इतके धान्य आणि इतर भत्ते दिले होते. मठाधिकाऱ्यांना निवासासाठी जमीन, नित्याच्या आरती प्रार्थनांसाठी वाजंत्री, देवाची पालखी वाहण्यासाठी भोई इत्यादी व्यवस्था सरकारमार्फत होती. चिंचवडचे मोरया गोसावी, निंबचे कमलनयन गिरी यांच्या मठांनाही गरजेनुसार

देणग्या दिल्या होत्या.

शिवाजी राजांनी आपली मातोश्री जिजाबाई, काही मंत्री आणि स्वत:चे काही प्रसंगानुसार आणि त्या वेळच्या रीतीनुसार तुलादान घडवून आणले होते. त्या व्यक्तीच्या वजनाचे मोजमाप करण्यासाठी वापरलेले धातू, धान्य, सोने, रुपे, नाणी यांचे वाटप विद्वान ब्राह्मणवर्गात केले गेले. जिजाबाईंनी गरजू पित्याला कन्येच्या विवाहासाठी आपल्या खाजगी संपत्तीतून (जिजाऊची डबी) रक्कम दिल्याची उदाहरणे आढळतात. गुंजणमावळच्या देशमुखाची अडचण लक्षात घेऊन मातोश्रींनी त्याला त्याच्या कन्येचा विवाह निर्वेधपणे पार पाडावा म्हणून आपल्या पदरचे २५ होन, शंभर माणसांच्या पंक्तीला पुरे होईल इतके धान्य दिले होते. (राजवाडे १७ : १६)

शिक्षण आणि विद्यावर्धनासाठी राजाश्रय देण्यासाठी सरकारी तिजोरीतून काही द्रव्य-साहाय्य केले जात असे. वर ज्या मठांचा उल्लेख केला आहे त्यांच्यामार्फत वेदाध्ययनाचे कार्यही होत असे. राजाच्या अष्टप्रधानांतील पंडितराव या मंत्र्याकडे धर्म, शिक्षण, अध्ययन इत्यादी विषय होते. नामांकित विद्वानांना त्यांच्या योगक्षेमासाठी उदारहस्ते देणग्या देण्याचा पंडितरावाला अधिकार दिला होता. त्याच्या खात्यातील कारकुनांना असे आदेश देण्यात आले होते की, वेदविद्यासंपन्न, ज्योतिषशास्त्रविशारद, तपस्वी यांना त्यांच्या गरजेनुसार अन्न, वस्त्र, द्रव्य प्रदान करावे.

काही प्रमुख ग्रंथनिर्मितीच्या कामी शिवाजी राजांनी पुढाकार घेतला होता. रघुनाथ हणमंते यांच्याकडून 'राज्यव्यवहार कोश,' कृष्णशास्त्री ज्योतिषाकडून 'करण कौस्तुभ' हा ज्योतिष शास्त्रावरील संस्कृत ग्रंथ, गागाभट्टाचा 'शिवार्कोदय,' परमानंदाचे 'शिवभारत' भूषणाचे काव्य इत्यादी ग्रंथ शिवाजी राजांच्या प्रेरणेनेच झाले होते.

थोडक्यात, राजा, त्याचे घराणे, त्यांनी केलेले दानधर्म, धर्मकारणासाठी दिलेल्या देणग्या, विद्येच्या उत्तेजनासाठी केलेला खर्च हा काहीसा राजाच्या खाजगी तिजोरीतून आणि मुख्यत: सरकारी तिजोरीतून होत असावा असे म्हणता येईल.

मध्यवर्ती सरकार

शिवाजी राजांना राज्यकारभारात मदत करण्यासाठी एक मंत्रिमंडळ होते, त्यास अष्टप्रधान मंडळ असे म्हणत. या मंत्र्यांना पगार, भत्ते काय होते याची माहिती सभासद देत नाही अथवा ती अन्यत्र कोठे सापडत नाही. आंग्लकालात तयार झालेली चिटणीशी बखर मात्र याबाबतचा तपशील देते. चिटणीशी दप्तरात असलेल्या जुन्या टिपणावरून आपण हे सप्त प्रकरणात्मक शिवचरित्र रचले, असा मल्हार रामरावाचा दावा आहे. चिटणीस हे पिढ्यान्‌पिढ्या राजाच्या दप्तराचे अधिकारी असल्याने त्यांच्या घराण्याकडे राज्यकारभारासंबंधी काही अस्सल माहिती असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. शिवाजीने बाळाजी आवजीला प्रधानमंडळात स्थान देऊ केले होते, पण आपले वंशपरंपरागत चालत आलेले चिटणीशी काम त्याने सोडले नाही. तेव्हा चिटणीशी दप्तरातून आलेली माहिती काही बाबतीत विचारात घेण्यास हरकत नाही. चिटणीस

बखरीचा धिक्कार करणाऱ्या डफ, सरकारसारख्या इतिहासकारांनीही शेवटी या बखरीचा आधार घेतला आहे. चिटणीसाने दिलेले मंत्र्यांचे पगार पुढीलप्रमाणे होते-

१. मुख्यमंत्री अथवा पेशवा : १५ हजार होन प्रतिवर्ष
२. अमात्य मुजुमदार : १२ हजार होन प्रतिवर्ष
३. अन्य मंत्री : १० हजार होन प्रतिवर्ष

राज्याचा कुलसचिव अथवा चिटणीस याच्याकडे राजांची सर्व पत्रे लिहिण्याचे व राजनैतिक पत्रव्यवहार करण्याचे काम होते. बाळाजी आवजी हा शिवाजीचा चिटणीस होता आणि त्याचा वार्षिक तनखा ६००० होन होता.

चिटणीसानंतरचा राजाच्या सचिवालयातील दुसरा प्रमुख अधिकारी म्हणजे फडणीस. त्याचा पगार २००० होन होता. चिमणाजी आवजी हा शिवाजी राजांचा फडणीस होता. पोतनीस, पोतदार, १८ कारखाने आणि १२ महालांवरील अधिकारी आणि अनेक कारकून हे राज्यकारभाराशी निगडित होते; परंतु त्यांच्या पगाराची माहिती मिळत नाही. चिटणीसाच्या मते १८ कारखाने आणि बारा महाल यांवरील अधिकाऱ्यांचे पगार वार्षिक ५०० पासून १०० होनांपर्यंत होते. राज्यव्यवहार कोशात आलेल्या माहितीवरून असे दिसते की, हे कारखाने आणि महाल यांची व्यवस्था शिवाजीच्या राज्यात असावी. परंतु दुर्दैवाने याविषयी अधिक तपशील मिळत नाही. सामान्यत: या संस्थांवर हवालदार, जमादार आणि कारकून असे तीन अधिकारी असत. त्यांपैकी हवालदार हा प्रमुख असून इतर दोघे त्याच्या हाताखाली अनुक्रमे संरक्षणाचे आणि हिशोबाचे काम करीत. सचिवालयातील दुय्यम अधिकाऱ्याचे पगाराचे आकडे उपलब्ध नसले तरी त्यांचे पगार कारखाने आणि महाल यावरील अधिकाऱ्यांहून कमी नसावेत. मंत्र्याला साहाय्य करणारे अनेक कारकून असावेत; पण त्यांच्या मासिक अथवा वार्षिक वेतनाविषयी काही माहिती मिळत नाही.

प्रांतिक सरकार

शिवाजी राजांनी आपल्या राज्याचे तीन प्रांत केले होते. त्यावरील अधिकाऱ्याला सरकारकून असे म्हणत. याचा दर्जा मंत्र्यांसारखा असे. किंबहुना अष्टप्रधान मंडळातील एका जबाबदार मंत्र्यालाच सरकारकून पद दिले जाई.

स्वराज्याच्या उत्तर, दक्षिण आणि आग्नेय विभागांचा तपशील मागे आलाच आहे. (पहा प्रकरण ५)

सरकारकुनाच्या कामाचा काही खास भत्ता त्यांना मिळत होता किंवा नाही हे सांगता येत नाही. सरकारकून जेव्हा आपल्या कामासाठी जात असत तेव्हा दरबारात त्यांना आपला मुतालिक ठेवावा लागे. या मुतालिकाचा पगार अर्थात सरकारातून होत असणार, पण तो किती होता हे सांगता येत नाही. मुतालिक म्हणजे नायब मंत्रीच. तेव्हा त्या मानाने त्याचा पगार असणार.

प्रांताची विभागणी अनेक सुभ्यांत केलेली असे. सुभ्याच्या प्रमुख अधिकाऱ्याला

सुभेदार म्हणत. त्याचा पगार वार्षिक ४०० होन होता. त्यात त्याचा प्रवासभत्ताही येत असे. सुभेदाराच्या तोलाचा सुभ्यातील दुसरा अधिकारी म्हणजे कारकून. त्याचा पगार सुभेदाराइतकाच असे. फक्त त्याला सुभेदारासारखा पालखी वापरण्याचा हक्क नसे. सुभ्याचा हिशोब ठेवण्यासाठी मुजुमदार असे. त्याचा वार्षिक पगार १०० ते १२५ होन इतका होता. त्याला अबदागिरीचा मान होता. शिवाजी राजांनी पातशाही कालातील असलेला सुभेदारांचा छत्र धरण्याचा शिरस्ता मोडून अबदागिरी देण्याची प्रथा सुरू केली. छत्र हे जर राजावर धरावयाचे असेल, तर तसेच छत्र चाकर लोकावरही धरू नये असे शिवाजी राजांची म्हणणे होते. (सभासद पृ. २५) अधिकाऱ्यांची ही सारी तैनात (तनखा) सरकारने द्यावी असा करार केला.

दोन महालांचा मिळून एक सुभा होत असे. सुभ्याचे उत्पन्न पाऊण लाखापासून सव्वा लाखापर्यंत असे. महालाचा अधिकारी हवालदार, त्याचा पगार महालाच्या आकाराप्रमाणे ३ पासून ५ होनांपर्यंत असे. सभासदाने हा पगार मासिक होता किंवा वार्षिक होता याचा स्पष्ट उल्लेख केला नाही. दोन महालांचा अधिकारी सुभेदार, याचा पगार जर ४०० होन होता, तर एका महालाच्या अधिकाऱ्याचा पगार वार्षिक ३ ते ५ होनापर्यंत असणे संभवत नाही. तो बहुधा मासिक पगार असावा. महालावर एक मुजुमदार असे आणि त्याचा पगार ३ ते ५ होन अथवा वार्षिक ५० ते ७५ होनांपर्यंत असावा. मुजुमदाराचा पगार सभासदाने दिला आहे. हवालदारचा पगारही किमान तितका तरी असावा. शिवाजी राजांनी व्यक्तींच्या अधिकारात फरक केला होता, पण पगारात फारसा फरक ठेवला नव्हता असे दिसते. (सभासद पृ. २५)

स्थानिक प्रशासन

अनेक परगण्यांचा मिळून एक सुभा होत असे. परगण्याचे अधिकारी स्थानिक अथवा ग्रामाधिकारी असत. देशमुख-देशपांडे हे परगण्याचे अधिकारी. काही गावांचा मिळून परगणा होत असे. गावचे अधिकारी म्हणजे पाटील आणि कुलकर्णी. देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी ही सारी वतनदार मंडळी होती. त्यांना रोख पगार नव्हता, परंतु सारामुक्त जमिनी होत्या. यालाच 'चाकरी वतन' म्हणत असत. यासंबंधी विस्तृत विवेचन मागे (प्रकरण २) आले आहे. शिवाजी राजांनी मध्यवर्ती आणि प्रांतिक प्रशासनात बदल केले पण स्थानिक प्रशासनव्यवस्थेत हस्तक्षेप केला नाही. एखाद्या गावी कुलकर्णी नसेल तर सरकार तेथे एका अधिकाऱ्याची नेमणूक करीत. त्यास यार्दी म्हणत. गावचे हिशोब लिहिण्याचे काम त्याच्याकडे असे व त्यासाठी त्याला दरमहा १२ लारी (एक चांदीचे नाणे) पगार आणि ४ लारी इतर खर्चासाठी म्हणून मिळत. (शि.च.सा. ५ : ९७५; पे.द. ३१ : २१)

खेडेगावच्या संरक्षणासाठी सरकारला काही खर्च येत असावा. नाईकवाडी नावाचा एक संरक्षक काही खेड्यात नेमल्याचे आढळते; पण नाईकवाडीवर होणारा खर्च गावातूनच वसूल केला जात असे. गावावर जितका खर्च मान्य झाला असेल त्यापेक्षा

अधिक करता कामा नये असा एक दंडक होता.

लष्करी प्रशासन

शिवाजीच्या स्वराज्याच्या कार्यात लष्करी व्यवस्थेला फार महत्त्वाचे स्थान होते. लष्कराचे पायदळ आणि घोडदळ ही दोन प्रमुख अंगे होती. सभासदाने शिवाजीच्या लष्कराची संख्या २,०८,२६० अशी दिली आहे. यांत त्याच्या वैयक्तिक रक्षक पथकाचाही समावेश आहे. रक्षकांची चार पथके असून त्यांत २००० माणसे होती. ही निवडक मावळे मंडळी महाराजांच्या पालखीबरोबर नेहमी असत. सभासद म्हणतो,

> "चहू पादशहांचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडतो. तेव्हा जवळ आहेत ते कार्यास येतील असे जाणून मावळे लोकात पाहणी परीक्षा करून निवडक माणूस पाहून, पतके केली त्यांची नावनिशीवार : १ शंभर लोक म्हणून नाव ठेविले. १ तीस लोक म्हणून नाव ठेविले. १ साठ लोक म्हणून नाव ठेविले. १ वीस लोक म्हणून नाव ठेविले. १ चाळीस लोक म्हणून नाव ठेविले. कलम १

येणेप्रमाणे पतका पतकांची नावे ठेविली. मावळ्या मावळ्यांमध्ये लोक उत्तम निवडले. निवडक भरती करून चार पतके मिळून दोन हजार माणूस ठेविले. "या माणसांना उत्तम भारी पोषाख दिला होता. डोईस मंदील अंगास सखलादी 'फतू' दोहो हाती दोन सोन्याची कडी, कोणास रुप्याची कडी, तरवारास अबनाळ तैनाळ (म्यानाच्या वरील व खालील बाजूचे अडकावण.) सोने-रुप्याचे बंदुकीस कट, रुप्याचे व विटियास कट तैसेच, कानास जोडी कुडक्यांची, येणेप्रमाणे अवघे लोकांस साजसरकार निसबतीने देऊन लोक सजविले." (सभासद पृ. ५४-५५)

मुख्य सैन्याचा बराचसा तपशील सभासदाने दिला आहे.

पागा

घोडे राऊत पागा	१०५०००
सिलेदार पागा	४५०००
	१,५०,०००

ही सारी पागा अशी विभागली होती–

पागा शिलेदार	२९
शिलेदार व मुलखीचे सुभेदार	३१
आरमारी सरदार	३
	६३

पायदळ

१,००,०००

हे सारे पायदळ ३५ मावळे सरदारांच्या हाताखाली होते.

थोडक्यात,

रक्षक पथक	२०००
पागा	१,५०,०००
पायदळ	१०,०००
	१,६२,०००

(सभासद पृ. ९८-१००)

सभासदाने शिवाजी राजांच्या पदरी हत्ती आणि उंट किती होते याचा तपशील दिला नाही. यदुनाथांनी 'तारीखे शिवाजी' आणि 'चिटणीशी बखरी'च्या आधारे हत्तीदळ १२५ ते ३०० पर्यंत आणि उंट १५०० ते ३००० पर्यंत असावेत असे म्हटले आहे. चिटणीस बखरीत राजाकडे २०० तोफा युद्धासाठी सज्ज होत्या व बाकीच्या गडावर ठेवल्या होत्या असे म्हटले आहे. (सरकार पृ. ३६०)

सभासद हा जरी शिवाजी राजांच्या राज्यकारभाराशी निगडित असला तरी, त्याला जिंजीमध्ये हा सारा तपशील कसा उपलब्ध झाला हे कोडेच आहे. तपशिलावर जरी विश्वास ठेवला नाही, तरी शिवाजी राजांच्या राज्यात लोकसंख्येच्या मानाने सैन्याचे प्रमाण अधिक होते असे मानावयास हरकत नाही. कारण स्वराज्यस्थापनेच्या कार्यास आणि चोहोबाजूला असलेल्या शत्रूला तोंड देण्यासाठी अधिक सैन्याची जरुरी त्या काळात होती.

सैन्याचे पगार कसे होते याबद्दलचा तपशील समकालीन बखरीत अथवा कागदपत्रात फारसा आढळत नाही. चिटणीसाने आपल्या बखरीत सेनापतीचा वार्षिक पगार १०,००० होन आणि इतर लष्करी अधिकाऱ्यांचा पगार वार्षिक ४ ते ५००० होनांच्या दरम्यान होता असे म्हटले आहे. खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांचे वार्षिक पगार १५ ते २०० होनांपर्यंत होते.

पागा

पागेचे महत्त्व विशद करताना आज्ञापत्रकार म्हणतो, ''ज्यास अश्वबळ त्याची पृथ्वी प्रजा आहे.'' सरनोबत, पंचहजारी, हजारी, जुमलेदार, हवालदार हे पागेचे प्रमुख अधिकारी. त्यांच्या हाताखाली मुजुमदार, कारभारी, जमेनीस, हेर, पखालजी, नालबंद इत्यादी नोकर असत. बारगीर म्हणजे ज्याला घोडा आणि हत्यारे सरकार पुरवीत असे तो राऊत. शिलेदाराला स्वत:चे साहित्य आणावे लागे. निरनिराळ्या उपलब्ध साधनांच्या साहाय्याने पगाराचा पुढील तक्ता मांडता येईल–

सरनोबत	४००० ते ५००० होन (वार्षिक)
पंचहजारी	२००० होन (वार्षिक)
हजारी	१००० होन (वार्षिक)
जुमलेदार	५०० होन (वार्षिक)
हवालदार	१२५ होन (वार्षिक)
बारगीर	९ होन (वार्षिक)

(राजवाडे ८ : ३३ Foreign Biographies of Shivaji (Martin) (FBS) P 316)

या अधिकाऱ्यांचा वैयक्तिक मदतनिसांचे पगार पुढीलप्रमाणे होते–

मुजुमदार (हजारी)	५०० होन
मुजुमदार (जुमलेदार)	१०० ते १२५ होन
कारभारी (हजारी)	५०० होन
जमेनीस (हजारी)	५०० होन

मुजुमदार हा ब्राह्मण, कारभारी- मराठा व जमेनीस, कायस्थ प्रभू असे होते. 'एकास एक प्रतिमेळ' ही शिवाजीची राजनीती असल्यामुळे अधिकाऱ्यांची जातवार विभागणी केलेली असावी. (सभासद पृ. २२)

पंचहजारीच्या हाताखाली असेच तीन मुलकी अधिकारी होते, पण त्यांच्या वेतनाचा तपशील सभासदाने अथवा इतर कोणी दिला नाही. कदाचित त्यांचे पगारही वरीलप्रमाणेच किंवा थोडे अधिक असावेत. सरनोबताच्या मुलकी अधिकाऱ्यांचे पगारही कोठे आढळत नाहीत.

२५ राऊतांच्या मागे एक पखालजी व एक नालबंद असे. कारकून, हेर, हरकारे इत्यादी नोकर प्रत्येक प्रमुख लष्करी अधिकाऱ्याला दिलेले होते, पण त्यांच्या वेतनाविषयी काही तपशील नाही.

काही अधिकाऱ्यांना खास हक्क दिलेले होते. सभासद म्हणतो की, जुमलेदार आणि त्याचे तीन मुलकी अधिकारी यांना पालखी वापरण्याचा हक्क होता. इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील असेच किंवा याहून अधिक विस्तृत अधिकार असावेत. अर्थात सभासदाने त्याचा उल्लेख केला नाही. लष्करी अधिकाऱ्यांची तैनात, हक्क यावर होणारा खर्च सारा सरकारवर पडत होता. (सभासद पृ. २२, २३)

पागा सरनोबताच्या हाताखाली शिलेदार काम करीत; परंतु त्यांच्या संघटनेविषयी अधिक माहिती उपलब्ध नाही. कदाचित ती राऊतांच्या संघटनेप्रमाणे असावी.

पायदळ

सरनोबत, सप्तहजारी, पंचहजारी, हजारी, जुमलेदार, हवालदार, नाईक आणि काही मुलकी अधिकारी यांचा पायदळाच्या संघटनेत समावेश होता. यांपैकी हजारीस ५०० आणि जुमलेदारास १०० होन वार्षिक वेतन मिळत असे. हजारीच्या सबनीसास १०० ते १२५ होन आणि जुमलेदाराच्या सबनीसास ४० होन मिळत होते. (सभासद पृ. २४)

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, पागेतील लोकांना पायदळापेक्षा जादा पगार होता. पागेतील जुमलेदाराला पायदळातील जुमलेदारापेक्षा ५ पट पगार जादा होता; आणि हजारीला दुप्पट होता. मध्ययुगात पागा हे महत्त्वाचे लढाईचे अंग

असल्याने असे असणे स्वाभाविक होते.

शिवाय पागेची संख्या घोड्यांच्या संख्येवर अवलंबून असल्यामुळे त्याच्या आकारावर मर्यादा होत्या. उत्तम घोडे हे आयात करावे लागत आणि त्यासाठी जबर किंमत मोजावी लागे. पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक असल्यामुळे स्वाभाविकच राऊतांचे पगाराचे दर जादा होते.

शिवाजी राजांना या नित्याच्या खड्या सैन्याशिवाय वतनदारांकडून प्रसंगी सैन्यपुरवठा होत असे. उदाहरणार्थ भीरवाडीच्या वतनदाराने शिवाजी राजांना कळविले होते की, जर त्याच्या शिबंदीला दर दिवशी सहा रुके याप्रमाणे भत्ता दिला तर तो त्यांच्यासह राजांना साहाय्य करण्यास तयार होता. सहा रुके म्हणजे साधारणपणे दोन पैसे, या दराने महिन्याचा पगार ३.३/४ टका अथवा १/४ होन आणि वर्षाचा तीन होन पगार होतो. यावरून असे म्हणता येईल की, शिवाजी राजांच्या खड्या सैन्यातील पाईकांचा वार्षिक पगार तीन होनांपेक्षा अधिक नसावा. इतर लष्करी अधिकाऱ्यांचे पगार लक्षात घेतले तर पाईकाचे वेतन फारच कमी होते असे म्हणावे लागेल.

शिवाजीराजे सैनिकांना वक्तशीर पगार देत असल्याने सैनिकांना तो जरी कमी वेतन देत असला तरी त्याविषयी त्यांना तक्रार करता येत नव्हती, असे डॉ. सेन म्हणतात. हा युक्तिवाद पटण्यासारखा नाही. कमी पगाराचे समर्थन करावयाचेच झाले तर असे म्हणता येईल की, पैशाची क्रयशक्ती (purchasing power) ही अधिक असल्याने आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कदाचित हा कमी पगार पुरेसा असावा, म्हणून त्यांची फारशी कुरकुर नसावी. शिवाय युद्धकाळात त्यांचा पोटगीचा खर्च सरकारच करीत असे किंवा तो परस्पर बाहेर निघत असे.

आरमार

आरमाराचे महत्त्व शिवाजीराजांनी ओळखले होते, "आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र, याकरिता आरमार अवश्य करावे" असे आज्ञापत्रात म्हटले आहे. सभासद म्हणतो,

> "राजियानी जहाजे पाणियातील सजिली. गुराबा व तरांडी व तारवे, गलबते, शिबाडे, गुराबा, पगार अशी नाना जातीची जहाजे करून दर्यासागर (सारंग) म्हणून मुसलमान सुभेदार व मायनाईक म्हणून भंडारी असे दोघे सुभेदार करून दोनशे जहाजे एक सुभा असे आरमार सजले." (सभासद पृ. ६.५)

शिवाजी राजांच्या आरमाराच्या संघटनेविषयी याहून अधिक तपशील मिळत नाही. आज्ञापत्रात विस्ताराने आरमाराचे महत्त्व वर्णन केले आहे. शिवाजी राजांचा संबंध जेव्हा सिद्दी लोकांशी आला तेव्हा त्याला आरमाराची अधिक निकड भासत होती. बोटी बांधणे, त्यांची डागडुजी करणे, व्यवस्था राखणे, अधिकारी नेमणे यांवर सरकारातून

बराच खर्च होत असावा पण त्याचा तपशील कोठे नाही. आरमारी अधिकाऱ्यांचे पगार पागेच्या अधिकाऱ्यांप्रमाणेच असावेत.

किल्ले

मराठी राज्यात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. आज्ञापत्रात म्हटले आहे की,

> "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उद्ध्वस्त होतो. देश उद्ध्वस्त झाल्यावरी राज्य ऐसे कोणास म्हणावे... हें राज्य तरी तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामीनी गडावरूनच निर्माण केले."

गडाकडे पाहण्याचा असा दृष्टिकोन असल्याने शिवाजी राजांनी गडाची बांधणी आणि दुरुस्ती यांवर अमाप पैसा वेचल्याचे दिसून येते. सभासदाच्या यादीप्रमाणे राजाच्या अंतसमयी त्यांच्या ताब्यात लहान-मोठे २४० किल्ले होते. (सभासद पृ. १०५)

प्रत्येक किल्ल्यावर सामान्यत: तीन अधिकारी होते. हवालदार, सरनोबत आणि सबनीस. या सगळ्यांचा दर्जा एकच असून ते एकमेकांच्या सल्ल्याने गडाचा कारभार करीत. "तिघे जण एका प्रतीचे. जो कारभार करणे तो तिघांनी एका प्रतीचा करावा" याखेरीज प्रभुजातीचा एक कारखानीस किल्ल्यावरील कोठीची व्यवस्था पाहण्यासाठी नेमला होता. कागदपत्रांवरून आणखी काही सेवक किल्ल्यावर नेमले होते असे दिसते. उदाहरणार्थ, उटलूर किल्ल्यावर इमारत अधिकारी मुजुमदार, काही सरनोबत, कारकून, हवालदार आणि इमारत अधिकाऱ्यांचे खाजगी सेवक इत्यादींची नेमणूक केल्याचे आढळते. (राजवाडे ८ : ३३, ३५, ३६) त्यांचे पगार पुढीलप्रमाणे दिले आहेत :

हवालदार १२५ होन + २५ होन सेवकांसाठी (२)	
सरनोबत	१०० होन
तट सरनोबत	१२ होन
इमारत अधिकारी १२५ होन + १० होन एका सेवकासाठी	
सबनीस	१०० होन
मुजुमदार (बांधकामखाते)	३६ होन
कारकून	३ होन
(जादा काम असेल तर)	

पाईक, नाईक, बंदुखी, इटेकरी, तिरंदाज व आडहत्यारी (इतर हत्यारे वापरणारे) इत्यादी लोक नेमले होते. त्यांचे पगार सैन्यातील इतर तत्सम सेवकांप्रमाणे असावेत.

किल्ल्याच्या बांधकामाकडे, डागडुजीकडे शिवाजी राजांनी विशेष लक्ष पुरवल्यासारखे

दिसते. कित्येक दुर्गम डोंगरांचे किल्ल्यात रूपांतर केले आणि नवीन दुर्गही बांधले होते. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्गासारखे जलदुर्ग अथवा जंजिरे त्यांनी बांधले. या कामासाठी युद्धापासून मिळालेली संपत्ती अथवा अचानक झालेला धनलाभ यांचा उपयोग केला होता. राजगड, रायगड या गडराजधान्यांच्या बांधकामावर बराच खर्च झाला होता. अनेक निवासस्थाने येथे बांधली होती. १६७२ साली किल्ल्यावरील घरे, सज्जे इत्यादी बांधकामासाठी १ लाख ७५ हजार होन इतकी रक्कम मंजूर केली होती. यापैकी एकट्या रायगडावर ५० हजार होन खर्च व्हावयाचे होते आणि बाकीचे इतर १८ किल्ल्यांसाठी होते. (राजवाडे ८ : २२)

बक्षिसे-इनाम

एखाद्याने सैन्यात चोख कामगिरी बजावली तर त्याच्या पगाराव्यतिरिक्त त्यास उत्तेजनार्थ बक्षीस अथवा इनाम दिले जात असे. प्रस्तुत संदर्भात सभासद म्हणतो,

> "भांडते (लढाई करणारे) माणूस होते तितकी यास भेटून, पोटाशी धरून दिलासा करून, भांडते लोक जे पडले होते त्यांच्या लोकास चालवले. पुत्र नाही त्यांच्या बायकास निमे वेतन करून चालवावे असे केले. जखमी झाले त्यास दोनशे होन, शंभर होन, पन्नास होन दर असामीस जखम पाहून दिधले. मोठमोठे लोक धारकरी जुमले होते, त्यास बक्षीस हत्ती, घोडे दिधले. हस्तकडी, कंठमाला, तुरे, पदके, चौकडे, मोत्याचे तुरे, कित्येकास बक्षीस फार दिले. ऐसे देणे लोकास दिधले. कित्येकास गाव मोकासे बक्षीस दिधले. लोक नावाजिले, दिलासा केला" (सभासद १८-१९)

मोरोपंत पिंगळे आणि प्रतापराव गुजर यांनी पराक्रमाची शर्थ करून मोंगलांपासून सालेरगड घेतला. या युद्धाचे वर्णन सभासदाने मोठे बहारदार केले आहे–

> "मोठे युद्ध जाहाले... चार प्रहर दिवस युद्ध जाहले. मोगल, पठाण, रजपूत, रोहिले, तोफची, हत्ती, उंट, आराबा (तोफगाडे) घालून युद्ध जाहले... युद्ध होताच पृथ्वीचा धुराला असा उडाला की, तीन कोश औरस चौरस आपले व परके माणूस दिसत नव्हते... रक्ताचे पूर वाहिले."

या युद्धातील अपूर्व यशामुळे राजाला आनंद होणे स्वाभाविक होते. त्यांनी तोफा मारल्या, साखर वाटली, ही बातमी घेऊन येणाऱ्या जासूदाला सोन्याचे कडे दिले. एवढेच नव्हे, तर या यशास जे जे कारणीभूत झाले होते त्यांचा यथोचित गौरव केला.

> "बक्षीस अपार द्रव्य दिले. सरदार, हजारी, पंचहजारी लष्करचे मावळे त्यास बक्षिसे दिधली. नांवाजिले." (सभासद पृ. ७१-७२)

कॉस्मा द् गार्दा हा शिवाजी राजाचा पोर्तुगीज चरित्रकार म्हणतो की,

> "शिवाजी राजा आपल्या सैनिकांना चांगला पगार आणि तो सुद्धा नियमितपणे देत असे. यात हेतू हा की युद्धात मिळालेली लूट लपविण्याचा त्यांना मोह होऊ नये." (FBS-Guarda ch II P 1)

या लष्कराला पगार कोणत्या पद्धतीने दिला जात असे याचा खुलासा सभासदाने एका ठिकाणी केला आहे. "सरनोबत, मुजुमदार, कारकून आणि हुजुराकडील इतर अधिकारी यांना पगार हुंडीच्या रूपाने दिला जात असे. त्याला वरात म्हणत. ते ज्या जमिनी कसत असत, त्यांच्यावर साराआकारणी नियमाप्रमाणे होई व तेवढी रक्कम त्यांच्या पगारातून वजा केली जाई. पगाराचा उरलेला हिस्सा त्यांना वरातेच्या रूपाने हुजुराच्या अथवा जिल्ह्याच्या खजिन्यावर दिला जाई. सैन्यात काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला एखाद्या गावचे मोकासे हक्क दिले जात नसत. सर्व पगार वरातेच्या रूपाने अथवा रोख दिला जात असे. जमिनीवर सर्व सत्ता कारकून या मुलकी अधिकाऱ्याची असे आणि हे कारकून पगार देण्याचे काम करीत. (सभा. २४-२५)

मध्ययुगात सरदारांना रोख तनखा देण्याची प्रथा नव्हती. त्यांना गावे मोकासा देत व त्यातून ते आपला पगार वसूल करीत. वसूल किती करावा याचे त्यांच्यावर बंधन नव्हते. ही मध्ययुगीन प्रथा शिवाजी राजाने बंद केली. जमीनदारांची सत्ता वाढू नये व ते राज्याला भारी होऊ नयेत हाच प्रमुख हेतू या धोरणामागे होता. प्रस्तुत संदर्भात न्या. रानडे म्हणतात की, शिवाजी राजाच्या काळी जे सरदार उदयाला आले त्यांच्यापैकी कोणालाही आपल्या वारसदारांना मोठी मालमत्ता देता आली नाही. (रानडे पा. ७०)

रोख पगार देण्याच्या पद्धतीमुळे सरकारच्या खजिन्यावर बराच ताण पडत असला, तरी वक्तशीर पगार मिळत असल्याने सेवकवर्ग खूष होता आणि जमीनदारांचा अथवा सरदारांचा जाच रयतेला सोसावा लागत नव्हता.

युद्धावरील खर्च

शिवाजी राजांचे आयुर्मान केवळ ५० वर्षांचे. त्यात ऐन उमेदीची ३० वर्षे धरली, तर हा सारा काळ लहान-मोठी युद्धे खेळण्यातच गेला होता; परंतु या युद्धावर नेमका किती खर्च झाला असावा याचा अंदाज करणे कठीण आहे. मुघल अथवा मुसलमानी राज्यांच्या मानाने शिवाजी राजाचा युद्धकार्यावरील खर्च कमी असावा असे स्थूलमानाने म्हणता येईल. शिवाजी राजाच्या युद्धछावण्या अगदी साध्या असत. तो आपल्या सैनिकांना शस्त्रे व पोशाख पुरवीत असे. परमानंद, जयराम पिंड्ये, रघुनाथ हणमंते, सभासद आदी समकालीन लेखकांनी शिवकालात वापरल्या जाणाऱ्या हत्यारांची, पोशाखांची नावे दिली आहेत. भाले, तलवारी, पट्टे, परशू, मुदगर, परिघ, त्रिशूळ, तोमर, गदा, धनुष्य, बाण, ढाली, चक्रे, सुऱ्या, कट्यारी, कवचे, शिरस्त्राणे, सोन्याचे कमरपट्टे, चामड्याचे हातमोजे, पंजे, तोफा, दुदुंभ्यादी वाद्ये, पताका, ध्वज, बिरुदे,

छत्र्या, चवऱ्या, छते, कनाती, तंबू, तिवया इत्यादी युद्धात सापडलेले सामान लढाईच्या कामी वापरण्यात येई.

नित्य वापरावयाची शस्त्रे ही सामान्यत: स्थानिक बनावटीची असत. युद्धापासून बरीच शस्त्रसामग्री मिळत असे. दारूगोळा, तोफा आणि बंदुकी या गुप्तपणे फ्रेंच, डच, पोर्तुगीज लोकांकडून विकत घेतल्या जात. इंग्रज युद्धसाहित्य विकण्यासाठी फार खळखळ करीत; परंतु त्यांचे शत्रू फ्रेंच हे मराठ्यांना उदारहस्ते मदत करीत. शिवाजी राजांनी फ्रेंचांकडून ८० बंदुका व २ हजार मण जस्त खरेदी केल्याचे उल्लेख आहेत. (सरकार पृ. २६०)

राऊतांना शिवाजी राजे घोडे पुरवीत असत. शिपायांना पोशाख दिल्याचे उल्लेख नाहीत. पण रक्षकपथक (Royal guards) अथवा हुजुराबरोबर असणाऱ्या २००० सैनिकांना मात्र उंची पोशाख दिल्याचे उल्लेख बखरीत आहेत. (सभासद पृ. ५४) इतर सैनिकांना कदाचित मंदील, अंगरखा आणि इतर काही साधा पोशाख मिळत असावा असा अंदाज करावयास हरकत नाही.

शिवाजी राजांची छावणी अगदी साधी असे. त्यावरील खर्च अगदी अल्प असे. मार्तिन हा पाँडेचरीचा फ्रेंच अधिकारी शिवाजीच्या कर्नाटकातील छावणीत तीन दिवस राहिला होता. आपल्या वृत्तात तो लिहितो, "त्याच्या छावणीत कसलाच भपका नव्हता. स्त्रियांना तेथे बंदी होती." मार्तिनच्या या विधानाला सभासदाने पुष्टी दिली आहे. "लष्करात बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील त्याची गर्दन मारावी. परमुलखात पोरबायका न धरावी." (पृ. २३) मार्तिन पुढे म्हणतो, "त्याच्याकडे जाड पण साध्या कापडाचे आणि लहान असे फक्त दोन तंबू होते. त्यांपैकी एक तो वापरे आणि दुसरा त्याच्या मंत्र्याकरिता होता." (फॉ. ब्रा. शिवाजी पृ. ३०६) एका डच पत्रात म्हटले आहे की, शिवाजीने जेव्हा सुरतेवर हल्ला केला तेव्हा त्याच्याकडे फक्त एक शामियाना होता. त्याच्याखेरीज इतर सारे लोक उघड्यावर राहत होते. (शि.प.सा. १ : ९६८)

थोडक्यात, सैनिकांचे माफक पगार, साधे पोशाख, आवश्यक तेवढीच स्थानिक बनावटीची शस्त्रे आणि छावणीचा अतिसाधेपणा यामुळे शिवाजी राजांचा युद्धावरील खर्च कमीत कमी असावा. शिवाय युद्धाचा खर्च युद्धातूनच शक्यतो निघाला पाहिजे असेही त्यांचे धोरण असावे.

शेती आणि इतर व्यवसाय

राज्याची उत्पन्नाची सारी मदार शेतीव्यवसायावर होती. त्यामुळे शेतीव्यवसायाच्या वाढीकडे राजांनी लक्ष पुरवणे स्वाभाविक होते. शिवाजी राजांनी प्रभावळीच्या शेतकऱ्यांना दोन लाख लारीपर्यंत कर्ज देण्याचा आदेश दिला होता. या पैशातून त्यांनी बैलजोडी, बी-बियाणे आणि शेतीची अवजारे घ्यावीत अशी अपेक्षा होती. विशेष म्हणजे हे कर्ज बिनव्याजी होते. (शि.च.सा. ९ : ५५)

अधिकाऱ्यांनी नव्या-जुन्या शेतकऱ्यांना आवश्यक ते साहाय्य करावे अशी त्यांची आज्ञा होती. त्यांना पैसा द्यावयाचा तो केवळ बी-बियाणे आणि अवजारे घेण्यापुरताच मर्यादित द्यावयाचा नाही, तर त्याचा योगक्षेमही काही दिवस चालेल यासाठीसुद्धा त्याचा उपयोग व्हावा अशी तरतूद केली. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या गरजांची, तक्रारींची नोंद अधिकाऱ्यांनी घ्यावी असा त्यांना आदेश दिला होता.

"नवी रयत येईल त्यास गुरेढोरे द्यावी. बीजास दाणापैका द्यावा तो ऐवज दाहोचोहो वर्षांनी आयुर्दाव पाहून उगवून घ्यावा. ये जातीचे रयतेचे पालग्रहण करावे." (सभासद पृ. २६)

बागाईत जमिनीला दोन प्रकारे पाणीपुरवठा होई. एक पाटस्थळ व दुसरा मोटस्थळ. पाटस्थळाच्या साहाय्याने येणाऱ्या पिकावरील सरकारी साऱ्याचा दर जादा असे. पाटस्थळाचे पाणी सरकारातून मिळत असे. यावरून कालवे खोदण्यावर सरकार काही पैसा खर्च करीत असावे, हे स्पष्ट होते.

शेतीव्यवसायाबरोबर इतर उद्योगधंदे देखील वाढीला लागले पाहिजेत अशी शिवाजी राजांची धारणा होती. विशेषत: मिठाचा धंदा वाढीस लागण्यासाठी त्याने खास प्रयत्न केले होते. मीठ वाहून नेण्यासाठी स्वतंत्र बोटींचा ताफा तयार केला होता. कल्याण-भिवंडी येथे जहाजे बांधण्याचा कारखाना उभा केला होता. वस्तुरूपाने वसूल केलेले धान्य साठविण्यासाठी त्याला आंबारखाने अथवा गुदामे बांधावी लागली होती.

वर वर्णन केलेल्या सार्वजनिक व्यवसायापासून सरकारला जरी काही उत्पन्न मिळत असले, तरी ते व्यवसाय उभे करण्यासाठी, त्यांची देखभाल करण्यासाठी सरकारी तिजोरीतून काही पैसा खर्ची पडला असणार. अशा सार्वजनिक व्यवसायातून नेहमी सरकारला फायदा होतो असे नाही; पण ते व्यवसाय सुरू करणे हे सरकारचे कर्तव्य असते. कारण त्यापासून लोकांचा फायदा होतो.

एखादी राजवट कशा प्रकारची आहे हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्या राज्याच्या संपत्तीची विल्हे कशी लावली जाते याचा विचार करावा लागतो. राष्ट्राच्या संपत्तीचा वापर लोकजीवन सुखी, शिस्तबद्ध करण्याकडे झाला पाहिजे. ही समृद्धता आर्थिक अथवा अन्य स्वरूपाची असो, पण ती प्राप्त करून घेण्यासाठी राज्याच्या पैशाचा व्यय उदारहस्ते झाला पाहिजे. राष्ट्रीय संपत्तीचा व्यय समतोलपणे विविध कार्यासाठी केला तर लोककल्याण साधणे अशक्य नसते. मराठी राज्याच्या व्ययव्यवस्थेचा विचार केला तर आपल्याला असे म्हणता येईल, जी काही उपलब्ध संपत्ती होती तिचा विनियोग शिवाजीच्या राज्यात लोककल्याणासाठी होत होता.

■■

आर्थिक व्यवहार

सतराव्या शतकात दख्खन देशात- ज्यात महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक प्रांत मोडतात- विविध प्रकारची नाणी प्रचलित होती असे उपलब्ध ऐतिहासिक साहित्यावरून दिसून येते. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तर ऐतिहासिक दस्तऐवज आणि बखरीतून शिवराई, होन, फनम, चक्रम, पादशाही होन, निशाणी होन आणि होनांचे इतर प्रकार यांचा उल्लेख आढळतो. होन हा कानडी शब्द असून त्याचा अर्थ सुवर्ण असा आहे. याखेरीज लारी, रुपये, अश्रफी, टका ही चांदीची आणि छत्रपती अथवा शिवराई, सजगणी, तिरूका, रूका, पैसा, दाम, अडका, चवल, जित्तल, दुवल, पाल, ब्यॉल अशी तांब्याची नाणी आर्थिक व्यवहारासाठी वापरली जात होती. अगदी छोट्या देव-घेवीसाठी कवड्यांचा देखील वापर केला जाई.

या विविध नाण्यांच्या टाकसाळी महाराष्ट्रात होत्या, असे म्हणता येणार नाही. शिवाजी राजाच्या प्रदेशात, मुघल, विजापूर, गोवळकोंडा, पोर्तुगीज, इंग्रज या सत्तांची नाणी विशेषकरून प्रसारात होती. अस्तित्वात नसलेल्या जुन्या राजसत्तांची नाणीही बाजारात येत व त्यांचा आर्थिक व्यवहारासाठी वापर होई. उदाहरणार्थ, विजयनगरचे साम्राज्य सोळाव्या शतकातच अस्तंगत झाले होते; पण अच्युतराई, रामचंद्रराई, देवराई इत्यादी त्या सत्तेची सोन्याची नाणी शिवाजी राजाच्या खजिन्यात मोठ्या प्रमाणावर होती. सामान्यत: नाणी पाडण्याचे काम प्रस्थापित सरकार करीत असे; परंतु मध्ययुगात खाजगी व्यक्तींना देखील टांकसाळी काढण्याचा परवाना दिला जात असे.

अशा प्रकारची चलनव्यवस्था असण्याचे प्रमुख कारण म्हणजे सतराव्या शतकात आजच्यासारखी 'लाक्षणिक अथवा प्रतीकात्मक नाण्या' (token coin)ची प्रथा रूढ नव्हती. प्रत्येक नाण्याची किंमत ते ज्या धातूचे बनविले असेल त्याच्या वजनावर अवलंबून असे. उदाहरणार्थ, होन या सुवर्ण धातूचे नाणे किती वजनाचे आहे, त्यात

सोने किती कण (grains) आहे यावर त्याची किंमत ठरवली जाई. कारण सर्व सुवर्णनाणी एकाच वजनाची नसत. यालाच नाण्याचे 'अंतर्गत मूल्य' (intrinsic value) असे म्हणतात. 'लाक्षणिक नाण्या'ची किंमत हे सरकार ठरवते तर 'अंतर्गत मूल्य' नाण्याची बाजारातील किंमत ही त्याच्यातील धातूच्या कणांच्या वजनावर ठरविली जाते.

नवी-जुनी नाणी

येथे आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे मध्ययुगात एकाच धातूच्या समान जुन्या आणि नव्या नाण्यांच्या बाजारी किमतीत थोडासा फरक असे. जुनी नाणी वापरून झिजत त्यामुळे नव्या नाण्याहून त्यांचा भाव थोडासा कमी असे. अर्थात काही वेळा चलनात आलेल्या नव्या नाण्यांपेक्षा जुन्या नाण्यांचा भाव अधिक असल्याचेही परदेशी प्रवाशांच्या टिपणावरून दिसून येते. याचे कारण कदाचित दोन्ही नाण्यांतील वजनातील अथवा त्यांच्या सुबक बनावटीतील फरक असू शकेल.

ट्रॅव्हर्नियर नावाचा एक फ्रेंच जव्हेरी-प्रवासी १६४१ ते १६६५ या कालखंडात भारतात व्यापाराच्या निमित्ताने सहा वेळा आला होता. गोवळकोंड्याच्या चलनव्यवस्थेची त्याला चांगली माहिती होती. जुन्या आणि नव्या नाण्यांच्या संदर्भात तो म्हणतो की, जुन्या-नव्या नाण्यांच्या भावातील फरक हा त्यांच्या वजनातील फरकामुळे नसून विनिमयाचा व्यवसाय करणाऱ्या सराफांच्या धोरणामुळे ठेवला होता. कारण जुन्या आणि नव्या नाण्यांच्या भावातील फरकापासून त्यांना भरपूर फायदा होत असे; राजाला प्रतिवर्षी खंडणी देऊन तो फरक ठेवण्यासाठी त्याच्यावर सराफ मंडळी एक प्रकारचे दडपण आणीत असत आणि नवी नाणी पाडण्यापासून त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत असत. (ट्रॅव्हर्नियर पृ. ३३६-३८)

भारताच्या नाणकशास्त्राच्या इतिहासातील नव्या आणि जुन्या नाण्यांच्या विनिमयाच्या दरामध्ये असलेल्या या कृत्रिम आणि लक्षवेधी प्रकाराचे विस्तृत विवेचन 'गोवळकोंडा राज्यातील नाणी' या आपल्या निबंधात डॉ. पु.म. जोशी यांनी केले आहे. (जर्नल ऑफ न्युमिसमॅटिक सोसायटी, खंड ५, भाग १, जून १९४३) सतराव्या शतकाच्या अगदी सुरुवातीपासूनच जुन्या आणि नव्या पगोड्यांच्या (होन) दरात फरक होता असे दिसून येते. १६६७ साली हा फरक १४ ते ७० टक्क्यांपर्यंत होता असे दिसते. असे असण्याचे एक कारण म्हणजे सराफांना अशी भीती वाटत होती, की जुने पगोडे वितळविले तर या देशावर फार मोठे संकट कोसळेल. या अंधश्रद्धेमुळे ते जुन्या नाण्यांची किंमत ठरविण्यास तयार नव्हते. अर्थात परदेशी प्रवाशाने दिलेले हे कारण कितपत सत्य आहे हे सांगणे कठीण आहे.

दुसरे एक कारण असे सांगितले जाते की, गोवळकोंडा राज्यात सर्व सरकारी देणी जुन्या पगोड्यात करीत असत. अंधश्रद्धा आणि व्यवसाय यांचे मिश्रण करून सराफांनी या परिस्थितीचा फायदा उठविला; परंतु इंग्रज व्यापाऱ्यांचे मत मात्र निराळेच होते. त्यांचे

म्हणणे असे की, या भागातील नरेशांना जुनी नाणी जास्त भावाने विकून औरंगजेब पातशहाला खंडणी म्हणून द्यावयाची रक्कम परस्पर उभी करावयाची होती. ट्रॅव्हर्नियरच्या मते व्यापाऱ्यांना ही जुनी, झिजलेली, कमी दर्जाची, कमी वजनाची नाणी सराफांच्याकडून परीक्षा करून घेतल्याखेरीज स्वीकारणे तोट्याचे होते आणि सराफ स्वत:च्या फायद्यासाठी त्यांची परीक्षा करण्यास नकार देत. थिओनॉ या आणखी एका प्रवाशाच्या मते ही जुनी नाणी दुर्मीळ असल्याने ती साडेपाच रुपयाने विकली जात, तर नव्या नाण्यांची किंमत सुमारे चार रुपये होती. अर्थात लोकांच्या मागणीप्रमाणे या भावात चढ-उतारही होत असत.

१६५४ साली विजापूरच्या मुहम्मद आदिलशहाने एका फरमानाद्वारे सराफ, व्यापारी आणि इतरांना उद्देशून असा आदेश दिला होता की, लहान लहान नाण्यांच्या बदल्यात 'होन' हे सुवर्णनाणे देणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. या फरमानाचे या ना त्या निमित्ताने जे स्वीकार करणार नाहीत त्यांची स्थावर आणि जंगम मालमत्ता जप्त केली जाईल असा कडक इशाराही त्यात देण्यात आला होता. अर्थात या फरमानाद्वारे नाण्यांचा व्यवहार करणाऱ्यांना असा दिलासाही दिला होता, की प्रस्थापित वजनापेक्षा कमी प्रतीची नाणी त्यानी सरकारी टाकसाळीकडे पाठविली तर त्यांचे 'प्रमाणभूत' (standard) नाण्यात रूपांतर करून दिले जाईल.

हे सारे इतके विस्ताराने सांगण्याचे कारण दखखन देशात सतराव्या शतकात महाराष्ट्रात विनिमयांचे व्यवहार कसे चालत असत याची कल्पना यावी. शिवकालीन महाराष्ट्रातील चलन व्यवहारावर या नाणेबाजारातील चढ-उतारांचा बरा-वाईट परिणाम होत असे.

मराठी राज्यात पोतदार नावाचा एक अधिकारी सरकारी खजिन्यात येणाऱ्या नाण्यांची परीक्षा करण्याचे काम करीत असे. 'पोता' याचा अर्थ खजिना असा आहे. बाजारपेठेत नाण्याचा स्वीकार करताना, व्यापारी लोक सराफांकडून ते तपासून घेत. सामान्य लोकही नाणे कसे पारखून घेत याचा एक मजेशीर अनुभव ट्रॅव्हर्नियरने दिला आहे. एका नावाड्याला त्याने नावेतून नदी पार करण्याच्या दराचा एक रुपया दिला. त्याने तो लगेच पेटलेल्या आगीत टाकला आणि बाहेर काढल्यावर त्याचा रंग पांढरा दिसला तेव्हाच त्याने त्याचा स्वीकार केला. तसे नसते तर त्याने तो रुपया परत केला असता. या सर्व उदाहरणांवरून सतराव्या शतकात विनिमयाचे दर ठरविताना नाण्याचे 'अंतर्गत मूल्य' कसे प्रमाणभूत मानले जात होते याची कल्पना येते.

टाकसाळ

सतराव्या शतकात, 'एक टाकसाळ, एक नाणे' अथवा 'वैध चलन' (legal tender) ही संकल्पना प्रचलित नसल्याने, बाजारात नाना प्रकारची देशी-परदेशी नाणी येत असत आणि त्यांचे परस्परांतील विनिमयाचे दर ठरविणे हा एक मोठा व्यवसायच होऊन बसला होता. ठराविक मुदतीसाठी खाजगी टाकसाळ काढण्यास अटी घालून

काही व्यक्तींना परवानगी दिली जात असे. टाकसाळ काढणाऱ्या व्यक्तीला परवाना शुल्क म्हणून पाडलेल्या नाण्यांचा काही हिस्सा द्यावा लागत असे. उदाहरणार्थ, संगमेश्वरजवळील बंदरात वीरसेटी आणि हरसेटी या दोन सोनारांनी टाकसाळीसाठी सरकारकडे परवानगी मागितली होती. त्यांना मुख्यत: 'लारी' हे चांदीचे नाणे आणि 'खुर्दा' म्हणजे तांब्याची चिल्लर नाणी पाडावयाची होती. सरकारने शंभर लाऱ्यांना १ लारी आणि एक मण खुर्द्याला दोन लारी असे परवानाशुल्क आकारून पाच वर्षांच्या मुदतीने त्यांना 'कौलनामा' दिला. (भा.इ.सं. मंडळ, षष्ठ संमेलन वृत्त, शके १८४० (१९१८) पृ. १३५-३६)

मराठी मुलखात आरंभीच्या काळात सरकारी टाकसाळ नव्हती. सरकारी अटीवर ज्यांना टाकसाळ काढावयाची असेल तर त्यांना तशी परवानगी दिली जात असे. अशी मुक्तता दिल्याने शिवकालातील प्रमुख तांब्याचे नाणे 'छत्रपती' अथवा 'शिवराई' याची विविध आकाराची रूपे आपणास आढळतात. अर्थात या नाण्यांवर कोणती अक्षरे कोरावयाची यासंबंधी सरकारने टाकसाळींना सक्त आदेश दिले असणार. कारण यांचे आकार जरी भिन्न असले तरी अक्षरवाटिका एकच होती.

दक्षिणेतील चलनाचे एक वैशिष्ट्य म्हणून असे सांगता येईल की, या भागात सुवर्णनाण्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असे. चांदीची नाणी त्यामानाने व्यवहारात कमी असत. याउलट परिस्थिती उत्तर हिंदुस्थानात होती. मुघल प्रदेशात रुपया आणि इतर चांदीच्या नाण्यांना अधिक मागणी असे. मराठी सनदापत्रात अथवा इतर कागदपत्रात होनांचा उल्लेख का येतो, रुपयांचा का नाही हे यावरून स्पष्ट होते.

नाण्यांचे वर्गीकरण

शिवकालात सामान्यत: सुवर्ण, रुपे आणि तांबे या धातूंची नाणी चलनात होती, असे उपलब्ध पुराव्यावरून म्हणता येईल. मराठी सत्तेने या कालात पाडलेल्या नाण्यांवर विजयनगरच्या हिंदू राजांचा आणि मुसलमानी सत्तांचा प्रभाव होता असे दिसून येते.

सुवर्णनाणी : शिवाजी राजाच्या खजिन्यात किती प्रकारची सुवर्णनाणी होती याची एक विस्तृत यादी सभासदाने आपल्या बखरीत दिली आहे. याखेरीज प्रवाशांचे वृत्तांत, इंग्रजांचे फॅक्टरी रेकॉर्डस्, आणि समकालीन कागदपत्रांतूनही मराठी मुलखात प्रचलित असलेल्या नाण्यांचे उल्लेख आलेले आहेत.

सुवर्णनाणी विविध प्रकारची होती. यांत गंभार, मोहर, पुतळी, सणगिरी, शिवराई, पातशाही, देवराई, अच्युतराई, रामचंद्रराई, सतलामी, इब्राहिमी, निशाणी, टिपकी, गुत्ती, धारवाडी, कावेरीपाक, चंदावरी, वेंगुर्ला, वेलोरी, मलयघाटी, पाकनाईकी, आदवणी, जडमाल, कटेराई, ताडपत्री, देवनहाळी, वेंकटपथी, त्रिशुळी, अफरजी, बिलधरी, उलफकरी, मुहमदशाही, रामनाथपुरी, कुनगोटी इत्यादी विविध प्रकारचे होन, साध्या सोन्याच्या कांबी, फलम अथवा फनम आणि चक्रम इत्यादी लहान सुवर्ण-

नाण्यांचा उल्लेख करता येईल. (सभासद पृ. ९५-९६)

सभासदाच्या यादीतील सर्व सुवर्णनाण्यांची माहिती देणे अपुऱ्या साधनांमुळे कठीण आहे. डॉ. सुरेंद्र नाथ सेन यांच्या मते 'गंभार' म्हणजे तीन रुपये बारा आणि सहा पै किमतीचे समकालीन गुब्बुर नाणे असावे. 'मोहर' हे सुवर्णनाणे सामान्यत: राजे लोकांना अथवा मान्यवर व्यक्तींना नजराणा अथवा भेट देण्यासाठी वापरले जात होते. सोन्याचा रुपया असे लोकभाषेत मोहरेला म्हटले जाई. 'मोहर' म्हणजे एक मौल्यवान धातूचा नग असे मानीत. त्यामुळे नाणे म्हणून त्याचा वापर केला जात नसे. १६६३ साली एका मोहरेची किंमत १३ रुपये होती. पुतळी हा एक दागिन्याचा प्रकार असून त्याची किंमत चार रुपयाच्या जवळपास होती.

शिवराई (?) अच्युतराई, देवराई, नावांचे होन हे विजयनगर साम्राज्यातील असावेत. हिंदू परंपरेप्रमाणे ही नाणी राजाच्या नावाने पाडलेली दिसतात. कावेरीपाक, सणगरी, गुत्ती, धारवाडी, आदवणी, चंदावरी, वेळुरी, रामनाथपुरी इत्यादी होनांची नावे ज्या टाकसाळीत ती पाडली गेली त्या टाकसाळीच्या गावावरून दिली गेली असावीत. ताडपत्री या कर्नाटकातील एका तालुक्यात वापरला जाणारा होन ताडपत्री होन आणि म्हैसूरच्या पगोड्याला 'कटेराई' होन म्हणत असत, असे डॉ. सेन म्हणतात. त्रिशुळाचे चित्र कोरलेला होन म्हणजे 'त्रिशुळी' होन. निशाणी होन मात्र कोठल्या राजाच्या अथवा टाकसाळीच्या नावावरून ओळखला जात नव्हता. असेच इतरही काही होन होते.

'पगोडा' हे मूळच्या हिंदू 'वराह होनास' पाश्चिमात्य लोकांनी दिलेले नाव होय. 'वराह' हा हिंदू देवाचा, विष्णूचा एक अवतार. चालुक्य आणि विजयनगरच्या राजांचे ते एक मानचिन्ह होते. वराहाचे चित्र या सुवर्णनाण्यावर कोरल्याने त्यास 'वराह' होन म्हणत. शिवकालीन राज्यव्यवहार कोशात 'वराह' हा शब्द होन या अर्थाने वापरला आहे. दक्षिणेत सर्वत्र प्रचलित असलेल्या या सुवर्णनाण्याचे वजन सुमारे ५३ सुवर्णकण होते. हिंदूंच्या देवळांना युरोपीय लोक 'पगोडा' म्हणत आणि त्यावरूनच हिंदूंच्या या प्रमुख नाण्याला-वराहाला- ते पगोडा या नावाने संबोधीत असावेत. मनुची या इटालियन प्रवाशाचे मते वराह हे सुवर्णनाणे आकाराने लहान आणि वर्तुळाकार होते. त्याच्या एका बाजूस कोरीव अक्षरे आणि दुसऱ्या बाजूस एखाद्या हिंदू देवतेचे चित्र कोरलेले असे. ट्रॅव्हर्नियरच्या मते पगोडा हे एक लहान म्हणजे करंगळीच्या नखाच्या आकाराएवढे जाड सोन्याचे नाणे होते. इंग्लिश आणि डच कंपन्यांनी देखील राजाच्या परवानगीने पगोडे काढले होते. डच पगोडा हा इंग्लिश पगोड्यापेक्षा दोन टक्क्याने महाग होता.

पगोडा आणि होन हे समानार्थी शब्द आहेत. 'होन्नू' या कानडी शब्दापासून होन हा शब्द तयार झाला. पगोडा म्हणजे मंदिर. दक्षिणेतील काही सुवर्णनाण्यांवर मंदिराचे चित्र कोरले असल्याने, अशा नाण्यांना युरोपीय व्यापारी पगोडा म्हणू लागले आणि नंतर सर्व सुवर्णनाणी त्याच नावाने ओळखली जाऊ लागली.

'शिवराई' होन हे शिवाजी राजाने पाडलेले सुवर्णनाणे होते असे मानले जाते.

सभासदाने शिवाजी राजाच्या खजिन्यात चार लाख शिवराई होन होते असे म्हटले आहे. हैद्राबादेच्या दप्तरखान्यातर्फे प्रसिद्ध झालेल्या दख्खनच्या १६६०-१६७१ या कालखंडातील बातमीपत्रात शिवराई होनाचा उल्लेख आहे; पण तो शिवपूर्व-कालीन होन असल्याने शिवकालीन शिवराईशी त्याची गल्लत करता कामा नये. आश्चर्याची बाब अशी की, मराठी आणि इतर कागदपत्रांतून अनेक होनांचे उल्लेख येतात, पण एक सभासद सोडला तर ह्या नाण्याचा उल्लेख कोणत्याच कागदपत्रांत आढळत नाही. त्यामुळे शिवाजी राजाने असे सुवर्णनाणे काढले होते किंवा नाही याबद्दल शंका वाटते. प्रा. ग. ह. खरे यांनी चिंचवडच्या मोरया गोसाव्याच्या मठातील एका ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे शिवराई होन सतराव्या शतकात मुबलक प्रमाणात उपलब्ध होते असे विधान केले आहे. या कागदावर तारीख नाही, पण खरे यांच्या मते तो १६८० ते १७०७ या कालखंडातील असावा असे आहे. या कागदात शिवराई होन आणि निशाणी होन यांच्यामधील विनिमयाचे दर दिले आहेत. (जर्नल ऑफ न्यूमिसमॅटिक्स सोसायटी, खंड १३, भाग १, १९५१) श्री. दि. वि. काळे यांच्या पाहण्यात एक शिवराई आली होती. त्याच्या एका बाजूस श्री राजा शिव व दुसऱ्या बाजूस 'छत्रपती' अशी अक्षरे आहेत. याचा आकार साधारण वाटोळा असून व्यास १.३२ सेंटीमीटर इतका आहे. त्याचे वजन दोन मासे आणि सात गुंजा अथवा ४२.१२ कण (ग्रेन) इतके भरले. त्याचा कस ९७.४५ इतका आहे. (या शिवराईचे छायाचित्र 'English Records on Shivaji' या भा.इ.सं.मं. पुरस्कृत ग्रंथात दिले आहे.)

शिवराईच्या शोधाची कहाणी मोठी मनोरंजक आहे. ठाण्याचे प्रसिद्ध संशोधक, 'मराठी सारस्वतकार' वि.ल. भावे यांनी मंडळाच्या पाचव्या संमेलनात (१९१७ साल.) एक होन दाखवून तो म्हणजे दुर्मीळ असा 'शिवराई' होनच असे ठोसपणे मांडले. सहाव्या संमेलनात (१९१८) म.म. पोतदार यांनी 'श्री शिवाजी महाराजांचा दुसरा होन' या शीर्षकाखाली एक टिपण वाचून एक प्रकारे भाव्यांच्या मताला दुजोरा दिला. नगरच्या गुजरांनी त्यांना दाखविलेला आणि भाव्यांच्या होनासारखाच पण कोरा करकरीत, ३ मासे ४ गुंजा वजनाच्या होनाचा उल्लेख टिपणात केला; पण प्रत्यक्ष होन सभासदांपुढे ठेवला नाही. पुढे १२-१३ वर्षांनी दि.वि. काळे यांनी भाव्यांनी दाखविलेला होन हा शिवाजी राजाचा नसून तो विजयनगरच्या देवराय किंवा देवराज यांचा असावा असे सप्रमाण सिद्ध केले. पोतदारांचा 'होन' मंडळापुढे न आल्याने त्यासंबंधी विचार करण्याची संधीच मिळाली नाही. (भा.इ.सं.मं.त्रै. १२ : १, पृ. २९-३४)

साताऱ्याला श्री. काळे यांना शोधाअंती शिवाजी राजाचे सोन्याचे नाणे मिळाले. त्यासंबंधी माहिती वर दिलेली आहे. साताऱ्याच्या राजघराण्यातच हे नाणे मिळाल्याने याविषयी शंका घेण्याचे कारण उरले नाही. शिवाजी राजाची सुवर्णनाणी जोपर्यंत अधिक प्रमाणात मिळत नाहीत, तोपर्यंत राज्याभिषेकाच्या निमित्ताने हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच होन काढले असावेत असे म्हणावे लागेल. सभासदाने जो

'शिवराई'चा आकडा दिला आहे, तो विजयनगर राजाच्या होनांचा असावा. शिवाजी राजा हा अत्यंत व्यवहारी राजा असल्याने बाजारात इतकी सुवर्णनाणी उपलब्ध असताना, आपली म्हणून स्वतंत्र सुवर्णनाणी पाडण्याच्या फंदात ते पडले नसावेत असे वाटते.

पातशाही, मुहम्मदशाही, निशाणी होन

होन या सुवर्णनाण्याची दक्षिण हिंदुस्थानातील लोकप्रियता ओळखून मुसलमानी पातशहांनी आणि खास परवानगीने डच आणि इंग्रजांनी देखील होन पाडले होते. पातशाही, मुहम्मदशाही हे होन विजापूरच्या आदिलशाहीने काढले होते. फ्रायरच्या मते 'इब्राहिमी' हे सुवर्णनाणे पर्शिया आणि पश्चिम भारताच्या किनाऱ्यावरील शहरात प्रामुख्याने आढळते. विजयनगरचे साम्राज्य मुसलमानांनी काबीज केले होते, तरी अच्युतराई, देवराई, रामचंद्रराई आणि शिवराई हे त्या साम्राज्याचे होन त्या प्रदेशात चलनात ठेवण्यात आले होते. पाश्चिमात्यांनी या होनाचा आपल्या लिखाणातून 'पगोडा' या नावाने उल्लेख केला आहे.

पातशाही होनाचे उल्लेख मराठी कागदपत्रांतून येतात. हे विजापूरच्या पातशहांनी काढले होते. कारण कोणत्याही मुघल बादशहाने होन पाडल्याचे आढळत नाही. औरंगजेबाच्या दखखन मोहिमेपूर्वी हा पातशाही होन चलनात होता. पातशाहीप्रमाणेच विजापूरचा आणखी एक होन म्हणजे 'मुहम्मदशाही' होन. विजापूरच्या पातशहांपैकी मुहम्मदशहा (१६२७-१६५६) खेरीज दुसऱ्या कोणी पातशहाने होन नाणे काढल्याचे दिसत नाही. त्यामुळे 'पातशाही' आणि 'मुहम्मदशाही' हे होन एकच असावेत असे मानले जाते. मुहम्मदशाही होनाचे वजन ५१.५ ग्रेन इतके असून त्याचा सुवर्ण कस ७८.७५ टक्के होता आणि त्याचा विनिमयाचा दर ३.६९ इतका मुंबई रुपयात होता. आदिलशाही फरमानाप्रमाणे मुहम्मदशाही होनाचा कस ८२.६९ टक्के इतका होता. ग. ह. खरे यांच्या मते हा सुमारे चार टक्क्यांचा फरक काही विशेष महत्त्वाचा नाही. कारण सतराव्या शतकातील नाणे परीक्षा पद्धती आजच्याइतकी शास्त्रोक्त आणि तंतोतंत नव्हती. पातशाही होनाची किंमत ३.३/४ मुघली रुपयाइतकी होती. मुहम्मदशाही होनाचीही तितकीच असावी असे ग.ह. खरे म्हणतात. (भा.इ.सं.मं.त्रै. १६ पृ. ५१)

खाजगी टाकसाळीतून पाडलेल्या होनांना 'निशाणी' होन म्हणत. सोनारांनी राजाकडून परवाना घेऊन काढलेल्या होनावर काही चिन्ह असे. म्हणून ते 'निशाणी' होन या नावाने ओळखले जाई. या होनाखेरीज, शुद्ध सोन्याच्या कांब्यादेखील बाजारात स्वीकारल्या जात असत. सावंतवाडी चिटणीसांच्या कागदपत्रांवरून 'निशाणी' आणि 'हुक्केरी' होनासंबंधी काही विशेष माहिती उपलब्ध झाली आहे. थोड्याशा नंतरच्या काळातील एका कागदावरून निशाणी होन हे वेंगुर्ला येथील टाकसाळीत पाडत होते असे दिसून येते. शिवाजी राजाच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या दखखन मोहिमेच्या काळात ही वेंगुर्ल्याची टाकसाळ केव्हातरी बंद झाली असावी; परंतु सावंतवाडीच्या सरदेसायाने टाकसाळ

परवानाधारकांना अभयदान दिल्याने अठराव्या शतकात ही टाकसाळ परत सुरू झाली असावी. (न्यूमिसमॅटिक्स जर्नल, खंड २४ भाग १, २, १९६२, पृ. ४८-४९) 'हुक्केरी' होन, हा बेळगावनजीकच्या पाच्छापूर अथवा पादशहापूर या देसाईच्या जहागिरीच्या गावी पाडला जात असावा.

सतराव्या शतकात प्रत्येक सुवर्णनाण्याची किंमत त्यातील धातूच्या 'अंतर्गत मूल्या'वरून ठरविली जात होती हे मागे सांगितलेच आहे. पाश्चिमात्यांच्या प्रवास - वृत्तांतात होन आणि रुपया यांच्यामधील विनिमयाच्या दरात आपल्याला जो फरक आढळतो त्याचे मुख्य कारण हे 'अंतर्गत मूल्या'चे तत्त्व होय. उदाहरणार्थ, इटालियन प्रवासी मनुची, होनचा दर ३.५ रुपये, इटालियन प्रवासी जॉन एफ्. जी. कॅरेरि (१६९९) ४ रुपयांपेक्षा थोडासा जास्त, पोर्तुगीज शिवचरित्रकार ग्वार्दा ५ रुपये, थिवेनॉ, जुना होन ५ रुपये आणि नवा होन ४ रुपये, इंग्रज व्यापारी ३.५ रु. असे निरनिराळे विनिमयाचे दर देतात. मराठी कागदपत्रांत पातशाही होन हा निशाणी होनाच्या १.२५ बरोबरीचा मानला आहे आणि त्याचा विनिमयाचा दर २ ते २.५ रुपये असा दाखवला आहे. या कागदपत्रातून दिलेले होनाचे दर ३.७५ रुपये, ३ रुपये ५ आणे असे दिलेले आहेत. या विविध साधनांवरून असे म्हणता येईल की, सतराव्या शतकात होनाचा दर २.५ रुपयापासून ३.७५ रुपयापर्यंत होता.

होनाचे लहान विभाग

राज्यव्यवहार कोशात 'प्रताप', 'धरण', 'चवल' आणि 'दुवल' असे होनाचे लहान विभाग दिले असून त्यांचे परस्परांशी प्रमाण पुढीलप्रमाणे होते.

१ होन = २ प्रताप
१ प्रताप = २ धरण
१ धरण = २ चवल
१ चवल = २ दुवल

मराठी हिशोबाच्या काही कागदपत्रांत या छोट्या छोट्या सुवर्णनाण्यांचा उल्लेख येतो; पण राज्यव्यवहार कोशात दिलेल्या लहान नाण्यांपेक्षा आणखी काही लहान नाण्यांचा उल्लेख समकालीन कागदपत्रांत आढळतो. उदाहरणार्थ, 'दुवल' या नाण्याचे 'ब्याल' आणि 'विस' असे दोन लहान भाग आढळतात. 'ब्याल' हे नाणे दुवलच्या निम्मे आणि 'विस' हे ब्यालच्या निम्मे इतके होते.

१ दुवल = २ ब्याल
१ ब्याल = २ विस

असे हे दोन लहान विभाग होनाखाली येतात.

पाश्चिमात्य साधनांप्रमाणे मराठी आणि अन्य कागदपत्रांतूनही होन आणि रुपया अथवा इतर चांदीची नाणी यातील विनिमयाचे दर आढळतात. उदाहरणार्थ, १६६१ साली औरंगाबादच्या बाजारपेठेत पुढीलप्रमाणे खरेदी-विक्रीचे दर होते-

	खरेदी दर				विक्री दर			
	रु.	आणे	टका	दाम	रु.	आणे	टका	दाम
अच्युतराई	४	४			४	४.१/२		
देवराई	३	९.१/४	१	२.१/८	२.१/८	९.१/४	१	२०.७/८
शिवराई	३	८.१/४	१	३३.३/८	३	८.१/४	२	२.१/८
अढोणी	३	५.१/४		४९	३	५.१/४		१७.३/४
धारवाडी	३	४.१/४	१	२४	३	४.१/४	१	४२.२/४

वरील तक्त्यावरून विक्रीचा दर हा खरेदीच्या दरापेक्षा काहीसा अधिक होता असे दिसून येते. टका आणि दाम ही मुघली नाणी अनुक्रमे रुप्याची आणि तांब्याची आहेत. (व.का.य. पृ. २६)

थिवेनाच्या मते मोहर हे सुवर्णनाणे ज्याला सोन्याचा रुपया असेही म्हणत त्याची सुरतेच्या बाजारात किंमत १४ ते १४.५ चांदीच्या रुपयाइतकी होती आणि कॅरेरीच्या मते त्याची सर्वत्र किंमत १३.५ रुपये होती.

ट्रॅव्हर्नियर, मनुची, थिवेना, कॅरेरी आणि डॉ. फ्रायर या प्रवाशांनी आपल्या वृत्तांतात विनिमयाचे दर दिल्याने आपल्याला त्या वेळी चलनात असलेल्या सुवर्ण आणि रुप्याच्या नाण्यांची बाजारातील खरेदी-विक्रीची किंमत ठरविणे सुलभ झाले आहे.

डॉ. जॉन फ्रायर हा इंग्रज प्रवासी सतराव्या शतकात महाराष्ट्रात बराच हिंडला होता. किंबहुना शिवाजी राजाच्या मराठी सत्तेची ओळख युरोपीय राष्ट्रांना त्याच्या लिखाणामुळेच झाली, असे रॉबर्ट ऑर्मसारखा अठराव्या शतकातील इंग्रज इतिहासकार म्हणतो. त्याच्या मते पगोड्याची किंमत समकालीन इंग्रजी चलनात ८ शिलिंग आणि रुपयाची किंमत २ शिलिंग ३ पेन्स इतकी होती. म्हणजे पगोडा हा साधारणपणे साडेतीन रुपयापेक्षा थोड्या कमी किमतीचा होता. राजापूर येथे इंग्रजांची पहिली वखार होती. आयात-निर्यात व्यापाराचे सतराव्या शतकातील राजापूर हे एक प्रमुख ठाणे असल्याने तेथे सर्व प्रकारची सोन्या-चांदीची नाणी चलनात होती. त्या पेठेत पगोडा, ३.१/२ रुपये, सणगरी पगोडा सुमारे ४ रुपये, टिपकी पगोडा चार रुपये असे विनिमयाचे दर होते.

फलम आणि चक्रम

सभासदाने 'फलम' अथवा 'फनम' नावाच्या एका सुवर्णनाण्याचा उल्लेख बखरीत केला आहे. कागदपत्रातून त्याचा उल्लेख 'फुल्लम' असा येतो. 'फनम' हे जरी सुवर्णाचे नाणे असले तरी त्यात इतर धातूही असत. एका होनाची किंमत साधारणपणे ३६ फलम होती असे ॲबे कॅरे हा फ्रेंच प्रवासी म्हणतो; परंतु ॲबे कॅरेचे हे विधान तितकेसे बरोबर दिसत नाही. अलीकडे उपलब्ध झालेल्या दाभाडे घराण्याच्या कागदपत्रावरून एका होनाची किंमत १६ फलम होती असे निश्चित स्वरूपाचे विधान इतिहाससंशोधक शं. ना. जोशी यांनी केले आहे. (शं.ना.जोशी, दाभाडे दप्तर खंड १, पत्र क्र. ६).

अर्थात ॲबे कॅरे याच्या पाहण्यात जो 'फलम' आला त्याची 'अंतर्गत' किंमत ही दाभाडे दप्तरातील 'फलम'पेक्षा कमी असू शकेल.

डॉ. फ्रायर याच्या पाहण्यातही 'फलम' हे नाणे आले होते आणि त्याच्या मते फलमची किंमत सुमारे सव्वा रुपया होती. याचा अर्थ दोन किंवा त्याहून थोडासा अधिक फलम ही एका होनाची किंमत असावी. अर्थात फलम जर काहीशा हलक्या प्रतीच्या सोन्याचा अथवा चांदीचा असेल तर साहजिकच होनाची किंमत जास्त 'फलम' होईल.

राज्यव्यवहार कोशात मात्र 'फनम' म्हणजे 'पण' हे चांदीचे नाणे होते असे म्हटले आहे. दाभाडे दप्तरातील १६९५ च्या एका कागदात फलमचा उल्लेख छत्रपती 'चक्रे' अथवा 'चक्रम' असा झाला आहे. सामान्यत: फलम आणि चक्रम ही छोटी सुवर्णनाणी होती असे म्हणता येईल. सभासदाने 'चक्रम' या नाण्याचा उल्लेख चंद्रम्या असा केला आहे. दाभाडे दप्तरातील माहितीच्या आधारे होन फलम आणि चक्रम यांचे परस्परसंबंध पुढीलप्रमाणे मांडता येतील–

१०० होन – १६० छत्रपती चक्रम
१ होन – १६ फलम
१ चक्रम – १० फलम

'फलम' याचा 'फनम' असाही उल्लेख काही ठिकाणी केला आहे. 'फलम' हे एक लहान सुवर्णनाणे असून सोळाव्या शतकात दहा फलमचा एक होन होत असे. सतराव्या शतकात पंधरा ते सोळा फलम एका होनास पडत. किमतीतील हा फरक फलममधील मिश्र धातूच्या प्रमाणामुळे होत असे. फलमवर 'छत्रपती' ही अक्षरे आढळतात, परंतु शिवाजीने अशी नाणी पाडली होती किंवा नाही हे सांगणे कठीण आहे. कदाचित संभाजी अथवा राजाराम किंवा दोघांनीही अशी नाणी चलनात आणली असावीत; परंतु सबळ पुरावा उपलब्ध नसल्याने शिवाजी राजाच्या नावावर 'फलम' हे नाणे घालता येणार नाही.

रजत अथवा रुप्याची (चांदीची) नाणी

रुपया, लारी आणि टका ही विशेष प्रचारात असलेली रुप्याची नाणी होती. गोवळकोंड्याहून पाडलेली मुघली शहाजहानी आणि अलमगिरी रुपये अधिक चलनात होते असे दिसते. 'अब्बासी' नावाचे एक पर्शियाचे चांदीचे नाणेही चलनात असावे असे सभासदी बखरीतील उल्लेखावरून म्हणावे लागेल. 'महमुदी' नावाचे एक रुप्याचे नाणे इंग्लिश कंपनीच्या कागदपत्रात आणि प्रवाशांच्या वृत्तांतात आलेले आहे.

चलनी आणि खजाना

दैनंदिन बाजारात जे नवे नाणे प्रचलित असे त्याला 'चलनी' म्हणत आणि त्याची किंमत जुन्या अथवा 'खजाना' नाण्यापेक्षा सामान्यत: अधिक असे. 'खजाना' रुपये हे जुने, झिजलेले, पुसट असे नाणे होते. साहजिकच व्यापारी लोक 'खजाना' नाणे पसंत

करीत नसत आणि तसा प्रसंग आलाच तर त्याची मूळ किंमत कमी करून मागत. 'खजाना' म्हणजे साठविलेली, प्रसंगी पुरून ठेवलेली नाणी. प्रसंगानुरूप अथवा आवश्यकतेप्रमाणे ती बाजारात आणली जात. सतत हाताळल्यामुळे त्या नाण्यांसाठी वापरलेले धातू झिजत व ती गुळगुळीत बनत असत. उदाहरणार्थ, १०० चलनी रुपये हवे असतील तर त्यासाठी १०० खजाना आणि वर १२ टका आणि २५ दाम द्यावे लागत.

रुपया हा आकाराने मोठा आणि जड असे आणि त्याचे वजन सुमारे १ तोळा अथवा १८० ग्रेन असे. असे रुपये सामान्यत: प्रतिवर्षी पाडत असावेत. नव्या वर्षाच्या रुपयाची किंमत गतवर्षीच्या रुपयापेक्षा एक पैसा अधिक असे. रुपयांचे खरेदी आणि विक्रीचे दर भिन्न असत. उदाहरणार्थ, एक आलमगिरी रुपयाच्या खरेदीचा दर १६ टका, १५ दाम होता, तर विक्रीचा १६ टका आणि ९ दाम होता. नाण्यांचा व्यापार करणाऱ्या सराफांना या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात भरपूर फायदा होत असे.

असरफी

रुप्याच्या नाण्यांत सभासदाने असरफदी अथवा असरफी आणि आबाशा या दोन मुसलमानी नाण्यांचा समावेश केला आहे. असरफदी अथवा असरफी हे पोर्तुगीज नाणे 'सेराफिन' याचा हिंदी अपभ्रंश आहे. एक रुपया म्हणजे १.४ सेराफिन आणि १० रुपये म्हणजे १३ सेराफिन असा विनिमयाचा दर होता. सेराफिन, अश्रफी, लारी ही नाणी सारखी होती.

अब्बासी हे चांदीचे नाणे, पर्शियाचा बादशहा शहा अब्बास दुसरा याच्या नावाने काढले होते आणि ते पर्शियातून आपल्याकडे आले. प्रवाशांच्या वृत्तांतात या नाण्याचा उल्लेख आढळतो. सुरत या जागतिक बाजारपेठेत हे नाणे प्रचलित असून त्याची किंमत इंग्रजी चलनात १६ ते १८ पेन्स म्हणजे साधारणपणे २ रुपये इतकी होती.

महमुदी या चांदीच्या नाण्याचा उल्लेख देखील हिंदुस्थानात आलेल्या परदेशी प्रवाशांनी केला आहे. या नावाचे एक नाणे पर्शियात देखील होते. गुजरातच्या सुलतानाने याच नावाचे एक नाणे काढले होते. थिवेनाच्या मते हे मुघलांचे चांदीचे नाणे असून त्याची किंमत २० पैसे होती; पण हे मुघलांचे नाणे असावे असे वाटत नाही. याचा विनिमयाचा दर सारखा बदलत होता असे दिसते. फॅक्टरी रेकॉर्डस्च्या १६५९ च्या एका नोंदीत १००० सणगरी पगोड्यांची किंमत ७८२५ महमुदी असे कोष्टक दिले आहे. पगोड्याची किंमत ३.१/२ रुपये धरली तर १ रुपया म्हणजे २.१/४ महमुदी असे प्रमाण पडते.

लारी नावाच्या आणखी एका चांदीच्या नाण्याचा उल्लेख सभासद, फॅक्टरी रेकॉर्डस् आणि ऐतिहासिक पत्रे यांतून आलेला आहे. हे नाणेदेखील मूळचे पर्शियातीलच

होय. साधारणपणे कोकणपट्टीच्या समुद्रकिनाऱ्यावर या नाण्याचा वापर अधिक प्रमाणावर दिसून येतो याचे कारण अरबांचा व्यापार मुख्यत्वेकरून या प्रदेशाशी होता. पर्शियाच्या आखाताच्या तोंडाशी असलेल्या 'लार' नावाच्या प्रांतात हे नाणे पाडले जात असल्याने त्याला 'लारी' असे म्हणत. विजापूरच्या अदिलशाहीने या नाण्यास मान्यता दिली होती. लारी हे नाणे उत्तम दर्जाच्या चांदीचे बनविले जात होते आणि त्यात कोणत्याही इतर धातूंचे मिश्रण नसे. किनारपट्टीवर या नाण्याला अधिक मागणी असल्याने विजापूरच्या सुलतानांनी आपल्या नावे लारी पाडण्यास सुरुवात केली होती, पण विजापूरच्या राज्यात सर्वत्र हे नाणे वापरले जात होते असे म्हणता येणार नाही. कोकणपट्टीवर वखार उघडून बसलेल्या इंग्रजांना सतराव्या शतकात एका चांदीच्या नाण्याची गरज अधिक तीव्रतेने भासू लागली होती. त्यामुळे रेव्हिंग्टन या इंग्रज व्यापाऱ्याने रूस्तम झामन या राजापूरच्या अदिलशाही सुभेदाराकडे मुघलासारखा रुपया काढण्यासाठी राजापूर येथे टाकसाळ काढण्याची परवानगी मागितली होती. यातून काहीच निष्पन्न झाले नाही; पण पुढे १६७२ साली मुंबई येथे चांदीची नाणी पाडणारी टाकसाळ इंग्रजांनी काढली (इं.फॅ. १ १६५५-६० पृ. २४३-४४, २४६)

लारी हे नाणे एका जाड तीन इंचाहून अधिक लांबीच्या चांदीच्या तारेपासून बनविलेले असे. त्याची घडी करून मध्यभाग थोडासा रुंद करीत व त्यावर शिक्का मारीत. आकाराने ते केसात घालावयाच्या आकड्यासारखे (hairpin) दिसे. 'लारी' हे नाणे साधारणपणे ७२ ग्रेन वजनाचे असे. लारीच्या लांबीत फरक असला तरी वजनात नसे. कारण एखादी 'लारी' लांबीने लहान असली तर तिची जाडी वाढत असे आणि वजन मात्र तितकेच राहत असे. मँडेलस्लो या प्रवाशाने एका पगोड्याची किंमत १० लारी अशी दिली आहे, तर डॉ. फ्रायरने यानंतर तीस वर्षांनी दिलेली पगोड्याची राजापूरच्या बाजारपेठेतील किंमत फक्त १०.१/२ लारी अशी आहे. पश्चिम किनारपट्टीवर व्यापार करणाऱ्या पोर्तुगिजांनीही या नाण्याची नोंद आपल्या कागदपत्रांतून केली आहे.

कोकणाशी संबंधित अशा मराठी कागदपत्रांतून 'लारी' या नाण्याचे उल्लेख भरपूर आढळतात. चेऊल सुभ्यातील अमिनाबाद मामल्याच्या उत्पन्नाचा अहवाल लारीतच सादर केला आहे. संगमेश्वरनजीकच्या बंदरातील वीरसेठी आणि हरसेठी या सोनारांनी सरकारकडे 'लारी' पाडण्यासाठी टाकसाळ घालण्याची परवानगी मागितली होती याचा उल्लेख मागे आलाच आहे. मराठी कागदपत्रांतून 'बसरा लारी', 'दाभोळी लारी', 'चौली लारी', 'हुरमुजी लारी' असे उल्लेख येतात. 'लारी'ला ही विशेषणे टाकसाळींच्या नावामुळे दिली होती हे स्पष्ट आहे. यांपैकी 'बसरी' आणि 'हुरमुजी' लारी या परदेशी होत्या आणि इतर दोन या देशातील होत्या, हे त्यांच्या नावावरून स्पष्ट होते. सभासदाने आपल्या बखरीत शिवाजी राजाच्या खजिन्यांत दाभोळी, चौली, बसरी 'लारी' होत्या असे म्हटले आहे आणि 'चौली' (चुली) आणि 'हुरमुजी' लारी एकच असे सूचित केले आहे. सभासदाने 'कवरी' हा शब्द 'लारी'साठी वापरला आहे. कदाचित ही चूक मूळ

बखरीची नक्कल करताना झाली असावी.

डॉ. बाळकृष्ण यांनी आपल्या चार खंडांतील विस्तृत शिवचरित्रात, चौल आणि दाभोळ ही किनारपट्टीवरील महत्त्वाची बंदरे १६६० च्या सुमारास मराठ्यांच्या ताब्यात आली तेव्हा शिवाजी राजाने 'चौली' आणि 'दाभोळी' लारी पाडल्या असाव्यात असा तर्क केला आहे. (भाग ४ पृ. १५१) परंतु दाभोळ हे मराठी राज्यात १६६१ साली आणि चौल १६७० नंतर आले. तसेच शिवाजी राजाने 'लारी' पाडल्याचे मराठी कागदपत्रांतून आलेले नाही. त्यामुळे डॉ. बाळकृष्णांचा हा तर्क ऐतिहासिक घटनांशी सुसंगत नाही असे म्हणावे लागेल. डॉ. बाळकृष्णांनी 'शिरणी लारी' असे एक नाणे होते असे म्हटले आहे; पण 'शिरणी' हा शब्दप्रयोग मराठी कागदपत्रांतून न्यायदानाच्या संदर्भात आला आहे. दावा जिंकणाऱ्या माणसाला सरकारात 'बक्षिसी' म्हणून भरणा कराव्या लागणाऱ्या शुल्काला 'शिरणी' अथवा 'शेरणी' म्हणत आणि हरणाऱ्या व्यक्तीकडून वसूल केलेल्या शुल्काला 'गुन्हेगारी' असे म्हणत. तेव्हा 'शिरणी लारी' म्हणजे लारीत भरलेले न्यायदानाचे शुल्क होय.

टका हे सतराव्या शतकातील आणखी एक प्रसिद्ध चांदीचे नाणे होय. काही इतिहासकारांच्या मते 'टका' हे प्रत्यक्ष नाणे नसून केवळ हिशोबाच्या सोयीसाठी कल्पिलेले ते एक नाणे (money of account) होते, असे आहे परंतु हे विधान बरोबर वाटत नाही. कारण समकालीन अस्सल कागदपत्रांतून याचे जे असंख्य उल्लेख येतात त्यावरून दररोजच्या चलनातील ते एक महत्त्वाचे नाणे होते असे म्हणावे लागेल. टका आणि मुघली नाणे टंका यांची काही वेळा गल्लत केली जाते. प्रत्यक्षात ही दोन्ही नाणी भिन्न आहेत. काही वेळा 'टका' आणि 'खुर्दा' या दोन्ही नाण्यांचा संयुक्तपणे कागदपत्रात उल्लेख केलेला आढळतो. 'खुर्दा' हे राज्यव्यवहार कोशात सांगितल्याप्रमाणे तांब्याचे नाणे असल्याने 'टका' देखील तसेच एक तांब्याचे नाणे असावे असा काही संशोधकांनी तर्क केला आहे. (भा.इ.सं.मं.त्रै. खंड ११ : ३, राजवाडे २० : ५८)

मराठी कागदपत्रांत १२ टके म्हणजे १ होन असे समीकरण दिले आहे. (शि.च.सा. ८ : ८४ पृ. १००) टका जर तांब्याचे नाणे असेल तर १२ टक्यांचा १ होन हे सुवर्ण-नाणे कसे होऊ शकेल; तसेच १ टका म्हणजे ४८ रुके असे एका साधनात दिले आहे. (पे.द. ३१ : १९) रुका हे लहान तांब्याचे नाणे असून, रुक्याहून कोणताही नाण्याचा लहान भाग होऊ शकणार नाही. या सर्व विवेचनावरून टका हे चांदीचे नाणे होते व ते केवळ हिशोबाच्या सोयीसाठी वापरले जात नसून प्रत्यक्ष चलनात होते असेच म्हणावे लागेल.

टका आणि होन यांच्या समीकरणाबाबत आपल्याला निरनिराळे आकडे दिसतात. काही कागदपत्रांतून एका होनाची किंमत १०.१/२ टके, काहींत १२.१/२ टके तर काहींत सुमारे १३ टके अशी दिली आहे. (शि.च.सा. २ : १३४, शि.च.सा. ७ : ४५, पे.द. ३१ : २१) दरातील हे फरक वजन अथवा इतर काही कारणांमुळे होत असले, तरी येथे एक गोष्ट निर्विवादपणे मान्य केली पाहिजे आणि ती म्हणजे 'टका' हे चांदीचे नाणे होते, ते चलनात होते आणि बाजारातील परिस्थितीनुसार त्याच्या वजनात चढ-उतार होत असत.

ईस्ट इंडिया कंपनीच्या टाकसाळीतून पाडलेली नाणी महाराष्ट्रात या कालखंडात फारशी चलनात होती असे दिसत नाही. १६७९ च्या सुमारास कंपनीने मुंबईहून नाणी काढल्याची नोंद आढळते. सुरतेच्या अधिकाऱ्यांना भीती वाटत होती की ही इंग्लिश नाणी मुघलांच्या नाण्यासारखी बाजारात सर्रास स्वीकारली जाणार नाहीत आणि आपल्याला या व्यवहारात काहीच फायदा होणार नाही. कंपनीचा एक प्रतिनिधी शिवाजी राजाकडे, इंग्रजी नाणी मराठी मुलखात त्यांच्या नाण्याप्रमाणे स्वीकारण्यासंबंधी वाटाघाटी करण्यासाठी आला होता. शिवाजी राजाने त्याला स्पष्टपणे सांगितले की, तुमचा युक्तिवाद आपल्याला पटत नसल्याने इंग्रजी नाण्यांना इतरांपेक्षा काही विशेष सवलती देता येणार नाहीत. नाणेबाजारातील स्पर्धाच तुमच्या नाण्यांचे भवितव्य ठरवेल. या उत्तरावरून शिवाजी राजाचे आर्थिक व्यवहाराकडे किती बारकाईने लक्ष होते याची कल्पना येईल. (इ.रे.शि. भाग १, पृ. ३७६)

प्रस्तुत संदर्भात डॉ. फ्रायर यांचे म्हणणे असे की, शिवाजी राजाला कंपनीच्या नाण्यांना मराठी राज्यात प्रसारात आणण्यासाठी, खास परवानगी देण्याची आवश्यकता नाही. कारण मराठी मुलखात व्यवहार करण्यास त्याने कोणत्याही प्रकारच्या चलनावर बंदी घातली नव्हती; आणि आपल्या प्रजेवर ज्यामुळे त्यांचे नुकसान होईल, असे नाणे स्वीकारण्याची सक्तीही तो करू शकत नाही, पण इंग्रजांचे नाणे जर उत्तम धातूचे आणि वजनाने मुघली नाण्यासारखे असेल अथवा अन्य राज्यांच्या नाण्यांच्या तोडीचे असेल तर तो राजा इंग्रज नाण्यावर बंदी घालणार नाही." (फ्रायर, भा. १, पृ. २०६) या फ्रायरच्या विधानावरून मराठी मुलखात मुघली आणि इतर प्रकारची नाणी किती मोठ्या प्रमाणावर चलनात होती याची कल्पना येते.

तांब्याची आणि इतर नाणी

या सदरात शिवराई अथवा छत्रपती, सजगणी, विरुका, पैसा, रुका, दाम, अडका, जितल, बुद्रुक ही तांब्याची चिल्लर नाणी आणि अगदी छोट्या व्यवहारासाठी वापरली जाणारी कौडी (कवडी) यांचा उल्लेख करता येईल. ॲबट या नाणकशास्त्रज्ञाने सुमारे २५ हजार तांब्याची नाणी तपासून एक लेख लिहिला आहे. (ज.बॉम्बे.रॉ.अ.सो.खंड २०, पृ. १२३-२४) सतराव्या शतकात दखखन देशात तांब्याचा नाणी पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असे आणि हे तांबे इंग्रजांकडून घेतले जात होते. स्थानिक राजसत्ता रोख पैसा मोजून हा धातू त्यांच्याकडून खरेदी करत असल्याने इंग्रज व्यापारी त्याचा पुरवठा करण्यास सदैव उत्सुक असत.

पैसा हे एक प्रमुख तांब्याचे नाणे होते पण त्यांचा आकार सर्वत्र सारखा नसे.

शिवाजी राजाची तांब्याची नाणी विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. त्याच्या एका बाजूस 'श्री राजा शिव' आणि दुसऱ्या बाजूस 'छत्रपती' अशी अक्षरवाटिका कोरलेली असे. ॲबेटने या अक्षरवाटिकेचे निरनिराळे आठ प्रकार दाखविले आहेत. काही नाण्यांवर फूल, तलवार, सूर्य, बाण, चंद्र, बिल्वदल, ग्रह आणि राशी चिन्हे कोरल्याचे दिसून येते. त्यांच्या वजनातही फरक आढळून येतो. काहींचे वजन पाव तोळा, काहींचे पाऊण तोळा तर काहींचे एक तोळा असे आढळते. पाव तोळा वजनाच्या नाण्याला रुका आणि पाऊण तोळ्याच्या नाण्याला शिवराई अथवा छत्रपती म्हणत. पैसा हा एक तोळ्याचा होता. काहींच्या मते पाऊण तोळ्याच्या नाण्याला 'तिरुका' आणि एक तोळ्याच्या नाण्याला पैसा म्हणत. (शि.च.सा. २ पृ. ८७)

रुपयाचे आणा, अर्धा आणा, पैसा आणि पै हे पोटविभाग महाराष्ट्रात केव्हापासून रूढ झाले हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. 'आण्याचा' उल्लेख १६०८ सालच्या कंपनीच्या कागदपत्रात प्रथम आढळतो. दख्खन देशात रुपयाचे प्रसारात असलेले लहान विभाग म्हणजे दुवल आणि ब्याल हे होत.

पैसा, दाम आणि त्यानंतरची चिल्लर तांब्याची नाणी मुघली आणि मुसलमानी सत्तांनी प्रथम चलनात आणली. फ्रायरच्या मते पैसा हे नाणे गरीब समाजात विशेषकरून वापरले जात असे आणि 'महमुदी' या नाण्याची किंमत १२ ते २४ पैशापर्यंत होती. इंग्रजी कागदपत्रांवरून इंग्रजांचे पैसा हे नाणे शिवाजी राजाच्या राज्यात प्रसारात होते.

ग्रामीण विभागात जमिनीचे क्षेत्र 'टका' आणि 'रुका' या शब्दांनी व्यक्त केले जात होते असे उपलब्ध साधनांवरून दिसते. एका कागदात एक टका क्षेत्राची विभागणी पुढीलप्रमाणे केली आहे. १/२ टका बागाईत; ३ रुके चांभार टिके (चांभाराच्या मालकीची जमीन), ६ रुके शिंद्यांची जमीन आणि उरलेली १/४ टका आणि तीन रुके म्हणजे १५ रुके जमीन ही काजू लावण्यासाठी दिली होती असे म्हटले आहे. या सर्वांची बेरीज ४८ रुक्यात केली आहे. थोडक्यात, या तांब्याच्या नाण्यांचे पोटविभाग पुढीलप्रमाणे होते–

३ रुका – १ तिरुका
२ तिरुके – १ छत्रपती/शिवराई/सजगणी
८ छत्रपती – १ टका अथवा ४८ रुके

यावरून तिरुका हा पैशाएवढा होता, असे म्हणता येईल. मराठी राज्यात मात्र पैसा हे नाणे फारसे लोकप्रिय नव्हते असे दिसते. येथे 'तिरुक्यां'चा वापर मोठ्या प्रमाणात होत असे.

चिल्लर नाणी

चितल अथवा जित्तल हे आणखी एक तांब्याचे नाणे रुक्याच्या बरोबरीचे होते. विल्सनच्या मते ते आधुनिक पैसारखे होते. इंग्रजी पत्रातून 'बुगरूक' नावाच्या नाण्याचा

उल्लेख आला आहे. हे कथिलापासून बनविलेले होते.

याखेरीज अगदी छोट्या व्यवहारासाठी कडू बदाम आणि कवड्या यांचा वापर मुघली आणि मुसलमानी प्रदेशात केला जात असे. मराठी कागदपत्रांत छोट्या खरेदी-विक्रीच्या नोंदी आढळत नसल्याने या चलनाविषयी माहिती देणे कठीण आहे; परंतु ट्रॅव्हर्नियरच्या मते विजापूर राज्याच्या प्रदेशात ही प्रथा प्रचलित होती. या विधानावरून मराठी राज्यातही बदाम आणि कौडी यांचा छोट्या विनिमयासाठी विशेषत: ग्रामीण भागात वापर करीत असावेत, असे अनुमान काढावयास हरकत नाही.

पतपेढी

ठेवी स्वीकारणे, व्याजाने पैसे कर्जाऊ देणे ही जी पतपेढीची प्रमुख कामे असतात तशा तऱ्हेच्या पतपेढ्या अथवा बँका मध्ययुगात होत्या असे म्हणता येणार नाही; पण स्थानिक धनवान मंडळी गरजूंशी जमीन अथवा दागिन्यांच्या तारणावर व्याजबट्ट्याचा व्यवहार करीत असावेत. महाराष्ट्रात शेटे, महाजन, देशपांडे आणि काही ब्राह्मण मंडळी हा सावकारीचा धंदा करीत असत. ऋणको आणि धनको यांच्यामध्ये परस्परांना मान्य अशी बोलणी झाली म्हणजे कर्जासंबंधीचा कागद तयार होई. त्यास 'कजकतबा', 'कर्जरोखा' अथवा 'कर्जपत्र' असे म्हणत. कर्जासंबंधी उभयतामध्ये झालेला हा लेखी करार होय. उदाहरणादाखल, पुढील १६६७ सालचा एक 'कर्जकतबा' पाहा :

> "राजश्री माहादाजीपंत देसकुलकर्णी (म्हणजेच देशपांडे) पा। (परगणे) सिरवल गो। (गोसावी) सेवेसी गुणाजी अडवल व बापूजी निगडे प्रज मौजे अजनुज पा। सिरवळ सु॥ (सुहुरसन) समान सितैन अलफ (हा मुसलमानी सन दिला आहे) कारणे लेहून दिल्हा कर्ज कतबा यैसाजे तुम्हापासून कर्ज घेतले होनू ५१ येकावन हे छ २२ रविलोवल ता। (तागायत) छ ७ माहे रबिलारवरी (फक्त १५ दिवसांसाठी कर्ज घेतले आहे) देऊनु लिहिले मुदतीस पैके नेदी तरी दर माहे दर होनास कलातर (व्याज) रुके .॥. प्रमाणे (४८ रुक्यांचा एक टका, .॥. हा आकडा अर्धा टका दाखवितो म्हणजे व्याजाचा दर महिन्यास दर होनास २४ रुके इतका होता) झाले मुदतीचे देईन हा कतबा सही.
>
> हे सदरहू मुदतीस पैकेचे उगवणीस धणी गोमाजी त्रिमळ कुलकर्णी मौजे मा॥र (मजकूर)
>
> गोही (साक्षीदार)
>
> रभाजी ठाकूर — विसाजी नानाजी कुलकर्णी, मौजे पारगाऊ

(शि.च.सा. १ ले ५१ पृ. ७३)

वरील १६६७ च्या अस्सल कर्जकतब्यावरून त्यात कशा प्रकारचा तपशील येत

असे याची कल्पना येईल. यात धनको, ऋणको, मुद्दल, व्याजाचा दर, मुदत, मुदतीत कर्जफेड न केल्यास द्यावयाचा दंड, जामीनदार, साक्षीदार या सर्व बाबींचा उल्लेख आहे. काही कर्जकतब्यांतून कर्जाचे कारणही दिलेले आढळते. एखाद्या ऋणकोबद्दल सावकाराला विश्वास वाटत नसल्यास कोणा तरी जामीनदाराच्या मध्यस्थीने ते कर्ज दिले जाई आणि अशा कर्जकतब्यांत त्या व्यक्तीचे नाव स्पष्टपणे घातलेले असे. साक्षीदारांच्या सह्यांशिवाय कोणताही कर्जकतबा पूर्ण होत नसे. साक्षीदारांची संख्या ही कर्जकतब्यात उल्लेखिलेल्या मालमत्तेच्या स्वरूपावर अवलंबून असे. त्यामुळे दोनापासून नऊपर्यंत साक्षीदार कर्जकतब्यावर आढळतात. कर्ज हे नित्याच्या स्वरूपाचे अथवा विशेष गुंतागुंतीचे नसेल, तर गावचे पाटील, कुलकर्णी अथवा इतर एखाद्या गावच्या प्रतिष्ठित व्यक्तीच्या साक्षीवर काम भागत असे; पण एखाद्याने आपले मिरासी वतन हकलाजिमासह गहाण टाकावयाचे ठरविले तर त्यासाठी कर्जकतब्यावर साक्षीदार म्हणून सही करण्यास बरेच लोक लागत. उदाहरणार्थ, १६७१ सालच्या एका वरील प्रकारच्या कागदावर, ज्यात व्यक्तीचे दहा गावचे कुलकर्ण आणि ज्योतिषी वतन गुंतले होते, त्या कागदावर देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, नाईकवाडी, जोशी, पानसरे, डांगी इत्यादी अनेक व्यक्तींची साक्षीदारांच्या यादीत नोंद आहे. (शि.च.सा. २ : १३२)

अशी खबरदारी घेण्याचे मुख्य कारण म्हणजे, मिरासी वतन हे वंशपरंपरेने चालत असल्याने, कोणाचे कसे संबंध त्यात गुंतले असतील, हे सांगता येणे कठीण असे. शिवाय वतनदार हा गावचा अधिकारी असे आणि वतनाच्या साऱ्या व्यवहारावर गावची संमती असावी लागे. अशा प्रकारची संमती ही साक्षीदारांच्या द्वारे घेतली जात होती. तसेच ऋणकोला निःसंदिग्ध शब्दात हा कर्जकतबा आपण कसल्याही दडपणाखाली नाही, तर स्वखुशीने केला आहे अशी लेखी कबुली द्यावी लागे.

मराठी माणसाला 'वतन' प्राणाहून प्रिय असल्याने त्यासाठी हवा तो स्वार्थत्याग करावयास तो तयार असे. मराठी कागदपत्रांतून वतनाच्या दीर्घकाल चाललेल्या अनेक खटल्यांची माहिती येते. या खटल्यासाठी सावकाराकडून कर्ज घेतले जाई. असे कर्ज सामान्यतः देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी ही वतनदार मंडळी कोर्ट-कचेरीसाठी सावकाराकडून कर्ज काढताना आढळतात.

दुष्काळ, अवर्षण आणि काही वैयक्तिक संकटकाळी लोक कर्ज काढताना दिसतात. सुगीत परत करण्याच्या बोलीने जेव्हा कर्ज घेतले जात असे, ते प्रामुख्याने उदरनिर्वाहासाठी असे. काही वेळा असे कर्ज धान्याच्या रूपाने घेतले जाई. सामान्यतः असे कर्ज गावच्या जमीनदाराकडून अथवा सावकाराकडून घेतले जाई; पण ते शक्य नसेल तर इतर ठिकाणच्या सावकाराकडून घेतले जात असे. अशा वेळी धनकोने घातलेल्या मुदतीत त्याची परतफेड करावी लागे.

काही वेळा आपल्या एखाद्या व्यक्तीची शत्रूच्या कैदेतून मुक्तता करून घेण्यासाठी अथवा खंडणी देण्यासाठी तातडीने कर्ज काढावे लागे. राजापूरच्या एका शेतकरी कुटुंबातील काही व्यक्तींना सिद्दीखान याने पळवून नेले व ओलीस ठेवले. त्या कुणब्याने

गावच्या शेणव्याकडे २१० रुपयाला जामीन राहण्याची म्हणजे तेवढे कर्ज देण्याची विनंती केली. कारण आपल्या कुटुंबीयांची मुक्तता करून घेण्यासाठी तेवढ्या रकमेचा भरणा सिद्दीखानाकडे करणे आवश्यक होते. कुणब्याने तेवढी रक्कम आणि किरकोळ खर्चासाठी अधिक दहा रुपये असे २२० रुपयाचे कर्ज शेणव्याकडून घेतले. (शि.च.सा. ५ : ९५१)

बजाजी नाईक निंबाळकर आणि सावित्रीबाई महादेव निंबाळकर यांनी संयुक्तपणे मलवडीच्या दोन सावकारांकडून साठ हजार होन कर्ज काढले. विजापूरचा सरदार अफझलखान याने बजाजीला शिवाजी राजाचा सहकारी या संशयाने अटक केली होती. हत्तीच्या पायाखाली देऊन बजाजीला चिरडून मारण्याचा अफझलखानाने निश्चय केला होता. बजाजीने आपण निर्दोष आहोत आणि सुटकेसाठी साठ हजार होन देण्यास राजी आहोत असा कबुलीजबाब दिल्यावर; आणि नाईकजी राजे पांढरे या दुसऱ्या एका मराठा सरदाराने जामीन राहण्याचे कबूल केल्यानंतरच अफझलखानाने त्याची सुटका केली. (प.सा.सं. २ : १७९७)

आज उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरून कोणी मराठी माणसाने व्यापारउदिमासाठी सावकाराकडून कर्ज काढल्याचे उदाहरण आढळत नाही. तसेच कोणी सावकारही अशा प्रकारच्या आर्थिक व्यवहारात गुंतल्याचे दिसून येत नाही. आज्ञापत्रात ज्या सावकारांचा उल्लेख केला आहे ते व्याजबट्ट्याचा व्यवहार करणारे सामान्य सावकार नव्हते. राज्यात बाजारपेठ बसवून त्या राज्याचा आर्थिक विकास साधणारे ते भांडवलदार होते. प्रसंगी आपल्या गरजा भागविण्यासाठी अशा भांडवलदारांकडून कर्ज घ्यावे लागत असे. सतराव्या शतकात मराठी माणसे व्यापारात गुंतलेली दिसत नाहीत. त्यामुळे अशा प्रकारचे कर्जकतबे अभावानेच आढळतात. गावचे वाणी अथवा चिल्लर व्यापारी हे जमीनदार अथवा शेटे, महाजन यांच्याकडून पैशाच्या अथवा धान्याच्या रूपाने कर्ज घेऊन आपला धंदा करीत असावेत.

व्याजाचा दर

कर्ज हे सामान्यतः सहा महिने ते वर्षभराच्या लघु मुदतीने दिले जाई. दीर्घ मुदतीची कर्जे फारशी आढळत नाहीत. सहा महिन्यांपेक्षाही कमी मुदतीची अगदी १५ दिवसांच्या मुदतीची कर्जे दिल्याचीही उदाहरणे आढळतात. लघु मुदतीची कर्जे सामान्यतः शेतकरी अथवा अन्य व्यक्तींना त्यांच्या एका विशिष्ट कालखंडातील उदरनिर्वाहासाठी दिली जात होती. शेतकऱ्याला अशा कर्जाची परतफेड सुगीनंतर शिमगा अथवा वर्षप्रतिपदेस व्याजासकट करावी लागे. सरकारी कामासाठी काढलेल्या कर्जाची मुदत प्रसंगी एक वर्षाहून अधिक असे. कारण न्यायदरबारात गेलेल्या कामांच्या निर्णयाला विलंब लागत असे. एका व्यक्तीने अशा कामासाठी पाच वर्षांच्या दीर्घ मुदतीचे कर्ज काढले होते. (पे.द. ३१ : ४८)

सावकारी व्यवहारात लघु मुदतीच्या कर्जाचे प्रमाण अधिक असल्याने व्याजाचा दर

प्रतिमास आकारला जाई. कर्ज रुपयात दिले असेल तर व्याजाचा दर शेकड्यावर प्रत्येक महिन्याला रुपयात आकारला जात असे. कर्ज जर 'होना'च्या रूपाने दिले असेल तर प्रत्येक होनाला दरमहा किती टके अथवा रूके व्याज पडेल हे कर्जकतब्यात नमूद केले जात असे.

प्राचीन काळात एखाद्या पूर्ण संरक्षित कर्जाचा नित्याचा व्याजाचा दर हा प्रतिवर्षी १५ टक्के असे; पण तेच कर्ज जर असुरक्षित असेल, म्हणजे त्यासाठी काही तारण नसेल अथवा एखादा जामीनदार नसेल, तर हा व्याजाचा दर मनमानी असे. प्रसंगी तो दरवर्षी ६० टक्क्यांपर्यंत देखील जात असे. ब्राह्मणांना आकारलेला व्याजाचा दर हा क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णियांना आकारलेल्या दरापेक्षा काहीसा कमी असे. (मैती, एस्.के. इकॉनॉमिक लाईफ ऑफ नॉर्दर्न इंडिया, पृ. १८३)

शिवकालातील मराठी प्रदेशात रूढ असलेले नित्याच्या व्याजाचे दर हे प्राचीन काळापेक्षा निश्चितच जास्त होते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेतील प्रत्येक वर्गाला कशा प्रकारचे दर आकारले जात असत, याचा तक्ता उपलब्ध नसला तरी व्याजआकारणी करताना, ऋणकोच्या आर्थिक दर्जाचा प्रसंगी विचार केला जात होता, असे काही ऐतिहासिक साधनांवरून दिसून येते. ऋणकोला सामाजिक प्रतिष्ठा कितीही असली आणि त्याचा आर्थिक दर्जा समाधानकारक नसेल, तर कर्ज देताना सावकार पूर्ण विचारांती असे व्यवहार करीत असत.

व्याजाच्या दरात बरीच विविधता आढळते. व्याजाचा दर आकारताना कर्ज कशासाठी दिले जात आहे आणि ऋणकोचा आर्थिक दर्जा काय आहे, याचा प्रामुख्याने विचार केला जात असे. ३७.१/२ टक्क्यांपासून ६० टक्क्यांपर्यंत दरसाल व्याज आकारलेले कागदपत्रात आढळते. (शि.च.सा. २ : १३४, ३५२) उदाहरणार्थ, एका तेल्याला १ होनाला एका महिन्याला १ पल व्याज द्यावे लागले. यावरून वर्षाला त्याला ३७.१/२ टक्के व्याज द्यावे लागले असते. बजाजी नाईक निंबाळकराने अफझलखानाला जे ६० हजार होन दिले, त्याचा हिशोब केला तर हा दर ६० टक्के पडतो.

काही वेळा कर्ज हे ठरावीक मुदतीसाठी काढलेले असत नाही, अशा प्रकारच्या व्यवहारात पहिल्या महिन्याचा व्याजाचा दर हा नंतरच्या महिन्यापेक्षा अधिक असतो असे दिसते. असे करण्याचे मुख्य कारण पुढच्या महिन्यात कमी व्याज भरावे लागणार म्हणून ऋणको कर्ज फेडण्याची घाई करणार नाही; आणि त्यामुळे सावकाराचा फायदाच होईल अशी कदाचित धनकोची भावना असावी. दुसरेही कारण अशा प्रकारे बिनामुदतीचे कर्ज देण्याच्या मागे असू शकेल. सतराव्या शतकात किफायतशीर गुंतवणूक करण्याचे विविध मार्ग उपलब्ध नसल्याने, एखादा ऋणको जर ऐपतदार असेल तर असे बेमुदत कर्ज प्रसंगी कमी व्याजाच्या दराने त्याच्याकडे ठेवणे, हे धनकोला फायद्याचे वाटत असेल. एका धनकोने असे कर्ज देताना पहिल्या महिन्यासाठी १० टक्के आणि नंतर कर्ज फिटेपर्यंत दरमहा ५ टक्के दराने दिलेले कर्ज, कदाचित वरील कारणासाठी आकारले असावे. (राजवाडे खंड २० : १५)

शेतकऱ्यांना धान्यरूपाने कर्ज साधारणपणे सहा महिन्यांच्या मुदतीचे दिले जाई आणि त्याची परतफेड दामदुपटीने करण्याची अट त्याच्यावर लादलेली असे. (राजवाडे खंड १५ : ८९; प.सा.सं. १ : ४८२)

कर्जाची मुदत जितकी जास्त तितका व्याजाचा दर सामान्यपणे अधिक असतो; परंतु एका देशमुखाने आपला पाटीलकी-देशमुखीचा कज्जा लढविण्यासाठी दरमहा ४ टक्के व्याजाने एक दीर्घ मुदतीचे कर्ज काढले होते. (शि.च.सा. ४ : ७२२) दुसऱ्या एका देशमुखाने ५ वर्षांच्या मुदतीने १६०० रुपये दरमहा ५ टक्के दराने काढले होते. (पे.द. ३१ : ४८)

व्याजापोटी काही वतनदार त्यांना असलेले 'हकलाजिमा' धनकोला देत आणि मुद्दल हप्त्याहप्त्याने फेडीत. एका कुलकर्ण्याने सावकाराकडून १५० होन कर्जाऊ घेतले. मुद्दल तो सहा वर्षांत दर साल २५ होनाप्रमाणे फेडणार होता आणि व्याजापोटी आपले निम्मे कुलकर्ण आणि ज्योतिषी वतन व त्याबरोबरचे हकलाजिमे सावकाराला त्याने बहाल केले होते. या मार्गाचा अवलंब त्याने केला याचे कारण दरमहा ४ टक्के व्याजाने ही रक्कम त्याने घेतली असती, तर कदाचित व्याजापोटीच त्याला भलीमोठी रक्कम द्यावी लागली असती. त्यापेक्षा 'अर्धं त्यजति पंडित:' या न्यायाने त्या कुलकर्ण्याने काही काळापुरते आपल्या अर्ध्या हक्कावर पाणी सोडले असणार. शिवाय ते हक्क वसूल करण्याची जबाबदारी आपोआपच सावकारावर टाकली गेली. (शि.च.सा. २ : १३२)

दुसऱ्या एका प्रकरणात दोन वतनदार बंधूंनी १२ होन कर्ज दरमहा दर होनास १८ रुके व्याजाने काढले; पण ते कर्ज मुदत टाळून गेली तरी त्यांच्याकडून फिटले नाही. तेव्हा सावकाराने त्यांना बोलावून बऱ्याच कालावधीनंतरही कर्जफेड न झाल्याने कर्जाचा व व्याजाचा हिशोब केला. दरमहा साडेचार टक्के दराने व्याजाचे ८ होन व मूळ मुद्दल १२ होन असे एकूण २० होन देणे निघाले. तेव्हा ऋणकोने तो हिशोब मान्य केला आणि त्याच्या फेडीसाठी काही मुदत मागितली. त्या मुदतीत रक्कम भरणा केली नाही तर पुढील काळासाठी दरमहा ७॥ टक्के व्याज देऊ. म्हणजे मूळ दरमहा दर होनास १८ रुके व्याजाने काढलेल्या या मुदगल कुलकर्ण्याला आता दरमहा दर होनास ३६० रुके इतके व्याज म्हणजे मूळ व्याजाच्या २० टक्के व्याज द्यावे लागणार होते. याप्रमाणे जर मुदतीत कर्ज फेडले नाही तर आपल्या हिश्शाचे निम्मे कुलकर्ण व ज्योतिषी लिहून देऊ, असे मूळ कर्जपत्रात कबूल केल्याप्रमाणे हवाली करू असे साक्षीदारांच्या सहीनिशी १६७३ साली स्वखुशीने लिहून दिले आहे. (शि.च.सा. २ : १३४)

मुदतीत कर्ज व्याजासकट न फेडल्यास कशा प्रकारचा दंड द्यावयाचा, याची नोंद कर्जपत्रात प्रथमच केलेली असे. बहुधा हा दंड भारी असे. काही वेळा कर्जदाराला मुदतीचे बंधन पाळता आले नाही, तर मूळ मुद्दलाच्या दुप्पट रक्कम देऊ असे कर्जपत्र तयार करतानाच कबुली द्यावी लागे. (राजवाडे १५ : ८९)

कर्जाची फेड कराराप्रमाणे करण्याची नैतिक जबाबदारी ऋणकोवर असे. कारण तसे

न करणे हे एक महान पाप असून त्याचे वाईट परिणाम आपल्याला पुढच्या जन्मी भोगावे लागतील, अशी एक समजूत समाजात रूढ होती आणि या अंधश्रद्धेचा पुरेपूर फायदा सावकार मंडळी उठवीत असत. कर्जाची फेड मुदतीत न करणे म्हणजे गोहत्या, ब्रह्महत्या अथवा वाराणसीत मातृगमनासारखे घोर पातक करण्यासारखे आहे असे मानले जाई. दुर्गोजी पायगुडे याने पुण्याच्या मोरो विठ्ठल होनप देशपांडे यांना कर्जापोटी लिहून दिलेल्या कर्जपत्रात म्हटले आहे की, कराराप्रमाणे कर्जफेड करू. ''आनेथा करू तरी गौहत्या, ब्रह्महत्या व वाराणसीस मात्रागमन केलियासी सफेत आसे.''

मिरासवतन तारण ठेवून कर्ज काढले असेल आणि त्याची फेड जर करता आली नाही, तर ते वतन सावकार गिळंकृत करील अशी सारखी भीती कर्जदाराला वाटत असे. कारण वतन हे वंशपरंपरा असे आणि ते एक सामाजिक प्रतिष्ठेचे गमक होते.

तगाई अथवा सरकारी कर्ज

शेतीच्या अथवा इतर व्यवसायांच्या विकासासाठी सरकारातून काही कर्जे दिली जात असत किंवा नाही यासंबंधीची विशेष काही माहिती मिळत नाही. मुघलांच्या राजवटीत सरकारी आश्रयाखाली कारखाने होते आणि त्यासाठी सरकारी खजिन्यातून भांडवल पुरविले जात असल्याचे उल्लेख आढळतात. मराठी राज्यातसुद्धा शिवकालात अठरा कारखाने असल्याचा उल्लेख सभासद बखरीत आढळतो; पण या कारखान्याचे स्वरूप म्हणजे विविध वस्तूंच्या संग्रहाचे विभाग असेच असावे असे दिसते. मुघली कारखान्यातून काही मौल्यवान वस्तूंचे उत्पादन होत असे व राजघराण्यांच्या गरजा पुरवून, उरलेल्या वस्तू बाजारात 'मीना बाजारा'त विकल्या जात. तशा प्रकारचे उत्पादन करून मालाची विक्री करण्याचे काम मराठी राज्यातील कारखान्यातून होत असावे असे उपलब्ध पुराव्यांवरून दिसत नाही.

सतराव्या शतकात सरकारी उत्पन्नाची प्रमुख बाब म्हणजे शेतीव्यवसाय आणि त्याच्या उत्तेजनार्थ शिवकालात जातीने काही प्रयोग झाले असावेत असे म्हणावयास पुरावा आहे. कोकणातील प्रभानवलीच्या सुभेदाराला उद्देशून प्रस्तुत संदर्भात लिहिलेल्या पत्रांचा उल्लेख मागे आलाच आहे. कदाचित तशा आशयाची पत्रे इतर अधिकाऱ्यांनाही पाठविली असावीत. मराठी राज्याचे शेतीव्यवसायाविषयीचे धोरण प्रस्तुत पत्रावरून स्पष्ट होते.

गरजू शेतकऱ्यांना, शेतकीचा व्यवसाय निर्वेधपणे करता यावा, त्याला आवश्यक ती शेतीची अवजारे खरेदी करता यावीत अथवा पेरणी ते सुगी हा मधला काळ त्याच्या जीवनात अत्यंत हलाखीचा असतो, त्या काळात उदरनिर्वाहासाठी काही साहाय्य मिळावे, या हेतूने शिवाजी राजाने तगाईच्या रूपाने शेतकऱ्यांना, बिनव्याजी आर्थिक साहाय्य करण्याची एक योजना, या पत्राद्वारे प्रभानवलीच्या सुभेदारापुढे मांडली होती. ही तगाई शेतकऱ्याच्या मगदुराप्रमाणे, त्याला परवडतील अशा हप्त्यांनी वसूल करावयाची होती व कोणत्याही परिस्थितीत तगाईवसुलीसाठी त्याची अवजारे अथवा

जमीन जप्त करावयाची नव्हती. जमीनदारांच्या वर्चस्वाखाली असलेली रयत मुक्त करून तिच्याशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याच्या, मराठी राज्याच्या हेतूचा शेतीविषयक धोरण हा एक महत्त्वाचा भाग होता असे म्हणता येईल.

सरकारी कर्जाचे अस्सल दस्तऐवज आज उपलब्ध नसले तरी तगाईसंबंधी जे तुरळक उल्लेख आढळतात, त्यावरून असा निष्कर्ष काढता येईल की, शेतीच्या विकासासाठी, राजाच्या अंदाजपत्रकात काही योजना असणार की, ज्यायोगे शेतकऱ्याला बिनव्याजी अथवा माफक व्याजाच्या दराने कर्ज मिळून, त्याच्या मेहनतीला उत्तेजन मिळेल. बाजारपेठा वसविण्यासाठी सरकारातून आर्थिक मदत आणि इतर साहाय्य मिळत असल्याचे काही उल्लेख आढळतात, तर शेती या प्रधान व्यवसायाला ते का मिळू नये, असा प्रश्न येथे उपस्थित करता येईल आणि त्याचे उत्तर होकारात्मक असेल.

पैशाच्या देवाण-घेवाणीच्या व्यवहारात धनको आणि ऋणको यांना राज्याकडून कशा प्रकारचे संरक्षण मिळत होते, हे निश्चितपणे सांगता येणार नाही; परंतु मराठी राज्याच्या एकंदर कारभाराचे स्वरूप लक्षात घेतले, तर खेड्यातील पंचायती, गोतसभा यासंबंधीचे निर्णय घेत असावेत आणि ते उभय पक्षांवर बंधनकारक असले पाहिजेत आणि त्या वेळच्या सामाजिक न्यायाच्या कल्पनेप्रमाणे, या स्थानिक संस्थांचे नियम 'तिलतुल्यतले' मानण्याची सोय नव्हती. वतनासारख्या महत्त्वाच्या संस्थेसंबंधी स्थानिक सभांनी दिलेले निर्णय फिरविणे राजाला सुद्धा कठीण असे, तर कर्जासारख्या छोट्या बाबतीतले निर्णय ग्रामवासियांना बंधनकारक असल्यास नवल नाही.

वरात

पतपेढीचा विचार करताना मध्ययुगात प्रचलित असलेल्या आणखी एका आर्थिक व्यवहाराच्या साधनाचा आपण विचार केला पाहिजे. ते साधन म्हणजे 'वरात' अथवा 'हुंडी'. 'वरात' म्हणजे त्या कागदात नमूद केलेली रक्कम देण्याचा सरकारी अधिकाऱ्याला दिलेला आदेश होय.

आपल्या अधिकाऱ्यांना शिवाजी राजा वरातीद्वारे पगार देत असे. (जसे आज चेकच्या रूपाने दिला जातो) सभासद बखरीत म्हटले आहे.

> ''सरनौबतास, मजुमदारास, कारकुनास व हुजुरातील लोकांस तनखे वराता देत होते'' (पृ. २४)

इंग्रजांकडून खरेदी केलेल्या वस्तूंची किंमत शिवाजी राजाने सॅम्युअल ऑस्टिन या कंपनीच्या अधिकाऱ्याला कल्याण-भिवंडीच्या खजिन्यावर 'वरात' काढून दिली होती. अर्थात या पद्धतीबद्दल इंग्रजांनी नाराजी व्यक्त केली आहे. ऑस्टिन म्हणतो की, खजिन्यातून वरातीची रक्कम वसूल करणे इतके सोपे नव्हते. रक्कम देण्याचे मान्य केलेच तर त्याच्या वसुलीसाठी दोन ते तीन वर्षांचा कालावधी लागत असे. (इ.रे.शि. २, पृ. ९९, ११४) अर्थात राजाला माल पुरविणाऱ्या व्यक्तींना देण्याबाबत होणाऱ्या

या विलंबाची पूर्ण कल्पना असणार म्हणूनच माल पुरवताना, त्याची किंमत थोडीशी वाढवून दिलेली असणार आणि आपल्या संभाव्य नुकसानाची भरपाई केली असणार. इंग्रज व्यापारी वरातीला 'अनिश्चित पैसा' मानीत आणि म्हणून मालाची किंमत चांदीच्या नाण्यात कशी मिळेल यासाठी सतत प्रयत्नशील असत.

'वराती' मागोमाग बाजारपेठेत एक नवा वर्ग उदयाला आला, तो म्हणजे दलालांचा. कंपनीचे व्यापारी अशा दलालांच्या मार्फत वरातीत नमूद केलेला पैसा त्वरित मिळावा म्हणून, काही बक्षिसी देण्याचे मान्य करून 'वरात' वठवून घेत. (इ.रे.शि. १ : पृ. ४८)

बाजारभाव

शिवकालीन महाराष्ट्रात निरनिराळ्या वस्तूंचे काय भाव होते, त्यात होणारे चढ-उतार कालानुक्रमाने कोष्टक अथवा आलेख काढून सांगणे पुराव्याभावी कठीण आहे. स्थूलमानाने बाजारभावात होणाऱ्या या कालातील चढ-उताराचे तीन कालखंड कल्पिता येतील. १६२९-३० साली मराठी मुलखात पडलेल्या भीषण दुष्काळाचे संहारक रूप आपण मागे पाहिले आहे. या दुष्काळाचे परिणाम पुढे कित्येक वर्षे लोकांना भोगावे लागले. शिवचरित्रकार परमानंद हा आपल्या 'शिवभारत' या संस्कृत काव्यात दुष्काळाचे वर्णन करताना म्हणतो की, एरवी जनावरांना घालण्याच्या कुळीथासारख्या धान्यखरेदीसाठी १ शेराला १ शेरभर सोने मोजावे लागे. कवींद्राच्या या विधानातील अतिशयोक्तीचा भाग वगळला तरी, बाजारभाव फारच कडाडले होते व दैनंदिन जीवनावश्यक वस्तू मिळविण्यासाठी लोकांना फार कष्ट उपसावे लागत असत, हे अमान्य करता येणार नाही. दुष्काळाच्या काळात १ पायली ज्वारीसाठी १ होन मोजावा लागे.

दुष्काळाचा प्रभाव १६३१ नंतर हळूहळू ओसरत गेला असावा, विस्कळीत झालेली अर्थव्यवस्था लोकांनी थोडी फार सावरली असावी. विशेषत: अन्नधान्याचे भाव क्रमश: खाली येत गेले असावेत. अर्थात सामान्यस्थिती अथवा दुष्काळापूर्वीची मूळस्थिती बाजारभावाच्या दृष्टीने केव्हा प्रस्थापित झाली हे साधनाअभावी मांडणे कठीण आहे; पण स्थूलमानाने असे म्हणता येईल की, शिवाजी राजाचा उदय आणि आर्थिक स्थैर्य या घटना बरोबरीनेच घडत गेल्या असाव्यात आणि १६४५ नंतरच्या काळात बाजारभावाच्या दुसऱ्या कालखंडाला सुरुवात झाली असावी. या दुसऱ्या अवस्थेत १६६७ पर्यंत तरी वस्तूंचे भाव, काही किरकोळ चढ-उताराचे अपवाद सोडता, बरेच स्थिर राहिले असावेत. कारण १६६६ च्या एका साधनानुसार, १ पायली गव्हाची किंमत ११ रुके, ज्वारीची ११ रुके (१६३० साली १ पायली कुळीथास ५७६ रुके पडत) आणि डाळीची १०.१/२ रुके इतकी होती.

१६७६ च्या एका कागदात, १६६७ पूर्वीचे अन्नधान्याचे दर दिले आहेत. हे दर सरकारने निश्चित केले होते. पौड मावळच्या रयतेला, चिंचवडच्या मोरया गोसाव्याच्या मठाला पुरविण्याच्या वस्तू तांदूळ, भात, तूप, पेंड यांचे भाव ठरवून दिले होते. यात उत्तम तांदूळ ५ रुके पायली, भात २.१/२ रुके पायली असे दर दिले होते.

शिवाजी राजाने १६६७ साली आपल्या राज्याच्या काही मुलखात बटाईचा अंमल सुरू केला होता. त्यामुळे १६६७ पूर्वीच्या धान्याच्या भावात काहीसा फरक पडणे अनिवार्य होते. बाजारभावाचा तिसरा कालखंड या काळापासून सुरू झाला असे म्हणता येईल. पौण मावळचा प्रदेश बटाईखाली आला होता. तेथील रयतेने तक्रार केली की मठाला पुरविण्याच्या वस्तूंचे भाव बटाईपूर्वीचे आहेत आणि बटाईनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत जुन्या दराने त्या वस्तू पुरविणे त्यांना शक्य नव्हते. कारण वस्तूंचे भाव वाढल्याने त्यांच्यावर अधिक बोजा पडत होता. मठाला मालाचा पुरवठा वस्तूंच्या रूपाने करावयाचा होता आणि त्यासाठी प्रसंगी त्यांना तो माल वाढत्या भावाने खरेदी करावा लागे आणि मठाला द्यावा लागे. अर्थात मठाचे अधिकारी या मालाची किंमत जुन्याच दराने देत असत आणि त्यात शेतकऱ्यांचा तोटा होत असे. उदाहरणार्थ, भाताची किंमत २. १/२ रुक्यावरून ६ रुके पायली इतकी वाढली होती. बाजारभाव आणि ठरवून दिलेले भाव यामधील असणाऱ्या फरकामुळे शेतकऱ्यांवर अधिक ताण पडू लागला, आणि तो सहन करण्याची त्यांची ताकद नव्हती. किमतीतील वाढ ही बटाईमुळे झाली होती.

रयतेकडून सारावसुली हे प्रामुख्याने धान्याच्या रूपाने केली जात असे. बटाईचा अंमल जेथे सुरू झाला तेथे रयतेवरील इतर कर रद्द करून, ते बटाईच्या साऱ्यात विलीन केले होते. राज्याचा हिस्सा हा एकूण शेतीच्या उत्पन्नाच्या २/५ 'राजभाग पचादुई' असा रूढ होता; पण बटाईमुळे रयतेला आपल्या उत्पन्नाचा जवळ जवळ निम्मा भाग साऱ्याच्या रूपाने सरकारला द्यावा लागे. त्यामुळे बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या धान्याचे प्रमाण घटले. मालाच्या पुरवठ्यात अशी घट पडल्याने मागणी आणि पुरवठा यांच्यातील प्रमाणात फरक पडू लागला. पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक झाल्याने वस्तूंचे भाव वाढले.

१६६६ पूर्वीचे भाव आणि नंतरचे भाव यात जेव्हा फारसा फरक नव्हता, तेव्हा देवस्थानासंबंधीच्या पूज्यभावनेने पौड मावळचे शेतकरी हे नुकसान सहन करीत. भाववाढ अधिक होऊ लागली तसे रयतेच्या नुकसानाचे प्रमाणही वाढले. इकडे चिंचवडच्या मठाने रयतेची धान्य देण्याबाबतची खळखळ बंद व्हावी म्हणून राजाकडे पक्क्या सनदेची मागणी केली. राजाला रयतेचे म्हणणे पटत होते, त्यांच्यावरील वाढता बोजा कमी करणे हे शिवाजीसारख्या प्रजाहितदक्ष राजाचे आद्यकर्तव्य होते. त्याचबरोबर मोरया गोसावीच्या मठाचेही नुकसान होऊ नये याकडेही त्या धर्मसंरक्षक राजाला लक्ष पुरविणे भाग होते. ही समस्या राजाने मोठ्या कौशल्याने सोडविली आणि रयत आणि मठाधिकारी या दोघांचेही समाधान होईल असा तोडगा काढला. मठाच्या मागणीप्रमाणे १६७६ साली त्याला पूर्वीच्या तरतुदीत मामुली फरक करून एक कायम स्वरूपाची सनद करून दिली; आणि त्यात असे स्पष्टपणे नमूद केले की त्यांनी १६६६ साली ठरवून दिलेल्या किमतीप्रमाणेच त्यांना मंजूर केलेल्या धान्याची, तेल आणि पेंड यांची किंमत रयतेला द्यावी. रयतेने मठाकडून मिळेल तो पैसा घ्यावा आणि तो माल पुरवावा,

आणि असे करीत असताना वाढलेल्या भावामुळे त्यांना जे नुकसान सोसावे लागेल, त्याची भरपाई सरकारी खजिन्यातून केली जाईल. या तोडग्यामुळे शिवाजी राजाने दोन्ही पक्षांचे समाधान तर केलेच; पण आपल्या रयत आणि वतन यासंबंधीच्या धोरणाचा राज्याभिषेकानंतर परत एकदा पुनरुच्चार केला. रयतेची 'नुकसानभरपाई' मान्य करून राजा आणि रयत यांच्यातील प्रत्यक्ष संबंधाचे राज्याचे धोरण दृढ केले. राजा हा वतनदारांपेक्षा श्रेष्ठ आहे, तो वतनात कमी-अधिक बदल करू शकतो, हे चिंचवडच्या मठाला १६७६ साली दिलेल्या नव्या सनदेवरून स्पष्ट होते. पूर्वीच्या सनदेत १५ खंडी भाताची तरतूद होती, नव्या सनदेत ती ७॥ खंडी केली. वस्तूंच्या बाजारभावातील चढ-उतारामुळे चिंचवड मठाच्या अन्नखर्चाच्या तरतुदीच्या निमित्ताने, महाराजांच्या प्रजाहितदक्षपणाचे आणि त्यांच्या सार्वभौमत्वाचे दर्शन घडते. (शि.च.सा. ४, पृ. ९-११)

बाजारभावाच्या संदर्भात मागणी आणि पुरवठा यांचे परस्परसंबंध यांची शिवाजी राजाला पूर्ण कल्पना होती हे त्यांच्या पत्रावरून दिसून येते. साऱ्याच्या रूपाने सरकारी कोठडीत जमा झालेले धान्य ताबडतोब विक्रीस काढू नये अथवा जेथे त्या वस्तू वसूल केल्या असतील तेथील बाजारपेठेत त्या विकू नयेत, याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सक्त आदेश दिले आहेत. अशा वस्तू ज्या भागात दुर्मीळ असतील त्या बाजारपेठेत योग्य आणि वाढीव भाव मिळत असेल, तर विकाव्यात आणि साहेबाचा म्हणजे सरकारचा फायदा करून द्यावा, असे राजाचे खरेदी-विक्रीबाबतचे धोरण होते. प्रस्तुत संदर्भात प्रभानवलीच्या सुभेदाराला १६७६ साली पाठविलेल्या एका पत्रात शिवाजी राजाने आपले धोरण स्पष्ट केले आहे–

> "रयतेपासून यैन जिनसाचे नख्त घेत नवजाणे येन जिनसाचे येन जिनसच घेऊन जमा करीत जाणे, आणि मग वेलचें वेलेस विकती जाणे की ज्या ज्या हुनरेने (कौशल्याने) माहाग विकेल आणि फायदा होये त करीत जाणे.. विकरा यैसा करावा की कोण्हे वेलेस कोण जिनसच विकावा ते हंगामी तो जिनस विकावा जिनस तर पडोन जाया नव्हे आणि विकरा तरी महाग..." (शि.च.सा. ९ : ५५)

मराठी राज्यात ठिकठिकाणी जमिनीची मोजणी करून साराबंदी करीत असताना, शिवाजी राजाने निरनिराळ्या विभागासाठी परिस्थितीनुरूप वस्तूंचे बाजारभाव ठरवून दिले असण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

■■

'बहुत जनांसी आधारू'

यदुनाथ सरकार यांनी आपल्या 'हाऊस ऑफ शिवाजी' या ग्रंथात, शिवाजी राजांचे स्मरण आपणास सतत का राहिले पाहिजे हे विशद करताना, राजांचे इतिहासातील स्थान याबाबत मार्मिक उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "आठ विविध भाषांतून उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा बारकाईने अभ्यास केला असता, शिवाजी राजाच्या इतिहासकाराला हे मान्य करावे लागेल की, शिवाजी हा केवळ मराठा-राष्ट्रनिर्माता नव्हता तर मध्ययुगीन हिंदुस्थानातील तो एक श्रेष्ठ रचनात्मक कार्य करणारा अत्यंत बुद्धिमान माणूस होता. (The greatest constructive geius of medieval India) राज्ये नष्ट होतात, साम्राज्यांचे विघटन होते, राजघराणी लुप्त होतात; परंतु कालातीत ऐतिहासिक वारसा म्हणून 'लोकनेता राजा' या नात्याने शिवाजी राजाचे स्मरण अखिल मानवजातीला दीर्घकाल सचेतन करणारे, कल्पनाशक्तीला चेतवणारे, बुद्धीला स्फुरण देणारे आणि अति उच्च पराक्रम करण्यास उद्युक्त करणारे असे राहील. (पृ. ११५)

आपल्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ त्यांनी रामदास स्वामींचा शिवाजी राजासंबंधीच्या एका श्लोकाचा आधार घेतला आहे. रामदास स्वामी म्हणतात,

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी॥१॥

वरील श्लोकातील 'बहुत जनासी आधारू।' आणि 'श्रीमंत योगी' हे शब्दप्रयोग शिवाजी राजाच्या अर्थकारणाच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. "राज्य म्या शिवाजीने चाळीस हजार होनांचा पुणे महाल होता, त्यावरि एक क्रोड होनांचे राज्य पैदा केले" असे सार्थ अभिमानाने म्हणणारा, आपले राज्य म्हणजे 'श्रींचा प्रसाद' असे मानणारा आणि सर्व लोकांना बरोबर घेऊन जाणारा, तो एक प्रजाहितदक्ष श्रीमंत योगी राजा होता

असेच म्हणावे लागेल. गुणवान् लोकांना सेवेचे अनेक मार्ग उपलब्ध करून देऊन (careers open to talents) तो बहुत जनासी आधारू बनला.

शिवाजी राजाच्या राजमुद्रेत देखील हे लोककल्याणाचेच ध्येय मराठी राज्यापुढे ठेवले आहे. राजमुद्रेत म्हटले आहे, ''प्रतिपदेच्या चंद्रकलेप्रमाणे हळूहळू वाढणारी, शहाजीचा पुत्र शिवाजीची ही मुद्रा कल्याणासाठी प्रकाशमान होते अथवा शोभते.'' येथे कल्याण म्हणजे लोकांचे कल्याण. कारण राजाचे हित लोकांच्याच हितात सामावलेले असते आणि लोकांचे कल्याण साधावयाचे म्हणजे, राजकीय उन्नतीबरोबरच त्यांचा आर्थिक विकास साधला पाहिजे, हे या शिवकल्याण राजाने ओळखले होते आणि थोडेसे राजकीय स्थैर्य मिळाल्यावर, त्या दिशेने पाऊले टाकण्यास प्रारंभ केला होता. हे येथवर केलेल्या विवेचनावरून स्पष्ट व्हावे.

शिवाजी राजाचे वर्णन करताना रामदासांनी विशेषणांची खैरात केली आहे. त्यांनी वापरलेले 'जाणता राजा' हे शब्द फार सूचक आहेत. लोकांचे हित कशात आहे आणि राजसत्तेने त्यासाठी काय केले पाहिजे हे जाणणारा तो राजा होता. आपल्या आयुष्याच्या शेवटी शेवटी सुद्धा लोकांचे कज्जेखटले सोडविण्यात तो किती दक्ष होता, हे त्याच्या १६७९ च्या मावळ देशाच्या अधिकाऱ्याला दिलेल्या आज्ञेवरून स्पष्ट होते. ते म्हणतात, ''स्वामी धाकुटपणापासून या देशात आहेत. मिरासदार कोण, गैरमिरासदार कोण हे जाणताती व माणसाचे माणूस वळखतात. 'येथे काव्य आणि अस्सल इतिहासाच्या साधनाचा मेळ 'जाणता' या शब्दावरून पडलेला दिसून येतो. रामदासांनी केलेला शब्दप्रयोग म्हणजे केवळ कविकल्पना नव्हती, ते एक ऐतिहासिक सत्य होते. यदुनाथ सरकारांनी योजलेल्या 'Hero as King' या शब्दप्रयोगातून देखील हाच अर्थ ध्वनित होतो. लहानपणापासून आपल्या प्रदेशातील माणसांना ओळखणारा बालशिवाजी हा त्यांचा नायक अथवा नेता बनला आणि या नेतेपदातूनच त्याला राजपद मिळाले होते. म्हणूनच तो लोकनेता राजा बनला.

शेतकऱ्याला 'बळीराजा' असे म्हटले जाते. कारण तो धान्य पैदा करून दुनियेच्या पोटापाण्याचा भार उचलतो. शेतकऱ्यांसाठी, शेतीच्या विकासासाठी, शिवाजी राजाने जे प्रयत्न केले, ते सारे लक्षात घेतले म्हणजे तो खऱ्या अर्थाने या 'बळी राजाचा' संरक्षक राजा होता असे म्हणता येईल. गनिमाचा हल्ला होणार असे समजताच आपल्या प्रदेशातील 'गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून' समस्त रयत लेकराबाळासह सुरक्षित स्थळी नेण्याची जबाबदारी शिवाजी राजाने, वतनदारांवर टाकली होती आणि यात कुचराई झाली आणि मुघलांनी रयतेला गुलाम म्हणून पळवून नेले, तर त्याचे पाप वतनदाराच्या माथ्यावर लादले जाईल अशी त्यांना ताकीद दिली होती. सैनिकांना देखील असे बजावले होते की, त्यांचा तळ जेथे असेल तेथील रयतेला कसल्याही प्रकारचा उपद्रव त्यांच्यापासून पोहोचता कामा नये. लष्कराला काही हवे असेल तर त्यांनी बाजारात जाऊन, तेथील जो रास्त भाव आहे त्याप्रमाणे वस्तू खरेदी कराव्यात.

''कोण्हावरी जुलुम जाजती अगर कोण्हासी कलागती (भांडण) करावयाची गरज नाही.''

तसेच बटाईमुळे पौड मावळात अन्नधान्याचे भाव कडाडल्याने, चिंचवड देवस्थानाला कराराने बांधून दिलेल्या भावाप्रमाणे माल पुरविणे रयतेला कठीण जाऊ लागले. तेव्हा शिवाजी राजाने त्यांच्यावर पडणारा जास्त बोजा सरकारी तिजोरीतून देण्याची सोय केली, पण रयतेला कसलीही तोशीश होऊ दिली नाही, हे आपण मागे पाहिलेच आहे.

कागदपत्रातील, काव्यातील उल्लेख आणि राजमुद्रा या साऱ्यांचा एकत्रित विचार केला म्हणजे शिवाजी राजा - शेतकऱ्यांचा राजा आणि प्रजेच्या हितासाठी झटणारा 'बहुत जनासी आधारू' असा राजा होता हे सत्य निर्विवाद मान्य केले पाहिजे.

नव्याने संपादन केलेले 'स्वराज्य' आर्थिकदृष्ट्या कसे बळकट होईल यासाठी शिवाजी राजाने अहर्निश प्रयत्न केले. मराठी राज्याची निर्मिती अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाली होती. शिवजन्माच्या सुमारास म्हणजे १६३० साली महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला होता त्याचे सविस्तर वर्णन मागे आलेच आहे. गावे ओसाड पडली, लोक परागंदा झाले, व्यवसाय संपुष्टात आले आणि सारी आर्थिक घडी पार विसकटून गेली. अशा परिस्थितीत लोकांना केवळ स्वराज्य देऊन भागण्यासारखे नव्हते, त्यांना आधार हवा होता, अन्न-वस्त्र-निवाऱ्याची खात्री हवी होती आणि ती शिवशाहीत मिळाली असणार हे शिवाजी राजाच्या प्रशासन आणि आर्थिक धोरणावरून स्पष्ट होते. १६३० साली मराठी मुलखाची आर्थिक परिस्थिती काय होती आणि महाराजांच्या अंतसमयी ती कशी सुधारली हे आकडेवारीच्या साहाय्याने देता आले नाही तरी, या संपूर्ण काळाचे साक्षीदार आणि डोळस निरीक्षक रामदास स्वामी, यांच्या शब्दांत सुरुवातीच्या आणि नंतरच्या आर्थिक स्थितीचे वर्णन साररूपाने करता येईल. १६३० साली 'उदंड दु:खचि' साहिलेल्या जनतेला मराठी राजा छत्रपती बनला तेव्हा मात्र 'उदंड झाले पाणी' असे वाटू लागले आणि महाराष्ट्राचे 'आनंदवनभुवन' झाले. पूर्वीच्या अस्मानी सुलतानी राजवटीचा अनुभव घेतलेले, सतराव्या शतकातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे विदारक रूप पाहून कंटाळलेले, वैतागलेले रामदासस्वामी तुळजाभवानीला साकडे घालतात,

''दुष्ट संहारिले मागे। ऐसे उदंड ऐकिले।
परंतु रोकडे काही। मूळ सामर्थ्य दाखवी।।''

हे 'रोकडे' रूप म्हणजेच शिवाजीच्या नेतृत्वाखाली उदयाला आलेली मराठी सत्ता आणि त्यांनी दाखविलेले मूळ सामर्थ्य म्हणजे सुलतानी राजवटीला हटवून स्थापन केलेले मराठी 'स्वराज्य' हे होय. रामदासांचे मनोरथ अशा रीतीने त्यांच्या हयातीतच पूर्ण झाले होते.

यदुनाथ सरकारांनी 'शिवाजी ॲण्ड हिज टाईम्स' हे इंग्रजी शिवचरित्र लिहून

मराठ्यांच्या इतिहासाची थोर सेवा केली आहे. अमराठी इंग्रजी जाणणाऱ्या माणसाला त्यांनी शिवाजीच्या अतुलनीय कार्याची ओळख करून दिली आहे. त्यांनी शिवचरित्र बऱ्याच अंशी वस्तुनिष्ठपणे आणि परखडपणे लिहिले आहे; परंतु शिवचरित्राच्या साधनांचा विचार करताना मराठी साधनांविषयी त्यांनी काढलेले उद्‌गार अनुदारपणाचे आहेत. शिवचरित्राची अस्सल आणि उपयुक्त साधने फक्त समकालीन फारसी, पोर्तुगीज, राजस्थानी भाषेतच आहेत, मराठीत मुळीच नाहीत (none in Marathi) हे त्यांचे विधान मात्र खटकणारे आहे. 'शिवचरित्र' ही यदुनाथांची एक अनिवार्य अथवा अनाहूत कलाकृती आहे. औरंगजेबाचा सखोल अभ्यास करत असताना शिवाजी आणि मराठे यांचा अभ्यास टाळणे त्यांना शक्य नव्हते; पण मराठी अस्सल साधने पाहण्यास त्यांना वेळ नव्हता. तेव्हा फारसी, राजस्थानी आणि काही पाश्चिमात्य साधने यावर लक्ष केंद्रित करून, 'सभासद बखर', '९१ कलमी बखर', 'शिवकालीन पत्र सारसंग्रह', 'शिवचरित्र प्रदीप'सारखी मोजकी साधने वापरून त्यांनी आपला 'शिवाजी' सजवला आहे. तेव्हा मुघलांच्या इतिहासाची एक पुरवणी (appendix) असेच त्यांच्या शिवचरित्राचे स्वरूप आहे. असे असले तरी त्या ग्रंथाचे महत्त्व आपण नाकारू शकत नाही.

यदुनाथांच्या शिवचरित्राचा मुख्य गाभा राजकीय असल्याने आणि मराठी साधने विशेष न वापरल्याने मराठ्यांच्या सामाजिक, आर्थिक इतिहासासंबंधी काही विवेचन त्यात अपेक्षित नव्हते; परंतु मराठ्यांच्या अर्थविषयक कार्यासंबंधी त्यांनी जे सर्वसाधारण विधान केले आहे ते वस्तुस्थितीचे निदर्शक नाही. ते म्हणतात, मराठ्यांनी आर्थिक विकासाकडे दुर्लक्ष केले (neglected the economic development of the State.) त्यांचा हा निष्कर्ष शिवकालाला कसा लागू पडत नाही, हे या पुस्तकातील साधार विवेचनावरून स्पष्ट व्हावे. एखाद्या राज्याचा किंवा प्रदेशाचा सामाजिक, आर्थिक इतिहास जाणून घ्यावयाचा असेल, तर त्यासाठी स्थानिक भाषेतील साधनांचाच प्रामुख्याने विचार केला पाहिजे आणि इतर भाषेतील साधने ही पूरक म्हणून वापरली पाहिजेत. पण यदुनाथांना हे मान्य नसल्याने न्यायमूर्ती रानड्यांच्या सारखे मूलग्राही लेखन त्यांच्याकडून झाले नाही. मात्र असा काहीसा प्रयत्न वंग इतिहासकार सुरेंद्रनाथ सेन यांनी केला आणि मराठ्यांची प्रशासनव्यवस्था जनतेसमोर आली.

यदुनाथ सरकारांच्या या विवेचनातून आणखी एका वादग्रस्त प्रश्नाला वाचा फुटली आहे. तो विषय म्हणजे मराठी राज्याचे स्वरूप. या विषयावर उलट-सुलट लिखाण आजही होत आहे; त्याची तपशीलवार चर्चा इथे काहीशी विषयांतरासारखी वाटली तरी प्रस्तुत ग्रंथात मराठी राज्याच्या अर्थव्यवस्थेसंबंधी जे विचार मांडले आहेत, त्याच्या समर्थनासाठी काही संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे.

शिवकालीन आर्थिक व्यवस्थेचे प्रस्तुत ग्रंथात जे साधार विवेचन केले आहे ते यदुनाथ सरकारांच्या विधानाचा फोलपणा ठरविण्यास पुरेसे आहे; पण असे विवेचन करताना मराठी सत्ता म्हणजे केवळ एक 'लष्करी सत्ता' होती हे त्यांचे विधान खटकण्यासारखे आहे. ग्रँट डफ या मराठ्यांच्या आद्य इतिहासकाराप्रमाणे केवळ

राजकीय इतिहासावर लक्ष केंद्रित करून यदुनाथांनी शिवचरित्राचे लेखन केले असल्याने मराठी सत्तेविषयी तसे त्यांचे मत झाले असल्यास नवल नाही. केवळ डफच्या इतिहासामुळे मराठ्यांच्या कार्याविषयी जे ग्रह एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी रूढ झाले होते ते अद्यापही पूर्णपणे दूर झालेले नाहीत. म्हणूनच द.वि. आपटे यांनी यदुनाथ सरकारांना 'ग्रँट डफचा नवा अवतार' असा एक शेलका आहेर आपल्या 'शिवभारता'च्या प्रस्तावनेत दिला आहे. मराठ्यांचा इतिहास हे मोगलांच्या इतिहासातील एक उपाख्यान या दृष्टीनेच पाहिले जात असल्याने, मराठी सत्ता म्हणजे 'लष्करी सत्ता - Kriegstate' एक केवळ लढायांवर जगणारे आणि वाढणारे राज्य असे विधान यदुनाथ करू शकले. मराठ्यांच्या सत्तेची नैतिक बैठक न्या. रानडे यांनी आपल्या 'मराठी सत्तेचा उदय' या अभिजात ग्रंथात जी मांडली आहे त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे.

मराठी सत्तेच्या स्वरूपाविषयी विचार करताना शिवपूर्वकाल, शिवकाल आणि शिवोत्तर काल अशा संदर्भात त्याची चर्चा केली पाहिजे. शिवपूर्वकालातील अस्थिर परिस्थितीतून शिवाजी राजाने मराठ्यांचे स्वराज्य निर्माण केले. लढाया मारून प्रदेश-विस्ताराऐवजी आपले छोटेसे राज्य राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या स्थिर आणि बळकट कसे होईल यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रित करून प्रशासन आणि आर्थिक विकास यासंबंधीची आर्थिक धोरणे आखली, स्वराज्याचे सुराज्य बनविण्याची अहर्निश धडपड केली; परंतु शिवाजी राजाने घालून दिलेल्या ध्येय-धोरणाचा पाठपुरावा न करता त्याकडे पाठ फिरवून अठराव्या शतकात मराठ्यांनी प्रदेशविस्ताराचे, मराठी राज्याचे साम्राज्य बनविण्याचे धोरण आखले. त्यामुळे शिवोत्तर कालात मराठी सत्तेचे पूर्वीचे स्वरूप पार बदलून गेले. पहिल्या बाजीरावाने दिल्लीपर्यंत धडक मारली आणि उत्तरेच्या राजकारणात मराठ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित केले. त्याचे अभिनंदन करणाऱ्या त्याच्या एका मित्राने- येसाजी रघुनाथाने – १७३३ च्या सुमारास लिहिलेल्या पत्रात मराठे स्वदेशाला कसे विसरले यासंबंधी जे सूचक उद्‌गार काढले आहेत ते मराठी सत्तेच्या बदलत्या स्वरूपाचे निदर्शक आहेत. येसाजी म्हणतो,

> ''स्वामींची कीर्ती दिगंती होऊन दिवसेंदिवस येशाची अभिवृत्ति होत आहे. परंतु स्वामींचे चितात आजता। (आजतागायत) यैसे न ये जे कोकणांत येरवादा जागा आपला यैसा करून जैसी वरघाटी कीर्ती तैसी तलकोंकणात व सागरात व्हावी. हे चिती येत नाही. परंतु वरघाटी येक द्रव्यच मिलेल. कोकण म्हणजे नवनिधी आहे... कोंकण स्वामीचे वतनादाखल आहे. स्वामीनी कोकणांत नजरमात्र केल्यानंतर इच्छिले सिद्धीस जाईल यैसे आहे.'' (पे.द. ३३ : १४२, पृ. ११८-११९)

शिवाजी राजाचे राज्य 'कोकणचे राज्य' म्हणून ओळखले जाते. रायगड ही त्यांची राजधानी, कोकणच्या कुशीतली. कोकणच्या किनारपट्टीवर सागरीसत्ता विकासाची

पायाभरणी शिवाजीनेच केली; पण कोकणच्या सुपुत्रांना-पेशव्यांना-कोकणचा नवनिधी आठवला नाही किंवा सागराचे आव्हान त्यांना स्वीकारावेसे वाटले नाही. शिवाजी राजाच्या मार्गाने ते गेले नाहीत म्हणून शिवोत्तर कालात मराठी सत्तेचे स्वरूप पार बदलून गेले.

शिवाजीचे राज्य हे 'लष्करी राज्य होते' हा मुद्दा विशद करताना यदुनाथ सरकारांनी सुरतेच्या लुटीचे उदाहरण दिले आहे. राज्याच्या उत्पन्नासाठी, अस्तित्वासाठी युद्ध हेच एक नित्याचे साधन बनले तर जित आणि पराजित दोन्ही राज्यांतील उत्पादनाची साधने नष्ट होतात आणि युद्धाचा मूळ हेतूच बाजूला राहतो. कारण शांतता म्हणजे लष्करी सत्तेचा अंत – आणि शांततेचा काळ हाच राज्याच्या विकासाचा काळ असतो. युद्ध हाच ज्या राज्याचा पाया आहे, प्रमुख ध्येय-धोरण आहे, त्या राज्याची तुलना सोन्याची अंडी देणाऱ्या कोंबडीची हत्या करणाऱ्याशीच करावी लागेल, असे यदुनाथ म्हणतात. सुरतेच्या पहिल्या लुटीत शिवाजी राजाला जेवढी संपत्ती मिळाली, तेवढी दुसऱ्या किंवा नंतरच्या हल्ल्यात मिळाली नाही. कारण मराठ्यांनी त्या भागात दहशतीचे वातावरण निर्माण केल्याने तेथील व्यापार घटला, उद्योगधंदे मंदावले आणि सुरतेच्या संपत्तीचा झराच आटला. हे विधान काहीसे अतिशयोक्त आहे. मराठ्यांच्या हल्ल्यांचा व्यापारावर काहीसा परिणाम झाला असेल; पण सुरतेची बेसूरत होण्यास मुघलांची राजकीय, धार्मिक, आर्थिक धोरणेही तितकीच कारणीभूत आहेत याचा विचार मात्र यदुनाथांनी केला नाही. व्यापाऱ्यांना संरक्षण देण्यास, त्यांना सवलती देण्यास मुघली सत्ता असमर्थ ठरली आणि म्हणूनच इंग्रजांना नाइलाजाने सुरतेची आपली मुख्य वखार मुंबईस आणावी लागली आणि मराठी मुलखात ती भरभराटीस आली. सुरतेचा हा दाखला देऊन यदुनाथ सरकार म्हणतात, "आर्थिकदृष्ट्या मराठी सत्तेला स्थिर पाया नव्हता, अंतर्गत विकासाची नित्याची साधने त्या सत्तेपाशी नव्हती." यदुनाथांचा हा निष्कर्ष व्यापक स्वरूपाचा, सर्व मराठी सत्तेला लागू पडेल असा असला तरी, सुरतेच्या संदर्भात आणि विशेषत: शिवचरित्रात याचे विवेचन केले असल्याने त्यांना येथे शिवकालच अभिप्रेत आहे, असे अनुमान काढता येईल. शिवकालात अनेक लढाया झाल्या, पण मराठी सत्ता त्यामुळे खचली नाही किंवा तिचा आर्थिक पाया अस्थिर झाला नाही. आर्थिक विकासासंबंधी या ग्रंथात जे विवेचन केले आहे त्यावरून याची प्रचीती येईलच. तसेच "महाबुद्धिमान रचनात्मक कार्यकर्ता" असे शिवाजी राजाचे वर्णन करणाऱ्या यदुनाथ सरकारांच्या विधानातील आणि त्यांच्या लष्करी सत्तेसंबंधीच्या विवेचनातील ही विसंगती लक्षणीय आहे. टिपूची सत्ता आणि मराठ्यांची सत्ता यांतील फरक थॉमस मन्रोसारख्या प्रशासकाच्या देखील लक्षात आला होता. मराठ्यांशी तो अदबीने वागतो आणि परंपरेवर आधारित प्राचीन सत्ता (ancient regime) अशी तिची प्रशंसा करतो.

शेवटी शिवाजी राजाच्या राज्याच्या स्वरूपाविषयी अलीकडेच प्रसृत झालेल्या दोन विचारप्रवाहांचा येथे विचार करावयाचा आहे. प्राध्यापक इरफान हबीब यांच्या 'अग्रेरियन

सिस्टम ऑफ मुघल इंडिया' (१९६३) या नावाजलेल्या ग्रंथात मराठ्यांविषयी जे काही विचार आले आहेत ते प्रामुख्याने फारसी व समकालीन पाश्चिमात्य प्रवाशांच्या वृत्तांतावर आधारित आहेत. भीमसेन बऱ्हाणपुरी (१७०० इ.) लिखित 'नुकशा-इ-दिलकशा' या त्याच्या आठवणीवजा ग्रंथात त्याने शिवपूर्वकालात मुसलमानी आणि मुघली राजवटीत रयतेची सरकारी अधिकारी आणि जमीनदार यांच्याकडून कशी पिळवणूक होत होती याचे चित्र रेखाटले आहे. (इरफान, पृ. ३४६-४७). सभासद बखरीत यासंबंधी जे वर्णन आले आहे आणि ज्याचे विस्तृत विवेचन या ग्रंथात प्रारंभीच्या दोन प्रकरणांत आणि अन्यत्र केलेले आहे, त्याच्याशी भीमसेनचे स्वतंत्रपणे केलेले वर्णन बरेचसे मिळतेजुळते आहे.

शिवाजी राजाच्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगात या असहाय्य जनतेचा, सामान्य रयतेचा मोठा वाटा आहे, असा त्यातून निष्कर्ष प्रा. हबीब यांनी काढला आहे. असे असले तरी शिवाजी अथवा मराठी जमीनदार (chiefs) यांनी जाणीवपूर्वक अथवा पूर्ण विचारांती रयतेच्या उठावाचे नेतृत्व केले होते असे मानणे ही मोठी घोडचूक ठरेल. ("There will be no greater mistake than to consider Shivaji and the Maratha Chiefs as conscious leaders of a peasant uprising." इरफान पृ. ३४९) शिवाजी हा निजामशाही आणि आदिलशाही राज्यात नोकरी करणाऱ्या जमीनदाराचा पुत्र; आणि त्याने आपल्या कारकीर्दीची सुरुवात देखील एक जहागीरदार अशीच केली. मराठ्यांच्या आर्थिक आणि राजकीय व्यवहारांचा विचार केल्यास मराठी समाजात जमीनदारीची पाळेमुळे किती खोलवर रुजली होती याची कल्पना येईल. मराठी सत्तेचा उदय हा असा जमीनदारीतून, सामंतशाहीतून झाला. उदाहरणार्थ, 'चौथ' अथवा जमिनीच्या उत्पन्नाचा एक चतुर्थांश हिस्सा ही लुटारू मराठ्यांची परंपरागत अशी नित्याची मागणी असे. याला महाराणी ताराबाई सुद्धा अपवाद नव्हती. १७१९ साली मुघलांशी तह करताना तिने 'दख्खनच्या देशमुखीची' मागणी केली होती. कोणत्याही महत्त्वाकांक्षी जमीनदाराने केव्हाही अशीच देशमुखीची मागणी केली असती. अठराव्या शतकात मराठ्यांनी जवळजवळ एक साम्राज्य मिळविले; पण मराठी नेत्यांनी मुलूख काबीज करताना सर्वत्र आवर्जून मागणी केली ती जमीनदारीच्या हक्कांची. आपल्या या प्रचंड सत्तेचा उपयोग केवळ जमीनदारीचे हक्क संपादन करण्यापेक्षा दुसरा कोणताही चांगला मार्ग त्यांना सुचू नये हे आश्चर्य होय. ब्राह्मण पेशव्यांना तर ही जमिनीची हाव इतकी होती की, त्यांनी राज्याचे जमीनदारच नव्हे, तर पाटील-कुलकर्ण्यांसारख्या गावच्या छोट्या जमीनदारांचीही गय केली नाही. साऱ्या विश्वाचे 'मालिक' बनण्याची स्वप्ने हे कोकण ब्राह्मण पाहत होते. (इरफान, पृ. ३४९)

प्रा. हबीब यांनी मराठ्यांच्या ध्येय-धोरणांची फारसी साधनांच्या आधारे जी मीमांसा केली आहे त्याची साररूपाने माहिति वरील परिच्छेदात दिली आहे.

मराठी राज्यात शेतकऱ्यांवर जुलूम-जबरदस्ती होत नव्हती असे मानण्याचे कारण नाही, असे विधान करून त्याच्या समर्थनार्थ प्रा. हबीब यांनी पाश्चिमात्य प्रवासी, डॉ.

जॉन फ्रायर याच्या वृत्तांताचा आधार दिला आहे. १६७५-७६ च्या सुमारास शिवाजीच्या राज्यात भ्रमण करणारा डॉ. फ्रायर हा इंग्रज प्रवासी म्हणतो की, ''मला असे सांगण्यात आले आहे की, शिवाजीने रयतेकडून पूर्वीच्या दरापेक्षा दुप्पट दरांची मागणी केली; आणि कसाबसा उदरनिर्वाह करता येईल, जिवंत राहता येईल एवढाच त्याच्या उत्पन्नाचा भाग त्याच्याकडे ठेवला. कारवारात तर त्याच्या जुलमामुळे तीन चतुर्थांश जमीन लागवडीखाली येऊच शकली नाही.''

भीमसेनच्या आणि डॉ. फ्रायरच्या वृत्तांतावर आधारित आणखी एक विधान शिवाजी राजा आणि त्याची रयत यांच्या संदर्भात केले आहे. त्यांच्या मते शिवाजीने आपल्या रयतेचा उपयोग आणखी एका दुसऱ्याच कार्यासाठी करून घेतला होता. हे अर्धपोटी लोक, ज्यांचा नंगेफकीर, उपाशी, पुंड (naked, starved, rascals) असा डॉ. फ्रायरने उल्लेख केला आहे, ते सारे शिवाजी राजाचे सैनिक होते. त्यांना केवळ लूटमारीवर जगावे लागत असे. कारण ''लूट नाही, तर पगार नाही,'' असा राजाचा दंडक होता.

प्रा. इरफान हबीब यांच्या ग्रंथात मराठ्यांविषयी आलेल्या लिखाणाचा मथितार्थ येथवर दिला आहे. केवळ फारसी आणि प्रवाशांच्या वृत्तांतावर आधारित असे हे लेखन असल्याने त्यांनी मराठ्यांविषयी असे भाष्य करावे यात नवल नाही. या त्यांच्या अभ्यासाला समकालीन मराठी साधनांची जोड मिळाली असती आणि फारसी, पाश्चिमात्य आणि प्रादेशिक भाषांतील साधनांची साकल्याने त्यांनी मीमांसा केली असती, तर मराठ्यांचे राज्य म्हणजे एक 'लुटारूंचे राज्य' (Robber State) या व्हिन्सेंट स्मिथ या सरकारी आंग्ल इतिहासकारापेक्षा, त्यांनी कदाचित निराळे निष्कर्ष काढले असते.

प्रा. इरफान हबीब यांच्या बऱ्याच विचारांचे परिमार्जन प्रस्तुत ग्रंथात आलेल्या विवेचनामुळे होणारे असले तरी त्यांचा थोडक्यात परामर्ष घेणे येथे आवश्यक आहे. 'मराठेशाही' ही एक 'सामंतशाही' होती. शिवाजी हा एका जमीनदाराचा पुत्र आणि त्याने निर्माण केलेल्या राज्याचे स्वरूप 'सरंजामशाही'सारखे होते; आणि अशा राज्यात रयतेची, जनतेची पिळवणूक अनिवार्य असते असा सूर अनेक मार्क्सवादी विचारसरणीच्या बुद्धिवंतात आढळतो. शिवाजी हा शेतकऱ्यांचा राजा होता, जमीनदारांच्या ताब्यात, (ज्याला बखरकार 'जप्तीखाली' असा शब्दप्रयोग वापरतात.) असलेल्या रयतेची सुटका करून, राजाशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचा त्याने अहर्निश प्रयत्न केला, हा विचार साम्यवादी इतिहासकारांना पटण्यासारखा नाही.

प्रस्तुत संदर्भात रयतेचे नेतृत्व म्हणजे काय? राजा, वतनदार (जमीनदार) आणि रयत यांच्या परस्परसंबंधाविषयी शिवाजी राजाचे धोरण काय होते? आणि सामान्य लोकांतून अथवा जनतेतून ज्या सैन्याची शिवाजी राजाने उभारणी केली होती, त्यांना शिवकालात कशी वागणूक मिळत होती? फक्त एवढ्याच मुद्द्यांचा येथे ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे थोडक्यात विचार करावयाचा आहे.

प्रवाशांचे वृत्तांत हे बहुतांशी ऐकीव माहितीवर आधारित असतात. काही बाबतीत, विशेषत: एतद्देशियांना जी माहिती सामान्य, नोंद न करण्यासारखी वाटते ती माहिती

प्रवासी तपशीलवार देतात आणि ती इतिहासकाराला उपयुक्त वाटते. उदाहरणार्थ वाहतुकीची साधने, प्रवासाचे मार्ग, लोकांच्या चालीरीती, नाण्यांचे भाव इत्यादी माहिती जी त्यांच्या निरीक्षणावर अथवा स्वानुभवावर आधारित असते ती मान्य करण्यास काही हरकत नसते. अन्यथा ऐकीव माहितीवर केलेले विधान इतर समकालीन विश्वसनीय साधनांशी ताडून पाहिल्याखेरीज ते प्रमाणभूत मानता कामा नये.

प्रस्थापित सत्तेविरुद्ध रयतेने बंड पुकारले आणि त्याचे नेतृत्व एखाद्याने केले म्हणजे रयतेचे नेतृत्व समजावयाचे का? रयतेचे सामान्य प्रश्न अथवा गाऱ्हाणी असतील आणि ती सोडविण्याचा प्रयत्न एखाद्याने केला तर त्याला नेता म्हणावयाचे नाही का? ''स्वामी धाकुटपणापासून या देशात आहेत, मिरासदार कोण, गैरमिरासदार कोण हे जाणताती, माणसाचे माणूस वळखतात'' असे म्हणून योग्य त्या माणसाला त्याची जमीन देणारा, परचक्र आले असता रयतेचे संरक्षण केले नाही तर वतनदाराला जबाबदार धरणारा, धान्याचे भाव वाढले तरी देवस्थानात पूर्वीच्याच भावाने भरणा करावयाच्या मालाचा बोजा पौड मावळच्या रयतेवर पडू नये म्हणून त्यांना नुकसान-भरपाई देणारा, रयतेकडून भाजीच्या देठाचीही अपेक्षा अधिकाऱ्याने करता कामा नये-असे त्यांना बजावणारा, रयतेच्या गरजा ओळखून त्यांना मदत करावी, त्यांना कसलाही उपद्रव करू नये, बिनव्याजी कर्ज द्यावे, वसुलीसाठी तगादा करू नये, मालमत्ता जप्त करू नये, असे आदेश देणारा राजा रयतेचा नेता नव्हता का? तो तसा नव्हता असे मानणे हे मात्र इतिहासाला धरून होणार नाही.

शिवाजी राजाप्रमाणेच प्रसंगी वतनदार मंडळींनादेखील रयतेचे नेतृत्व करावे लागे. अस्मानी संकटामुळे अथवा अन्य कारणांमुळे एखाद्या वर्षी पीकपाणी ठीक झाले नाही, सरकारी सारा भरण्याची ताकद रयतेत उरली नाही, तर त्यांना सारासूट मिळावी म्हणून रयतेचे नेतृत्व गावचे- परगण्याचे वतनदार करीत, असे अनेक समकालीन कागदांवरून दिसून येते.

दुसरा प्रश्न म्हणजे- राजा-वतनदार-रयत यांचे परस्परसंबंध शिवकालात कशा प्रकारचे होते? सभासद या शिवाजी राजाच्या समकालीन शिवचरित्रकाराने या प्रश्नाचे उत्तर आपल्या बखरीत दिले आहे. सभासद हा कोणी सामान्य बखरकार नव्हता. शिवाजीच्या प्रशासन-व्यवस्थेतील तो एक नामजाद अधिकारी होता. त्याच्या विधानांचं प्रत्यंतर पुरावा समकालीन विश्वसनीय ऐतिहासिक कागदपत्रातूनही येतो. शिवाजी हा एकाच वेळी वतनदारांचा आणि रयतेचाही राजा होता. वतनदारांना त्याने त्यांच्या कर्तव्याची वेळोवेळी जाणीव करून दिली आहे. शिवपूर्वकालात वतनदारांचा जो मनमानी कारभार चालला होता आणि ज्याची कबुली भीमसेन बुऱ्हाणपुरीनेही दिली आहे, त्यास शिवाजी राजाने हा मुलूख ताब्यात आल्यावर पायबंद घातला. ''मिरासदार, इनाम इजारतीने मनास मानेसारखे आपण घेत होते ते सर्व अमानत करून जमीनदारास गल्ला व नख्त गाव पाहून देशमुखास व देशकुलकर्णी यास व पाटील कुलकर्णी यांसि हक्क बांधून दिला.'' (सभासद पृ. २७)

रयतेकडून किती सारा वसूल करावयाचा हे देखील निश्चित केले असल्याचे आढळून येते. 'राजभाग पचादुई' या तत्त्वानुसार एकूण उत्पन्नाच्या पाच हिश्शांपैकी तीन हिस्से रयतेचे आणि दोन सरकारचे असे प्रमाण ठरविले होते. हे प्राचीन परंपरेला सामान्यत: धरूनच होते. रयतेचे पालग्रहण कसे करावे, यासंबंधीचे विवेचन या ग्रंथाच्या पूर्वभागात आलेच आहे. ''गावचा गाव, रयतेची रयते, कारकुनाचे कमावीस पाहून रयतेपासून वसूल पीकाचे पीकावर घ्यावा. मुलखात जमीदार, देशमुख व देसाई यांचे जप्तीखाली कैदेत रयत नाही. याणी 'साहेबी' करून नागवीत म्हटल्याने त्यांचे हाती नाही.'' (सभासद पृ. २६) असे रयतेसंबंधीचे राजाचे धोरण बखरकाराने स्पष्ट केले आहे. ''आपल्याला असे सांगण्यात आले'' (We are told) असे प्रास्ताविक करून रयत आणि राजा यासंबंधी विधान करणाऱ्या डॉ. फ्रायर याच्या लिखाणावर विसंबून राहून, शिवाजीच्या राज्यात रयतेची पिळवणूक होत होती किंवा त्याच्या जुलमामुळे तीन चतुर्थांश जमीन 'पडीक' होती असे मानणे इतिहासाला धरून होणार नाही. मराठी मुलखात, मध्ययुगात ग्रामसंस्था इतक्या बळकट होत्या की, दिवाण सत्तेला म्हणजे राज्यसत्तेलाही त्यांचे निर्णय फिरवता येत नसत. गावावर एखादा वतनदार लादणे, गावच्या वतनाची विल्हेवाट गावकऱ्यांच्या संमतीशिवाय लावणे, राजसत्तेलाही शक्य नसे. अशा या देशातील रयत जमीनदार अथवा राजा यांच्याकडून अन्यायकारक वर्तणूक सहन करणे संभवनीय नव्हते.

थोडक्यात, शिवकालात राजा-वतनदार-रयत यांचे परस्परांशी संबंध सहकार्याचे होते, परस्परांच्या अधिकारकक्षांचा आदर करणारे असे होते, असे सामान्यपणे मानण्यास प्रत्यवाय नसावा.

शिवकालातील 'चौथ' या मराठ्यांच्या मागणीसंबंधीचे काही गैरसमज दूर करणे आवश्यक आहे. शिवकालाच्या उत्तरार्धात आणि प्रामुख्याने शिवोत्तरकालात परमुलखातील सत्तांनी (ज्याचा उल्लेख मोगलाई असा केला जातो) मराठ्यांपासून अभयदान मिळविण्यासाठी दिलेली एक प्रकारची खंडणी म्हणजे 'चौथ' अथवा 'चौथाई' असे म्हणता येईल.

सुरतेच्या दक्षिणेस सुमारे साठ मैलावर असलेला रामनगर (आताचे धरमपूर) संस्थानचा कोळी राजा पोर्तुगिजांकडून त्यांच्या दमण भागाच्या संरक्षणासाठी खंडणी म्हणून तेथील उत्पन्नाचा काही भाग, कदाचित एक चतुर्थांश वसूल करीत असे. पोर्तुगीज त्याला 'चवथिया राजा' म्हणत. पुढे रामनगर शिवाजी राजांकडे आल्यानंतर त्यांनी पोर्तुगिजाकडे चौथची मागणी केली व त्यासाठी दीर्घकाल चर्चा झाली. ही प्रथा इतर जिंकित राजांना देखील लागू करण्यात आली. (पहा प्रकरण ५, पृ. १३८-१४१). थोडक्यात 'चौथ' या प्रथेचा शिवाजीराजा हा निर्माता नाही, त्यांनी पोर्तुगिजाकडून आलेली ही प्रथा चालू केली.

'सरदेशमुखी' म्हणजे स्वराज्याच्या मुलखातून राजाच्या खर्चासाठी गावच्या वसुलीपैकी दिलेला एक दशांश हिस्सा होय. सतराव्या शतकात कोकणातील देसाई असा हक्क वसूल करीत असत. देसायांचा मुलूख आपल्या ताब्यात आल्यावर शिवाजी राजाने ती

प्रथा चालू ठेवली.

ताराबाई अथवा शाहू यांनी, प्रा. हबीब म्हणतात, त्याप्रमाणे औरंगजेबाकडून 'देशमुखी'ची नव्हे तर 'सरदेशमुखी'ची मागणी केली आहे, म्हणजेच स्वमुलखातील-स्वराज्यातील एकूण वसुलाच्या एक दशांश हिश्शाची मागणी केली आहे. मोगलांकडून आणलेल्या तीन प्रसिद्ध स्वराज्याच्या सनदा म्हणजे, ''चौथ, सरदेशमुखी आणि बाबती'' या होत. स्वराज्याच्या उत्पन्नाच्या या प्रमुख बाबी होत्या. तसेच प्रा. हबीब यांनी केवळ आझाद बिलग्रामी यांच्या 'खिजाना-इ-अमिरा' या फारसी ग्रंथावर आधारित पेशव्यांच्या जमीनदारीच्या हव्यासासंबंधी केलेल्या विधानास इतरत्र कोणताही बळकट पुरावा आढळत नाही. पेशव्यांनी राजाचे जमीनदार (परगण्याचे अधिकारी देशमुख-देशपांडे) गावचे छोटे-मोठे वतनदार (पाटील, कुलकर्णी, चौगुले इत्यादी) इत्यादी वतनदार मंडळी नेस्तनाबूत केली असे म्हणणे म्हणजे पूर्वापार चालत आलेली ग्रामसंस्थाच पेशव्यांनी मोडून काढली असे होईल. पेशवे महत्त्वाकांक्षी होते, ग्रामसंस्थेत वतनदारांना कसे प्रतिष्ठेचे स्थान होते याची त्यांना पूर्ण कल्पना असल्याने, 'देशमुखी, सरदेशमुखी, देशपांडेपण' नवीन मुलखात मिळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला असला तर त्यात काही अस्वाभाविक नव्हते.

प्रा. इरफान हबीब यांनी उपस्थित केलेला तिसरा प्रश्न म्हणजे शिवाजी राजाने लष्कराला दिलेली वागणूक. शिवाजी राजा हा शिस्तीचा भोक्ता होता. प्रारंभीच्या काळात त्याच्या सैन्यात प्रामुख्याने मावळातील शेतकरी, कातकरी, जेधे करिन्यात म्हटल्याप्रमाणे, 'हिम्मत धरून मऱ्हाष्ट राज्य,' निर्माण करण्याच्या उच्च ध्येयाने प्रेरित होऊन 'स्वराज्या'च्या उद्योगात सामील झाले होते. ते गरीब होते (naked, starved) होते, पण पुंड (rascals) किंवा केवळ हलक्या जातीचे होते असे म्हणता येणार नाही. शिवाजीच्या मृत्यूनंतरही, या शिवाजी राजाच्या मावळ्यांनी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव इत्यादींच्या नेतृत्वाखाली औरंगजेबाच्या बलाढ्य सत्तेशी सतत पाव शतक जो निकराचा लढा दिला; आणि 'मराठ्यांची सत्ता' नष्ट करण्याचे त्याचे स्वप्न कसे धुळीस मिळविले, हा स्वातंत्र्यसंग्रामाच्या लढ्याचा इतिहास सर्वश्रुतच आहे. लष्कराने रयतेस कसलीही तसवीस अथवा उपद्रव देता कामा नये, या बाबतीत शिवाजी राजाने आपल्या सैनिकांना कशी जबर ताकीद दिली होती याची चर्चा मागे आलीच आहे. लष्कराच्या धामधुमीत कुराणाची प्रत अथवा स्त्रिया हाती आल्यास त्याबाबत शिवाजी राजा आणि त्याचे सैनिक किती सभ्यतेने आणि आदराने वागत असत, याची कबुली मुघली इतिहासकार खाफीखान यानेच दिली आहे.

नाईक या सर्वांत खालच्या लष्करी अधिकाऱ्यापासून ते सरनोबत या सर्वश्रेष्ठ लष्करी अधिकाऱ्यापर्यंत सैन्याची बांधणी करण्याची प्रथा प्रथमच, मराठी राज्यात शिवाजी राजामुळे आली. सैन्याच्या अधिकाऱ्यांना शिवपूर्वकालात 'मोकासे' देण्याची (सैन्यउभारणी आणि निर्वाहासाठी जमिनीचे उत्पन्न लावून देण्याची) पद्धती नष्ट करून त्यांना नख्त पगार देण्याचा पायंडा शिवाजी राजाने पाडला. मराठी लष्कराचा तळ आणि

मुघली लष्करी तळ यांच्या स्वरूपात जमीन-अस्मानाचे अंतर होते. मुघल छावणीचा डामडौल, भपका, दिमाख शिवाजीच्या छावणीकडे नव्हता. प्रमुख लष्करी अधिकाऱ्यांना देखील साध्या तंबूत राहावे लागे आणि लष्कराला तर उघड्यावरच- खाली धरती आणि वर आस्मान- आपला तळ ठोकावा लागे. लढाईच्या कामात प्रसंगी मंत्रिमंडळातील प्रधानांनाही मोहिमेचे नेतृत्व करावे लागे. वणी-दिंडोरीच्या लढाईत मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे, तर पन्हाळ्याच्या लढ्यात अण्णाजी दत्तो या मंत्र्यांस प्रत्यक्ष भाग घ्यावा लागला होता. सैनिकांचे पगार कमी असले तरी ते वक्तशीर दिले जात असत याची ग्वाही पाँडेचरीचा फ्रेंच अधिकारी फ्रँका मार्तिन याने आपल्या रोजनिशीद्वारा दिली आहे. तेव्हा 'लूट नाही, तर पगार नाही' असा शिवाजी राजाचा सैन्याबाबत दंडक होता, हे विधान बरोबर नाही असे म्हणावे लागेल.

सैनिकांना पगाराखेरीज त्यांच्या गुणवत्तेप्रमाणे अथवा विशेष कामगिरीसाठी बक्षिसे दिल्याचीही उदाहरणे आहेत. लष्करी धामधुमीत मिळालेली सर्व धनदौलत, वस्तू सैनिकांना लपवून ठेवता येत नसत. आठ महिन्यांच्या मुलूखगिरीहून परत आल्यानंतर लुटीचा सारा हिशोब त्यांना अधिकाऱ्यासमोर सादर करावा लागत असे, कारण लढाईत मिळालेली लूट ही राजाच्या मालकीची असा अलिखित नियम होता. 'लष्करात बायको, बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील, त्याची गर्दन मारावी. परमुलखात पोर, बायका न धरावी.' अशी सक्त ताकीद लष्कराला दिली होती. 'केवळ शेतावर काम करून अर्धपोटी राहणाऱ्या, परक्याच्या लष्करी चाकरीत लाचारीने राहणाऱ्या, वेठबिगारीत खितपत पडलेल्या असंख्य मावळ्यांना 'उदरनिर्वाहाची नवी दिशा मराठी राजाने लष्कराची उभारणी करून दिली आणि शिवपूर्वकालातील 'नंगे, उपाशी आणि पुंड' अशा लोकांना अन्न, वस्त्र, निवारा देऊन सामाजिक प्रतिष्ठा शिवाजी राजाने मिळवून दिली असेच म्हणावे लागेल.

थोडक्यात, मराठ्यांच्या मोहिमा या केवळ लूटमारीसाठी होत्या, मराठी सत्तेचे अस्तित्वच या लूटमारीवर अवलंबून होते अथवा व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो त्याप्रमाणे 'मराठी राज्य' हे एक 'चोरांचे राज्य' (Robber State) होते, या विधानातील फोलपणा येथवर केलेल्या विवेचनावरून स्पष्ट व्हावा.

मराठी राज्याच्या स्वरूपाविषयी अलीकडे प्रचलित असलेला दुसरा एक प्रवाह म्हणजे या सत्तेच्या सार्वभौमत्वाचा होय. आंद्रे विंक या तरुण डच इतिहासकाराने आपल्या 'लँड ॲण्ड सॉव्हरेन्टी इन इंडिया' (१९८६) या ग्रंथात प्रस्तुत संदर्भात काही प्रश्न उपस्थित करून त्यासंबंधी आपले विचार मांडले आहेत. या ग्रंथावर अलीकडे बरीच उलट-सुलट चर्चा होत आहे ती प्रामुख्याने त्याने मांडलेल्या 'फितना' या संकल्पनेसंबंधी आहे. येथे विशेष तपशिलात न शिरता, आज्ञापत्राचा आधार घेऊन शिवाजी राजाचे 'स्वराज्य' म्हणजे 'राजा आणि वतनदार यांमध्ये विभागलेले एक राज्य' आणि 'स्वराज्य म्हणजे वतनाची प्रतिकृती (replica) अशा स्वरूपाचे असल्याने राज्यात नेहमी 'दावे-दरोडे', 'फांदा-फितवा' होत असत आणि राजाला सर्वस्वी या

वतनदारांवर अवलंबून राहावे लागे असे जे विवेचन केले आहे, त्याचा विचार थोडक्यात करावयाचा आहे. (आंद्रे विंक, पृ. १८३-२०५)

शब्दांचे अर्थ हे नेहमी कालाच्या संदर्भात लावावयाचे असतात. आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्यांनी वतनदारांना 'राज्याचे दायाद' असे म्हटले आहे ते राज्याचे 'वाटेकरी' अशा अर्थाने मुळीच नाही. शिवाजी राजाने स्वराज्यस्थापनेचा जो प्रपंच केला, त्यात वतनदारांनीही आपला कामाचा वाटा उचलला होता, असा 'दायाद' या शब्दाचा अर्थ येथे अभिप्रेत आहे. प्रस्तुत संदर्भात 'जेधे करिना' या मावळातील एका प्रमुख देशमुखाने शिवाजी राजाच्या स्वराज्यबांधणीच्या कार्यात कसे साहाय्य केले यासंबंधी आलेली माहिती विचारात घेणे आवश्यक आहे. ''साहेब (शिवाजी राजा) कामासाठी आपण वतनास पाणी सोडले'' असे वचन देऊन जेधे देशमुख स्वराज्याच्या कार्यासाठी कटिबद्ध झाले आणि शिवाजी राजाने त्यांना आश्वासन दिले की, ''फते जालियावरी तुमचे सर्वश्वे उर्जित करून देऊ.'' जेध्यांनी मावळातील सर्व देशमुखांना एकत्र आणून राजाचा हा संदेश त्यांच्यापर्यंत पुढील शब्दांत पोहोचविला.

> ''हे मऱ्हाष्ट राज्य आहे. अवघियानी हिम्मत धरून जमाव घेऊन राजश्री-स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेने शेवा करावी यैश्या हिमतीच्या गोष्टी सांगितल्या.'' (शिवचरित्र प्रदीप, जेधे करिना, पृ. ४३)

या उताऱ्यावरून वतनदार मंडळी ही 'महाराष्ट्र राज्य' निर्माण करण्यासाठी सर्वशक्तिनिशी शिवाजी राजाला मिळाली ती ''राज्याचे आपण वाटेकरी होऊ'' या भावनेने नव्हे, तर स्वराज्याच्या या प्रचंड उद्योगात आपण देखील आपला 'खारीचा वाटा' उचलला पाहिजे या सेवावृत्तीने होय. शिवाजी राजाने त्यांना फक्त एकच आश्वासन दिले होते आणि ते म्हणजे, स्वराज्याचे काम फते झाले म्हणजे तुमचे वतन चालवू, नष्ट करणार नाही.

शिवाजी राजे, स्वराज्य प्राप्तीनंतर आपल्या वचनाला जागले; त्यांनी वतनसंस्था नष्ट केली नाही, तर तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा आणि प्रशासनाच्या कार्यासाठी तिचा योग्य तो उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण जीवनात रुजलेली ही वतनसंस्था म्हणजे ती त्या काळाची एक गरज होती. अपुरी दळणवळणाची साधने, दुर्गम प्रदेश; यामुळे नव्याने निर्माण होऊ घातलेली ही मराठी सत्ता मराठी मुलखाच्या कानाकोपऱ्यात स्थिर करण्यास मध्ययुगात ही संस्था फार उपयुक्त आणि सोयीची होती. लष्कराच्या बाबतीत मात्र शिवाजी राजाला पूर्वीची पद्धती पार बदलावयाची होती. त्यामुळे लष्करी चाकरीसाठी पूर्वी जे 'मोकासे' दिले होते ते नष्ट करण्याचा उपक्रम त्यांनी हाती घेतला; पण सनदी वतनांचे मात्र नूतनीकरण करून दिले. प्रसंगी आवश्यकतेनुसार नवी वतनेही निर्माण केली; आणि या साऱ्यांना, 'अवघे धरू सुपंथ' या न्यायाने स्वराज्याच्या प्रशासनात गुंतविले. वतनदारांमध्ये दोष आहेत म्हणून त्यांची वतने नष्ट करावयाची असा सरधोपट मार्ग शिवाजीने स्वीकारला नाही. 'वतनदार' ही एखादी

व्यक्ती जुलमी असेल, पण 'वतन' संस्था ही श्रेष्ठ होती, उपयुक्त होती. शिवाजी राजाच्या प्रशासनाचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल की, त्यांनी प्रशासन हे 'व्यक्तिनिष्ठ' न ठेवता 'संस्थानिष्ठ' ठेवले आणि म्हणूनच त्याला मध्ययुगातील अलौकिक बुद्धिमत्तेचा रचनात्मक प्रशासक (constructive genius) असे इतिहासकार म्हणतात. वतनदारांविषयी शिवाजी राजाचे धोरण सांगताना आज्ञापत्रकार म्हणतो, ''दोष या लोकांत आहेत म्हणून केवळ यांचा द्वेष करावा, वतने बुडवावी म्हणता हाही परम अन्याय... यांस स्नेह आणि दंड या दोहोंमध्ये निक्षून ठेवावे लागतात.''

वतनदाराविषयी आज्ञापत्रकाराने मांडलेल्या मताचा विचार संदर्भ सोडून करता कामा नये. 'वतनदार' या प्रकरणात आज्ञापत्रकाराने प्रारंभीच्या म्हणजे शिवपूर्वकालात वतनदार कसे वागत होते हे सांगितले आहे, आणि या बेताल वतनदारांना वठणीवर कसे आणावयाचे आणि त्यांचे उच्चाटन न करता स्वराज्यासाठी त्यांचा उपयोग कसा करून घ्यावयाचा हे शिवकालातील मराठी सत्तेचे धोरण या प्रकरणाच्या उत्तरार्धात सांगितले आहे. 'देशनायक', 'त्यास साधारण गणावे असे नाही, हे लोक म्हणजे राज्याचे 'दायाद'च आहेत', 'राजाची सेवा करावी ही त्यांची बुद्धी नाही', 'दावे दरवडे करावे' इत्यादी शब्दप्रयोग हे आज्ञापत्रकाराने शिवपूर्वकालातील वतनदारांचे वर्णन करताना काढले आहेत. अशा या वतनदारापासून 'अखंड सावधानतेचे' धोरण शिवाजी राजाने अवलंबिले होते.

जावळीचे चंद्रराव मोरे अथवा शृंगारपुरीचे सुर्वे हे कोकणातील वतनदार स्वत:ला राजे म्हणवून घेत असत. मोऱ्यांच्या बखरीत, 'कायमचे राजे कोण' यासंबंधी जो मजकूर आला आहे तो म्हणजे आंद्रे विंक यांच्या 'स्वराज्य म्हणजे वतनाची नक्कल अथवा प्रतिकृती' या सिद्धांताला दिलेले एक उत्तरच ठरावे. आपल्या स्वराज्याच्या कामात अडथळे निर्माण करणाऱ्या वतनदारांना शासन करण्याचे शिवाजी राजाचे धोरण होते. देश आणि कोकण यांना जोडणारा जावळीचा प्रदेश आपल्याकडे असावा आणि मोऱ्यांनी विजापूरकरांचा पक्ष सोडून आपल्या स्वराज्याच्या कार्यात सामील व्हावे या उद्देशाने शिवाजी राजाने त्यांना निरोप पाठविला. ''तुम्ही मुस्तफद (कायमचे) राजे म्हणविता, राजे आम्ही. आम्हा श्रीशंभूने राज्य दिधले आहे. तर तुम्ही राजे न म्हणावे. आमचे नौकर होऊन आपला मुलूख खाऊन हामराहा चाकरी करावी. नाही तर बदफैल करून फंद कराल, तर जावळी मारून तुम्हांस कैद करून ठेवू.'' ऐशी पक्की इशारत लिहिली. यावर मोऱ्यांचा जबाब असा, ''तुम्ही काल राजे जाहाला, तुम्हांस राज्य कोण दिधले? मुस्तफद राजा आपल्या घरी म्हटलियावर कोण मानितो?... आम्ही कोकणचे राजे... पातशहाने राजे किताब दिला.'' (मराठी रियासत, शककर्ता शिवाजी, पृ. ४५)

ही वतनदार, जहागीरदार मंडळी आपली 'सार्वभौम सत्ता' मानावयास कुरकुर करतील, कारण त्यांना एकच सार्वभौम सत्ता माहीत होती आणि ती म्हणजे सुलतानांची. शिवाजी राजाने हे पुरेपूर ओळखले होते. वतनदारांच्या मनात कायमचे घर करून राहिलेली ही समजूत, भावना दूर करण्याच्या उद्देशानेच शिवाजी राजाने प्रचंड खर्च

करून राज्याभिषेक करवून घेतला. ''या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशहा, मऱ्हाटा पातशहा येवढा छत्रपती जाला ही गोष्ट काही सामान्य जाली नाही.'' (सभासद पृ. ८२) हे साऱ्या जगाला दाखवून दिले. तेव्हा अशा या छत्रपतीने निर्माण केलेले स्वराज्य म्हणजे राजा आणि वतनदार यांच्या भागीदारीतील एक संस्था होती असे म्हणणे अज्ञानमूलक आहे. तेव्हा आज्ञापत्रकाराने म्हटल्याप्रमाणे स्वराज्य म्हणजे 'नूतन सृष्टीच' होती आणि शिवाजी राजा हा तिचा 'सार्वभौम' सत्ताधीश होता.

थोडक्यात, बखर, ऐतिहासिक कागदपत्रे आणि आज्ञापत्र यांचा साकल्याने विचार केला तर मराठी राज्य हे केवळ लष्करी सत्ता नव्हती. 'लुटारूं'चे राज्य नव्हते, 'सरंजामशाही नव्हती' अथवा 'वतनाची प्रतिकृती' नव्हती, तर ते प्रामुख्याने शेतकऱ्यांचे, सामान्य जनतेचे राज्य होते असेच निर्धारपूर्वक मानावे लागेल. रामदासांनी म्हटल्याप्रमाणे ज्याचा 'प्रताप आठवावा' असा शिवाजी राजा हा 'बहुत जनांसी आधारू' लोकांच्या कल्याणाकडे, राज्याच्या आर्थिक बळकटीकडे विशेष लक्ष पुरविणारा, 'भद्राय राजते' अशी राजमुद्रा धारण करणारा मध्ययुगातील एक रचनात्मक कार्य करणारा बुद्धिमान 'राजा होता' हे आपणास मान्य करावेच लागेल.

■■

परिशिष्ट (प्रकरण ८)

समर्थ रामदासांच्या शब्दांत शिवाजी राजा

तुळजाभवानीस साकडे

"एकचि मागणें आतां। द्यावें ते मजकारणें। तुझा तूं वाढवी राजा। सीघ्र आम्हांचि देखतां।।१।। दुष्ट संहारिले मागें। ऐसे उदंड ऐकतों। परंतु रोकडे कांहीं। मूळ सामर्थ्य दाखवी।।२।। देवांची राहिली सत्त्वे। तू सत्त्व पाहिसी किती। भक्तासी वाढवी वेगीं। इच्छापूर्ण परोपरी।।३।। रामदास म्हणे माझें। सर्व आतुर बोलणें। क्षमावे तुलजे माते। इच्छा पूर्णचि ते करीं।।४।।

लोककल्याण राजा

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू।
अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी।।१।।
परोपकाराचिया राशी। अखंड घडती जयासी।
तयाचे गुण महत्त्वासी। तुळणा कैंची।।२।।
नरपति हयपति गजपति। गडपति भूपति जळपति।
पुरंदर आणि छत्रपति। शक्ती पृष्ठभागी।।३।।
यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत।
पुण्यवंत नीतिवंत। जाणता राजा।।४।।
आचारशील विचारशील। दानशील धर्मशील।
सर्वज्ञपणे सुशील। सकळां ठायी।।५।।
धीर उदार गंभीर। शूर क्रियेसी तत्पर।
सावधपणें नृपवर। तुच्छ केले।।६।।

देवधर्म गोब्राह्मण। करावया संरक्षण।
हृदयस्थ झाला नारायण। प्रेरणा केली।।७।।
या भूमंडळाचे ठायी। धर्मरक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्रधर्म राहिलीं कांहीं। तुम्हा करितां।।८।।
कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकांस धाक सुटले।
कित्येकांस आश्रय जाले। शिवकल्याण राजा।।९।।
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति। सांगणे काय तुम्हां प्रति।
धर्मस्थापनेची कीर्ति। सांभाळली पाहिजे।।१०।।
उदंड राजकारण तटले। तेणें चित्र विभागले।
प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजें।।११।।

-समर्थांचे शिवाजीराजास पत्र

निवडक संदर्भ ग्रंथ आणि त्यांचे संक्षेप

(सूचना : प्रस्तुत ग्रंथात तळटीपा अथवा प्रकरणाशेवटी संदर्भ दिलेले नाहीत. ग्रंथाच्या मजकुरातच कंसातच असे संदर्भ संक्षेप दिले आहेत. संदर्भ ग्रंथ हे प्रामुख्याने साधन ग्रंथ व काही प्रसिद्ध सिद्ध ग्रंथ आहेत याची कृपया नोंद घ्यावी.)

संस्कृत

परमानंद, कविंद्र	शिवभारत (सं.) स.म. दिवेकर, भा.इ.सं.मं.पुणे, १९२७
पिंड्ये, जयराम	राधामाधव विलास चंपू (सं.) वि.का.राजवाडे, पुणे १९२२
वेंकटाध्वरी	विश्वगुणादर्शचंपू, निर्णयसागर प्रेस, मुंबई, १९२३
हणुमंते, रघुनाथ	'राज्यव्यवहार कोश' (शिवचरित्र प्रदीप) (सं.) द.वि.आपटे; स.म.दिवेकर, पुणे, १९२५

मराठी

अमात्य, रामचंद्रपंत,	आज्ञापत्र, (सं.) ग.ह.खरे, स.रा.भिडे, पुणे, १९६०
खरे ग.ह. (सं)-	ऐतिहासिक फार्सी साधने भाग १ ते ५, पुणे, १९३४-१९६४
जोशी शं.ना.,	मराठेकालीन समाजदर्शन, पुणे १९६०
भा.इ.सं.मंडळ प्रकाशने	शिवचरित्र प्रदीप (सं.) द.वि. आपटे, स.म. दिवेकर, पुणे, १९२५
	शिवकालीन पत्रसारसंग्रहखंड १-२ (सं.) द.वि. आपटे, न.चिं. केळकर, पुणे १९३०
	शिवचरित्र साहित्यखंड १ ते १४, (विविध संपादक) पुणे, १९२६-१९८३
तुकाराम	तुकारामाची गाथा २ भाग (सं.) पु.म. लाड, मुंबई, १९५५
राजवाडे वि.का. (सं.)	मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १-२२, (विविध ठिकाणी प्रसिद्धी काळ १८९८ ते १९१८) शिवकालास उपयुक्त खंड- ८,१५,१६,१७,१८,२०,२१.
सभासद कृष्णाजी अनंत	शिवछत्रपतींचे चरित्र (सं.शं.ना.जोशी,) पुणे १९६०
सरदेसाई गो.स.	पेशवे दप्तर, खंड ३१ जमाव, पुणे, १९३३
केळकर न.चिं. आणि	शिवचरित्र निबंधावली, पुणे, १९२९
आपटे द.वि. (सं.)	शिवाजी निबंधावली, पुणे, १९३०.

इंग्रजी

ग्रँट डफ	ए हिस्ट्री ऑफ द मराठाज (सं.एस.एम. एडवर्डस् लंडन १९२१.
गुणे व्ही.टी.	द ज्युडिशियल सिस्टीम ऑफ द मराठाज, पुणे. १९५३
बर्नियर एफ.	ट्रॅव्हल्स इन मुघल एम्पायर (१६५६-१६८८) लंडन, १९१४
फ्रायर जॉन	ए न्यू अकौंट ऑफ ईस्ट इंडिया ॲण्ड परशिया, तीन भाग सं. हकलुयात सोसायटी, लंडन, १९०९.
ट्रॅव्हर्नियर जे.बी.	ट्रॅव्हल्स इन इंडिया, १६७६ ऑक्सफर्ड प्रेस, लंडन, १९२५
रानडे एम.जी.	राईज ऑफ द मराठा पॉवर, रिप्रिंट. मुंबई, १९६१
सेन एस.एन. (सं.)	फॉरेन बायॉग्राफीज ऑफ शिवाजी, कलकत्ता, १९२७. पुनर्मुद्रित १९७७.
(सं)	इंडियन ट्रॅव्हल्स ऑफ थिवेनो ॲण्ड कॅरेरी, न्यू दिल्ली, १९४९, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम्स ऑफ द मराठाज, कलकत्ता, १९२५
परांजपे बी.जी. (सं)	इंग्लिश रेकॉर्ड्स ऑन शिवाजी पुणे, १९३१ (भा.इ.सं.मंडळ)
बाळकृष्ण	शिवाजी द ग्रेट, ४ था भाग, तारापोरवाला, मुंबई, १९३२
सरदेसाई जी.एस.	न्यू हिस्ट्री ऑफ द मराठाज, भाग १, मुंबई, १९४६
	मेन करंट्स ऑफ मराठा हिस्ट्री, मुंबई, १९२३
सरकार यदुनाथ	शिवाजी ॲण्ड हिज टाईम्स, आवृत्ती ६, कलकत्ता, १९६१
	हाऊस ऑफ शिवाजी, आवृत्ती ३, कलकत्ता, १९५५

राऊलिन्सन एच.जी. ॲण्ड पटवर्धन आर.पी. ए सोअर्स बुक ऑफ मराठा हिस्ट्री, मुंबई, १९२९ (सं)

संक्षेप

(कागदपत्रांचे खंड असतील तर खंड, पत्र आणि आवश्यक तेथे पृष्ठ दिले आहे.)

ऐ.फा.सा.	ऐतिहासिक फार्सी साहित्य.
ऐ.सं.सा.	ऐतिहासिक संकीर्ण साहित्य.
भा.इ.सं.मं.	भारत इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक इ.
इ.रे.	इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी.
सरकार	शिवाजी ॲण्ड हिज टाईम्स, हाऊस ऑफ शिवाजी.
राजवाडे,	मराठ्यांच्या इतिहासाची साधने
पे.द.	पेशवा दप्तर
शि.च.सा.	शिवचरित्र साहित्य.
वकाय	सिलेक्टेड वकाय ऑफ द डेक्कन
१० सभासद	शिवछत्रपतींचे चरित्र (सं.जोशी शं.ना.)

■■

सूची

■■

शिवकालीन महाराष्ट्र

अ. रा. कुलकर्णी

शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राचा मानदंड! त्यांच्या पराक्रमाची गाथा अनेक चरित्रकारांनी आजवर गायिलेली आहे आणि पुढेही गातील. न्यायमूर्ती रानडे यांनी 'मराठी राष्ट्राची निर्मिती' ही शिवाजीराजाची थोर देशसेवा असा सिद्धांत मांडला. डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी त्यांच्या प्रशासनाचे आणि लष्करी पद्धतीचे विवेचन केले. परंतु 'मराठी राज्य' आर्थिकदृष्ट्या कसे सबल होईल यासाठी शिवरायांनी जे प्रयत्न केले त्याचा आजवर साकल्याने फारसा विचार झाला नाही.

'शिवकालीन महाराष्ट्र' या ग्रंथात, समकालीन साधनांच्या साहाय्याने १७ व्या शतकातील आर्थिक जीवनाचा विचार प्रथमच इतक्या विस्तृतपणे मांडला आहे. मराठ्यांचे राज्य म्हणजे लुटारूंचे राज्य अथवा लष्करी राजवट अथवा सरंजामशाही नसून ते 'बहुत जनांसी आधारू' असे लोकांचे राज्य होते, त्या राज्याच्या राजमुद्रेत 'भद्राय राजते' अशी अक्षरे होती, आणि 'धाकुटपणापासून माणसाचे माणस वळखतात' असे अभिमानाने म्हणणाऱ्या 'स्वामी'ने निर्माण केलेले ते 'कल्याणकारी' राज्य होते त्याचा विस्तार छोटासा असला तरी 'आर्थिकदृष्ट्या' त्याला स्थैर्य येण्यासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नांचे येथे विवेचन केले आहे आणि हेच या ग्रंथाचे आगळे-वेगळेपण आहे.

राजहंस प्रकाशन / पुणे